12-10-2009 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

APR/ 11:00

10-12-2009 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

APR/ SBT/ KTG/ 11:00

<u>सभापतीस्थानी - मा.सभापती</u>

पृ.शी./मु.शी. मंत्र्यांचा परिचय

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, डॉ.पतंगराव कदम यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

. . . .अे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

कोकण व पश्चिम महाराष्ट्रात मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेले नुकसान

(1)* 278 श्री.सुभाष चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.राजन तेली , श्री. संजय केळकर , श्री.चरणसिंग सप्रा , श्री. मधुकर चव्हाण , श्री. रामनाथ मोते , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. हेमंत टकले , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री.अरुण गुजराथी : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कोकण व पश्चिम महाराष्ट्रात माहे ऑक्टोबर, 2009 च्या सुमारास मुसळधार पावसामुळे या विभागातील अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळित होऊन मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शासनाने या प्रश्नाबाबत सर्वे करुन नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना कोणती आर्थिक मदत दिली आहे वा देण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश सोळंके, श्री.नारायण राणे यांच्याकरिता : (1) होय.

(2) माहे ऑक्टोबर, 2009 च्या पहिल्या आठवड्यात (दिनांक 30 ऑक्टोबर, 2009 ते दिनांक 6 ऑक्टोबर, 2009) झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी दिनांक 9 ऑक्टोबर, 2009 रोजी आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे.

"दुसऱ्या क्रमांकाच्या उत्तरामध्ये "दिनांक 30 ऑक्टोबर, 2009" ऐवजी दिनांक 30 सप्टेंबर 2009" असे वाचण्यात यावे."

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय,आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांचे जे नुकसान झालेले आहे, त्याचे सर्व्हेक्षण पूर्ण झालेले आहे काय ? एकंदर शेतकऱ्यांची गणसंख्या किती आहे ? तसेच कोकणासाठी किती निधी देणार आहात ? पश्चिम महाराष्ट्रासाठी किती निधी देणार आहात ? तसेच या मदत कार्याची पूर्तता करण्यासाठी ही रक्कम देण्याकरता शासनाला किती कालावधी लागणार आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, याबाबतीत जिल्हाधिकारी स्तरावर आणि कृषी विभागाच्या स्तरावर त्यांनी सर्व्हेक्षणाचे काम पूर्ण करणे अपेक्षित आहे.या भागांमध्ये झालेल्या अतिवृष्टीसाठी मदत देण्याकरता शासनाच्या माध्यमातून दि.7 सप्टेंबर 2009 रोजी सर्व आयुक्तां -

. . . .अे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.278 . . . .

श्री.प्रकाश सोळंके . . . .

कडे 24 कोटी 16 लाख रुपयांचा निधी पाठविण्यात आलेला आहे. अशा वेळी तेथे जे नुकसान झालेले आहे, त्याबाबतीत जे पंचनामे झालेले आहेत, त्याच्या आधारावर जिल्हाधिकारी यांनी निधीचे वाटप करावे असे अपेक्षित आहे.

श्री.राजन तेली : सभापती महाराज, शासनाने शेतकऱ्यांना जी मदत जाहीर केलेली आहे, त्या बद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. पण ती मदत अद्यापर्पंतशेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली नाही, ती मदत त्यांच्यापर्यंत केव्हा पोहोचणार आहे? माझा दुसरा प्रश्न असा आहे की,कोकणामध्ये वेळोवेळी अशा प्रकारची अतिवृष्टी होत असते. त्यामुळे काही ठिकाणी काही गावे कायम स्वरुपात बाधित झालेली आहेत. अशा गावांसाठी कायम स्वरुपी उपाययोजना करणार आहात काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, याबाबतीत शासनाने तातडीने कारवाई केलेली आहे हे अगोदरच्या उत्तरामध्ये सांगितले आहे. त्यानुसार दि.7 सप्टेंबर 2009 रोजी 24 कोटी 16 लाख रुपयांचा निधी सर्व आयुक्तांकडे देण्यात आलेला आहे. कृषी विभागाकडून जसजसे नुकसानीच्या पंचनाम्याचे रिपोर्ट प्राप्त होतील, त्याप्रमाणात निधीच्या वाटपाचे काम सुरु आहे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, फयान वादळामुळे बाधित झालेल्यांना ज्याप्रमाणे मदत देण्यात आली आहे,त्याप्रमाणे ऑक्टोबरमध्ये पडलेल्या पावसामुळे जी घरे पूर्णपणे जमीनदोस्त झालेली आहेत अशा घरांसाठी देखील नुकसान भरपाई देणार आहात काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, होय. यासाठी जो जी.आर.निगर्मित केलेला आहे, त्या मध्ये घरांच्या दुरुस्तीसाठी आणि त्यांच्या पुर्नबांधण्यासाठी पक्क्या घरांना 35 हजार रुपये, कच्च्या घरासाठी प्रति घर 10 हजार रुपयांची मदत अनुज्ञेय आहे. जर नुकसान कमी झाले असेल तर कमी मदत मिळेल. त्यांना अशा प्रकारे अनुदान दिले जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय,जेव्हा-जेव्हा कोकणाच्या बाबतीत प्रश्न उपस्थित होतो, तेव्हा आंब्याच्या झाडांचा प्रश्न येतो. आजपर्यंत आंब्याच्या झाडांच्या बाबतीत प्रति झाड याप्रमाणे कधीही नुकसान भरपाई दिलेली नाही. माझा प्रश्न असा आहे की, आंब्याच्या झाडासाठी आणि काजूच्या झाडासाठी प्रति झाड याप्रमाणे राज्य शासनाकडून नुकसान भरपाई दिली जाईल काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, मदत करण्याच्या बाबतीत जे

. . . .अे-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.278 . . . .

श्री.प्रकाश सोळंके . . . .

निकष आहेत, ते केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे सी.आर.एफ.आणि एन.सी.सी.एफ.यांच्यावर आधारित आहेत. त्याप्रमाणे आपण दर हेक्टरी मदत करतो. त्यामुळे याठिकाणी आंबा, सुपारी या झाडांच्या बाबतीत सांगावयाचे तर प्रति झाड याप्रमाणे मदत देण्याची बाब आपल्याला मान्य करता येणार नाही.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : माननीय मंत्री महोदयांनी कोकणामध्ये अतिवृष्टीमुळे जे नुकसान झालेले आहे, त्याबाबतीत माहिती दिली आहे. प्रत्येक घटकाचे नुकसान झालेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, त्याठिकाणी जे नुकसान झालेले आहे, यासंदर्भात हेक्टरवाईज् किती नुकसान भरपाई दिलेली आहे ?

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक 278.....

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

शासनाचे जुने नॉर्म्स ठरलेले आहेत त्याप्रमाणे मदत देण्यात अलेली आहे काय? सद्य:स्थिती लक्षात घेऊन या ठिकाणी हेक्टरी किती अनुदान दिलेले आहे यासंबंधीची माहिती देण्यात यावी.

श्री. प्रकाश सोळंके : शेती पिके, फळ पिके आणि वार्षिक लागवडीची पिके यांच्या नुकसान भरपाईसाठी कोरडवाहू क्षेत्रासाठी प्रती हेक्टरी दोन हजार रुपये, आश्वासित जलसिंचन क्षेत्रासाठी प्रती हेक्टरी चार हजार रुपये याप्रमाणे मदत दिली जाते. त्याचप्रमाणे बहू वार्षिक पिकांच्या नुकसान भरपाईसाठी प्रती हेक्टरी सहा हजार रुपये या दराने मदत अनुज्ञेय आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी आता उत्तरात असे सांगितले की, झाडांच्या नुकसानभरपाईच्या संदर्भात हेक्टरी मदत करण्यात येते. काल किंवा परवाच्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये हेक्टरी कमाल दहा हजार रुपये मदत देण्यात येते असे लिहिलेले आहे. परंतु प्रत्यक्षात झाडेनिहाय पैसे दिले जात आहेत. एका झाडामागे 125 रुपये दिले जातात. मी परवाच्या दिवशी फयान वादळामुळे झालेल्या नुकसानीच्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांना यासंदर्भात प्रश्न विचारला होता. पण त्यांनी उत्तर दिले नाही. प्रत्यक्षात हेक्टरी दहा हजार रुपये मदत दिली जात नाही, त्याच्या ऐवजी झाडे मोजून जी रक्कम कमी असेल ती दिली जाते, हे प्रत्यक्षात घडत आहे. तेव्हा याबाबतीत सुधारणा करुन हेक्टरी दहा हजार रुपये नुकसानभरपाई देण्याचे जाहीर केलेले आहे त्याप्रमाणे मदत देण्यात येईल काय? याबाबतचे स्पष्ट उत्तर देण्यात यावे.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, दर हेक्टरी नुकसान भरपाई देण्यात येते. 50 टक्क्यापेक्षा जास्त पीकहानी झाली असेल तर ही नुकसानभरपाई देण्यात येते. परंतु दर हेक्टरी मदत अनुज्ञेय असली तरी प्रत्यक्षात जर कमी नुकसान झाले असेल तर त्याप्रमाणे कमी नुकसानभरपाई देण्यात येते.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, 30 सप्टेंबरच्या दरम्यान पडलेल्या पावसामुळे कोकणातील भात शेती आणि अन्य पिकांचे जे नुकसान झालेले आहे त्यासंबंधीचा हा प्रश्न आहे. फयान चक्रीवादळामध्ये देखील मोठी झाडे उद्ध्वस्त झालेली आहेत. त्यासंबंधीची नुकसान भरपाई मिळण्याच्या दृष्टीने काल या सभागृहात चर्चा झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ KTG/

तारांकित प्रश्न कमांक 278

श्री. नारायण राणे...

यांनी या ठिकाणी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे तो असा की, भातशेतीच्या नुकसान भरपाईसाठी हेक्टरी मदत देण्यात येते. मात्र फळबागेच्या संदर्भात नुकसान भरपाई देताना आंबे, नारळ, सुपारी वगैरे झाडांना हेक्टरी मदत दिली जात नाही. एका एकररमध्ये आंब्याची 40 झाडे येतात. म्हणजे एका एकराला जर आता पंधरा हजार रुपये मदत देण्यात येत असेल तर एका झाडाला 150 रुपये मदत मिळेल आणि हे पैसे कमी वाटतात. त्यांचा दुसरा प्रश्न असा आहे की, 20 गुंठयातील पाच झाडांचे नुकसान झाले असेल तर त्या ठिकाणी हेक्टरी मदत देण्याचा प्रश्न येत नाही. एका हेक्टरमध्ये 100 झाडे असतील तर एका झाडाला किती मदत देण्यात येईल त्या प्रमाणे पाच झाडांचे नुकसान झाले असेल तर गुणिले पाच झाडे याप्रमाणे मदत दिली जाते. सभापती महोदय, मी काल उत्तर देतांना सांगितलेले आहे की, यासंबंधी सरकार विचार करीत आहे की, अशी जी झाडे आहेत त्यांना हेक्टरी मदत न देता प्रत्येक झाडामागे रक्कम दिली जावी याचा शासन विचार करीत असून त्याबाबतचा निर्णय नक्की घेण्यात येईल.

=x=

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

SMT/ SBT/ KTG/

राज्यातील अनुसूचित जाती जमातीच्या केंद्रीय आश्रमशाळांना अनुदान देण्याची मागणी

(२) * २१६ श्री. माणिकराव ठाकरे , श्री. सुभाष चव्हाण , श्री. चरणसिंग सप्रा , श्री.सय्यद जमा , श्री. संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक ५१४१६ ला दिनांक २ जून, २००९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जातीच्या केंद्रीय आश्रमशाळांना महाराष्ट्र शासनाच्या आश्रमशाळांप्रमाणे अनुदान मिळण्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून शासनाने वेळोवेळी मागणी करुनही अद्याप ते मिळालेले नसल्याने राज्यातील सुमारे ५ हजाराहून अधिक शिक्षकांचे व ४० हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांचे भवितव्य अंध:कारमय झाले असल्याचे माहे जून, २००९ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय अनुसूचित जातीच्या आश्रमशाळांना महाराष्ट्र शासनाच्या अनुसूचित जातीच्या आश्रमशाळांप्रमाणे अनुदान देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणताच निर्णय घेण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सचिन अहिर श्री.शिवाजीराव मोघे यांच्याकरिता : (१) सदर विषयाबाबतची निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत.

(२) व (३) सदर योजना केंद्र शासन पुरस्कृत असलेने राज्य शासनाने सदरहू शाळांना अनुदान देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आदिवासींसाठी केंद्र शासनाने दिलेल्या अनुदानाच्या आधारावर या सगळया आश्रमशाळा चालत होत्या. त्यामुळे केंद्र शासनाचे या विषयावरील धोरण स्पष्ट करण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर राज्यामध्ये जर अशा प्रकारच्या आश्रमशाळा चालू असतील व त्या आश्रमशाळांमध्ये पूर्णपणे विद्यार्थी असून त्यावेळेपासून त्या संस्था या आश्रमशाळा चांगल्या पध्दतीने चालवीत असतील तर त्या आश्रमशाळांना मदत करण्याच्या दृष्टिकोनातून शासन काही वेगळे धोरण आखणार आहे काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, केंद्र शासनाने एक योजना जाहीर केली आहे अनुदान देऊन काही शाळांना आणि अनुसूचित जातीच्या लोकांसाठी ही योजना जाहीर करण्यात आली आहे. ही योजना जाहीर करीत असताना काही निकष लावण्यात आले आहेत. त्या निकषाच्या आधारावर काही शाळांना मान्यता देण्याचे काम केलेले आहे. एकूणच 288 शाळांचे प्रस्ताव राज्य शासनाकडे प्राप्त झाल्यानंतर राज्य शासनाने या प्रस्तावांना अनुदान मिळावे अशी केंद्र शासनाला शिफारस केली आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केंद्र शासनाने आपल्या निकषानुसार, धोरणानुसार 33 शाळांना मान्यता दिली. काही प्रस्ताव प्रलंबित आहेत. त्याच्या बाबतीतही शासनाच्या स्तरावर पाठपुरावा केला जात आहे जेणेकरुन केंद्र शासनाच्या निकषांच्या माध्यमातून त्यांच्या ग्रँटची मान्यता मिळावी. या व्यतिरिक्त एक प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला की, राज्य शासनाच्या स्तरावर देखील आपण काय करतो ? या व्यतिरिक्त देखील आपण राज्य शासनाच्या स्तरावर 2388 संस्थांना एन.जी.ओ.च्या माध्यमातून अनुदान देत आहोत. या व्यतिरिक्त 271 शासकीय वसतिगृहे शासनाच्या स्तरावर चालविण्याचा प्रयत्न करीत आहोत आणि एक ते सव्वा लाख विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहता कामा नये म्हणून त्यांना अनुदान देऊन राज्य शासन त्यांच्या शिक्षणाची काळजी घेत आहे.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, याबाबतचे प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे केव्हा पाठविले आणि विलंब लागण्याचे कारण काय ? प्रस्ताव पाठविले असल्यास अनुदान मिळण्यासाठी विलंब का लागत आहे ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, हे प्रस्ताव या अगोदर देखील वेळोवेळी पाठविण्याचे काम केलेले आहे. 2004 मध्ये हे प्रस्ताव पाठविण्याचे नेमके निकष काय आहेत यासंदर्भात उच्च न्यायालयामध्ये एक दावा दाखल केला गेला होता. त्याचा निवाडा देत असताना असे सांगण्यात आले की, हे प्रस्ताव पाठविताना निव्वळ सामाजिक न्याय खात्याने न पाठविता शालेय शिक्षण विभागाची सुध्दा मान्यता घ्यावी आणि मग केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवावेत. त्या धर्तीवर जे प्रस्ताव आलेले आहेत ते आधी शालेय शिक्षण विभागाकडे पाठवून मग केंद्र शासनाकडे पाठविण्याचे काम केलेले आहे. केंद्र शासनाचे जे निकष आहेत त्या निकषांच्या धर्तीवर आम्ही त्यासंदर्भात वाट बघत आहोत. त्यांची मान्यता मिळाल्यानंतरच पुढची कार्यवाही करु शकतो.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, अभी मंत्री महोदय ने बताया कि वर्ष 2002 से केन्द्रीय सरकार द्वारा यह योजना चलाई जा रही है. इसी योजना के तहत केन्द्रीय सरकार को प्रस्ताव भेजे गए हैं. उच्च न्यायालय में मामला गया और वहां यह मामला विचाराधीन है. मेरा प्रश्न यह है कि 5 हजार से अधिक शिक्षकों एवम् 40 हजार से अधिक विद्यार्थियों के भविष्य को देखते हुए यह बताए कि वर्तमान में इस मामले में क्या स्थिति है, अनुदान मिलने में क्या तकलीफ है

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 216..... श्री. सय्यद जमा ....

और महाराष्ट्र शासन ने इन शिक्षकों एवम् विद्यार्थियों के भविष्य के बारे में क्या योजना बनाई है ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मुळातच 288 प्रस्ताव आल्यानंतर ते राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविलेले आहेत. हे करीत असताना त्यामध्ये एक अट अशी होती की, शाळा चालू असली पाहिजे. यामध्ये काही संस्थांनी शाळा चालू ठेवून प्रस्ताव पाठविले. या व्यतिरिक्त 105 शाळा अशा आहेत की, त्यांनी कोणतीही मान्यता न घेता आणि शासनाकडे प्रस्ताव न पाठविता शाळा सुरु करण्याचे काम केलेले आहे. या सर्वांची जबाबदारी राज्य शासन घेऊ शकत नाही. परंतु कोणीही शिक्षणापासून वंचित राहता कामा नये म्हणून आपल्या वेगवेगळ्या योजनांच्या अंतर्गत राज्य शासनाच्या माध्यमातून त्या विद्यार्थ्यांना न्याय देत आहोत. परंतु ही केंद्र शासनाची योजना असल्यामुळे केंद्र शासनाची ग्रँट मिळाल्याशिवाय याबाबतीत आपण काही करु शकत नाही. परंतु शासन परत सकारात्मक पाठपुरावा करुन ते वंचित राहणार नाही याची काळजी घेण्याचा प्रयत्न करील.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिले त्यावरुन मला त्यांच्याकडून काही अपेक्षा आहेत. एकूणच या महाराष्ट्रातील शाळा आहेत आणि हे सगळे विद्यार्थी महाराष्ट्रातील आहेत. सगळ्या शाळा फार चागल्या पध्दतीने चालू आहेत असे माझे मत नाही. जर केंद्र शासनाला अनुदान कंटीन्यू करावयाचे नव्हते तर केंद्र शासनाने एवढ्या मोठ्या प्रमाणावर शाळा का दिल्या हे कळत नाही. राज्य शासनाने एवढ्या मोठ्या प्रमाणावर शिफारशी करुन टाकल्या. केंद्र शासन एवढ्या मोठ्या शाळांना अनुदान देऊ शकत नाही ही स्थिती आहे. या सगळ्या विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडावयाचे काय ? यामध्ये आपण ए, बी, सी, डी, अशी वर्गवारी करुन ज्या शाळा चांगल्या चालत असतील, चांगले विद्यार्थी असतील त्यांच्या बाबतीत वेगळा विचार करुन खास बाब म्हणून केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवू शकलो तर एखादवेळी केंद्र शासन त्याचा विचार करील असे मला वाटते. नाही तर हा विषय असाच चालू राहील आणि प्रश्न सुटणार नाही. याबाबतीत राज्य शासनाने गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. याबाबत राज्य शासन विचार करील काय ?

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 216.....

श्री. सचिन अहिर : याबाबत निश्चितपणे विचार केला जाईल. एवढेच नव्हे तर वेळोवेळी आपण छाननी करुन प्रस्ताव पाठविण्याचे काम करतो. यावेळी 27 प्रस्ताव सचिवांच्या मार्फत केंद्र शासनाकडे पाठविण्याचे काम केलेले आहे. एवढेच नव्हे तर सुदैवाने केंद्रातील संबंधित खात्याचे मंत्री देखील महाराष्ट्राचे असल्यामुळे कॅबिनेट मंत्री आणि मी, आम्ही दोघेही मिळून माननीय मंत्रिमहोयांची भेट घेणार आहोत.

यानंतर श्री. खंदारे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.216... श्री.सचिन अहिर....

आणि त्याच्यातून काही चांगला मार्ग निघू शकेल काय याबद्दल शाश्वती देण्याचे प्रयत्न करीत आहोत.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी विचारलेल्या प्रश्नाला माननीय मंत्रिमहोदयांनी अनुकूल स्वरुपाचे उत्तर दिलेले आहे, सकारात्मक दृष्टीकोन ठेवून उत्तर दिलेले आहे. माझा एकच प्रश्न आहे की, या ज्या शाळा सध्या सुरु आहेत त्या अनुसूचित जाती, जमातीच्या आहेत. गेली अनेक वर्षे हा प्रश्न प्रलंबित आहे. अनेक विद्यार्थी आणि शिक्षकांचा हा प्रश्न आहे. त्यांचे जीवन उद्ध्वस्त झालेले आहे. आज या शाळांना केंद्र सरकारकडून अनुदान मिळत नाही आणि राज्य सरकारकडूनही अनुदान मिळत नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे या संस्थांची शिक्षकांना पगार देण्याची ऐपत नाही. म्हणून माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे की, जर केंद्र सरकारकडून या शाळांना अनुदान मिळणार नसेल तर हा प्रश्न सुटणार नाही. शासन हे अनुदान मिळवून देण्याबाबत प्रयत्न करीत आहे ही चांगली बाब आहे. पण केंद्राने या शाळांना अनुदान दिले नाही तर राज्य शासन जसे आदिवासी क्षेत्रात सुरु असलेल्या शाळांना अनुदान देते तसेच या शाळांना देईल काय ? कारण या शाळा चांगल्या पध्दतीने सुरु आहेत. त्यामुळे विद्यार्थी व शिक्षकांचे नुकसान होऊ नये म्हणून राज्य शासन या शाळांना खास बाब म्हणून अनुदान देण्याबाबत विचार करणार आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे केंद्र सरकारकडून अनुदान मिळवून घेण्याची ही योजना होती. म्हणून राज्य शासनाने संस्थांकडून अर्ज मागविण्याचे काम केले आहे. तूर्त राज्य शासन आपल्या योजनेंतर्गत त्या विद्यार्थ्यांना लाभ देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. तूर्त राज्य शासनाकडून अनुदान देण्याबाबतचा निर्णय घेणे योग्य होणार नाही. केंद्र सरकारकडे पाठपुरावा करुन त्या संस्थेला व विद्यार्थ्यांना मदत करण्याचा प्रयत्न करता येईल आणि तसा प्रयत्न शासन निश्चितपणे करील.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चंद्रपूर जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गत सिमेंट ठेवण्यासाठी लाकडी पेट्या खरेदीत मोठ्या प्रमाणात झालेला भ्रष्टाचार

(३) * २१५८ श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गतच्या कामासाठी खरेदी केलेल्या सिमेंट ठेवण्यासाठी जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास प्रकल्पांतर्गत २९ लाख रुपयांच्या लाकडी पेट्या खरेदीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २००९ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे, श्री.जयंत पाटील यांच्याकरित : (१) होय, तथापि ही खरेदी सिमेंट हाताळणी शुल्कामधून जमा झालेल्या रकमेतून करण्यात आली आहे. तसेच सदर खरेदी ही लाकडी पेट्यांची नसून लाकडी प्लॅटफॉर्मची करण्यात आली आहे.

(२) होय. केलेल्या चौकशीनुसार लाकडी प्लॅटफॉर्म खरेदीमध्ये अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे. सदर अनियमिततेस प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, चंद्रपूर हे सकृत दर्शनी जबाबदार असल्याचे आढळून आल्याने त्यांना क्र.मविसे-६५०९/प्र.क्र.१८१/आस्था-२ दि.२७.११.२००९ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे व त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करण्यासाठी विभागीय चौकशीचा प्रस्ताव मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, लाकडी प्लॅटफॉर्म खरेदीमध्ये अनियमितता झाल्यामुळे शासनाने प्रकल्प संचालकांना निलंबित केल्याचे उत्तरात नमूद केलेले आहे. पण या उत्तरामुळे आमचे समाधान होणार नाही. कारण वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संमतीशिवाय एवढया मोठया रकमेची खरेदी होऊ शकत नाही. या अनियमिततेमुळे जवळपास 30 लाख रुपयांचे नुकसान झालेले आहे. या प्रकरणाची मंत्रालय स्तरावरुन वरिष्ठ अधिका-यांमार्फत चौकशी करणे आवश्यक आहे. कारण या खरेदीमध्ये सर्वजण दोषी आहेत. या खरेदीचे पेमेंट मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या सहीने झालेले आहे. त्यांच्या सहीने ऑर्डर इश्यू झालेली आहे. म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, आहरण व संवितरण अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्याविरुध्द शासन कठोर कारवाई करणार काय आणि यामध्ये जे दोषी आढळतील त्यांच्याकडून ही सर्व रक्कम वसूल करणार काय ?

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, याप्रकरणामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा काही दोष नाही. कारण खरेदीच्या एक धनादेश सोडता उर्वरित सर्व धनादेशांवर प्रकल्प संचालकांनी सहया केलेल्या आहेत...

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, माझी उत्तराला हरकत आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी मंत्रिमहोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, 1 लाखाच्या आतील रकमा मंजूर करण्याचे अधिकार प्रकल्प संचालकांना होते. या खरेदीत एकूण 35 धनादेश देण्यात आलेले आहेत. एक धनादेश सोडून उर्वरित धनादेश डी.आर.डी.ए.च्या प्रकल्प संचालकांच्या सहीने देण्यात आलेले आहेत. यामध्ये अनेक प्रकारची अनियमितता झालेली आहे. त्यामुळे प्रकल्प संचालकांची सविस्तरपणे चौकशी झाली आहे, त्यामध्ये ते स्पष्टपणे दोषी दिसत आहेत. केवळ एक धनादेशावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सही आहे. सन्माननीय सदस्यांनी याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्यांनी म्हटल्याप्रमाणे याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करु. परंतु शासनाच्या धोरणानुसार रिकव्हरी केली जाईल आणि संबंधिताविरुध्द कारवाई सुध्दा केली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शासनाने लेखी उत्तरात संबंधित अधिकारी प्रथमदर्शनी दोषी असल्याचे नमूद केले आहे. पण मंत्रिमहोदयांनी त्या अधिका-यांचे नाव सांगितले नाही, त्यांचे पदनाम सांगितले आहे. त्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांना निलंबित केले जाईल काय ?

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. रणजित कांबळे : त्यांना निलंबित केलेले आहे.

प्रा. सुरेश नवले : माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, मुख्य कार्यकारी अधिका-यांनी एका चेकवर सही केलेली आहे. बाकीच्या चेकवर त्यांच्या सह्या आहेत किंवा नाहीत हा प्रश्न गौण आहे. एका चेकवर त्यांची सही असल्यामुळे प्रत्यक्षदर्शी मुख्य कार्यकारी अधिकारी देखील दोषी आहेत. तेव्हा ज्याप्रमाणे प्रकल्प संचालकांना निलंबित केले तशा प्रकारची कारवाई मुख्य कार्यकारी अधिका-यांवर देखील करण्यात येणार आहे काय ?

श्री. जयंत पाटील : एक लाख रुपयापर्यन्तच्या चेकवर सही करण्याचे अधिकार प्रकल्प संचालकांना आहेत. त्यांनी वारंवार अशा प्रकारचे चेक दिलेले आहे. मध्येच एक लाख रुपयावरील देयके सही करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे पाठविली. त्या देयकासोबत काहीच डिटेल्स नव्हते. हा रुटीन एक्स्पेण्डिचरमधील भाग आहे म्हणून मुख्य कार्यकारी अधिका-यांनी त्यास कन्करन्स दिला. या प्रकरणी चौकशी केल्यानंतर प्रकल्प अधिका-यांनी केलेल्या कामामध्ये वेगवेगळया त्रुटी आढळून आलेल्या आहेत. गरज नव्हती तेथे सिमेंटचे प्लॅटफॉर्म खरेदी केलेले आहेत. त्यांच्यावरील विविध दोष सिध्द झालेले असल्यामुळे प्रकल्प संचालकांना निलंबित केलेले आहे. मुख्य कार्यकारी आफिका-यांनी देखील एका चेकवर सही केल्यामुळे ते देखील दोषी आहेत असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी यांनी मागणी केल्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करण्यासंबंधी आयुक्तांना सांगता येईल.

प्रा. सुरेश नवले : मुख्य कार्यकारी अधिका-यांनी चेकवर सही केलेली आहे.

श्री. जयंत पाटील : Whether he was directly responsible for this act या संबंधीची जबाबदारी निश्चित करण्याचे काम आयुक्ताकडे देण्यात येईल आणि त्यामध्ये ते दोषी असल्याचे निष्पन्न झाले तर त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>ता.प्र.क्र. 519</u>

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

सभापती : सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री. पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी मला यासंबंधी पत्र दिलेले आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हिंगोली जिल्ह्यात १९ घाटातील वाळू उपसा करुन महसूल बुडविल्याप्रकरणाची चौकशी

(५) * ४६७ श्री.विक्रम काळे : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात १९ घाटातील वाळूचा अनधिकृतरित्या उपसा करुन लाखो रुपयांचा महसूल बुडाल्याची घटना माहे नोव्हेंबर, २००९ च्या पहिल्या आठवड्यात घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश सोळंके, श्री.नारायण राणे यांच्याकरिता : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.विक्रम काळे : मंत्री महोदयांनी दिलेले छापील उत्तर चुकीचे आहे. जिल्ह्यामध्ये एकूण वाळूचे घाट किती आहेत ? या वर्षी किती वाळूच्या घाटांचा लिलाव झालेला आहे आणि त्यापासून सरकारला किती महसूल प्राप्त झालेला आहे ? तेसच किती वाळूच्या घाटांचा लिलाव झालेला नाही ?

श्री. प्रकाश सोळंके :हिंगोली जिल्हयामध्ये एकूण ६८ घाट आयडेण्टिफाय केलेले होते. त्यापैकी ११ घाटांना वरिष्ठ भू वैज्ञानिक विकास यंत्रणा, हिंगोली आणि निरनिराळया गावच्या ग्रामसभेने मान्यता दिलेली आहे. ६८ पैकी ११ ठिकाणच्या वाळूचा लिलाव करण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. ऑफसेट प्राईज आयुक्तांनी मान्य केलेली आहे. अजूनपर्यन्त ११ घाटांचा लिलाव झालेला नाही. या घाटांच्या लिलावाची प्रक्रिया चालू आहे.

श्री. विक्रम काळे : ११ घाटावरील लिलाव प्रक्रिया सुरु आहे. ६७ पैकी ४४ घाटावरील वाळूचा अनधिकृतरित्या उपसा केलेला आहे ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : काही ठिकाणी अवैध वाहतूक झाल्याची प्रकरणे आढळून आलेली असून त्यांच्यावर दंडवसुलीची कारवाई देखील झालेली आहे. जवळ जवळ ६५ वाहतूकदारांकडून रु. २,४४,४५०/- रु. दंड वसूल केलेला आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र 1434.....

श्री. विलासराव शिंदे : सभापती महोदय सांगली जिल्ह्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात रिक्त पदे असताना तसेच सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी सांगितलेली परिस्थिती खरी असतानाही या जिल्ह्यातून इतर जिल्ह्यांमध्ये या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या, ही वस्तुस्थिती खरी आहे काय ?

श्री. नितीन राऊत : महोदय, फयान वादळामुळे कोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याची जबाबदारी प्रामुख्याने सांगली व सातारा जिल्ह्यातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांवर टाकली म्हणून या जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना तेथे पाठविले होते.

डॉ. दीपक सावंत : माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की ज्यावेळेस नैसर्गिक आपत्ती येते त्यावेळेस अशा प्रकारे स्टाफ पाठवितो. पण ज्या ज्या वेळी पदे भरण्याच्या प्रक्रियेत एमपीएससी येते त्या त्या वेळेस नेहमीच उशिर होतो. कारण त्यांची प्रोसिजरच अशी आहे की परीक्षा इ ाल्यानंतर तीन-तीन वर्षे सुध्दा निकाल जाहीर होत नाहीत. म्हणून या पदांची भरती एमपीएसची च्या परव्ह्यूमधून काढून काढणार काय ? कारण कॅबिनेटमध्ये निर्णय घेतला तर हे आपल्याला शक्य होणार आहे आणि यापूर्वी सुध्दा अशा प्रकारे निर्णय घेऊन आपण पदे भरलेली आहेत

श्री. नितीन राऊत : महोदय मागील आठवडयात आमच्या विभागाचे अधिकारी एमपीएससी मध्ये चौकशीसाठी गेले असता ही पदे भरण्याची कार्यवाही सुरु झाल्याची माहिती मिळाली आणि लवकरात लवकर ही पदे भरण्यात येतील.

श्री. भगवान साळुंखे : महोदय, यापैकी बरेच अधिकारी व त्यांचे सब ऑर्डिनेट शासकीय यंत्रणा वापरुन प्रायव्हेट प्रॅक्टिस करतात व त्यामुळे सेवा चांगली दिली जात नाही. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाकडे कोणती यंत्रणा आहे ?

श्री. नितीन राऊत : यासंबंधीची माहिती निश्चितपणे घेतली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील शासकीय दुधाच्या कमतरतेमुळे दूध योजना बंद करण्याबाबतची शासनाच्या विचाराधीन बाब

(7) * 1239 **श्री. अरविंद सावंत , श्री.किरण पावसकर , श्री. अनिल परब** : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दुधाच्या कमतरतेमुळे शासकीय दूध योजना बंद करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मुंबईकरांना किफायतशीर दरात सकस आणि ताजे दूध मिळावे यासाठी सुरु करण्यात आलेल्या शासकीय दूध योजनेला दूधाची कमतरता भासत असल्यामुळे गोर-गरीब ग्राहकांना सध्या जास्त दराने खाजगी दूध डेऱ्यामधून दूध विकत घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, शासकीय दूध योजनेत दूधाची कमतरता असण्याची कारणे काय आहेत,

(4) सदर दूध योजनेस पुरेशा दूधाचा पुरवठा करुन सदर योजना पुर्ववत सुरु ठेवण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ?

श्री गुलाबराव देवकर, डॉ.नितीन राऊत यांच्याकरिता : (1) नाही.
(2) नाही.
(3) प्रश्न उद्भवत नाही.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. अरविंद सावंत : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तरच असत्य आहे. मी प्रश्न विचारला होता की दुधाच्या कमतरतेमुळे शासकीय दूध योजना बंद पडण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे काय, त्याला उत्तर "नाही" असे दिलेले आहे ते ठीक आहे. परंतु पुढे असेही विचारले की, दुधाचे संकलन कमी होत आहे काय तर त्याला देखील "नाही" असेच उत्तर दिलेले आहे. माझ्याकडे असलेल्या रिपोर्ट्सनुसार गेल्या सहा महिन्यात खास करुन डिसेंबर, 2008 मध्ये आरे डेअरीकडे 5.78 लिटर दूध संकलित झाले होते त्यानंतर जानेवारी, 2009 मध्ये 7.67 लिटर, मार्च, 2009 मध्ये 7.31 लिटर आणि जून, 2009 मध्ये 1.52 लिटर दूध संकलित झालेले होते. शासनाच्या महानंदा आणि ज्या इतर खाजगी डेअरीज आहेत त्या आरे डेअरीला दुधाचा पुरवठा करीत नाहीत. शासनाने यासंदर्भात सक्तीने आरे डेअरीला दूध देण्यासंबंधीचा निर्णय या खाजगी डेअरीजवर लादला होता, परंतु आता या डेअरीज दुधाचा पुरवठा आरेला करीत नाहीत. परिणामी गोरगरिबांना स्वस्त दरात दूध उपलब्ध होऊ शकत नाही. खाजगी डेअरीज मात्र 30-32

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 1239..... श्री. अरविंद सावंत.....

रुपये प्रति लिटरप्रमाणे दूध विकतात. म्हणून सक्तीने आरे डेअरीला दुधाचा पुरवठा करण्यासंबंधीचा जो करार शासनाने या खाजगी डेअरीजबरोबर केला होता त्याचे पालन करण्याची सक्ती शासन त्यांच्यावर करणार काय ? कारण यामध्ये मला एक धोका असाही वाटतो की, कुर्ला येथील आरे डेअरीकडे 3300 एकर जमीन आहे, पूर्वी तेथेच म्हशी सुध्दा होत्या आणि त्यांचे दूध सुध्दा आरे डेअरीलाच दिले जात होते परंतु आता ते दूध सुध्दा आरे डेअरीला मिळत नाही. म्हणून आरे डेअरीला मुबलक प्रमाणात दूध उपलब्ध करण्याच्या संदर्भात शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे ?

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात)

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी असा प्रश्न विचारलेला आहे की, खाजगी किंवा सहकारी डेअरीज यांनी शासकीय दूध योजनांशी करार केला होता परंतु नंतर दुधाचा पुरवठा करणे बंद केले आहे. त्या दृष्टीने शासन काय प्रयत्न करणार आहे ?

श्री. गुलाबराव देवकर : अशा खाजगी दूध संस्थांशी कोणताही करार केलेला नाही.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य प्रश्न राखून ठेवण्याची मागणी करतात.)

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 1239 .....

श्री. नितीन राऊत : सभापती महोय, मुंबई शहराला प्रति दिनी 60 लिटर दुधाची गरज आहे. मुंबईच्या दुधाची गरज भागविण्यासाठी शासनाकडून 2 लक्ष 20 हजार लिटर प्रति दिन एवढा दुधाचा पुरवठा केला जातो तसेच सहकारी दूध संघाकडून रोज 10.80 लक्ष लिटर दुधाचा पुरवठा केला जातो तसेच खाजगी सहकारी संस्थांकडून रोज 47 लाख लिटर दूध मुंबईसाठी उपलब्ध करुन दिले जाते. या सर्वांकडून मुंबईला रोज 60 लाख लिटर दूध उपलब्ध होत असते ही वस्तुस्थिती आहे. ज्या शासकीय दुग्ध शाळा आहेत त्यांच्याकडून आवश्यकतेनुसार मुंबईला दूध पुरवठा होत नाही ही वस्तुस्थिती आहे.. वरळी, कुर्ला येथील शासकीय दूध योजनेचे जे युनीट आहे ते जुने झालेले असल्यामुळे या युनिटचे मॉर्डनायझेशन करण्याची गरज आहे. मी शासकीय दूध योजनेच्या युनिटला नुकतीच भेट दिलेली आहे.

(विरोधी पक्षोचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. विनोद तावडे : सभापती या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदय चुकीचे उत्तर देत आहेत.

सभापती : माननीय मंत्रीमहोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्या. मंत्रीमहोदयांचे उत्तर अपूर्ण असेल तर त्यासंदर्भात मी निर्णय घेईन.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी जो प्रश्न विचारलेला आहे ती वस्तुस्थिती आहे. मुंबईच्या दुग्ध शाळेत येणा-या दुधाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे ही वस्तुस्थिती आहे. पूर्वी मुंबईसाठी 7 लाख लिटर दूध दर दिवशी उपलब्ध करुन दिले जात असे परंतु आता जवळपास 2 लाख लिटर दूध मुंबईसाठी उपलब्ध होत आहे. मुंबईला दूध पुरवठा कमी होण्याचीही काही कारणे आहेत. शासनाने महानंदा आणि बाकीच्या डेअरीजने शासकीय दूध योजनेला दुधाचा पुरवठा करण्यासाठी काही अटी घालून दिलेल्या आहेत. शासकीय दूध योजनेला जेव्हा दुधाचा तुटवडा जाणवेल तेव्हा महानंदा आणि इतर खाजगी दूध डेअरीजनी मुंबईतील शासकीय दूध योजनेला रोज टँकरने दूध पुरवठा करावा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 1239 .....

श्री. नारायण राणे...

यासंदर्भात शासनाने करार केला होता. ज्यावेळेला शासकीय दूध योजनेला दुधाची कमतरता भासेल तेव्हा महानंदा आणि खाजगी डेअरीजने 10-20 टँकर दुधाचा पुरवठा केला पाहिजे अशी अट घालून देण्यात आली होती. परंतु ही कंडीशन मात्र फूल फिल होऊ शकली नाही त्यामुळे मुंबईला दुधाचा पुरवठा कमी होत आहे ही वस्तुस्थिती आहे. मुख्यत: शासकीय दुग्ध शाळा सुरु ठेवावी की, अजून त्यामध्ये काही आधुनिकीकरण करावे याबाबत विचार सुरु असून हा प्रश्न लवकरात लवकर निकाली काढला जाईल. शासकीय डेअरीज सुरु ठेवण्यासाठी तसेच जनतेला चांगल्या दुधाचा पुरवठा होण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. परंतु काही लोकांचा डोळा दूध डेअरीजच्या जागेवर आहे याचीही शासनाला कल्पना आहे. खरे म्हणजे शासनाने ग्रामीण भागातील दूध व्यवसाय करणा-या शेतक-यांसाठी दूध योजना सुरु केलेली आहे हे आपण विसरु नका.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र....1239 श्री.नारायण राणे..

दुग्ध व्यवसाय हा शेतक-यांचा एक जोड धंदा असून तो चालू रहावा आणि त्यातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे म्हणून हा धंदा चालू ठेवण्यात आला आहे. सर्व शेतक-यांना कायम स्वरुपी न्याय देण्यासाठी ही प्रक्रिया शासन चालू ठेवणार आहे

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय,माननीय मंत्रिमहोदयांनी पॉझिटीव्ह उत्तर दिलेले आहे. मला त्यांना एकच प्रश्न विचारावयाचा आहे. दूध कमी आले आहे हे माननीय मंत्र्यांनी कबूल केलेले आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. खाजगी दूध डेअ-याकडून 29 ते 30 रुपये प्रती लिटर या दराने ग्राहकांना दूध विकत घ्यावे लागते. दूध कमी आले आहे हे मला मान्य आहे त्यामुळे त्यांच्याकडील दूधसुध्दा कदाचित घटले असेल परंतु त्यांच्याकडे येणारे दूध ते जास्त दराने विकत आहेत तसेच ते दूध आरेच्या स्टॉलवरुन विकले जात नाही. ज्याप्रमाणे शेतक-यांना जगवले पाहिजे त्याप्रमाणेच ग्राहकांनासुध्दा जगवले पाहिजे.आज मुंबईच्या ग्राहकांना 29 ते 30 रुपये लिटर या दराने दूध विकत घ्यावे लागते. खाजगी डेअ-यानी आरेकडे हे दूध दिले पाहिजे तसेच आरेच्या दराने हे दूध ग्राहकांना उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत शासन कार्यवाही करणार आहे काय ?

श्री.नारायण राणे :सभापती महोदय, अमुक दरानेच दूध विकावे अशा प्रकारचे बंधन खाजगी दूध डेअरीजवर घालता येणार नाही. को-ऑपरेटीव्ह तत्वावर महानंद डेअरी चालविण्यात येते त्यामुळे महानंद आणि शासनावर काही बंधने आहेत. शेतक-यांचा आणि ग्राहकांचा विचार करुन शासन दुधाचे दर वाढविण्यास परवानगी देते. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे शासकीय दूध न मिळाल्यामुळे ग्राहकांवर जादा दराचा भुर्दन्ड पडतो म्हणून शासनाचे दूध वाढविण्याचा प्रयत्न सरकार करील.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, कमिशन हे शासकीय दूध डेअरीजमध्ये दूध कमी येण्याचे एक कारण आहे. महानंद आणि शासकीय दूध डेअरी यांच्या कमिशनमध्ये बराच फरक आहे. शासकीय दूध डेअरीतून 22 रुपये दराने दूध विकले जाते आणि महानंद 19 रुपये दराने दूध विकते. शासनाकडून जे कमिशन दिले जाते ते कमी असल्यामुळे त्यांचे असे म्हणणे आहे की आपल्याला दूध देणे आम्हाला फायदेशीर होत नाही. तेव्हा त्यांचे कमिशन जर वाढविण्यात आले तर शासकीय दूध डेअरीतील दुधाचे प्रमाण वाढेल आणि जर कमिशन वाढविण्यात आले नाही तर

2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दुधाचे प्रमाण वाढणार नाही. तेव्हा कमिशन वाढवून देण्याच्या बाबतीत शासन विचार करणार आहे काय ?

श्री.नारायण राणे : सजेशन फॉर ॲक्शन .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गोदावरी नदी काठच्या १० गावांत गारपिटीच्या पावसामुळे पिकांचे झालेले नुकसान

(८) * १३७७ श्री. किसनचंद तनवाणी , श्री.परशुराम उपरकर : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील गोदावरी नदी काठच्या वडवाळी, वाघाडी, मायगाव, नायगाव, आपेगाव, नवगाव इत्यादी आसपासच्या दहा गावांत दिनांक २० सप्टेंबर, २००९ रोजी वा त्यासुमारास गारपिटीच्या पावसामुळे मूग, ऊस, कापूस, बाजरी इत्यादी पिकांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हातातोंडाशी आलेली पिके पावसामुळे जमीनदोस्त झाल्यामुळे नुकसान भरपाई मिळणेबाबत तेथील शेतकऱ्यांनी मागणी करुनही याबाबतचा पंचनामा तहसिलदार पैठण यांनी केला नसल्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणे दुरापास्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी तातडीने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री.प्रकाश सोळंके,श्री.नारायण राणे यांच्याकरिता : (१) होय, हे खरे आहे.

(२) गारपिटीमुळे झालेल्या पिक नुकसानीचे पंचनामे तहसिल कार्यालय, पैठण यांचेमार्फत करण्यात आलेले आहे.

(३) नुकसान भरपाईबाबत तहसिलदार यांचेमार्फत अहवाल प्राप्त झाला असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, उत्तरात म्हटल्याप्रमाणे तहसीलदारामार्फत जो अहवाल प्राप्त झालेला आहे त्याप्रमाणें नुकसान भरपाई वा मदत शासन किती दिवसात देणार आहे?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, तहसीलदाराकडून जो अहवाल प्राप्त झालेला आहे त्याप्रमाणे एक महिन्याच्या आत बाधित झालेल्या खातेदारांना मदत देण्यात येईल.

ॲड. उषाताई दराडे : सभापती महोदय, या भागाच्या बाजूलाच बीड जिल्हा आहे. नुकसानीच्या संदर्भात फेर पंचनामे करण्यात यावेत अशी मागणी बीड जिल्हयातून करण्यात आली होती हे खरे आहे काय आणि किती दिवसात फेर पंचनामे करण्यात येणार आहे ?

श्री.नाराण राणे : सभापती महोदय, मूळ प्रश्नाशी हा प्रश्नं संबंधित नाही परंतु त्यासंबंधी मला माहिती असल्यामुळे मी उत्तर देतो की, बीड येथील शेतक-यांनी पुन्हा पंचनामे करावेत अशी मागणी केलेली आहे परंतु त्यासाठी शासनाने अजून परवानगी दिलेली नाही. ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कुडाळ तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग)शेतकऱ्यांच्या
बैलांना शेपटी रोगाची झालेली लागण

(९) * १८४७ श्रीमती अलका देसाई , श्री.राजन तेली , श्री. सुभाष चव्हाण : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) शेतकऱ्यांच्या बैलांना शेपटी रोगाची लागण होऊन त्यात १२ बैलांचा मृत्यू झाल्याचे दिनांक ७ सप्टेंबर, २००९ रोजी उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, शेपटी रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ.नितीन राऊत : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) करीता प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील कुडाळ तालुक्यातील शेतक-यांच्या बैलांना शेपटी रोगाची लागण होऊन त्यात १२ बैलांचा मृत्यू झाल्याचे दिनांक ७ सप्टेंबर २००९ रोजी उघडकीस आले, हे खरे आहे काय, असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, शेपटी रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणें काय आहेत ?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न विचारलेले आहेत त्याचे उत्तर मी देतो की, या वर्षी अशी एकही केस झालेली नाही.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला उत्तर मिळालेले नाही .

सभापती :सन्माननीय मंत्र्यांनी लेखी उत्तरातच सांगितले आहे की " हे खरे नाही " तसेच "दुसरा , तिसरा व चौथा "प्रश्न उद्‌भवत नाही." त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेली आहेत.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1847 ....

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, माझ्या मनामध्ये एक शंका आहे की, हा शेपटी रोग म्हणजे नेमका काय आहे ? त्याची लक्षणे कोणती आहेत ? तसेच संबंधित शेतकऱ्यांना या रोगाची पूर्वसूचना शासन देते काय ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, चाऱ्याची कमतरता असणारी गुरे, मोकाट असणारी गुरे, उत्पादनक्षम नसणारी दुर्लक्षित गुरे, व्यवस्थापनाची काळजी न घेतलेली गुरे, डबक्यातील साठलेले दूषित पाणी तसेच कुजलेले चारा-वैरण आणि इतर कोणत्याही अखाद्य पदार्थ नकळत सेवन करतात. शेपटी रोगाचे बोटीलीझम जीवाणू, शेतातील चारा व वैरणीत कुजत असलेली हाडे, मासे इत्यादी पदार्थ ठराविक आर्द्रता तापमानात आणि आक्सिजन वायूचा अभाव असलेल्या ठिकाणी जोमाने वाढीस लागतात., त्यामुळे हा रोग होतो.

***

<u>तारांकित प्रश्न क्रमांक 2108</u>

सन्माननीय सदस्य अनुपस्थित.

..... जे 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्या कायमस्वरुपी थांबविण्याबाबत करावयाची कार्यवाही

(11) * 333 **श्री. संजय दत्त, श्री. सुभाष चव्हाण, श्री. चरणसिंग सप्रा, श्री. संजय पाटील, श्रीमती उषाताई दराडे , श्री.अरुण गुजराथी** : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) विदर्भात ऐन दिवाळीच्या सणाच्या दिवशी 48 तासांत पाच शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची भयंकर घटना घडल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, दिवसेंदिवस वाढत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यास शासन अपयशी ठरले आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, सध्या वाढत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या कायम स्वरुपी थांबविण्याबाबत शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.नारायण राणे : (1) विदर्भात दिनांक 17 ते 19 ऑक्टोबर, 2009 या कालावधीत एकूण 11 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून त्यापैकी 02 प्रकरणे मदतीसाठी पात्र ठरली आहेत. 03 प्रकरणे मदतीसाठी अपात्र ठरली असून 06 प्रकरणांमध्ये चौकशी सुरु आहे.
(2) व (3) राज्यात सन 2007, 2008 व 2009 मध्ये अनुक्रमे 590, 627 व 259 शेतकरी आत्महत्या प्रकरणे पात्र आढळून आली आहेत. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी केंद्र शासनाने व राज्य शासनाने तीन वर्षासाठी विशेष पॅकेज जाहिर केले होते. सदर पॅकेजेसची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात आली असून त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संख्यामध्ये घट झाल्याचे दिसून येत आहे.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, प्रश्नाच्या उत्तरात म्हटले आहे की, 17 ते 19 ऑक्टोबर 2009 या काळात एकंदर 11 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. त्यातील दोन प्रकरणे मदतीसाठी पात्र ठरली आहेत आणि 3 प्रकरणे अपात्र ठरलेली आहेत तसेच 6 प्रकरणाबाबत चौकशी सुरू आहे. तर ही चौकशी केव्हा पूर्ण होणार आहे आणि त्यांना केव्हा मदत आपण देणार आहात ? भारत सरकारने जे मदतीचे पॅकेज दिलेले आहे त्यातून या लोकांना प्रत्यक्ष वाटप केव्हा होणार आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, ज्या 6 प्रकरणात चौकशी सुरू आहे ती एक महिन्यात पूर्ण केली जाईल आणि त्यात जे पात्र असतील त्यांना मदत केली जाईल. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा जो प्रश्न येथे विचारलेला आहे तो या प्रश्नाशी संबंधित नाही.

..... जे 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, विदर्भात होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसंबंधात तसेच विशेष पॅकेजची अमलबजावणी कशी प्रभावीपणे करण्यात येतआहे याचे उत्तर येथे दिलेले आहे. मला या निमित्ताने असे विचारावयाचे आहे की, या विशेष पॅकेजमध्ये असलेल्या जिल्ह्यांमध्ये दारूबंदी करण्याचा विचार सरकार करीत आहे काय ? शेतकऱ्यांच्या होणाऱ्या या आत्महत्यांमागे दारूमुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत अशा निष्कर्षाप्रत शासन आले आहे काय ? कारण कालच वर्तमानपत्रातून दारूमुळे या आत्महत्या होत असल्याचा शोध लागल्याचे वाचनात आले आहे.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.गोऱ्हे यांनी या प्रश्नाच्या संदर्भात विचारले आहे की, शेतकऱ्यांच्या ज्या आत्महत्या होत आहेत त्याला दारू हे कारण आहे काय ? त्याबद्दल त्यांनी वृत्तपत्रात आलेल्या बातमीचा संदर्भ दिलेला आहे. मला या संदर्भात आपल्यामार्फत सांगावयाचे आहे की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या या अनेक वर्षांपासून होत आहेत, केवळ त्यांची संख्या कमी जास्त होते. या संबंधात सरकार विविध उपाय करीत असताना सरकारने या मागील कारणांचा शोध घेण्याच्या दृष्टीने अनेक संस्थांकडे, इन्स्टिट्यूटस्कडे अभ्यास करण्याचे काम दिले होते आणि त्यांच्या अभ्यासांती या आत्महत्यां मागील वेगवेगळी कारणे जी समोर आली त्यात कर्जबाजारीपणा, घरगुती भांडणे, या व अशा 10-12 कारणे आहेत त्यामध्ये दारूचे व्यसन हेही एक कारण आहे. म्हणून मी या संदर्भात अमरावती व नागपूर या दोन्ही विभागातील आयुक्त व जिल्हाधिकारी यांची एक बैठक हे अधिवेशन सुरू होण्यापूर्वी घेतली होती त्यात यवतमाळ जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी, या यवतमाळ जिल्ह्यामध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत, या आत्महत्यांमागील कारणांबाबत विश्लेषण करताना असेही सांगितले आहे की, या टक्केवारीमध्ये व्यसनाधीनता हेही एक कारण आहे. हे माझे मत आहे असे नाही तर अनेक तज्ज्ञांनी अभ्यासांती हे कारण असल्याचे नमूद केलेले आहे. त्यात इंदिरा गांधी इन्स्टिट्यूट पासून अनेक संस्थांनी अभ्यास करून ही कारणे सांगितलेली आहेत. ..

(यानंतर श्री. सरफरे .... के 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 333...

श्री. नारायण राणे...

माननीय श्री. जाधव साहेबांप्रमाणे अनेक जण त्यामध्ये सदस्य होते. त्यांनी व्यसनाधीन लोकांनी केलेल्या आत्महत्त्येची टक्केवारी सांगितली. त्यामुळे आत्महत्त्येची जी कारणे आहेत ती मी माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणली. त्यामध्ये दारुच्या व्यसनामुळे आत्महत्त्या होत असतील तर त्या थांबविण्यासाठी कारवाई करावी अशाप्रकारचे पत्र माननीय मुख्यमंत्र्यांना दिले. जी दहा-बारा कारणे आहेत त्यापैकी दारुचे व्यसन हे एक कारण आहे. त्याला आळा घालण्याबाबत शासनाने उपाय योजना करावी असे पत्रामध्ये मी सुचविले आहे.त्यामुळे मी हा शोध लावलेला नाही. आत्महत्त्येच्या कारणांचे विश्लेषण करुन जी कारणे शोधण्यात आली आहेत, त्यापैकी एक कारण आपल्यासमोर आले आहे. आणि ते माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणण्याचे काम मी केले आहे....

(गोंधळ)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, दारुबंदी संदर्भात....

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, माझे उत्तर अजून संपलेले नाही. आत्महत्त्येसंबंधी ज्या उपाय योजना करावयाच्या आहेत, त्यापैकी दारुबंदी ही एक उपाय योजना आहे एवढेच मला म्हणावयाचे आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, आत्महत्त्येची अनेक कारणे आहेत. या देशाच्या माननीय पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरुन केलेल्या भाषणाची अधिकृत प्रत माझ्याकडे आहे, त्यामध्ये असे म्हटले आहे की, "Reasons are many but the prime reason is irrigation backlog." त्यामध्ये सिंचनाचा अभाव हे मुख्य कारण आहे. असे त्यांनी म्हटल्यानंतर विदर्भामध्ये येऊन सिंचनासाठी पॅकेज दिले. आज विदर्भामध्ये अशी परिस्थिती आहे की, 1984 च्या सरासरीनुसार एक हेक्टरने सुध्दा अनुशेष कमी झालेला नाही. उलट तो दुप्पटीच्या वर वाढला आहे. सन 2007 च्या सरासरीनुसार तो झालेला आहे. या संदर्भातील रेगुलेटरी ॲथॉरिटीचा अहवाल शासनाने सभागृहासमोर सादर करावा लागतो. त्या अहवालामध्ये आपल्याला दिसेल की, तो अनुशेष दुप्पटीने वाढला आहे. या राज्यामध्ये जवळ जवळ दसपटीने अनुशेष वाढला आहे. आणि म्हणून माझे म्हणणे आहे की, हे अधिवेशन विदर्भामध्ये सुरु आहे. यामध्ये विदर्भाचे सर्व जिल्हे, मराठवाडयातील 2 जिल्हे आणि कोकणातील 2 जिल्हयांमध्ये फिजिकल बॅकलॉग आहे. त्या बॅकलॉगचे दरवर्षी अपडेटींग झाले पाहिजे. त्याबाबतचा कार्यक्रम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

ता.प्र.क्र. 333...

प्रा.बी.टी.देशमुख...

शासनाने ठरवावा आणि त्याप्रमाणे माननीय राज्यपालांना कळवावे. या प्रश्नाविषयी लोकांच्या अत्यंत ज्वलंत भावना आहेत. तेव्हा फिजिकल बॅकलॉगचे दरवर्षी अपडेटींग करुन त्याबाबतचा कार्यक्रम तयार करुन तो माननीय राज्यपालांना सादर केला जाईल काय?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सभागृहाचे सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांनी केलेली सूचना विदर्भातील व राज्यातील अनुशेषग्रस्त जिल्हयांच्या दृष्टीने उपयुक्त आहे. त्यांनी केलेली सूचना कार्यान्वित करण्यासाठी हे शासन प्रयत्न करील. दरवर्षी तो अहवाल अपडेट करुन त्याबाबत माननीय राज्यपालांना कळविले जाईल. आणि जास्तीत जास्त तरतूद करुन सिंचनाचा अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय महसूल मंत्र्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिल्याचे याठिकाणी सांगितले. त्यामध्ये त्यांनी आठ-दहा कारणे असल्याचे सांगितले. त्या पत्राची प्रत माझ्याजवळ असून ते संपूर्ण पत्र सभागृहाला वाचून दाखविण्यासाठी आपण मला परवानगी द्यावी...

सभापती : माननीय सदस्यांनी पत्र वाचून दाखविण्याची आवश्यकता नाही, आपण उपप्रश्न विचारावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या पत्रामध्ये त्यांनी केवळ "दारु" हेच कारण असल्याचे म्हटले आहे...

सभापती : मी आपणास प्रश्न विचारण्याची परवानगी दिलेली आहे...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय महसूल मंत्र्यांनी ज्या पत्राचा उल्लेख केला व त्यामध्ये दहा कारणे असल्याचे सांगितले. त्यापैकी एक कारण "दारु" असल्याचे म्हटले. या पत्रामध्ये फक्त "दारु" हाच एकमेव विषय आहे. म्हणून हे पत्र वाचण्यासाठी आपण मला परवानगी दिली पाहिजे.

सभापती : त्या अनुषंगाने आपण उपप्रश्न विचारावा....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या पत्रामध्ये असे म्हटले आहे की, "वर्धा जिल्हयामध्ये सुध्दा दारुचे व्यसन हेच शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येचे कारण आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता आर्थिक उपाय योजनेबरोबर शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येला आळा घालण्यासाठी सामाजिक उपाय योजना म्हणून विदर्भाच्या सहाही जिल्हयात संपूर्ण दारुबंदी करावी."

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.333 . . . .

श्री.दिवाकर रावते . . . .

म्हणून ही वस्तुस्थिती लक्षात घेता आर्थिक उपाययोजने बरोबर शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांना आळा घालण्याकरता सामाजिक उपाययोजना म्हणून सहाही आत्महत्याग्रस्त जिल्ह्यामध्ये पूर्ण दारुबंदी करण्यात यावी. म्हणजे विदर्भातील शेतकरी कापसामध्ये पाणी ओततो, दगड घालतो, तो आळशी आहे असे पहिले माननीय मुख्यमंत्री म्हणाले आणि दुसरीकडे आमचे माननीय मंत्री महोदय असे सांगत आहेत की, आमचा विदर्भातील शेतकरी दारु पिऊन आत्महत्या करतो अशा प्रकारचे आरोप करीत आहेत हे कितपत योग्य आहे ?

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पत्रामध्ये असे म्हटलेले आहे. त्यांनी पत्रामध्ये जे नमूद केलेले आहे, ते सांगितले आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी सदरहू पत्र माझ्याकडे सादर करावे आणि आपला प्रश्न विचारावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी येथे पत्र वाचून दाखविलेले आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, असे कसे ?

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना पत्र वाचण्यासाठी परवानगी दिलेली नाही. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी उल्लेख केलेला आहे. आमचा विदर्भातील शेतकरी दारुमुळे आत्महत्या करतो हे आम्ही ऐकून घ्यावयाचे काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, मी असे म्हटलेले नाही. रेकॉर्डवर चुकीचे येत आहे. मी असे म्हटलेले नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, वर्धा जिल्हा दारुमुक्त आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

. . . .एल-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.333 . . . .

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, याठिकाणी पत्रामध्ये अशा प्रकारचा उल्लेख नाही. या पत्रामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात, त्याची कारणे दिलेली आहेत. त्यामध्ये नापिकीमुळे झालेच्या आत्महत्या, कर्जबाजारीपणामुळे झालेल्या आत्महत्या, आजारपणामुळे झालेल्या आत्महत्या, व्यसनाधीनतेमुळे झालेल्या आत्महत्या, कौटुंबिक वाद, कर्ज माफी योजनेचा लाभ न मिळाल्यामुळे, झालेल्या आत्महत्या आणि कर्ज न मिळाल्यामुळे झालेल्या आत्महत्या, भूमीहीनतेमुळे झालेल्या आत्महत्या, अपघात, मुलीचे लग्न इ.कारणामुळे झालेल्या आत्महत्या,कर्जाचे पुनर्वसन न झाल्यामुळे केलेल्या आत्महत्या इ.अशी वेगवेगळी कारणे आहेत. पण येथे विरोधी पक्ष राजकारण करीत आहे. हे जे सुरु आहे, त्याचे कारण काय आहे ? विधानसभेच्या निवडणुकीमध्ये आलेले अपयश हे याचे कारण आहे.

(घोषणा)

सभापती : ता.प्र.क्र.333 च्या . . . ..

(घोषणा)

सभापती : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. प्लीज, सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, ...

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. सध्या विदर्भामध्ये अधिवेशन सुरु आहे. मघाशी मी विचारलेल्या प्रश्नाला माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले, ते समाधानकारक दिशेने जाणारे आहे. त्यातील एक गोष्ट अशी आहे की, 1984 मधील जो अनुशेष आहे, तो पुढे सातत्याने वाढत गेला आहे . . . .

श्री.विलासराव शिंदे : सभापती महोदय, ...

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, एक मिनिट . . . .

(घोषणा)

(यानंतर विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत सभात्याग करतात.)

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, हे सर्व निवडणुकीमध्ये आलेल्या अपयशामुळे सुरु आहे. नैराश्य आल्यामुळे सुरु आहे, दुसरे काही कारण नाही.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्न क्रमांक 333...

प्रा. बी.टी. देशमुख : सभापती महोदय, विदर्भात अधिवेशन आहे. हा अतिशय जिव्हाळयाचा विषय असल्यामुळे याबाबतीत मला फक्त एक प्रश्न विचारण्याची आणि माननीय मंत्रिमहोदयांना त्याचे उत्तर देण्याची परवानगी देण्यात यावी,अशी माझी विनंती आहे.

सभापती : प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 11 वरील प्रश्न विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भातील प्रश्न आहे. तरीही आपली ज्येष्ठता, विदर्भाचा प्रश्न आणि विदर्भाचा अनुशेष यादृष्टीने आपण जो प्रश्न विचारलेला आहे त्याला सन्माननीय महसूल मंत्र्यांनी जे उत्तर दिलेले आहे ते याबाबतीत आश्वासक आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : माननीय मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिलेले आहे ते अतिशय समाधानकारक आहे. त्यामध्ये एक लहानशी त्रुटी राहिलेले आहे ती माननीय मंत्रिमहोदय दूर करतील याची मला खात्री आहे.(अडथळा)सभापती महोदयानी मला बोलण्याची परवानगी दिलेली आहे. माझे बोलून झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी बोलावे.

श्री. विलासराव शिंदे : सभापती महोदय, या प्रश्नाशी अनुशेषाचा काही संबंध नाही.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची परवानगी दिल्यानंतर सन्माननीय सदस्य मंत्र्यांसारखे उत्तर देत आहेत हे बरोबर नाही.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची परवानगी दिल्यानंतर सन्मानीय सदस्यांनी मला बोलू दिले नाही.

सभापती : प्रश्न क्रमांक 333 च्या अनुषंगाने आपण जो प्रश्न विचारलेला आहे त्याला सन्माननीय महसूल मंत्र्यांनी आपले आणि सभागृहाचे समाधान होईल अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. आता 2 वाजून 01 मिनिट झालेले आहेत त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची परवानगी दिल्यानंतर सुध्दा सन्माननीय सदस्यांनी मला बोलू दिलेले नाही.

सभापती : आपण थोडयावेळापूर्वी जो प्रश्न विचारला त्या प्रश्नाच्या अनुषंगाने माननीय महसूल मंत्र्यांनी सभागृहाचे आणि आपले समाधान होईल असे उत्तर दिलेले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्न क्रमांक 333....

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, त्यानंतर आपण मला प्रश्न विचारण्याची परवानगी दिली पण काही सदस्यांना अनुशेषाचा प्रश्न आवडत नाही म्हणून ते जर यामध्ये अडथळा आणीत असतील तर आपण मला संरक्षण दिले पाहिजे.

सभापती : त्यांनी तुम्हाला अडथळा आणण्याचे काही कारण नाही. त्यांनी फक्त हरकत घेतलेली आहे. ठीक आहे एका मिनिटात आपण आपले म्हणणे मांडावे.

प्र. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, अर्धा ते एका मिनिटाच्यावर मी वेळ घेणार नाही. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. अविकसित भागाला या सभागगृहामध्ये संरक्षण दिले जाते. सभापती महोदय, आपण मला एक मिनिट वेळ दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी थोडयावेळी पूर्वी जी गोष्ट सांगितलेली आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे असे आपण जाहीर केल्यानंतर सन्माननीय सदस्यांना त्यावर बोलता येणार नाही.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, या ठिकाणी विषयांतर करण्यात येत आहे. आपण सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे तेव्हा बोलू दिले पाहिजे.

प्रा. बी. टी. देशमुख :सभापती महोदय, आपण मला हा प्रश्न पूर्ण करण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. माझे म्हणणे असे आहे की, माननीय मंत्री महोदयांनी थोडयावेळा पूर्वी असे सांगितले की, आम्ही दर वर्षी याचे अपडेटिंग करु. मंत्रिमहोदय, काय झालेले आहे की, गेली अनेक वर्षे रुपयात किंमत काढण्यात येते. 1984 मध्ये दहा हजार रुपये किंमत काढण्यात आली. 1994 मध्ये पन्नास हजार रुपये किंमत काढण्यात आली. आता 2007 मध्ये ऐंशी हजार रुपये किंमत काढण्यात आली आहे. रुपयातील किंमत काल्पनिक असते. आणि कमी असते तेवढयात प्रोजेक्ट पूर्ण होत नाहीत. मग असे सांगितले जाते की, रुपयातील अनुशेष दूर झाला. माझे म्हणणे असे आहे की, जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचा सन 2007-2008 चा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला तो दर वर्षी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतो. कायद्याने ते बंधनकारक आहे. फिजिकल बॅकलॉग मराठवाडयाचा वाढलेला आहे विदर्भाचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्न क्रमांक.333...

वाढलेला आहे. कोकणचा वाढलेला आहे. हेक्टरामध्ये काढलेला फिजिकल बॅकलॉग दर वर्षी अपडेटिंग करण्याचा प्रयत्न करु असे माननीय मंत्रिमहोदयांनी मघाशी सांगितले आहे. फिजिकल बॅकलॉगमध्ये अपडेटिंग केले जावे, त्यादृष्टीने माननीय मंत्रिमहोदय प्रयत्न करतील काय एवढाच माझा प्रश्न आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र. क्र. 333....

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, मी याचे उत्तर दिलेले आहे. अपडेट करुन त्याचा विचार केला जाईल असे मी मघाशी सांगितले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याच्या मुद्यासंबंधी

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी हॉस्पिटलमध्ये गेलो होतो त्यामुळे सभागृहामध्ये थोडा उशिरा आलो. मी येण्याआधी या ठिकाणी एक प्रश्न उपस्थित झाला. मी आज वर्तमानपत्रामध्ये एक बातमी वाचली. या राज्याचे माननीय महसूल मंत्री श्री. राणे साहेब यांनी माननीय मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण यांना एक पत्र लिहिलेले आहे.

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मला बोलण्याचा अधिकार आहे की नाही ? आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे.

सभापती : मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची परवानगी दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपया मला बोलू द्यावे. माननीय सभापतींनी मला परवानगी दिलेली आहे.

(सत्ताधारी पक्षाने अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना सांगू इच्छितो की, ज्या ज्या वेळी माननीय विरोधी पक्ष नेते एखाद्या बाबीवर बोलण्यासाठी माझ्याकडे परवानगी मागतात तेव्हा संकेत म्हणून त्यांना आपण परवानगी देतो. दुसरी बाब अशी की, मघाशी ज्यावेळी अनुक्रमांक 11 वरील प्रश्नाच्या संदर्भात चर्चा झाली त्यावेळी माननीय विरोधी पक्ष नेते सभागृहात उपस्थित नव्हते. माननीय मंत्रिमहोदय श्री. राणे साहेबांनी त्या प्रश्नाच्या अनुषंगाने या ठिकाणी उत्तर दिलेले आहे. पण तरीही माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी एखाद्या बाबीवर परवानगी मागितली तर त्यांना परवानगी देणे माझे काम आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी तसेच सन्माननीय सदस्य श्री. विलासराव शिंदे यांना मी हरकतीचा मुद्दा मांडण्याची परवानगी देणार आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, जर वर्तमानपत्रामध्ये एखादी गोष्ट आली असेल किंवा मंत्रिमंडळातील एखाद्या सन्माननीय मंत्रिमहोदयांनी एखादे पत्र सन्माननीय मुख्यमंत्र्यांना लिहिले असेल तर त्या पत्राचा उद्देश काय आहे हे या सभागृहामध्ये जाणून घेण्याचा अधिकार या सदनाच्या प्रत्येक सदस्याचा आहे. हे पत्र माझ्या हातामध्ये आहे. सन्माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांनी सन्माननीय मुख्यमंत्र्यांना जे पत्र लिहिले आहे त्या पत्रातील एका वाक्यावर माझा आक्षेप आहे. माझा पूर्ण पत्रावर आक्षेप नाही. त्यांनी असे वाक्य लिहिले आहे की,"दारुबंदी असलेल्या वर्धा जिल्ह्यामध्ये सुध्दा शेतकऱ्यांना असलेले दारुचे व्यसन हे आत्महत्येमागचे तेवढेच मोठे कारण असल्याचे आढळून आलेले आहे." सभापती महोदय, या विदर्भातील सहा जिल्ह्यामध्ये साडेसात हजार आत्महत्या झाल्या त्याबद्दल शरम वाटली पाहिजे. आम्हाला ब्रेक अप द्यावा. दारु पिवून किती शेतकरी मेले याबाबत 7 हजार आत्महत्यांचा ब्रेक अप द्यावा. या ठिकाणी अन्नदात्या शेतकऱ्यांवर अशा पध्दतीने आरोप करुन सरकार पळणार असेल तर आम्हाला या ठिकाणी बसण्यात काही स्वारस्य नाही. सन्माननीय सदस्य आम्हाला या ठिकाणी बोलू देत नाहीत. माझ्या बोलण्याचा उद्देश हा आहे की, 7 हजार शेतकऱ्यांपैकी किती शेतकरी दारु पिऊन मेले आणि किती शेतकरी कर्जामुळे मेले याचा ब्रेक अप द्यावा. अशा पध्दतीने जर शेतकऱ्यांवर आरोप केले जात असतील तर ते योग्य नाही. केवळ विदर्भातच आत्महत्या झाल्या असे नाही तर मराठवाड्यामध्ये आत्महत्या झाल्या. आपल्या पश्चिम महाराष्ट्रामध्ये सुध्दा आत्महत्या होत आहेत. त्या ठिकाणी दारुचे कारण आहे काय ? सभापती महोदय, माझी आग्रहाची विनंती आहे की, या ठिकाणी शेतकऱ्यांवर जो दारुचा आरोप केलेला आहे त्याबद्दल मी माननीय महसूल मंत्री श्री. राणे साहेबांना सांगू इच्छितो की, आपण धान्यापासून दारु बनविण्याचे जे परवाने देत आहात ते आधी बंद करा. आपण आम्हाला सांगता की, दारुबंदी करा. आधी ते कारखाने बंद करा आणि मग दारुबंदी करा. सभापती महोदय, माझी आग्रहाची मागणी आहे की, माननीय मंत्रिमहोदयांनी विदर्भातील शेतकऱ्यांची माफी मागितली पाहिजे. या आधी सुध्दा एका माननीय मुख्यमंत्र्यांनी असे म्हटले होते की, विदर्भातील शेतकरी तंबाखू चोळतात, विदर्भातील शेतकरी आळशी आहेत, विदर्भातील शेतकऱ्याला अक्कल नाही. विदर्भातील शेतकऱ्यांचा जर अवमान होणार असेल तर ते चालणार नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी माफी मागावी अशी आमची आग्रहाची मागणी आहे.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

मंत्रिमहोदय माफी मागणार नसतील तर आम्ही सभागृहामध्ये खाली बसू.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, समोरच्या बाजूच्या सन्माननीय सदस्यांना सभागृहामध्ये सभ्यता ठेवण्यास आपण सांगावे. निवडणुकीच्या पराभवाचे पडसाद येथे दिसत आहेत की काय ?

(विरोधी पक्षाचे व सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकमेकांशी बोलत असतात.)

श्री.नारायण राणे : विरोधी पक्षाने एवढे हताश होण्याचे कारण काय ? समोरच्या बाजूच्या सन्माननीय सदस्यांची आता आवळत चालली आहे, हे मला पहावत नाही.

सभापती : मंत्रिमहोदय, आपण माझ्याकडे बघून बोलावे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी वृत्तपत्रामध्ये आज जी बातमी आली त्या बातमीचा संदर्भ देऊन मी माननीय मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रातील एक वाक्य वाचून दाखविले. परंतु त्या पत्रातील मजकूर त्यांनी नीट वाचून पहावा. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "मला मिळालेल्या माहितीनुसार" म्हणजे माझ्याकडे जे अहवाल प्राप्त झाले त्या अहवालाच्या आधारावर मी हे पत्र लिहिलेले आहे. हे माझे मत नाही. विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्याकडून जे अहवाल प्राप्त झाले त्या अनुषंगाने मी माननीय मुख्यमंत्र्यांना हे पत्र लिहिलेले आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जे वाक्य वाचून दाखविले त्याप्रमाणे शेतकरी असे करतो असे मी म्हणत नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,....

श्री.नारायण राणे : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी माझे ऐकून घ्यावे. उगाचच पराचा कावळा करण्याची सवय बरोबर नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,....

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, आपण मंत्रिमहोदयांचे म्हणणे पूर्ण होऊ द्यावे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, शेतक-यांच्या आत्महत्येस अनेक कारणे आहेत. त्यामध्ये नापिकीवरुन आत्महत्या, कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या, मुलीचे लग्न करु न शकल्यामुळे आत्महत्या, आजारपणामुळे आत्महत्या, व्यसनाधीनतेमुळे आत्महत्या, कौटुंबिक वादामुळे आत्महत्या, भूमिहिनतेमुळे आत्महत्या अशी कारणे नमूद केलेली आहेत. या कारणांमध्ये व्यसनाधिनता हे एक कारण आहे आणि त्याचे एका जिल्हयात 4 टक्के प्रमाण आहे, हे प्रमाण प्रत्येक जिल्हयात भिन्न आहे. ही बाब मी नजरेला आणून दिलेली आहे. हा अहवाल आहे. या अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कार्यवाही करावी असे मी म्हटलेले आहे. विरोधी पक्षाला आता हातामध्ये नवीन विषय मिळत नाही म्हणून हा विषय उपस्थित केला आहे. हा विषय उपस्थित करुन मी माफी मागावी असे बोलले जात आहे. यवतमाळ जिल्हयातील निवडणुकीमध्ये 6 पैकी 5 जागा काँग्रेसला मिळालेल्या आहेत, विरोधी पक्षाचे तेथे पानिपत झालेले आहे. शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या जिल्हयातही काँग्रेसने अधिक जागा मिळविल्या आहेत, विरोधी पक्षाला काहीच हाती लागले नाही. लोकांनी तुम्हाला विरोधी पक्षात बसविले आहे. शेतकऱ्यांनी तुम्हाला तिकडे बसविले आहे. सभागृहात चुकीची माहिती रेकॉर्डवर आणली जात आहे. पराचा कावळा केला जात आहे, शिवसेनेची आता विश्वासाहर्ता गेलेली आहे. पण भारतीय जनता पक्षाने तरी विनाकारण, कोणतेही कारण नसताना विषय माहीत करुन घेऊन नंतर बोलावे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांबद्दल मला आदर आहे. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, मी ही बाब माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. तुमच्या सहकारी पक्षाला आता कामधंदे नाहीत.

यानंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती महोदय, भारतीय जनता पक्ष हा अखील भारतीय पक्ष आहे. माननीय विरोधी पक्षनेते हे भारतीय जनता पक्षाचे आहेत. त्या पक्षामध्ये काही सभ्य माणसे आहेत. ज्या पक्षामध्ये सभ्य माणसे नाहीत त्यांच्याबरोबर माननीय विरोधी पक्षनेते कशाला भाष्य करतात ? त्यांना काही मिळाले नाही म्हणून या सभागृहामध्ये एक पत्र आणले. या सभागृहापुढे एवढे महत्वाचे कामकाज आहे ते शेतक-यांसाठी नाही काय ? यांनी शेतक-यांसाठी काय केले ? येथे येऊन हे सभागृह बंद पाडण्याचेच काम केले. या महाराष्ट्रातील शेतक-यांवर आमचे प्रेम आहे. महाराष्ट्रातील शेतक-यांना राज्य आणि केन्द्र सरकारने मदत केलेली आहे. शेतक-यांना कर्जमाफी दिलेली आहे. तुम्ही काय दिले ? तर नुसत्या टाळया वाजवल्या. महाराष्ट्रातील शेतक-यांना आम्ही 14 हजार कोटी रु.ची मदत केली. निवडणुकीमध्ये तुमचे पानीपत झालेले आहे. सन्माननीय सदस्यांनी निदान भगव्या दुपट्टयाची शान ठेवावी. सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, शेतक-यांचा अपमान मी कधीही करणार नाही. मी शेतक-याचा मुलगा आहे. माझ्याकडून चूक झाली तर मी एकदा नाही तर हजार वेळा माफी मागेन, परंतु माझ्याकडून चूक झालेली नाही. सभापती महोदय, अहवाल माननीय मुख्यमंत्र्यांच्या नजरेला आणून देणे हे चुकीचे आहे काय ? चांगल्याला चांगले म्हणण्याचा माणूसकीचा धर्म समोरच्या सन्माननीय सदस्यांना आवडत नाही. खोटेनाटे करुन आपली पत सांभाळण्याचा ते प्रयत्न करीत आहेत.

(माननीय विरोधी पक्षनेते व विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय महसूल मंत्र्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र दिले असून त्यासंदर्भातील चर्चा येथे होत आहे. आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील 11 क्रमांकाच्या प्रश्नावर सभागृहामध्ये चर्चा चालू होती त्यावेळी सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री पांडुरंग फुंडकर सभागृहामध्ये उपस्थित नव्हते. आता प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर पुन्हा तो प्रश्न उपस्थित करण्याचा अधिकार सदस्यांना प्राप्त होत नाही. जर त्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी....)

प्रश्नासंबंधी त्यांना चर्चा घडवून आणावयाची असेल तर ती वेगळया आयुधाच्या माध्यमातून घडवून ते घडवून आणू शकतात. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये चर्चिल्या गेलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने लगेच नवीन चर्चा उपस्थित करता येत नाही असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

सभापती : माननीय विरोधी पक्षनेत्यांचा आदरपूर्वक उल्लेख करुन मी त्यांना बोलू दिलेले आहे. आता सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर शांत बसावे अशी माझी त्यांना विनंती आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या व्यासपीठा जवळील मोकळया जागेत येऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: आश्वासनावरील शासकीय कार्यवाहीचे विवरण सभागृहासमोर ठेवणे

श्री. भास्कर जाधव (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषदेच्या सन 1989च्या पहिल्या अधिवेशनापासून ते सन 2009च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनापर्यंतच्या 658 आश्वासनांवर शासनाने केलेल्या कारवाईबाबतचे विवरण मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : विवरण सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : कृपया येथे सोबतचे जोडलेले विवरण छापावे.)

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या व्यासपीठा जवळील मोकळया जागेत येऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवणे

श्री. भास्कर जाधव (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानपरिषदेच्या सन 2009च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दिनांक 1 जून, 2009 ते 16 जून, 2009 या कालावधीत दिलेल्या 277 आश्वासनांची यादी मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली आश्वासनांची यादी छापावी.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.गुलाबराव देवकर (रोजगार व स्वयंरोजगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 1998-1999, 1999-2000, 2000-2001 व 2001-2002 चा अनुक्रमे पहिला, दुसरा, तिसरा व चौथा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनासमोरील मोकळया जागेत येऊन घोषणा देत असतात)

श्री.पद्माकर वळवी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई यांचा सन 2004-2005, 2005-2006 व 2006-2007 चा अनुक्रमे विसावा, एकविसावा व बाविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनासमोरील मोकळया जागेत येऊन घोषणा देत असतात)

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नांदेड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नांदेड यांचा सन 2003-2004, 2004-2005 व 2005-2006 चा अनुक्रमे बारावा, तेरावा व चौदावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनासमोरील मोकळया जागेत येऊन घोषणा देत असतात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अहमदनगर यांचा सन 2005-2006 व 2006-2007 चा अनुक्रमे पंधरावा व सोळावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनासमोरील मोकळया जागेत येऊन घोषणा देत असतात)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनासमोरील मोकळया जागेत येऊन घोषणा देत असतात)

ॲड.उषा दराडे (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करते.

शुक्रवार, दिनांक 11 डिसेंबर, 2009 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय ठराव यांस द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 10 डिसेंबर, 2009 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. अशासकीय ठरावांना खालीलप्रमाणे देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

<u>बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय ठराव</u>

(1) ठराव क्रमांक 70 - डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.	50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
(2) ठराव क्रमांक 26 - श्री.राजन तेली, वि.प.स.	50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
(3) ठराव क्रमांक 11 - श्री.दिवाकर रावते, वि.प.स.	50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्यापुढील क्रमांकाच्या ठरावास देण्यात यावा अशीही शिफारस समितीने केली आहे.

सभापती : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडते.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनासमोरील मोकळया जागेत येऊन घोषणा देत असतात)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सभागृहाचे कामकाज मी 15 मिनिटांसाठी तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.23 ते 12.38 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

(नंतर श्री.खर्चे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

दारुमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या होत असल्याबाबत दिलेले पत्र

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हे पत्र दाखविण्याचा उद्देश एवढाच होता की माननीय मंत्री महोदयांनी जो अहवाल वाचून दाखविला त्यामध्ये एकच शब्द टाकला होता आणि तो म्हणजे दारुचा. त्यांनी अहवालात आत्महत्त्येसंबंधीची सर्वच कारणे दिली असती तर काहीच वावगे नव्हते परंतु यामागे फक्त दारुचे एकच कारण शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांमागे दिले असल्यानेच आमची हरकत आहे. तसेच यापूर्वी शासनाकडून अशा आत्महत्त्यासंबंधी जो अहवाल आलेला आहे त्यात मात्र 5 टक्के सुध्दा लोक दारुमुळे मेलेले नाहीत, असे म्हटले आहे. वास्तविक आत्महत्त्यांच्या पाठीमागे अनेक वेगवेगळी कारणे आहेत. त्यात आजारपण, मुलींचे लग्न अशी वेगवेगळी कारणे आहेत. पण माननीय महसूल मंत्र्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रात अशा वेगवेगळ्या कारणांचा अंतर्भाव केला नाही. तो त्यांनी केला असता तर आत्महत्त्याग्रस्त शेतकऱ्यांवर दारु पिण्याचा आरोप आला नसता. परंतु माननीय महसूल मंत्र्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रातून एकंदरित वरीलप्रमाणेच आशय निघतो. तसेच वर्तमानपत्रातून ज्या पध्दतीने बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत त्यानुसार दारुमुळेच विदर्भातील 6 जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या असा बोध होतो. ही बाब शेतकऱ्यांच्या दृष्टीने संयुक्तिक नाही तर विदर्भातील शेतकऱ्याला बदनाम करण्याचाच हा प्रयत्न आहे. अशा प्रकारचा चुकीचा मेसेज देखील शासनाच्या माध्यमातून जाणे योग्य नाही, कारण हा शेतकऱ्यांचा अवमान आहे. म्हणून यासंबंधी माननीय महसूल मंत्री श्री. राणेसाहेब यांनी खुलासा केला तर जास्त चांगले होईल, असे मला वाटते.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या विषयासंबंधी आम्ही सभागृहात मगरीचे अश्रू सुध्दा पाहिले. सभागृहात मंत्री महोदयांनी खुलासा करण्यासंबंधीचा विषय सुरु होता, ते तसा खुलासा करीत होते, आम्ही देखील आमची बाजू सांगत होतो परंतु आमची ठाम भावना आहे की, विदर्भातील शेतकऱ्यांचा या पत्रामुळे अवमान झालेला आहे त्यामुळे शेतकऱ्यांची माफी मागावी असे आमचे म्हणणे आहे. माफी मागण्यात काय गैर आहे? माजी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख व इतर मंत्र्यांनी देखील माफी मागितली होती. ज्यांच्या जिवावर आपण येथे येतो त्यांची माफी

.2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

मागायला काहीच हरकत नाही. मूळ प्रश्न असा आहे की, आत्महत्त्येसंबंधी समोरच्या बाकावरुन प्रश्न विचारला त्यावेळेस आम्हाला सुध्दा क्षणभर आनंद झाला होता आणि अशा प्रकारे दोन्ही बाजूकडिल सन्माननीय सदस्यांचे या प्रश्नावर एकमत झाल्याचे दिसत आहे. परंतु त्यानंतर या सर्व प्रश्नावर असे काही वातावरण निर्माण केले गेले की, आम्ही विरोधकच शेतकऱ्यांच्या विरोधात बाके वाजवितो हे पाहून मला मात्र वाईट वाटले. म्हणून ग्रामीण भागाशी निगडित असे सर्वच प्रश्न महसूल विभागाच्या अखत्यारित येत असल्यामुळे कळत नकळत, उद्देश नसताना, चुकून आणि इच्छा नसताना माननीय मंत्री महोदयांनी असे वक्तव्य केले असल्यास त्यांना माफी मागण्यास हरकत नाही. आता प्रश्न असा निर्माण होतो की, हे पत्र माझ्याकडे कसे आले .....माननीय मंत्र्यांनी पत्र देताना ते सर्क्युलेट केले नव्हते. मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून प्रत जात असेल असाही आरोप मी करणार नाही पण हे जे शीतयुध्द चालू आहे ते शेतकऱ्यांच्या जिवावर यायला नको. म्हणून मंत्री महोदयांना माझी एवढीच विनंती आहे की, त्यांनी शेतकऱ्यांची माफी मागावी.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार : माननीय सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर आहे. आताच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात, त्यांच्या वेदनेच्या संदर्भात, दु:खाच्या संदर्भात माहिती दिलेली आहे. शेतक-यांच्या आत्महत्येबद्दल आणि त्यांच्या दु:खाबद्दल सभागृहाच्या दोन्ही बाजूकडून एकमत आहे, त्याबद्दल कोणताही वाद नाही. माझी माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांना विनंती राहील की, दारु पिण्याचे आपण समर्थन करीत आहोत असे होऊ नये एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. शेतक-यांच्या आत्महत्येच्या अनेक कारणांपैकी दारुचे व्यसन हे सुध्दा एक कारण आहे हे आपण मान्य करणार आहात की, नाही ? शेतक-यांच्या आत्महत्येसाठी दारुचे व्यसन हे कारणच नाही असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय ? दारुंबदीला आपण पाठिंबा देणार आहात की, नाही ? सन्माननीय मंत्रीमहोदय या विषयाच्या संदर्भात उत्तर देतील परंतु मी जो मुद्दा या ठिकाणी मांडला आहे तो भावनिक आहे. अप्रत्यक्षपणे दारु पिण्याला आपण समर्थन करतो आहे असा संदेश या सदनातून बाहेर जाऊ नये एवढेच मला अतिशय नम्रपणे सांगावयाचे आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी दारुच्या संदर्भात कधीही समर्थन केले नाही आणि करणार देखील नाही. दारुचे समर्थन करणारा मी असतो तर आपण धान्यापासून दारु बनविण्याच्या संदर्भात जे परवाने दिलेले आहेत ते रद्द करा असे म्हटले नसते. मी दारुचे कधीही समर्थन करणार नाही. परंतु अहवालात तीनच टक्के लोक मेले आहेत अशी माहिती असतांना 97 टक्के शेतक-यावंर यामुळे परिणाम होईल एवढेच मी म्हटले होते.

श्री. नारायण राणे : माननीय सभापती महोदय, या सदनात प्रश्नोत्तराच्या तासातील प्रश्न क्रमांक 11 हा "आत्महत्येच्या" संदर्भातील होता. या प्रश्नाच्या संदर्भात मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना एक पत्र दिले असून त्याचा संदर्भ वृत्तपत्रात देखील आलेला आहे. या प्रश्नाचा संदर्भ घेऊन माननीय सदस्य तसेच विरोधी पक्षाच्या सदस्यांनी मी "शेतक-यांचा अपमान केलेला आहे किंवा शेतक-यांच्या आत्महत्या या दारुच्या व्यसनामुळे होतात" अशा प्रकारची माहिती या ठिकाणी दिलेली आहे. मी चुकीचा शब्द वापरणार नाही, परंतु मी असे काही बोललो नाही एवढेच मी या ठिकाणी सांगू इच्छितो. शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात मला जे अहवाल प्राप्त झालेले आहेत त्यामध्ये, "दारुचे व्यसन हे सुध्दा आत्महत्येचे तेवढेच मोठे कारण असल्याचे आढळून आलेले आहे". अधिवेशनाच्या अगोदर मी नागपूरला आलो होतो. अमरावती आणि यवतमाळ येथे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे....

शेतक-यांच्या जास्त आत्महत्या झालेल्या असल्यामुळे मी अमरावती कमिशनर व यवतमाळ कलेक्टर यांच्या सोबत एक बैठक आयोजित केली होती. शेतक-यांच्या आत्महत्या का कमी होत नाहीत यासंदर्भात आपले म्हणणे काय आहे, तुमचा निष्कर्ष काय आहे असे विचारले असता त्यांनी शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात काही टिपण्या दिल्या तसेच त्यांनी मला सांगितले की, अमरावती आणि यवतमाळ येथे शेतक-यांच्या आत्महत्या नापिकी, कर्जबाजारीपणा, मुलींचे लग्न करु न शकणे, आजारपण, व्यसनाधीनता, कौटुंबिक वाद, कर्ज उपलब्ध न होणे, अपघात तसेच भुमिहिनता, सावकारी यामुळे शेतक-यांच्या आत्महत्या होतात अशी माहिती दिली. अशा कारणांमुळे शेतक-यांच्या आत्महत्या होतात अशी माहिती मला आढळून आली. शासनाने कर्ज माफी दिल्यामुळे शासन कोणत्याही प्रकारचे कर्ज शेतक-यांकडून वसूल करीत नाही. शेतक-यांच्या डोक्यावर आता जे कर्ज आहे त्यासंदर्भात देखील शासनाने विचार केलेला आहे. अमरावतीचे दरडोई उत्पन्न किती आहे" असे मी अधिका-यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, "अमरावती जिल्हयाचे दरडोई उत्पन्न 22 हजार रुपये आहे." महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न 71 हजार रुपये असतांना या ठिकाणचे उत्पन्न 22 हजार रुपये आहे ही वस्तुस्थिती आहे. दरडोई उत्पन्न वाढण्यासाठी तुम्ही काय करता असे मी कलेक्टरांना विचारले होते. मी माननीय मुख्यमंत्रीमहोदयांना शेतक-यांच्या आत्महत्येच्या प्रश्नाबद्दल जे पत्र दिले तसेच पत्र मी दारु बंदी विभागासाठी, गृहविभागासाठी तसेच आरोग्य आणि अन्न विभागांसाठी सुध्दा दिलेले आहे. मेळघाट येथे कुपोषण होत असल्यामुळे त्या ठिकाणी त्वरित डॉक्टर्स पाठविण्याची व्यवस्था करावयास पाहिजे. कारण हा विषय सुध्दा सभागृहात येऊ शकतो. मी केवळ माननीय मुख्यमंत्री महोदयांनाच पत्र दिले नसून विविध विभागांना पत्र का पाठविले, तर हा विषय अग्रक्रमाने प्रत्येक विभगाने सोडवावा यासाठीच. प्रत्येक विभागाला पत्र पाठवितांना वेगवेगळी कारणे मी घालू शकलो असतो आणि त्यापैकी व्यसनाधिनता असे मी म्हणू शकलो असतो. प्रत्येक विभागाला मी पत्र दिलेले आहे. मी जे पत्र वेगवेगळया विभागांना पाठविले आहे त्यामध्ये "माझे मत" असे मी कोठेही म्हणालो नाही. इंदिरा गांधी इन्स्टिट्यूट तसेच सन्माननीय जाधव साहेबांकडून तसेच ज्यांनी ज्यांनी शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात विश्लेषण केले त्यांच्या अहवालाचा उल्लेख मी माझ्या पत्रात केलेला आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे ...

एका वृत्तपत्रात "नारायण राणे यांचा शोध " असे छापून आलेले आहे. परंतु हा शोध मी लावलेला नसून अनेक मान्यवरांनी आणि तज्ज्ञांनी ही कारणे शोधून काढलेली आहेत. ही कारणे काही मी शोधलेली नाहीत. मी स्वत: शेतकऱ्याचा मुलगा आहे. त्यामुळे शेतक-यांचा अपमान करण्याचा माझा कोणताही हेतू नव्हता. शेतक-यांसाठी मी दोन दिवस अगोदर नागपूरला आलो होतो. आत्महत्या कमी व्हाव्यात असाच माझा उद्देश होता. आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या वारसांना एक लाख रुपये मदत देण्यात येते आणि सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर यांना हेसुध्दा माहीत आहे की,विदर्भातील आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या वारसांना एक लाख रुपयाचा चेक देणारा मी पहिला महसूल मंत्री आहे. त्या वेळच्या मुख्यमंत्र्यांना याबाबतीत सांगून मी ही योजना सुरु केली होती आणि मीच पहिला चेक दिला होता. त्या मुळे मी शेतक-यांचा अपमान कधीच करणार नाही. सभापती महोदय, शेतक-यांच्या वारसदारांना जेवढी मदत देता येईल, त्यांना जेवढे सावरता येईल तेवढा मी प्रयत्न केलेला आहे.शेतक-यांच्या आत्महत्या कमी करण्यासाठी जे जे करता येईल ते ते करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे व त्यासाठी मी बैठका घेतल्या होत्या. .आत्महत्याची जी काही कारणे आहेत त्यातील हे एक वेगळे कारण आहे. म्हणून मी असे सांगतो की, राज्यातील शेतकरी दारु प्यायल्यामुळे आत्महत्या करतात असे माझे म्हणणे नाही. त्याबाबतीत जो अहवाल आला आहे त्या अहवालात सांगण्यात आलेल्या कारणापैकी "व्यसनाधीनता "हे एक कारण आहे.अधिका-यांनी हे एक कारण सांगितलेले आहे त्यामुळे तो शेतकरी असा आहे काय ? अधिका-यांनी व वेगवेगळया तज्ज्ञांनी केलेले विश्लेषण आहे. त्या विश्लेषणाची माहिती मी दिलेली आहे. यामध्ये माझा काहीही संबंध नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, मी जर चूक केली असेल तर कोणाचीही माफी मागण्यास माझी काहीही हरकत नाही.परंतु मी कोणतीही चूक केलेली नाही. उलट मी चांगलेच काम करण्याचा प्रयत्न केला आहे.आत्महत्या थांबाव्यात यासाठी मी नागपूरला लवकर आलो आणि प्रयत्न केले आहेत. सामाजिक समस्या दूर व्हाव्यात यासाठी मी प्रयत्न केले आहेत. श्री. पवार साहेब बोलले की, "जे विकासाचे आणि सिंचनाचे प्रश्न आहेत ते पैशाने सुटतात " परंतु पैशाने न सुटणारे जे सामाजिक प्रश्न आहेत ते प्रश्न सुध्दा प्रबोधन करुन सुटले पाहिजेत आणि आत्महत्या कमी झाल्या पाहिजेत हा माझा अत्यंत चांगला हेतू होता परंतु काही लोकांनी टिव्स्ट केले आणि "ब्रेकिंग न्यूज"

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिली.परंतु असे करुन हा प्रश्न सुटणार आहे काय ?ज्याने ब्रेकिंग न्यूज दिली आणि हाय लाईट केले त्यांना असे विचारावे की, त्या बातमीमुळे हा प्रश्न सुटणार आहे काय आणि शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी होणार आहे काय ? की शासनाने ज्या निरनिराळया उपाययोजना केल्या आहेत , आत्महत्या कमी होण्यासाठी शासनाने जे प्रयत्न केलेले आहेत त्यामुळे आत्महत्या कमी होणार आहेत. तुम्ही आम्ही सर्वजण एकत्र बसून विचार केल्यामुळे आणि आत्महत्या कमी करण्यासाठी विविध मार्ग चोखाळल्यामुळे आत्महत्या कमी होतील. फक्त खप वाढविण्यासाठी बातम्या देणें हे त्यांचे काम आहे परंतु माझा उद्देश अतिशय चांगला आणि प्रामाणिक आहे. शेतक-यांचा अपमान व्हावा असा माझा उद्देश नाही.कोणत्याही शेतक-यांने आत्महत्या केलेली असली तरी त्याचा मला अपमान करावयाचा नाही. उलट जेवढी काही मदत त्याच्या वारसदाराला करता येईल तेवढी मदत करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे आणि ही मदत करण्यासाठीच मंत्री आहेत. आत्महत्तेची कारणे शोधण्याचे काम माझे नाही. ते वाक्य माझे नाही.अहवालामध्ये जो निष्कर्ष सांगण्यात आला होता त्यातील हे वाक्य होते. त्या अहवालात तसे मत सांगण्यात आलेले होते .ते माझे वैयक्तिक मत नाही. शेतक-यांच्या आत्महत्तेची अनेक कारणे आहेत त्यातील व्यसनाधीनता हे एक कारण आहे असे त्या अहवालात सांगण्यात आले असून तेवढेच मी माननीय मुख्यमंत्र्यांना कळविलेले आहे त्याच बरोबर आरोग्याच्या बाबतीत आणि अन्य विषयाच्या बाबतीतसुध्दा कळविलेले आहे त्यामुळे मला तसे काही म्हणावयाचे नाही. सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की,यामध्ये मी कोणतीही चूक केलेली नाही उलट चांगल्या हेतूने मी पत्र लिहिले आहे. आत्महत्या करण्यामागचे हे कारण कोठे 4 टक्के असेल कोठे 10 टक्के असेल, वा कोठे 30 टक्क्यापर्यंत असेल तर ते संपुष्टात यावे आणि माणसाचा जीव वाचावा आणि त्यांचा संसार चांगला चालावा या स्त्यूत्य हेतूने मी हे पत्र लिहिले त्यामुळे सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी माझा चांगला हेतू समजावून घ्यावा. मी पुन्हा एकदा सांगतो की, जर मी चुकलो असतो तर राज्यातील जनतेची आणि शेतक-याची माफी मागितली असती. मी केवळ मंत्रीच आहे असे नव्हे तर मी राज्याचा सेवक देखील आहे त्यामुळे माफी मागण्यास मला काहीही कमीपणा वाटला नसता .परंतु मी कोणतीही चूक केलेली नाही त्यामुळे माझा हेतू आपण समजावून घ्यावा आणि आता आपण पुढील कामकाज करु या. मी जे पत्र लिहिले होते त्या मागचा माझा हेतू चांगलाच होता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. मु.शी : नियम 93 अन्वये सूचना

सभापती : दिनांक 8 डिसेंबर 2009 रोजी सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या नियम 93 च्या सूचनासंबंधी मी निर्णय दिलेला नव्हता तसेच दिनांक 9 डिसेंबर 2009 रोजी सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या नियम 93 च्या सूचनेसंबंधी देखील निर्णय देता आला नाही. त्यामुळे दिनांक 8 डिसेंबर 2009 च्या नियम 93 च्या सूचना मी प्रथम घेत आहे

.सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र. पाटील यांनी " दिनांक 21.8.2009 रोजी पनवेल जिल्हा रायगड येथील शालेय विद्यार्थ्यांना घेऊन जाणा-या बसने पेट घेतल्याने त्यात 22 विद्यार्थी भाजून 6 विद्यार्थ्यांचा मृत्यू होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो विषय नियम 93 चा होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "गडचिरोली जिल्ह्यात दिनांक 5 डिसेंबर 2009 रोजी वन कर्मचाऱ्यांनी लाकडाची तस्करी करणाऱ्यांवर लक्ष ठेवतेवेळी नक्षलवाद्यांनी 34 वन कर्मचाऱ्यांना ओलीस ठेवून त्यांच्या बंदुका, काडतुसे व इतर शस्त्रे घेऊन पलायन करणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी "गॅस प्रकल्पाच्या वीज दरात वाढ झाल्याने ग्राहकांकडून 785.90 कोटी रक्कम वसूल करण्यास राज्य विद्युत नियामक आयोगाने महावितरण कंपनीला मान्यता दिल्याने वीज ग्राहकांना पडत असलेला भूर्दंड" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते यांनी "नाशिक,मुंबई महामार्गाच्या विसतारीकरणाचे काम सध्या जोरात सुरू असून रस्त्याच्या भरावासाठी बेकायदेशीररित्या डोंगर खोदून शासनाचा लाखो रूपयांचा महसूल बुडविणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री वसंतराव खोटरे, प्रा.बी.टी.देशमुख, दिलीपराव सोनवणे, विक्रम काळे, रामनाथ मोते, संजय केळकर, भगवान साळुंखे यांनी "शासनाने राज्यातील शाळांना कायम विनाअनुदान तत्त्वावर परवानगी देणे, त्यानंतर सुधारित निकष ठरवून शाळांना अनुदानापासून वंचित ठेवणे, शालेय पोषण आहार इत्यादी मागण्यांसाठी विनाअनुदान कृती समितीने दिनांक 10.12.2009 रोजी भव्य मोर्चा आयोजित केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण आम्ही दिलेल्या नियम 93 च्या सूचनेवर शासनाला निवेदन करण्यास सांगितले आहे त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. मात्र हा विषय अत्यंत महत्त्वाचा असल्याने शक्य तो हे निवेदन सोमवार किंवा मंगळवारी आल्यास बरे होईल.

.... यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ही निवेदने लवकरात लवकर येथे व्हावीत असाच माझा प्रयत्न राहील, त्यादृष्टीने मी यामध्ये लक्ष घालीन. वस्तुत: दिनांक 8 व 9 डिसेंबर 2009 रोजीच्या नियम 93 अन्वये दिलेल्या सूचना येथे तात्कालिक परिस्थितीमुळे मांडता आल्या नाहीत म्हणून मी त्या घेतल्या नाहीत असे नाही. तरीही मी त्या आज येथे घेतल्या आणि शासनाला त्यावर निवेदन करण्यास सांगितले आहे. तेव्हा आपण म्हणता त्या दृष्टीने निश्चितपणे प्रयत्न आपण करू.

प्रा. बी.टी.देशमुख : मी आपला आभारी आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, अशोक मानकर यांनी "शालेय शिक्षण विभागांतर्गत राज्यात अपंग एकात्म शिक्षण योजना गेल्या 30 वर्षांपासून राबविली जात असून सध्या राज्यात या योजनेचे 600 च्या वर युनिटस् असून जवळपास 700 शिक्षक कार्यरत असणे, तथापि या शिक्षकांना वेतन देण्याचे बंद केल्याने त्यांच्यावर आलेली उपासमारीची पाळी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "दिनांक 7 डिसेंबर 2009 रोजी नवी मुंबई येथे 5 किलो वजनाचे युरेनियम पोलिसांनी जप्त करून तीन व्यक्तींना अटक करणे, सदर युरेनियम आरोग्यास घातक व किरणोत्सारी पदार्थ असल्याने त्याचा अनधिकृत साठा रोखण्यास प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री परशुराम उपरकर, किरण पावसकर, ॲड.अनिल परब यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यात तिलारी गावातील पाटबंधारे प्रकल्पाच्या बाजूची सुमारे 4000 झाडे तोडण्याची परवानगी घेऊन 9 लाख किंमतीची झाडे तोडण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

.... यू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र. पाटील यांनी "मुंबईवरील 26/11 च्या दहशतवादी हल्ल्यात वीर मरण पत्करलेल्या शहिदांच्या मृत्यूला एक वर्ष होऊनही त्याबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांबाबत कार्यवाही न होणे, वीर पत्नी विनिता कामटे यांनी केलेले गंभीर आरोप तसेच शहीद करकरे यांचे जॅकेट गायम होणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र.पाटील यांनी "आयबीएन लोकमत या वृत्तवाहिनीवर हल्ला करून कार्यालयाचे नुकसान करून कर्मचाऱ्यांना मारहाण व महिला कर्मचाऱ्यांशी असभ्य वर्तन करणेबाबत." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, भगवान साळुंखे यांनी "राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना ऊस तोडणी मजुरांची आवश्यकता असणे, ऊस तोडणी मजुरांना ज्याप्रमाणे अग्रीम रक्कम दिली जाते त्याचप्रमाणे ऊस उत्पादकांना देणे, तसेच मजुरांना देण्यात येणाऱ्या अग्रीमावर व्याज आकारणेबाबत."या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

आता दिनांक 9 डिसेंबर, 2009 रोजी सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये ज्या सूचना दिल्या होत्या त्या मी येथे वाचून त्यावरील निर्णय देतो. ..

सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "राज्यातील शेकडो वन मजुरांचा गेली 12 वर्षे प्रश्न प्रलंबित राहणे, 5 वर्षे सेवा झालेल्या वन मजुरांना कायम करण्याचे मान्य करूनही त्याची अमलबजावणी न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.... यू 4 ..

सभापती ....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यात सन 2002 मध्ये दारिद्र्यरेषे खालील सर्व्हे करून 71,386 कुटुंबांची नोंद केली असून 7 वर्षे उलटली तरी त्यांना शिधापत्रिका न मिळणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान योजनेंतर्गत सुमारे 800 कोटीचा निधी प्राथमिक आरोग्य केंद्र दुरूस्ती, औषधे खरेदी इ.साठी प्राप्त होणे, सदर निधी या कारणासाठी न वापरल्याने पुन्हा केंद्र शासनाकडे परत जाणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे. ..

(यानंतर श्री. सरफरे .... व्ही 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

यानंतर सन्मा□□य सदस्य डॉ. दीपक सावंत यां□ "सिध्दी विनायक ट्रस्टच्या माध्यमातून गरीबांना तसेच अनेक संस्थांना औषधोपचार व शस्त्रक्रियेसाठी मदत मिळणे, परंतु दिनांक 27.2.2008 रोजीच्या निव्वळ उत्पन्नाचा 30 टक्के रक्कम मदती संदर्भातील निर्णयामुळे अनेक रुग्ण व संस्था हवालदिल होणेबाबत" या विषयावर □□म 93 अ□ये सूच□ दिली आहे.तो □□म 93 चा विषय होत □सल्या□, मी सूच□स अनुमती □□रीत आहे मात्र या विषयावर शासनाने □वेद□ □रावे.

यानंतर सन्मा□□य सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यां□ "मेसर्स मायक्रोप्लेक्स (इंडिया), वर्धा व अन्य इतर जैविक किटकनाशक कंपन्यांच्या विरोधात शासकीय योजनेत जैविक किटकनाशकांचा बोगस व गुणवत्ता नसलेला पुरवठा झाल्याने राज्यातील हजारो शेतकऱ्यांचे करोडो रुपयांचे नुकसान होणे" या विषयावर □□म 93 अ□ये सूच□ दिली आहे. तो □□म 93 चा विषय होत □सल्या□, मी सूच□स अनुमती □□रीत आहे मात्र या विषयावर शासनाने □वेद□ □रावे.

यानंतर सन्मा□□य सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, अशोक मानकर यां□ "विक्रोळी घाटकोपर येथील एसआरए योजनेअंतर्गत एकूण 16 गृहनिर्माण संस्थेमधील सुमारे 1990 झोपडी धारकांसाठी एसआरए योजना सन 1999 मध्ये मंजूर होऊनही अद्याप विकासकाने ही योजना पूर्ण न करणे".या विषयावर □□म 93 अ□ये सूच□ दिली आहे. तो □□म 93 चा विषय होत □सल्या□, मी सूच□स अनुमती □□रीत आहे मात्र या विषयावर शासनाने □वेद□ □रावे.

यानंतर सन्मा□□य सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर यां□ "माननीय उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार जाहिरातीबाबत निकष ठरणे, सदर निकषाकडे नागपूर म.न.पा.ने दुर्लक्ष करुन कारटेल या कंपनीकडे कोटयवधी रुपये थकित असूनही सन 2009-10 चा निविदा करार देण्यात येणे"या विषयावर □□म 93 अ□ये सूच□ दिली आहे.तो □□म 93 चा विषय होत □सल्या□, मी सूच□स अनुमती □□रीत आहे मात्र या विषयावर शासनाने □वेद□ □रावे.

यानंतर सन्मा□□य सदस्य सर्वश्री अशोक मानकर, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, विनोद तावडे यां□ "नागपूर महानगरपालिकेने 5 इ ोपडपट्टीवासियांना स्वत:चे घर उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सहा एसआरए योजनेचे प्रस्ताव

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

सभापती...

दि.28 फेब्रुवारी, 2009 रोजी शासनाकडे मंजूरीसाठी पाठवूनही त्यावर अद्याप कारवाई न होणे"या विषयावर नियम 93 अन्वये

सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती देत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "नवी मुंबईतील खारघर येथील बीयूडीपी योजनेंतर्गत आर्थिक मागास घटकासाठी वितरीत करण्यात आलेला सेक्टर 12 मधील सोहम गृहनिर्माण सोसायटीचा भूखंड दलालांनी हडप केल्याप्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना अटक करणेबाबत"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती देत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

आज दिनांक 10 डिसेंबर 2009 रोजी स्वीकारण्यात आलेल्या नियम 93 अन्वये सूचनांची यादी मी आता वाचून दाखवितो, व त्यावरील निर्णय देतो.

सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी "भाषा संचालनालयाच्या कार्यालयात भाषा संचालकाचे पद गेल्या सहा महिन्यांपासून रिक्त असून आजतागायत 13 उप सचिवांची तात्पुरते भाषा संचालक म्हणून वर्णी लावण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती देत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "नागपूर येथील डॉ. दळवी स्मारक रुग्णालय आणि नर्सिंग प्रशिक्षण शाळेत 60 प्रशिक्षणार्थी विद्यार्थीनींची दूषित पाणी व जेवणामुळे प्रकृती बिघडून सहा जणींना टायफाईडची लागण होणे".या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती देत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, अरविंद सावंत यांनी "अप्पर वर्धा व निम्न वर्धा प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे दि.9.12.2009 रोजी दहा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

प्रकल्पग्रस्तांनी विष प्राशन करुन आत्महत्त्या करण्याचा प्रयत्न करणे, त्यात त्यांची प्रकृती चिंताजनक असणेबाबत"या विषयावर □□□म 93 अ□ये सूच□ दिली आहे. तो □□□म 93 चा विषय होत □सल्या□, मी सूच□स अ□मती □□रीत आहे. मात्र या विषयामध्ये शासनाने तातडीने लक्ष घालून □□□दि□ □रावे.

यानंतर सन्मा□□□य सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यां□ "राज्यातील शेकडो वन मजुरांचा गेली 12 वर्षे प्रश्न प्रलंबित राहणे, 5 वर्षे सेवा झालेल्या वन मजुरांना कायम करण्याचे मान्य करुनही त्याची अंमलबजावणी न होणे" या विषयावर □□□म 93 अ□ये सूच□ दिली आहे. तो □□□म 93 चा विषय होत □सल्या□, मी सूच□स अ□मती □□रीत आहे मात्र या विषयावर शासनाने □□□दि□ □रावे.

यानंतर सन्मा□□□य सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "दि. 5 डिसेंबर, 2009 रोजी सुभाष नगर, किनवट येथील शेतात एका सात वर्षीय आदिवासी बालिकेवर बलात्कार करणारा आरोपी फरार असून त्यास अटक करण्यास पोलिसांना आलेले अपयश" या विषयावर □□□म 93 अ□ये सूच□ दिली आहे.

तो □□□म 93 चा विषय होत □सल्या□, मी सूच□स अ□मती □□रीत आहे मात्र या विषयावर शासनाने □□□दि□ □रावे.

यानंतर सन्मा□□□य सदस्य डॉ. दीपक सावंत यां□ "राज्यात शालेय पोषण आहाराव्दारे वर्ग 1 ते 8 च्या विद्यार्थ्यांना पोषक आहार मिळावा यासाठी मध्यान्ह भोजन योजना सुरु असून या योजनेव्दारे देण्यात येणाऱ्या खिचडीतून डाळ गायब होऊन निकृष्ट दर्जाचा तांदूळ वापरणे"या विषयावर □□□म 93 अ□ये सूच□ दिली आहे.तो □□□म 93 चा विषय होत □सल्या□, मी सूच□स अ□मती □□रीत आहे मात्र या विषयावर शासनाने □□□दि□ □रावे.

यानंतर सन्मा□□□य सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, अशोक मानकर यां□ "मौजा मांडवा, ता. कोपरणा, जि. चंद्रपूर येथील शेतकरी गेल्या 40 ते 50 वर्षापासून सर्व्हे नं.59 मध्ये अतिक्रमण करुन शेती करीत असून सदर जमिनीचे पट्टे या शेतकऱ्यांच्या नावे न करणे"या विषयावर □□□म 93 अ□ये सूच□ दिली आहे.तो □□□म 93 चा विषय होत □सल्या□, मी सूच□स अ□मती □□रीत आहे मात्र या विषयावर शासनाने □□□दि□ □रावे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती . . . .

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "देवाडा खुर्द, जि.भंडारा येथील एलोरा पेपर मिल या कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांना सन 2008 पासून वेतन वाढ करण्यात येऊनही सदर कामगारांची सन 2004 ते 2008 या कालावधीतील वाढीव वेतनाची थकित रक्कम व्यवस्थापनाने अद्याप न देणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने,मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण यांनी "ठाणे शहरातील राबोडी परिसरात 17-3-2009 रोजी एका किरकोळ अपघातावरुन तंटा होऊन जातीय दंगल होणे, सदर दंगलीस भडकावण्यास पोलीस कारणीभूत असणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, नितीन गडकरी, विनोद तावडे यांनी "शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे या संस्थेच्या आर्थिक गैरव्यवहारासंबंधीची कागदपत्रे दि.21-7-2008 रोजी गायब होणे, त्याची तक्रार दि.2-7-2009 रोजी देणे, याबाबत अद्यापही संबंधितांवर कारवाई न होणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "सोलापूर येथील बीडी कामगार वसाहतीतील माध्यमिक शाळेस विशेष बाब म्हणून मान्यता न मिळाल्याने बीडी कामगारांची मुले शिक्षणापासून वंचित असल्याने कॉ.नरसय्या आडम, माजी विधानसभा सदस्य व इतर कार्यकर्ते उपोषणास बसल्याने त्यांची प्रकृती खालावणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर यांनी "मा.उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार जाहिरातीबाबत निकष ठरणे,सदर निकषाकडे नागपूर मनपाने दुर्लक्ष करुन कारटेल या कंपनीकडे कोट्यावधी रुपये थकित असूनही सन 2009-2010 चा निविदा . . .

. . . .डब्ल्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती . . . .

करार देण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.दिलीपराव सोनवणे यांनी "शालेय शिक्षण विभागांतर्गत सर्व स्तरावरच्या शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन श्रेण्या लागू करताना भेदभावपूर्ण वागणूक देण्यात येणे, या संदर्भात स्वतंत्र आयोग न नेमण्याच्या राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयाशी विसंगत अशा वेतनश्रेण्या लागू करणे,राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यां-प्रमाणे सदर वेतन आयोग शिक्षक कर्मचाऱ्यांना लागू न होणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "सिंधुदूर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील कणकवली नगरपंचात हद्दीत कोकण प्राईड हॉटेलला 15 मीटर अंतरावर असलेला बिनशेती आदेश रद्द केलेल्या जागेत बिअरबार आणि परमीटरुमसठी अंतराची अट शिथिल करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

. . . .डब्ल्यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.:लक्षवेधी सूचना क्रमांक 1 बाबत

सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवर लक्षवेधी सूचना क्रमांक 1 च्या समोर सन्माननीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "लघुसिंचन विभाग जिल्हा परिषद, अकोला येथे झालेला भ्रष्टाचार या विषयावर दिलेली लक्षवेधी सूचना दाखविलेली आहे. तथापि माननीय मंत्री महोदयांनी लक्षवेधी सूचनेवरील चर्चा पुढे ढकलण्याबाबत मला पत्र दिले आहे.म्हणून मी ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलत आहे.

तसेच माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री.राजेश टोपे यांनी अशी विनंती केली आहे की, आजच्या कामकाज पत्रिकेवर सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांची लक्षवेधी सूचना तिसऱ्या क्रमांकावर दाखविण्यात आलेली आहे, ती प्रथम घेण्यात यावी. त्याप्रमाणे सदरहू लक्षवेधी सूचना चर्चेसाठी प्रथम घेण्यात येईल.

. . . .डब्ल्यु-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू झालेल्या

सहाव्या वेतन आयोगाच्या वेतननिश्चितीचे काम प्रलंबित असणे.

मु.शी. : विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू झालेल्या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतननिश्चितीचे काम प्रलंबित असणे यासंबंधी प्रा.बी.टी.देशमुख,सर्वश्री वसंतरावखोटरे दिलीपराव सोनवणे वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधीसूचना

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"विद्यापीठीय व महाविद्यायलीन शिक्षकांना लागू झालेल्या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतननिश्चितीचे काम दिनांक 12 ऑगस्ट, 2009 च्या शासन निर्णयाप्रमाणे त्या त्या विभागातील विद्यापीठांकडे व सहसंचालकांकडे सोपविलेले असणे, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये या कामासाठी नेमलेल्या समितीमध्ये खुद्द सहसंचालकांनी व काही तज्ज्ञांनी संगणकीय प्रणाली तयार करणे,अशा तज्ज्ञामध्ये सहसंचालकांनी काही तज्ज्ञांची नावे सुचविणे,या तज्ज्ञ समितीने तयार केलेल्या संगणक प्रणालीच्या आधारे 16 नोव्हेंबर 2009 ते 28 नोव्हेंबर 2009 या काळात सर्व महाविद्यालयांचे विद्यापीठ स्तरावरील काम पूर्ण होणे, विद्यापीठातील काम पूर्ण झाल्यावर त्याच किंवा दुसऱ्या दिवशी सहसंचालक स्तरावरील काम पूर्ण केले जाईल असे सहसंचालकांनी घोषित करणे,गेल्या 15-20 दिवसापासून ही सर्व प्रकरणे सहसंचालकांच्या कार्यालयात पडून असणे, संचालक उच्च शिक्षण, पुणे यांनी 3 ऑक्टोबर, 2009 रोजी आदेश काढून"वेतन निश्चिती प्रमाणित करण्याचे"(परिच्छेद व 1) आदेशित केले असतांना त्या आदेशाचा तसेच शासननिर्णयाचा भंग करुन प्रकरणे प्रलंबित ठेवण्याचे सहसंचालकांचे धोरण, नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (NUTA) सहसचिवांनी मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना, सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती, यांच्यामार्फत दिनांक 2 डिसेंबर, 2009 रोजी किंवा त्यादरम्यान एक निवेदन देऊन विद्यमान सहसंचालक शासन निर्णयाप्रमाणे व वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे काम करण्यास तयार नसतील तर पर्यायी व्यवस्था करण्याची केलेली मागणी,दिनांक 31 मार्च,2010 च्या आत केंद्र शासनाकडे निश्चित अर्थसहाय्याची

. . . .डब्ल्यु-5

प्रा.बी.टी.देशमुख ... . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मागणी न केल्यास केंद्राचे अर्थसहाय्य गमावण्याची स्थिती निर्माण होणे, त्यामुळे उच्च शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री.राजेश टोपे (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.असे करीत असताना मी आपल्या अनुमतीने निवेदनात पुढील दुरुस्ती करु इच्छितो.

"निवेदनातील परिच्छेद क्र.2 मधील दुसऱ्या ओळीमध्ये असे म्हटलेले आहे की,"या समिती मध्ये सहसंचालक उच्च शिक्षण, अमरावती यांनी कोणत्याही व्यक्तींची नावे सुचविलेली नाहीत. तसेच सदर संगणकीय प्रणाली करण्यामध्ये सहसंचालकांनी कोणताही हस्तक्षेप केलेला नाही." हे वाक्य वगळण्यात यावे.

सभापती : सुधारल्याप्रमाणे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

. . . .डब्ल्यु-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी निवेदनातील चुकीचे वाक्य वगळलेले आहे हे योग्यच झाले आहे. ते फॅक्च्युअली बरोबरच नव्हते. त्यामुळे त्याबाबत मला काही

विचारावयाचे नाही. याठिकाणी एक बाब सांगावयाची आहे की, माननीय मंत्री महोदयांनी दि.12 ऑगस्ट 2009 रोजी जो याबाबतचा शासन निर्णय निगर्मित केला, त्यामध्ये दि.26 ऑगस्ट 2009 रोजी संघटनेबरोबर झालेल्या चर्चेप्रमाणे दि.19 नोव्हेंबर 2009 रोजी काही दुरुस्ती करणारा शासन निर्णय निगर्मित करण्यात आला. त्या शासन निर्णयाच्या परिच्छेद 12 (1) व 12 (2) मध्ये स्पष्टपणे विद्यापीठावर व जॉईंट डायरेक्टर यांच्यावर वेतन निश्चितीची जबाबदारी सोपविली आहे आणि ते ती जबाबदारी पार पाडत नाहीत अशी तक्रार करणारे संघटनेच्या सहसचिवांचे दि. 2 डिसेंबर 2009 रोजीचे निवेदन असून ते माननीय मंत्री महोदयांना मिळालेले आहे. माझे एकच म्हणणे आहे की, एका विद्यापीठाची कागदपत्रे मला उपलब्ध झाल्यामुळे हा प्रश्न विचारलेला असला तरी सर्वच विद्यापिठांच्या तेथल्या जॉईंट डायरेक्टर यांनी अशा प्रकारे आपल्याकडे प्रकरणे पाडून ठेवणे ही गोष्ट अनुचित आहे, बरोबर नाही.

(सभापतीस्थानी - माननीय उप सभापती)

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी. देशमुख....

विद्यापीठाकडून त्यांच्याकडे प्रकरणे आली नसतील तर तो भाग वेगळा.पण जर जॉइंट डायरेक्टर यांच्याकडे प्रकरणे आलेली आहेत तर त्यांनी त्यावर निर्णय घेतला पाहिजे. नियमप्रमणे, कायद्याप्रमाणे त्यांना जो काय निर्णय घ्यावयाचा आहे तो त्यांनी ध्यावा. माझा पहिला प्रश्न असा आहे की, यापूर्वी 1988 मध्ये आणि 1999 मध्ये शिबिरे आयोजित करुन समोरा-समोर प्रकरण तपासून होय/नाही, मान्य/अमान्य असे करण्यात आले होते. मी सर्वच विद्यापीठ क्षेत्रातील जॉईंट डायरेक्टर्सच्या बाबतीत असे विचारु इच्छितो की, शिबिरे घेऊन त्यांनी आठ दिवसात, पंधरा दिवसात, वीस दिवसात त्यांच्याकडे आलेल्या सर्व प्रकरणांचा निकाल लावला पाहिजे, अशा प्रकारचे स्पष्ट आदेश त्यांना देण्याची गरज आहे. तसे आदेश देण्यात येतील काय? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, विद्यापीठाकडून जी प्रकरणे अजूनही आलेली नाहीत ती प्रकरणे जेव्हा येतील तेव्हा आल्यानंतर त्या प्रत्येक प्रकरणाचा आठ दिवसात सहसंचालकांनी निकाल लावला पाहिजे असे आदेश देण्यात येतील काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य प्रा. बी.टी.देशमुख साहेबांनी जे दोन प्रश्न विचारलेले आहेत ते या विषयाच्या संदर्भात निश्चितप्रकारे महत्वाचे प्रश्न आहेत. शासनाने ऑगस्ट महिन्यामध्ये जी.आर. काढून त्या ठिकाणी सहावा वेतन आयोग लागू केलेला आहे. या संदर्भातील पे-फिक्सेशनचे काम विद्यापीठ आणि सह संचालक ऑफिसवर सोपविण्यात आलेले आहे, त्यामध्ये दिरंगाई होत आहे याबाबतीत लक्ष घालण्याची निश्चतपणे आवश्यकता आहे. सभागृहाच्या माध्यमातून याबाबतीत सूचविण्यात आलेले आहे. या संदर्भात मी एवढेच सांगेन की, शिबिरे घेण्याची जी जुनीच प्रथा-परंपरा आहे ती पाळली जाईल. शिबिरे घेतली जातील. विद्यापीठाकडून सहसंचालकांकडे आलेली, निवेदनात म्हटल्याप्रमाणे 84 महाविद्यालयाचे 1341 प्रकरणे आहेत. ती एका महिन्याच्या आतमध्ये तातडीने काढण्यात येतील. विद्यापीठाकडून सहसंचालकांकडे जी प्रकरणे दाखल होतील, त्यानंतर आठ दिवसाच्या आतमध्ये ती पूर्ण केली जातील.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, या शासन निर्णयाने दोघांवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. परिच्छेद 12/1 ने विद्यापीठाकडे काही काम सोपविलेले आहे आणि परिच्छेद 12/2 ने जॉइंट डायरेक्टरकडे काही काम सोपविलेले आहे. जॉइंट डायरेक्टरविषयी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख...

माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितलेले आहे. संघटनेच्या सह सचिवांनी 2 डिसेंबर,2009 ला निवेदन दिलेले आहे ते आपल्याला मिळालेले आहे. त्याच्यासोबत एक सहपत्र आहे. नागपूरच्या जॉइट डायरेक्टरनी कार्यक्रम जाहीर केला की, या तारखेला या या महाविद्यालयांनी आपले प्रस्ताव घेऊन त्यांच्याकडे यावे. पण विद्यापीठातून ते प्रस्ताव गेले नाहीत. सर्वच विद्यापीठाच्या बाबतीत कमी-जास्त प्रमाणात ही तक्रार आहे. म्हणून माझा दुसरा प्रश्न असा आहे की, आपण या बाबतीत विद्यापीठांना स्पष्टपणाने कळविले पाहिजे की, त्यांच्या लेव्हलवरचे सारे प्रस्ताव जॉइंट डायरेक्टरकडे पंधरा दिवसात, वीस दिवसात पाठविले पाहिजेत. याप्रमाणे शासन विद्यापीठांना कळविणार आहे काय? तशा सूचना देणार काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, अशा पध्दतीच्या सूचना शासनाने यापूर्वी देखील दिलेल्या आहेत. त्या सूचनांची तंतोतंत अमलबजावणी झाली नसेल तर निश्चितपणे विद्यापीठ स्तरावरील अधिकाऱ्यांना आणि डायरेक्टर किंवा सह संचालक स्तरावरील अधिकाऱ्यांना निश्चितपणे या संदर्भात कडक सूचना देण्यात येतील. जाणीवपूर्वक उशीर होत असेल तर मी याठिकाणी जबाबदारीने सांगू इच्छितो की, त्यासंबंधित अधिकाऱ्यावर कायदेशीर कारवाई देखील करण्यात येईल.

श्री. वसंतराव खोटरे : महाविद्यालयीन शिक्षकांसाठी आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यासाठी केंद्र सरकार 80 टक्के अनुदान देते. परंतु त्यासाठी मागणी करणे हे महाराष्ट्र शासनाचे कर्तव्य आहे. दि.31 मार्च,2010 पूर्वी जर केंद्र शासनाला यासंबंधीचा प्रस्ताव सादर केला नाही तर सदर अर्थ सहाय्य आपण गमावण्याची स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. यासंदर्भात लवकरच केंद्र सरकारकडे प्रस्ताव सादर केला जाईल असे निवेदनात म्हटले आहे. लवकर म्हणजे प्रस्ताव नेमका केव्हा पाठविण्यात येणार आहे. तीन-चार महिने झालेले आहेत तेव्हा एका महिन्यात किंवा पंधरा दिवसात हा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात येईल काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सर्व राज्यभरातील जेवढे उच्च शिक्षणातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी किंवा त्यांची जी वर्गवारी आहे त्या सगळयांच्या संदर्भातील पे-फिक्सेशनचे काम मी सांगितल्याप्रमाणे एका महिन्याच्या आतमध्ये केले जाईल. मी सांगितल्याप्रमाणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे. . . .

एक ते दीड महिन्याच्या आतमध्ये हे काम संपवून केंद्र शासनाकडून जे 80 टक्के अनुदान राज्य शासनाला मिळणार आहे त्यासंबंधीचा प्रस्ताव कुठल्याही परिस्थितीत जानेवारीच्या दरम्यान निश्चितप्रकारे केंद्र शासनाकडे पाठविण्यात येईल.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी विद्यापीठाविषयी जे उत्तर दिले ते समाधानकारक आहे. त्यांना पॉइन्टेड अशी मुदत देण्याची आवश्यकता आहे. काही ठिकाणी फार गोंधळाची परिस्थिती आहे. याबाबत काहीच काम झालेले नाही. या सर्व विद्यापीठांना शासनाने असे कळवावे की, हे वेतन निश्चितचे काम 15 दिवसाच्या आत करावे. 4 महिने झाले तरी काही विद्यापीठांनी काहीही केलेले नाही. तेव्हा 15 दिवसाच्या आत त्यांनी सर्व प्रकरणे वेतन निश्चिती करुन पाठवावीत अशा सूचना त्यांना दिल्या जातील काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, केवळ अमरावती विद्यापीठच नाही तर सर्व विद्यापीठांच्या संबंधित सेक्शनने 15 दिवसाच्या आत पे फिक्सेशनचे प्रस्ताव सहसंचालकांकडे पाठविले पाहिजेत हे त्यांच्यावर बंधनकारक करण्यात येईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : जुलै-ऑगस्ट, 2009 पासून राज्यात स्वाईन फ्ल्यू या आजाराच्या संसर्गामध्ये झपाट्याने होत असलेली वाढ

मु. शी. : जुलै-ऑगस्ट, 2009 पासून राज्यात स्वाईन फ्ल्यू या आजाराच्या संसर्गामध्ये झपाट्याने होत असलेली वाढ यासंबंधी डॉ. वसंत पवार, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री अनिल परब, परशुराम उपरकर, डॉ. दीपक सावंत, श्री. अरविंद सावंत, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" माहे जुलै-ऑगस्ट, 2009 पासून राज्यात स्वाईन फ्ल्यू या आजारांच्या संसर्गामध्ये झपाटयाने वाढ होणे, परदेशातून आलेल्या प्रवाशांकडून स्वाईन फ्ल्यूच्या संसर्गास सुरुवात होणे, स्वाईन फ्ल्यू या आजाराची हजारोंना लागण होणे तसेच स्वाईन फ्ल्यूच्या आजाराने शेकडो रुग्ण दगावल्याची भिती, संसर्गाच्या भितीने शाळा व महाविद्यालये बंद ठेवावी लागणे, बळींच्या संख्येमध्ये राज्यात पुणे शहरात 100 हून अधिक रुग्ण मृत पावणे व त्यात दिवसेंदिवस होत असलेली वाढ, या साथीवरील टॅमिफ्ल्यू गोळयांचा असलेला तुटवडा, शासनाने चुकीच्या पध्दतीने ही साथ हाताळल्याने रिया नावाच्या 14 वर्षीय मुलींवर उपचार करण्यास हेंडसाळ झाल्यामुळे तिचा मृत्यू होणे, या आजाराबाबत शासनातर्फे अधिकृत माहिती व उपाययोजना सांगण्यासाठी कोणीही उपलब्ध नसणे, मुंबईत आढळून आलेल्या रुग्णांचे नेमके काय केले याबाबत माहिती सांगण्यासाठी आरोग्य सचिव उपलब्ध नसणे, राज्यात सुरुवातीला रुग्णांची नेमकी संख्या 270 च्या आसपास असणे, शासनाच्या कुठल्याच पातळीवर या आजाराबाबत गांभीर्य न जाणवणे मुंबईतील गर्दीचा विचार करता मुंबईत वेळीच या आजारावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना न केल्यास आजार फैलावण्याची निर्माण झालेली भिती, सबब शासनाने याबाबत तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

प्रा. फौजीया खान (सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, जुलै-ऑगस्टमध्ये राज्यात स्वाईन फ्ल्यू झपाट्याने आला आणि हजारो लोकांना त्याची लागण झाली. शासनाने त्या काळामध्ये अनेक प्रकारच्या उपाययोजना केल्या. जवळपास 15 लाख 86 हजार रुग्णांचे स्क्रिनिंग केले आणि त्यामध्ये ज्या रुग्णांना टॅमीफ्ल्यूची गरज होती अशा 84 हजार 716 रुग्णांना ते दिले. माझी माननीय मंत्रिमहोदयांना आणि शासनाला एवढीच विनंती आहे की, हा आजार संसर्गजन्य आहे. त्यामुळे त्यावेळी सर्व शाळा कॉलेजेस सुध्दा बंद ठेवावी लागली. मेक्सिकोमधून विमानातून हा आजार आपल्यापर्यंत पोहोचला आणि सगळे रुग्ण आल्यामुळे हा आजार आणखी पसरला. आताही हा आजार आटोक्यात आलेला आहे असे म्हणता येणार नाही. या आजारामुळे 235 लोकांचे प्राण गेलेले आहेत. 235 लोकांना ट्रिटमेंट देण्यासाठी काही ठिकाणी व्हेंटिलेटर्स कमी पडलेले आहेत. ते व्हेंटिलेटर्स आणि रेस्पिरेटर्स या ठिकाणी जास्तीतजास्त प्रमाणात उपलब्ध करुन देण्यात येतील काय ? त्याचबरोबर या ठिकाणी टॅमीफ्ल्यूची ट्रिटमेंट लवकर सुरु केली नाही असा समज डॉक्टर लोकांमध्ये आहे. कारण जोपर्यंत टेस्ट पॉझिटिव्ह येत नाही तोपर्यंत टॅमीफ्ल्यूची ट्रिटमेंट द्यावयाची नाही असे आहे आणि टेस्ट पॉझिटिव्ह येण्यासाठी सात ते आठ दिवस लागतात. सात आठ दिवसानंतर टॅमीफ्ल्यूचा फायदा होत नाही अशी टॅमीफ्ल्यूची ॲक्शन आहे. जागतिक आरोग्य संघटनेने असे आदेश दिले होते की, टेस्ट पॉझिटिव्ह आल्याशिवाय ट्रिटमेंट देऊ नका त्यामुळे शासनाने तसे आदेश दिले. त्यामुळे प्रिव्हेंशन फेल झालेले आहे. त्यामुळे याबाबतीत शासनाने खुलासा करणे अत्यंत आवश्यक आहे. आता एक लस निघालेली आहे ती लोकांना देण्याचा शासन विचार करणार आहे काय ? जर सस्पेक्टेड रुग्ण असतील तर त्यांना ती लस देणार काय ?

प्रा. फौजीया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा पहिला प्रश्न व्हेंटिलेटर्स कमी पडत आहेत यासंदर्भात होता. मला असे सांगावयाचे आहे की, केंद्र शासनाचा जो निधी येतो त्याच्या शिवाय आतापर्यंत राज्य शासनाने 5 कोटी रुपये व्हेंटिलेटर्सवर आणि मेडिकल इक्विपमेंटवर खर्च केलेले आहेत. परत दुसरी साथ येऊ नये म्हणून प्रिकॉशनरी मेजर घेण्यासाठी 15 कोटी रुपयांचा सी.एफ. ॲडव्हान्स व्हेंटिलेटर्स आणि रेस्पिरेटर्स यासाठी राज्य शासनाने दिलेला आहे. त्याच्या खरेदीची प्रक्रिया सुरु झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

प्रा. फौजीया खान ....

टॅमीफ्ल्यू केव्हा देणार यासंबंधी विचारलेला आहे. यामध्ये सी, डी, आणि ए अशा तीन कॅटेगरीज केलेल्या आहेत. सी कॅटेगरीजचे जे रुग्ण आहेत त्यांचे सिम्प्टम्स जर माईल्ड असतील तर त्यांना टॅमीफ्ल्यू देणार नाही. बी कॅटेगरीमध्ये माईल्ड फिवर, सोर थ्रोट, रनिंग नोज, अंगदुखी, डोकेदुखी असे सिम्प्टम्स असतील..

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान...

आणि डायरिया आणि उलटी होत असेल तर अशा रुग्णांना बी कॅटेगरीमध्ये धरले जाईल. अशा रुग्णांची टेस्ट करण्याची गरज नाही. त्यांना इमिजिएट टॅमीफ्ल्यू गोळया देण्यात येतील. कॅटेगरी 'ए' मधील रुग्णांना आयसोलेशन वॉर्डमध्ये भरती करुन म्हणजे जास्त सिरियस केसेस असतील ज्यांना ब्रेथलेसनेस खास करुन अशा रुग्णांमध्ये हे ॲडिशनल सिम्प्टम्स असेल आणि लंग्ज डिसिज, हार्ट डिसिज, किडणी डिजिस असेल तर अशा रुग्णांना कॅटेगरी ए अंतर्गत टॅमीफ्ल्यू व आयसोलेशन वॉर्डमध्ये ॲडमिशन दिले जाईल. आज तरी वॅक्सीन अवेलेबल नाही, पण त्यावर रिसर्च चालू आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांच्या प्रश्नाला माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले आहे ते समाधानकारक नाही हे मी प्रथम सांगतो. माननीय मुख्यमंत्र्यांकडून सीएफ फंडातून 15 कोटी रुपये घेऊन व्हेंटिलेटर्स घेतले आहेत. त्यापैकी 5 कोटींचे व्हेंटिलेटर्स आले काय असा माझा पहिला प्रश्न आहे. कारण सेंट जॉर्जेस रुग्णालयामध्ये व्हेंटिलेटर्स नसल्यामुळे काही रुग्णांचा मृत्यू झाला अशी बातमी होती. व्हेंटिलेटर्स नसल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला की नाही हे मला माहीत नाही. बायोलॉजिकल लेव्हल फोर ही लॅबोरेटरी आपल्याकडे सेफ्टीसाईड म्हणून पाहिजे होती. त्यामुळे अनेक रुग्णांचे रक्ताचे नमुने हाफकिन इन्स्टिटयूट व पुणे व्हायरॉलॉजीमध्ये तसेच पडले होते. 2-2 हजार रक्तांचे नमुने पडून राहिल्यावर शासनाने डिसिजन घेतला. त्यांचा नमुन्यांचा रिपोर्ट कधी येणार ? त्या रुग्णांना कधी ट्रिटमेंट मिळणार ? त्यामुळे अनेक रुग्ण दगावण्याचा प्रसंग सुध्दा आला. त्यासाठी टॅमीफ्ल्यू गोळया प्रिव्हेंटिव्ह म्हणून आर्बीटरी द्यायला सुरुवात केली. कारण गव्हर्नमेंट हॉस्पिटलमध्ये रुग्ण आल्यानंतर त्यांना तुम्हाला कफ, फिवर, कोल्ड नाही असे सांगून दोन दिवस एजिथ्रोमायसिनच्या गोळया घेण्यास सांगितले, त्याने गुण न आल्याने तिसऱ्या दिवसापासून त्यांना टॅमीफ्ल्यू गोळया चालू करण्यात आल्या. अशाप्रकारे टॅमीफ्ल्यू गोळया दिल्यामुळे काही लोकांना इम्यूनिटी येण्याचा प्रसंग आला, रेझिसटन्स देण्याचा प्रसंग आला. त्यामुळे आपल्याकडे बायोलॉजिकल लेव्हल थ्री व फोर ही लॅबोरेटरी असणे आवश्यक होते. त्यासाठी केंद्र सरकारकडून एका लॅबोरेटरीचा कण्टेनर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

आलेला आहे. हा कण्टेनर हाफकिन इन्स्टिटयूटमध्ये तसाच पडलेला होता. ज्यांच्यामुळे ही लॅबोरेटरी तयार झाली नाही त्यांच्यावर शासन काय कारवाई करणार आहे ? मंत्रिमहोदय हाफकिन इन्स्टिटयूटमध्ये गेले आहेत की नाही हे मला माहीत नाही. परंतु आपण तेथे जावे. मुंबईमध्ये स्वाईन फ्ल्यूची साथ पसरली होती त्यावेळी मी हाफकिन इन्स्टिटयूटमध्ये गेलो होतो. तेथे मी डॉ.अभय चौधरी यांना मी भेटलो होतो. डॉ.अभय चौधरी यांनी मला कण्टेनर सुध्दा दाखविला होता. दिल्ली येथून स्वास्थ्य सुरक्षा योजनेमधून हा कण्टेनर आलेला आहे, त्यामध्ये लॅबोरेटरीचे इक्विपमेण्ट आत बसवावयाचे आहे असे मला त्यांनी सांगितले होते....

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा. आपण प्रश्नही विचारता आणि उत्तरही देता.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांना याची कल्पना नाही. मंत्रिमहोदय नवीन आहेत. आपल्याकडे आलेल्या कण्टेनरचे लॅबोरेटरीमध्ये रुपांतर करण्यात आले नाही, त्यासाठी संबंधिताविरुध्द काय कारवाई करणार आहे आणि तिसरा प्रश्न असा आहे की, नागपूर शहरामध्ये स्वाईन फ्ल्यूची साथ येण्याचा संभव आहे. येथे आजही स्वाईन फ्ल्यूचे रुग्ण आढळत आहेत. दोन रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत अशी माझी माहिती आहे. म्हणून नागपूर शहरामध्ये जी हॉस्पिटल्स आहेत त्यामध्ये पुरेशा प्रमाणात व्हेंटिलेटर्स आहेत काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी व्हेंटिलेटर्ससंबंधी प्रश्न विचारला आहे. आताच सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे की, व्हेंटिलेटर्स खरेदी करण्यासाठी आर्थिक तरतूद केली असून खरेदीची प्रकिया चालू आहे. लवकरात लवकर 10-15 दिवसात व्हेंटिलेटर्स खरेदीची प्रक्रिया पूर्ण होऊन जाईल. हाफकिन इन्स्टिटयूटच्या लॅबोरेटरीबद्दल सांगण्यात आले आहे. परंतु सभागृहाला मी सांगू इच्छितो की, यापूर्वी मुंबईमध्ये लेबॉरेटरीच नव्हती. ज्यावेळी लेप्टोची साथ मुंबईत आली त्यावेळी मी स्वत: धिरुभाई अंबानी फाऊण्डेशनकडून पैसे घेऊन हाफकिन इन्स्टिटयूटमध्ये लेबॉरेटरी सुरु केली. त्यांच्याकडून निधी घेऊन त्या लॅबोरेटरीची स्थापना केली आहे.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीची नाही

(श्री. सुरेश शेट्टी ...

सन्माननीय सदस्यांनी हाफकिन इन्स्टिटयूट मधील कंटेनरसंबंधी प्रश्न विचारला. हाफकिन इन्स्टिटयूट ही संस्था वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारित येत असल्यामुळे त्यासंबंधीची महिती घेऊन ती पटलावर ठेवण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : ते कंटेनर हाफकिन इन्स्टिटयूटमध्ये एक वर्षापासून पडलेले आहे.

श्री. सुरेश शेट्टी : मी सांगितले की, हाफकिन इन्स्टिटयूट वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारित येत असल्यामुळे त्याबाबतीत माहिती घेऊन ती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्री महोदयांकडे माहिती उपलब्ध नसेल तर, "ती नंतर देण्यात येईल" अशा प्रकारची उत्तरे अनेक वेळा दिलेली आहेत. स्वाईन फ्ल्यूचा प्रार्दुभाव थांबविणे हे सार्वजनिक आरोग्य खात्याचे काम आहे आणि त्यासंदर्भातील तपासणी करण्याचे काम हे वैद्यकीय शिक्षण विभागाचे आहे. वाटाघाटीच्या राजकारामध्ये तुम्ही खाती तोडली. परंतु माणूस जगला पाहिजे याची काळजी घेण्याचे काम शासनाचे आहे. आम्ही जेव्हा हाफकिन इन्स्टिटयूटला भेट दिली त्यावेळी तेथील डॉक्टर्स 18 तास काम करुन 83 रुग्णांच्या नमुन्यांची तपासणी करीत होते. माझा हरकतीचा मुद्दा हा आहे की, हा प्रश्न आमच्या खात्याचा नाही असे म्हणून टोलवाटोवली करणे योग्य नाही. माननीय मंत्री महोदयांनी ठोस अशा प्रकारचे उत्तर द्यावे.

श्री. सुरेश शेट्टी : मी सांगितले की, कंटेनरसंबंधीची माहिती घेऊन ती मी पटलावर ठेवीन.

डॉ. दीपक सावंत : ज्यावेळी हा प्रश्न सार्वजनिक आरोग्य खात्याकडे आला त्यावेळी त्या विभागाचे प्रमुख श्री. भूषण गगराणी होते.त्यांनी या स्वाईन फ्ल्यूच्या संदर्भातील संचलन वैद्यकीय शिक्षण विभागाने केले आणि त्यावेळी श्री. भूषण गगराणी हे त्या विभागाचे सचिव होते. ही अधिकची माहिती मी देत आहे.त्यामुळे हा वैद्यकीय शिक्षण विभागाचा प्रश्न असल्यामुळे त्याबाबतची माहिती नाही असे म्हणणे योग्य नाही.

श्री. सुरेश शेट्टी : हाफकीनमध्ये आलेल्या कंटेनरबाबतची माहिती घेऊन ती मी पटलावर ठेवीन असे उत्तर मी दिलेले आहे.

.2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : वेळेअभावी या प्रश्नाच्या तपशिलामध्ये मला जाता येत नाही. माझे दोन-तीन प्रश्न आहेत. रिदा शेख हिच्या मृत्यू संबंधी माहिती द्यावी. दुसरे असे की, या रोगावर प्रायव्हेट हॉस्पीटल्सना उपचार करण्याची परवानगी दिली नाही. तसेच त्याबाबतीत त्वरित निर्णय घेऊन ते प्रायव्हेट हॉस्पिटल्सना कळविले नाहीत. टॅमी फ्ल्यूच्या गोळया बाजारात उपलब्ध केल्या नाहीत. आता पुनश्च मोठी साथ येण्याची शक्यता डब्ल्यू.एच.ओ. आणि संसदेने वर्तविली आहे. तेव्हा याबाबत नेमकी वस्तुस्थिती काय आहे ? खरंच मोठी साथ येणार आहे काय ? स्वाईन फ्ल्यूच्या संदर्भातील तपासणी फक्त पुणे आणि मुंबईमध्ये होते. महाराष्ट्रामध्ये अन्यत्र ती कुठेही होत नाही. तेव्हा रत्नागिरी, संभाजीनगर, नाशिक, जळगाव अशा राज्यातील 7-8 महत्वाच्या ठिकाणी स्वाईन फ्ल्यूच्या तपासणीची व्यवस्था करण्यासाठी शासन कोणती पावले उचलणार आहे ? या रोगाचे लसीकरण मेक्सिकोमध्ये झालेले आहे. तेव्हा आरोग्य सेवेमध्ये काम करणा-यांना आणि छोट्या मुलांना या रोगाच्या लसीकरणाची व्यवस्था शासन करणार आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : पुण्यामध्ये घडलेल्या घटनेसंबंधी सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला. त्यासंबंधीची चौकशी करण्यात आली असता चौकशीमध्ये असे निष्पन्न झाले की, दोन्ही हॉस्पिटल्समधील डॉक्टरांनी केलेले उपचार योग्य प्रकारचे होते.

..नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.4... श्री.सुरेश शेट्टी..

इन्फ्लूएन्झा आणि एच1एन1 संदर्भातील रक्ताची तपासणी परवानगी नसताना केली हे माझ्या ब्रिफिंग घेत असताना लक्षात आले आहे. रुबी आणि जहांगीर या रुग्णालयांविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न कोणत्या कायद्यात बसतो याबाबत विधी व न्याय विभागाचा सल्ला घेऊन योग्य ती कारवाई करु. महाराष्ट्रात दुसऱ्या टप्प्यात एच1एन1 चा प्रादुर्भाव उद्भवल्यास कोणती तयारी केली आहे या प्रश्नाबाबत मी खात्री देऊ इच्छितो की, संपूर्ण महाराष्ट्रात सर्व जिल्हयात आपण डॉक्टर्सना प्रशिक्षण देऊन आवश्यक ती उपकरणे नव्याने खरेदी करीत आहेत. टॅमिफ्ल्यू गोळ्यांचा भरपूर स्टॉक उपलब्ध आहे. जी काही प्रिकॉशन्स घ्यायची आहेत ती घेतली आहे. राज्यात एच1एन1 चा पुन्हा प्रादुर्भाव झाला तर we will be in a position to tackle it effectively.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, स्वाईन फ्ल्यू या रोगाचा पुणे शहराला अधिक फटका बसला आहे. पुणे शहरातील नायडू हॉस्पिटलमध्ये महापालिकेच्या डॉक्टरांनी व तेथील सर्व कर्मचाऱ्यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने साथ नियंत्रणात आणण्याचे काम केले आहे. डॉक्टर्स, नर्स व आया यांचे काम लक्षात घेऊन शासन त्यांचा गौरव करणार आहे का? त्यांना विशेष असे प्रशस्तीपत्रक देणार आहे का?

श्री.सुरेश शेट्टी : त्यांना नियमात बसेल तो ॲवॉर्ड देऊ. पुणे महानगरपालिका आयुक्तांकडून यादी मागवून त्यांना आपण सर्टिफिकेट ऑफ मेरिट देऊ.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राज्याच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. पुणे, मुंबई या शहराची चर्चा याठिकाणी सुरु आहे. परंतु विदर्भामध्ये सुध्दा स्वाईन फ्ल्यूने बाधित रुग्ण आढळला आहे. केवळ रक्त चाचणीची व्यवस्था नसल्यामुळे अकोला येथील रुग्ण दगावल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे अकोला, नागपूर आदी महत्वाच्या शहरामध्ये तातडीने स्वाईन फ्ल्यूच्या संदर्भातील ब्लड टेस्ट करण्याची व्यवस्था उपलब्ध केली जाईल का?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, हे खरे आहे की राज्यात फक्त एनआयव्ही,पुणे आणि हाफकिन इन्स्टिटयूट, मुंबई या दोनच लॅब आहेत. यापुढे राज्यातील प्रत्येक जिल्हयात रॅपिड रिस्पॉन्स टीम तयार केली असून मायक्रोबायॉलॉजीस्ट, पेडियाट्रिस्ट, फिजिशियन्स यांचे पथक तयार करुन ठेवले आहे. नवीन लॅब आपण निर्माण करु शकत नाही. कारण सध्याच्या लॅब या सॉफिस्टिकेटेड आहेत. पूर्वी राज्यात फक्त एनआयव्ही, पुणे येथेच रक्त तपासणीची व्यवस्था

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.4... श्री.सुरेश शेट्टी..

उपलब्ध होती. ब्लड सॅम्पल आपण अंदमान व निकोबार येथे पाठवित होतो. आता पुणे आणि हाफकिन इन्स्टिटयूट, मुंबई येथे रक्तनमुने तपासणीची व्यवस्था होत असून राज्यातील प्रत्येक जिल्हयात रॅपिड रिस्पॉन्स टीम तयार केली आहे. कोणत्याही जिल्हयात एच1एन1 ची केस डिटेक्ट झाली तर ब्लड सॅम्पल पाठविल्यानंतर एनआयव्ही, पुणे किंवा हाफकिन इन्स्टिटयूट, मुंबई येथून 24 तासात रक्त तपासणीचा अहवाल मिळतो.

(नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, परवाच अकोला येथे एक रुग्ण दगावला. कारण त्याच्या रक्ताचे रिपोर्टस पुण्यावरुन लवकर न मिळाल्यामुळे प्रॉपर ट्रिटमेंट सुरु होऊ शकली नाही. स्वाईन फ्लू चा रुग्ण असताना वेगळ्या प्रकारची ट्रिटमेंट केली त्यामुळे तो मृत झाला. म्हणून गरज पडल्यास केंद्राकडून मदत घेऊन प्रत्येक विभागाच्या ठिकाणी एक लॅबोरेटरी निर्माण करावी. त्याचबरोबर रुग्णाची परिस्थिती क्रिटीकल असताना आपण नेमलेले पथक रक्ताची तपासणी करण्यासाठी हॉस्पिटलमध्ये जात नाही तर रुग्णालाच येथे घेऊन या असे सांगतात. वास्तविक त्या अवस्थेत पेशंट रक्त देण्यासाठी जाऊ शकत नाही. यादृष्टीनेही शासन व्यवस्था करणार काय ?

प्रा. फौजीया खान : महोदय, लेबोरेटरीजच्या संदर्भात मान्यता देण्यात आलेली असून रॅनबॅक्सीसारख्या प्रायव्हेट कंपनीला सुध्दा आपण मान्यता दिली आहे. काही प्रायव्हेट लॅबोरेटरीजकडून तसे प्रस्ताव आले तर त्यांनाही मान्यता देण्यात येईल. त्याचप्रमाणे शासन पातळीवर असाही निर्णय झालेला आहे की, आयसोलेशन वॉर्डमधील रुग्णांना शिफ्ट करायचे नाही तर तेथेच त्यांची ट्रिटमेंट करायची आणि हा निर्णय घेतल्यानंतर हा रेट कमी दिसून आला आहे.

श्री. सय्यद ज़मा : सभापति महोदय, जैसा मंत्री जी ने बताया है कि पहले एक ही प्रयोगशाला थी लेकिन अब दो प्रयोगशाला की व्यवस्था हो गई है, हर जिले में रेपिड रिसपांस टीम बनाई गई है. यह भी बताया गया कि 24 घंटे में टेस्ट रिपोर्ट प्राप्त हो जाती है. यह बात सही नहीं है कि 24 घंटे के अंदर रिपोर्ट प्राप्त हो जाती है. नागपुर और अमरावती में टेस्ट रिपोर्ट प्राप्त करने में 24 घंटे से ज्यादा समय लग रहा है. मेरा यह प्रश्न है कि नागपुर तथा अमरावती डिवीजन में आधुनिक प्रयोगशाला स्थापित करने का क्या कोई प्रोग्राम सरकार बनाएगी ? आज नागपुर तथा अमरावती में आधुनिक प्रयोगशाला बनाना जरुरी है.

(उत्तर आले नाही.)

श्री. दिवाकर रावते : महोदय, स्वाईन फ्लू च्या भीतीने पुण्यातील हॉटेल्स सुध्दा ओस पडलेली आहेत. मी पुण्याला 15 दिवसांपूर्वी गेलो होते तेव्हा माझ्या निदर्शनास आले. त्याचप्रमाणे परप्रांतियांचे लोंढे सुध्दा थांबलेले आहेत. म्हणून माझी अशी विनंती आहे की, असाच प्रपोगंडा शासनाने केला तर हे लोंढे 100 टक्के थांबतील. हे शासन करणार काय ?

(उत्तर नाही)

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सूचना केली की, एखादा पेशंट हलविण्याच्या स्थितीत नसेल तर त्याच्या रक्ताची चाचणी तो ज्या ठिकाणी ॲडमिट असेल तेथेच जाऊन घ्यावी. या अनुषंगाने माननीय मंत्री महोदयांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात.

श्री. सुरेश शेट्टी : ठीक आहे, अशा सूचना देण्यात येतील.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : यवतमाळ व वर्धा जिल्ह्यातील जिनिंग प्रेसिंगला लागलेल्या आगींमुळे झालेली जिवित व वित्त हानी

मु.शी. : यवतमाळ व वर्धा जिल्ह्यातील जिनिंग प्रेसिंगला लागलेल्या आगींमुळे झालेली जिवित व वित्त हानी यासंबंधी सर्वश्री जयप्रकाश छाजेड, सय्यद ज़मा संजय दत्त, जैनुद्दीन जव्हेरी मोहन जोशी, प्रा सुरेश नवले वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सय्यद ज़मा (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय पणन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पांढरकवडा (जि. यवतमाळ) तालुक्यातील अग्रवाल जिनिंग प्रेसिंगला दिनांक 4 डिसेंबर, 2009 रोजी वा त्यासुमारास आग लागून सुमारे अडीच कोटी रुपयांचा कापूस जळून खाक होणे आणि नांदगाव (ता.हिंगणघाट, जि.वर्धा) येथील श्रीनिवास कॉटन जिनिंग फॅक्टरीला दिनांक 9 नोव्हेंबर, 2009 रोजी वा त्यासुमारास आग लागून त्या आगीत दोन महिला मजूर जळून मृत्यूमुखी पडणे तर तीन महिला मजूर गंभीररित्या जखमी होऊन एक महिला मजूर बेपत्ता होण्याची घडलेली घटना, सदरहू आगीत सुमारे 20 हजार क्विंटल कापूस जळून खाक झाल्याने कोट्यवधी रुपयांची झालेली हानी, दोन्ही जिनिंग फॅक्टरीत मजूरांना कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसल्याने विशेषत: महिला मजूरांमध्ये निर्माण झालेले भितीचे व चिंतेचे वातावरण, सबब जिनिंग फॅक्टरीमध्ये काम करणाऱ्या महिला मजूरांना सुरक्षिततेची व्यवस्था उपलब्ध करुन न देणाऱ्या जिनिंग मालकावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक सहाय्य देण्याची नितांत आवश्यकता, तसेच कापसाला उच्च दर्जाचा किंवा हलक्या दर्जाचा आहे हे कळू नये म्हणून जाणूनबुजून कापसाला आग लावण्याचे होत असलेले प्रकार, सबाब कापसाला सतत लागत असलेल्या आगीची चौकशी करण्याची गरज लक्षात घेता याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. प्रकाश सोळंके (पणन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री जुन्नरे

अशुद्धीरत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दिन जव्हेरी : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात म्हटले आहे की, या जिनिंग प्रेसिंग मिल शासनाच्या नसून खाजगी मालकांच्या असून या ठिकाणी लागलेल्या आगीत शेतक-यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही. लक्षवेधी सूचनेत पुढे असेही म्हटले आहे की, नांदगाव (ता. हिंगणघाट, जि.वर्धा) येथील श्रीनिवास कॉटन जिनिंग फॅक्टरीला लागलेल्या आगीत दोन महिला मजूर जळून मृत्यूमुखी पडल्या असून 3 महिला मजूर गंभीर जखमी झालेल्या असून एक महिला मजूर बेपत्ता झालेली आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, ज्या महिला मजूर मृत्युमुखी पडल्या आहेत, गंभीर जखमी झालेल्या आहेत तसेच जी महिला बेपत्ता झालेली आहे त्यांच्या वारसांना शासकीय नियमा प्रमाणे नुकसान भरपाई दिली गेली आहे काय? त्यांना शासकीय नियमाप्रमाणे मोबदला मिळाला नसेल तर तो केव्हा दिला जाणार आहे व किती दिवसात दिला जाणार आहे ? तसेच या जिनिंग प्रेसिंग मिलच्या मालकांनी आग प्रतिबंधात्मक उपाययोजना मिलमध्ये बसवली होती काय ?

श्री. प्रकाश सोळंकी : सभापती महोदय, पांढरकवडा (जि. यवतमाळ) तालुक्यातील अग्रवाल जिनिंग प्रेसिंग मिलच्या गंजीला दिनांक 4 डिसेंबर, 2009 रोजी दुपारी 11.30 -12.00 वाजेच्या सुमारास आग लागली होती व ही आग पांढरकवडा नगरपालिकेच्या टँकरने दुपारी 4.00 वाजता आटोक्यात आणली. या घटनेत 13 हजार क्विंटल कापूस जळून भस्मसात झाला असून या ठिकाणच्या आगीमध्ये कोणालाही ईजा किंवा कोणीही जखमी झाले नसून कोणतीही जिवित हानी झालेली नाही.

तसेच नांदगाव (ता. हिंगणघाट, जि. वर्धा) येथील श्रीनिवास कॉटन जिनिंग फॅक्टरीला सायंकाळी 4 वाजता आग लागती होती व आगीत 5 महिला कामगारांना ईजा झाली असून 2 महिला कामगारांचा घटनास्थळी मृत्यू झाला असून अन्य दोन महिलांचा हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु असतांना मृत्यू झाला असून एका महिलेवर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु आहे. या घटनेत ज्या महिला मृत्युमुखी पडल्या त्यांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई दिली जाणार आहे. या आगीत ज्या महिला मजूर मृत्युमुखी पडलेल्या आहेत त्यांना नुकसानभरपाई मिळण्यासाठी संबंधित मिल मालकाबरोबर शासकीय अधिकारी, उपविभागीय अधिका-यांनी बैठक घेतली असून मृत महिला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंकी.....

मजुरांच्या नातेवाईकांना प्रत्येकी 1.5 लक्ष रुपये नुकसान भरपाई देण्याचे मालकांनी मान्य केले आहे तसेच जखमी महिला मजूरांना 25 हजार रुपये अनुदान देण्याचेही मान्य करण्यात आले आहे. संबंधित उप विभागीय अधिका-यांनी मालकांकडून पैसे जमा केले असून जखमी महिला मजुरांच्या औषधोपचाराचा खर्च व्यवस्थापन करणार आहे. उपविभागीय दंडाधिकारी कामगारांच्या वारसाची तपासणी करुन मदत करणार आहे. शासकीय नियमाप्रमाणे आगीत मृत्युमुखी पडलेल्या व जखमी झालेल्या महिला मजूरांना नुकसान भरपाई देण्याचे मालकांनी मान्य केले आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा : सभापति महोदय, माननीय मंत्री जी ने अभी कपास को लगी आग की घटना के बारे में बताया. सवाल यह है कि इन जिनिंग फेक्टरी को फेक्टरी एक्ट, काम्पेनसेंशन संबंधी एक्ट, मिनिमम वेजेस संबंधी एक्ट तथा कामगारों से संबंधी अन्य एक्ट लागू है या नहीं ? मुआवजा सरकार ने दिया या मालिक ने दिया या और किसने दिया, यह सवाल नहीं है, सवाल यह है कि कानून के दायरे में पूरा मुआवजा मिला है या नहीं और मृत व्यक्ति के आश्रितों को नौकरी दी जाएगी या नहीं ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, त्या ठिकाणच्या स्थानिक आमदारांनी व उप विभागीय अधिका-यांनी बैठक घेऊन काही निर्णय घेतले होते त्यानुसार या आगीत मृत झालेल्या वारसदारांना दीड लाख रुपये आणि जखमी झालेल्या व्यक्तीला 25 हजार रुपये त्यांच्याकडे पोहोचविण्याचे मिल मालकाने मान्य केले आहे आणि हे पैसे उप विभागीय अधिका-यांकडे त्यांनी जमा केलेले आहेत. सन्माननीय सादस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला आहे त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, वर्क्समेन कॉम्पेनसेशन ॲक्ट खाली जी काही रक्कम द्यावयाची आहे ती सुध्दा देण्याचे व्यवस्थापनाने मान्य केलेले आहे. त्या बाबतीत क्लेम आल्यानंतर व्यवस्थापनाकडून ही रक्कम दिली जाईल अशा प्रकारची हमी व्यवस्थापनाने दिलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : हे पैसे केव्हा देण्यात येणार आहे ?

श्री..प्रकाश सोळंके : उप विभागीय अधिकाऱ्यांना वारसदार आयडेन्टीफाय झाल्यानंतर ही रक्कम त्यांना देण्यात येईल . हे पैसे जमा झालेले आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देतांना असे सांगितले की, ही खाजगी फॅक्टरी होती आणि खाजगी व्यापा-यांनी खरेदी केलेला हा कापूस होता त्या ठिकाणी आग लागल्यामुळे कापूस जळाला परंतु राज्य सरकारचे आर्थिक नुकसान झाले नाही. ही गोष्ट खरी आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री जामा यांनी दोन तीन प्रश्न विचारले होते. जीनिंग प्रेसिंग मिल नव्याने सुरु करीत असतांना वा फॅक्टरी ॲक्ट नुसार त्याचे रजिस्ट्रेशन करीत असतांना. त्या फॅक्टरीमध्ये पाण्याचा साठा असला पाहिजे, तेथे कपाऊन्ड असले पाहिजे.यासंबंधीचे काही नियम घालण्यात आलेले आहेत. तेव्हा या सर्व गोष्टी फॅक्टरी मालकाने केलेल्या आहेत किंवा नाही याची चौकशी कोण करणार आहे ?की या संबंधीची चौकशी करण्याची गरज शासनाला वाटत नाही ? कापूस हा खाजगी व्यापा-यांचा जरी असला तरी त्याला आग

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लागल्यामुळे राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान झालेले आहे. तेव्हा या कापसाचा विमा उतरविण्यात आला होता किंवा नाही, त्या ठिकाणी काम करणा-या कामगाराच्या ग्रॅच्युईटी व प्रॉव्हीडंड फंड संबंधीचे नियम त्या फॅक्टरीला लागू आहेत किंवा नाहीत या संबंधी सन्माननीय सदस्यांनी जो स्पेसिफिक प्रश्न विचारला आहे त्या बाबतीत चौकशी करण्याची आवश्यकता आहे तेव्हा जीनिंग प्रेसिंग फॅक्टरीच्या मालकाकडून काही चूक झाली आहे काय , या कापसाला लागलेल्या आगीचे कारण काय आहे ? याबाबतीत चौकशी अधिकारी नेमून चौकशी करण्यात येणार आहे काय ?

श्री प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की,त्या ठिकाणी इमर्जन्सी एक्झिट ज्या ठिकाणी होता त्याच्या समोर कापसाचा साठा करण्यात आला होता. त्यामुळे ही घटना घडली होती महाराष्ट्र कारखाने नियम 1963 च्या कलम 70 (एक) (क) आणि कलम 70 (9) (ड) चा भंग झाला असल्यामुळे भोगवटादाराविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे आणि त्याबाबतीत सविस्तर चौकशी सुरु आहे त्याचबरोबर पोलिसांनी सदर घटनेची चौकशी केली असून भारतीय दंड संहिता कलम 304 (अ) , 427 व 385 खाली मालकाच्या विरुध्द गुन्हा नोंदविलेला आहे .

उपसभापती : यानंतर विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ.शी.: फी वाढी संदर्भात शासनाने नेमलेल्या आयोगाचा अहवाल फेटाळण्याबाबत

मु.शी : फी वाढी संदर्भात शासनाने नेमलेल्या आयोगाचा अहवाल फेटाळण्याबाबत श्री.संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : प्रथम 9 डिसेंबर 2009 च्या विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे . त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखा सबंधीची सूचना मांडतो :

" या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस राज्य सरकारने माजी शिक्षण सचिव डॉ.कुमुद बन्सल यांच्या अध्यक्षतेखाली विना अनुदानित शाळांमधील फी वाढ संदर्भात एका आयोगाची स्थापना केली होती. आयोगाची स्थापना करतांना शासनाने असे अपेक्षिले होते की, आयोगाने पालक ,शिक्षक असोसिएशनशी व अन्य संबंधित शैक्षणिक संस्थेशी चर्चा करुन आपला अहवाल सादर करावा परंतु सदर आयोगाने असे न करता त्यांचा अहवाल इंग्रजीतून सादर केला. तो मराठीत करणे संयुक्तिक ठरले असते. अहवालातील तरतुदी पाहता संस्थेच्या व्यवसायिक कामासाठी संस्थेने त्यांच्या जागा भाडेतत्वावर दिलेल्या आहेत त्याचे उत्पन्न या अहवालात नाही. तसेच या अहवालानुसार शैक्षणिक संस्थांना फी वाढीसाठी मुक्त कुरण दिल्याचे दिसते. त्यामुळे विद्यार्थ्यावर अन्याय होणारच आहे. परंतु अधिक दरवाढीने पालकही त्रस्त होणार आहेत. या सर्व बाबीचा विचार करता शासनाने अहवालाच्या मुळ हेतुशी फारकत धेतल्याचे दिसते त्यामुळे सदरचा अहवाल विद्यार्थी पालक यांच्या हिताचा विचार करुन फेटाळावा व विद्यार्थी हिताचा विचार करुन सर्व समावेशक व पालकांनाही सुसहय होईल असा अहवाल सादर करण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा म्हणून सदर बाब विशेष उल्लेखाव्दारे शासनाच्या निदर्शनास आणत आहें. "

-- नंतर श्री. सुंबरे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मुंबईतील सेंट जॉर्जेस रूग्णालयात व्हेंटिलेटरची सुविधा न मिळाल्याने चार रूग्णांचा झालेला मृत्यू.

मु.शी. : मुंबईतील सेंट जॉर्जेस रूग्णालयात व्हेंटिलेटरची सुविधा न मिळाल्याने चार रूग्णांचा झालेला मृत्यू याबाबत श्रीमती अलका देसाई, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

--

उपसभापती : माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे., त्यांनी ती मांडावी.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते. -

" मुंबई येथील सेंट जॉर्जेस रूग्णालयात व्हेंटिलेटर वेळेवर देण्यात आले नसल्यामुळे चोवीस तासात या रूग्णालयात चार रूग्णांचा तडफडून मृत्यू झाल्याची घडलेली भयंकर घटना., या चार गरीब रूग्णांना जीवाला मुकावे लागले असताना रूग्णालयाचे अधीक्षक मात्र उद्धटपणे चार नाही दोनच रूग्णांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात येणे., यावरून हे सेंट जॉर्जेस रूग्णालय मृत्यूचा शॉर्टकट बनले आहे. तसेच या रूग्णालयातील दोन व्हेंटिलेटर गेल्या अनेक महिन्यांपासून बंद असूनही प्रशासन हे दुरूस्त करण्याकडे दुर्लक्ष करीत आहे. यामुळे रूग्णांना व्हेंटिलेटर वेळेवर मिळत नाही व त्यामुळे रूग्णांना आपला जीव गमवावा लागत आहे. रूग्णांना रूग्णालयात वेळेवर औषधोपचार मिळत नसल्यामुळे रूग्णांमध्ये भीतीचे व चिंतेचे वातावरण पसरणे, रूग्णांच्या जीवन मरणाच्या गंभीर प्रश्नांबाबत चर्चा उपस्थित करण्याकरिता मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे. "

***

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : परळी-वैजनाथ (जिल्हा बीड) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांत पाणी, वीज तसेच मुख्याध्यापक नसणे.

मु.शी. : परळी-वैजनाथ (जिल्हा बीड) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांत पाणी, वीज तसेच मुख्याध्यापक नसणे याबाबत ॲड.उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

--

उपसभापती : माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे., त्यांनी ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते. -

" बीड जिल्ह्यातील परळी-वैजनाथ तालुक्यात जिल्हा परिषदेच्या एकूण 169 शाळा असून त्यातील 69 शाळांमध्ये पिण्याचे पाणी नसणे, 99 शाळांमध्ये वीज नसणे, या शिवाय 16 शाळांमध्ये मुख्याध्यापक नसणे, यामुळे विद्यार्थ्यांना दिवसभर पाण्याविना राहावे लागणे, वीज नसल्याने अंधारात व उकाड्यात शिक्षण घ्यावे लागणे तसेच मुख्याध्यापकच नसल्याने शिक्षकांवर नियंत्रण नसल्यामुळे ज्ञानार्जनाचे काम व्यवस्थित न होणे, याबाबत सदर तालुक्यातील शाळांसाठी पाणी, वीज यांच्यास सोयी तसेच मुख्याध्यापक भरणेबाबत तातडीने करण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना करीत आहे. तिचा अवश्य विचार व्हावा. "

***

.... एफएफ 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्यातील अनुदानित संस्थांमधील अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करणे.

मु.शी. : राज्यातील अनुदानित संस्थांमधील अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करणे याबाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

--

उपसभापती : माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे., त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. -

" राज्यात अनुदानित माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थी संख्येच्या आधारे अर्धवेळ ग्रंथपालांची एकूण 2376 पदे मान्य असून त्यापैकी 385 पदे रिक्त असून कार्यरत पदे 1991 आहेत. त्यापैकी 924 पदांचे पूर्णवेळ ग्रंथपाल पदांमध्ये रूपांतर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उर्वरित 1067 अर्धवेळ ग्रंथपाल ज्या शाळांमध्ये काम करीत आहेत त्यांची विद्यार्थी संख्या पूर्णवेळ पद निर्माण होईल इतकी वाढण्याची अजिबात शक्यता नाही. या सेबंधी लक्षवेधी सूचना व अन्य मार्गांनी सभागृहामध्ये चर्चा झाली आहे. ज्या अर्थवेळ ग्रंथपालांची 5 वर्षे सेवा पूर्ण झाली आहे अशा अर्धवेळ ग्रंथपालांना विद्यार्थी संख्येची अट शिथिल करून निर्णय घेऊ असे आश्वासन 19.4.2006 रोजी दिले होते पण त्याची अद्यापही कार्यवाही झालेली नाही. अनेक अर्धवेळ ग्रंथपाल निवृत्त झाले असून काही जण निवृत्तीच्या मार्गावर आहेत. या कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी, पेन्शन, ग्रॅच्युईटी वगैरे सुविधा मिळत नसल्याने त्यांचे भावी आयुष्य निराधार झालेले आहे. म्हणून मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून हा विषय येथे उपस्थित केला आहे तरी शासनाने या अर्धवेळ ग्रंथपालांची पदे पूर्णवेळ पदांमध्ये रूपांतरित करण्याचा निर्णय त्वरित घ्यावा अशी विनंती मी करतो.

***

(यानंतर श्री. सरफरे ....जीजी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शिक्षक शब्दाची अवहेलना करुन "टिचर" नावाच्या गुटखा व व्हिस्कीची होत असलेली विक्री

मु.शी.: शिक्षक शब्दाची अवहेलना करुन "टिचर" नावाच्या गुटखा व व्हिस्कीची होत असलेली विक्री याबाबत श्री.विक्रम काळे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रामध्ये शिक्षकांचे महत्व अनन्यसाधारण आहे. "गुरुः ब्रम्हा, गुरुः विष्णू, गुरुः देवो महेश्वरा! गुरुः साक्षात परब्रम्ह, तस्मै श्री गुरुवे नमः" असे म्हटले जाते. जगात गुरुचे स्थान श्रेष्ठ आहे. शिक्षक हा उद्याची भावी पिढी घडवीत असतो. गुरुजीशिवाय विद्या होऊच शकत नाही हे आपण सर्वांनी अनुभवले आहे. "आचार्य देवो भवः" असेही म्हटले जाते. शिक्षकाला देवासमान मानले आहे. असे उच्च, श्रेष्ठ स्थान असलेल्या गुरुजींना हे स्थान असतांना सुध्दा महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात चक्क एका दारु बनविणाऱ्या कंपनीने "टिचर" नावाने व्हिस्की बनविलेली आहे. व त्याची चक्क बाजारात राजरोसपणे विक्री होत आहे. तसेच, एका गुटखा कंपनीने सुध्दा "टिचर" नावाने गुटखा बनविलेला आहे. तोही बाजारामध्ये सर्रासपणे विकला जात आहे. सभापती महोदय, या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने मी आपणास विनंती करतो की, शिक्षकासारख्या पवित्र शब्दाची अवहेलना आणि अवमान या राज्यामध्ये होत आहे. तो बंद करावा आणि या गुटखा कंपनीवर आणि टिचर व्हिस्कीवर बंदी घालावी. याबाबत शासनाने उत्तर द्यावे.

उपसभापती : माननीय सदस्यांच्या विशेष उल्लेखाच्या सूचनेबाबत शासनाने दोन दिवसात भूमिका स्पष्ट करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामार्फत ट्रिटमेंट प्लँट ऑपरेटरचा कोर्स सुरु करणे

मु.शी.: औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामार्फत ट्रिटमेंट प्लँट ऑपरेटरचा कोर्स सुरु करणे याबाबत श्री.संजय केळकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : आता मी आज दिनांक 10 डिसेंबर, 2009 रोजी माननीय सदस्यांनी दिलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना घेतो. माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, गाव पातळी, नगर परिषद तसेच महानगरपालिका क्षेत्रात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी सर्व प्रथम तलावातील पाणी जलशुध्दीकरण केंद्रात येते. मोठया महानगरपालिका वगळता बहुतेक गावातील व शहरातील जलशुध्दीकरण केंद्रे अत्यंत असमाधानकारक पध्दतीने सुरु असतात. अथवा बंद पडलेली असतात. जलशुध्दीकरण केंद्रे चालविण्यासाठी कुठेही प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध नसतात. बहुतेक ठिकाणी जलशुध्दीकरण केंद्राची देखभाल स्वच्छता कर्मचारी करीत असतात. यासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.

औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये ज्याप्रमाणे टर्नर, फिटर, वेल्डर, इलेक्ट्रिशियन, मशिनिस्ट इत्यादी अभ्यासक्रम असतात. त्याप्रमाणे ट्रिटमेंट प्लँट ऑपरेटरचा कोर्स औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामार्फत सुरु करण्यात यावा. आणि त्यामध्ये जल शुध्दीकरण (वॉटर ट्रिटमेंट), सांडपाणी प्रक्रिया (सिव्हरेज ट्रिटमेंट), व कारखान्यातील सांडपाणी प्रक्रिया (इफ्लुएन्ट ट्रिटमेंट), या अभ्यासक्रमाचा अंतर्भाव असावा. व या प्रशिक्षित विद्यार्थ्यांना ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगरपरिषद, महानगरपालिका, जीवन प्राधिकरण याठिकाणी त्यांना रोजगार दिल्यामुळे बेकारीसुध्दा कमी होईल. व शासनाचे जलशुध्दीकरणाचे कामही प्राधान्याने होईल. म्हणून औद्योगिक प्रशिक्षण

अशुद्धीत प्रत / शिक्षणीसाठी नाही

DGS/ SBT/ KGS/ KTG/ MMP/

श्री. संजय केळकर...

केंद्राच्या संदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा याकरिता विशेष उल्लेखाच्या सूचनेच्या निमित्ताने शासनाच्या निदर्शनास ही बाब आणीत आहे. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: यशवंतराव चव्हाण विद्यापीठातील पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षणासाठी शिवाजी विद्यापीठात प्रवेश नाकारणे

मु.शी.: यशवंतराव चव्हाण विद्यापीठातील पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षणासाठी शिवाजी विद्यापीठात प्रवेश नाकारणे याबाबत श्री.चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, यशवंतराव चव्हाण विद्यापीठ हे महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त विद्यापीठ असणे, सदर विद्यापीठाच्या बी.टेक. (इलेक्ट्रॉनिक्स) हा पदवी कोर्स बी.ई. (इलेक्ट्रॉनिक्स) समकक्ष असणे, सदर मुक्त विद्यापीठातून बी.टेक ही पदवी घेतल्यानंतर पदव्युत्तर अभ्यासक्रमांकरिता, एम.ई (इलेक्ट्रॉनिक्स), इतर विद्यापीठामध्ये प्रवेश मिळतो. परंतु शिवाजी विद्यापीठामध्ये प्रवेश मिळत नाही. श्री. मनोज नामदेव चव्हाण याने यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची बी.टेक. ही पदवी घेतल्यानंतर पदव्युत्तर शिक्षणासाठी शिवाजी विद्यापीठामध्ये दिनांक 5.5.2008 रोजी अर्ज करणे. परंतु अद्याप पर्यंत त्याच्या पात्रतेसंबंधी होकारार्थी अथवा नकारार्थी उत्तर न येणे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठामधील इंजिनिअरींग कॉलेजमध्ये प्रयोगशाळा सहाय्यक यांच्या पुढील शैक्षणिक भवितव्याचा प्रश्न निर्माण होणे, त्यांच्या शैक्षणिक पदव्या महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त विद्यापीठातील असल्यामुळे यशवंतराव चव्हाण विद्यापीठातील विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठामध्ये तात्काळ प्रवेश मिळावा. हा विषय अत्यंत गंभीर असल्यामुळे मी तो याठिकाणी विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित करीत आहे. शासनाने शिवाजी विद्यापीठाला त्या प्रकारच्या गाईडलाईन्स द्याव्यात अशी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यातील शेतकऱ्यांना महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून वीज जोडणी देण्यास टाळाटाळ करणे

मु.शी.: राज्यातील शेतकऱ्यांना महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून वीज जोडणी देण्यास टाळाटाळ करणे याबाबत श्री.केशवराव मानकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्य शासनाकडून राज्यातील शेतकऱ्यांच्या उत्थानाकरिता कोटयवधी रुपयांची तरतूद करण्यात येत आहे. परंतु राज्यातील बहुतेक शेतकऱ्यांच्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतर्फे शेतात पाण्याची सोय उपलब्ध व्हावी यासाठी विद्युत कनेक्शन देण्यासाठी टाळाटाळ करीत आहे. दोन-दोन वर्षापासून विद्युत विभागाकडे मागणी करुनही अद्यापपर्यंत शेतकऱ्यांनाकनेक्शन मिळाले नाहीत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर . . . .

शेतकऱ्यांनी नवीन विद्युत खांब लावण्यासाठी 2-2 वर्षे वाट पहावी लागत आहे. यामध्ये महाराष्ट्र विद्युत वितरण लिमिटेड कंपनीचे काम अत्यंत मंद गतीने होत असल्याचे लक्षात आले आहे. अशा प्रकारच्या शासन दिरंगाईमुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतामध्ये विद्युत पुरवठा वेळेवर न झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या धानाचे उत्पादन संकटामध्ये आलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर उपासमारीची आणि आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला रोष लक्षात घेता, शेतकऱ्यांना तात्काळ विद्युत पुरवठा होण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. धन्यवाद.

. . . .2 एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांची विशेष उल्लेखाची सूचना आहे. परंतु सन्माननीय सदस्या सदनामध्ये उपस्थित असल्याचे दिसत नाही. मला असे सांगावयाचे आहे की, जर विशेष उल्लेखाची सूचना देणारे सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये उपस्थित नसतील तर त्यांच्या सूचना घेतल्या जाणार नाहीत.

. . . .2 एच-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : शासकीय आश्रम शाळा लाहेरी (जि.गडचिरोली) या शाळेतील विद्यार्थ्यांना पुरेशा सोयी उपलब्ध नसणे.

मु.शी.: शासकीय आश्रम शाळा लाहेरी (जि.गडचिरोली) या शाळेतील विद्यार्थ्यांना पुरेशा सोयी उपलब्ध नसणे या बाबत श्री.व्ही.यू.डायगव्हाणे वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"शासकीय आश्रमशाळा लाहेरी (जि.गडचिराली) या शाळेतील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे भोजन दिले जाते. स्वयंपाकासाठी बंदी घातलेले खाद्यतेल स्वयंपाकात वापरले जाते. वसतीगृहाची दारे-खिडक्या तुटलेल्या आहेत. खोल्यांमध्ये विद्युत प्रकाश नसतो. वर्गात व स्नानगृहात गावातील मोकाट जनावरांचा संचार असतो, निकृष्ट दर्जाचे धान्य स्वयंपाकात वापरले जाते. तीन वर्षापासून शाळेत गणित व इंग्रजी विषयाचे शिक्षक नाहीत. शाळेतील विद्यार्थ्यांना एक वर्षापासून गणवेश मिळालेला नाही. विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची देखभाल योग्य पध्दतीने केली जात नाही. विद्यार्थ्यांच्या जेवणात भाजी व पोळी न देता दररोज भात आणि वरण दिले जाते. शासनाच्या नियमाप्रमाणे भोजनात आठवडयातून एकदाही मांसाहारी जेवण दिले जात नाही. शाळेच्या प्रशासकीय कामात अनियमितता असणे, शासनाकडून लाखो रुपयांचे येणारे अनुदान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही. मर्दानी महिला मंडळाच्या सदस्यांनी संबंधितांकडे तक्रारी केल्या असूनही विभागाने अद्यापही दखल घेतलेली नाही. या मागणीकडे शासनाने त्वरीत लक्ष घालावे यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे.

. . . .2 एच-4

पृ.शी.: बीड जिल्ह्यातील टुकुर साठवण तलावाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भूसंपादन प्रस्तावाबाबत कारवाई न होणे

मु.शी.: बीड जिल्ह्यातील टुकुर साठवण तलावाच्या भूसंपादन प्रस्तावाबाबत कारवाई न होणे या बाबत ॲड.उषा दराडे वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : सन्माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"टुकुर साठवण तलाव ता.जि.बीडचा पूल भूसंपादनाचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता बीड, पाटबंधारे विभाग, बीडकडे प्रलंबित असणे (फाईल नं.जा.क्र.बी.पा.वि.भू.स.195-सहपत्र, 13-1-04) अन्वये सदर कार्यालयाचे पत्रान्वये वि.भुसंपादन कायद्याच्या कलम 17 अंतर्गत शासनाने संपादित जमिनीचा अर्ज सी Clause अन्वये ताबा घ्यावा अशा आशयाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी बीडकडे दिला. पत्र क्र.बी.पा.वि.भू.स.400/3 प्रस्ताव, दि.6-2-09, कार्यकारी अभियंता, बीड कडून प्रस्ताव दि.9-2-09 रोजी जिल्हाधिकारी बीडकडे दिला. तो अद्याप प्रलंबित आहे. याबाबत शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना."

सभापती महोदय, टुकूर साठवण तलाव ता.जि.बीड याचा मूळ भू-संपादनाचा प्रस्ताव पूर्ण होणे, कलम-4 चे नोटीफीकेशन निघून त्याच्या नोटीसेस देखील संबंधित प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांवर सर्व्ह होणे. त्यानंतर संपादित संघ कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, जि.बीड यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे भूसंपादनाचा पत्र जावक क्र.बी.पा.वि.-185, सहपत्र दिनांक 13-1-2004 च्या सह जमिनीचा ताबा मागण्यासाठीचा प्रस्ताव संपादित संघ आणि जिल्हाधिकारी, बीड यांना देणे. जिल्हाधिकार, बीड यांनी वेळेमध्ये कारवाई न केल्यामुळे अनेक वर्षे प्रकरण प्रलंबित राहिले. त्यामुळे पुन्हा संपादित संघाने भूसंपादन कायद्याच्या कलम 17 अंतर्गत जमिनीचा ताबा घेण्याबाबतचा विशेष भूसंपादन 400/2 चा प्रस्ताव दिनांक 6-2-2009 रोजी पुणे जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविणे. अनेक वर्षापासून जिल्हाधिकारी यांच्याकडे हा प्रस्ताव प्रलंबित असणे. या कारणाने साठवण तलावाचा ताबा न घेतल्यामुळे तेथे टेंडर काढून दोन वर्षे झालेली ....

ॲड.उषा दराडे . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असतानाही अद्यापपर्यंत साठवण तलावाच्या कामास सुरुवात न होणे, याबाबत शासनाने ताबडतोब करावयाची उपाययोजना आणि ताबा घेण्याच्या दृष्टीने ताबडतोब निर्णय घेणे आवश्यक असून या बाबतची विशेष उल्लेखाची सूचना मी आपल्या अनुमतीने याठिकाणी मांडलेली आहे.

. . . .2 एच-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शासकीय व खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षेबाबत पोलीस व समाज व्यवस्थेमध्ये असणारी

उदासिनता.

मु.शी.: शासकीय व खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षेबाबत पोलीस व समाज व्यवस्थेमध्ये असणारी उदासिनता याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"सध्याच्या काळात विविध क्षेत्रामध्ये पुरुषांच्या बरोबरीने शासकीय तसेच खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांची संख्या जास्त असून या महिलांच्या सुरक्षेबाबत पोलीस व समाज व्यवस्थे मध्ये प्रचंड उदासिनता व निष्काळजीपणा जास्त आहे. पुण्यासारख्या मोठया शहरात माहिती तंत्रज्ञान किंवा बीपीओ क्षेत्रातील महिलांना लुटू त्यांचे खून करण्याचे प्रकार वाढत असून, गेल्या वर्षभरात तीन महिलांना लुटल्यानंतर त्यांच्यावर अत्याचार करण्यात येणे, दीड वर्षात ज्योती चौधरी, विद्या घोरपडे, उर्वशी ढवळे आणि नयना पुजारी या अत्याचाराच्या बळी ठरणे, महिलांना पोलीस संरक्षण देण्याच्या संदर्भात पोलीस आयुक्तांनी तयार केलेल्या नियमावरुन सर्व खाजगी कंपन्यांना पाठवून देखील त्यांची दखल पण घेतली नाही. आजही कंपन्यांचे प्रशासन महिलांच्या सुरक्षितते बाबतची आवश्यक माहिती पोलिसांना देत नसल्यामुळे महिलांच्यावरील अत्याचाराच्या घटनेचे वाढते प्रमाण, याबाबत शासनाने त्वरित निर्णय घेऊन महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी व सुरक्षिततेसाठी तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी."

सभापती महोदय, महिला कर्मचारी आय.टी.सेक्टरमध्ये मोठया प्रमाणात काम करीत आहेत. आय.टी.सेक्टरमध्ये काम करणाऱ्या स्त्रियांच्या सुरक्षिततेसाठी ज्या-ज्या शहरांमध्ये, खास करुन पुणे शहरामध्ये आय.टी.कंपन्यांना शासनाकडून एक नियमावली पाठविण्यात आलेली आहे. त्यानुसार या

. . . .2 एच-7

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

महिलांच्या सुरक्षिततेसाठी त्यांनी जवळजवळ 10 नियमांची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. महिला कर्मचाऱ्यांना पिक-अप् करताना किंवा ड्रॉप करताना तेथे सुरक्षा रक्षक कोण आहे ? गाडीचा ड्रायव्हर कोण आहे ? गाडीला जी.पी.ए.सिस्टीम असावयास पाहिजे. परंतु या नियमांचे पालन न इ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ाल्यामुळे कु.नयना पुजारीवर आणि त्याचबरोबर अनेक ठिकाणी देखील महिलांवरील अत्याचार आणि सामूहिक बलात्काराच्या घटना पुणे येथील हिंजवडी परिसरामध्ये घडलेल्या आहेत. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.मारुती कारंडे यांनी सांगितले आहे की, या सर्व कंपन्या सुरक्षिततेची पावले उचलण्यासाठी टाळाटाळ करीत आहेत. म्हणून विधान परिषदेमध्ये विशेष उल्लेखाच्या व्दारे मी या विषयाकडे सर्वांचे लक्ष वेधत आहे की, आय.टी.कंपन्या महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबद्दल जी उदासिनता दाखवित आहेत, त्याबद्दल शासनाने कठोर पावले उचलावीत आणि या कंपन्यांनी योग्य त्या पध्दतीने सर्व नियमावलीचे पालन करावे यादृष्टीकोनातून शासन कोणती पावले उचलत आहे याबद्दल या सभागृहाला माहिती व्हावयास पाहिजे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नक्षलग्रस्त भागातील शहीद पोलिसांच्या कुटुंबियांचे तातडीने पुनवर्सन व त्यांना आर्थिक मदत करणे.

मु. शी. : नक्षलग्रस्त भागातील शहीद पोलिसांच्या कुटुंबियांचे तातडीने पुनवर्सन व त्यांना आर्थिक मदत करणे याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यां□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. डॉ.नीलम गोऱ्हे(विधानसभेद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"दिनांक 6 डिसेंबर,2009 रोजी चंद्रपूर येथे पार पडलेल्या 59 व्या विदर्भ साहित्य संमेलनामध्ये गडचिरोली जिल्हयात नक्षलवाद्यांशी लढतांना तब्बल 152 पोलीस जवान शहीद झाले. त्यापेकी 29 मृत जवानांच्या पत्नीचा सदर साहित्य संमेलनामध्ये भावपूर्ण सत्कार करण्यात आला. सदर सत्काराच्या वेळी उपस्थितांचे डोळे भरुन आले. वीर मृतांच्या पत्नी लहान मुलांना घेऊन आल्या होत्या. अलीकडच्या काळात मावोवाद्यांच्या हिंसाचारात गडचिरोली जिल्हयात 750 पेक्षा अधिक आदिवासी मारले गेले आहेत. सर्वसामान्यांच्या संरक्षणाची जबाबदारी शिरावर घेऊन योग्य ती आर्थिक मदत, त्यांचे सुयोग्य पुनर्वसन शासनाने केलेले नसल्याचे स्पष्ट होणे, नक्षलवाद्यांशी लढणाऱ्या पोलिसांच्या मदतीला कुमक पाठविली जात नाही, परंतु मंत्र्यांना हेलिकॉप्टर पाठविले जाते. नक्षलग्रस्त भागातील शहीद पोलिसांच्या कुटुंबियांचे तातडीने योग्य पुनर्वसन व त्यांना आर्थिक मदत करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,याबाबत शासनाने तातडीने निवेदन करावे, ही विनंती."

सभापती महोदय, मी यापूर्वी दिलेली वरील विशेष उल्लेखाची सूचना वीर पत्नीं बंद्दलची आहे. त्याबद्दल आपले निदेश मिळणे अतिशय गरजेचे आहे अशी माझी विनंती आहे. नक्षलवाद्यांशी लढतांना 152 पोलीस जवान गडचिरोली जिल्हयामध्ये शहीद झालेले आहेत. श्रीमती हेमलता वाघाडे या नक्षलवाद्यांशी लढणाऱ्या पोलिसांच्या पत्नीने अशी व्यथा मांडली की, आतंकवाद्यांशी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MMP/

डॉ नीलम गोऱ्हे. . . .

मुकाबला करताना जे पोलीस शहीद झाले त्यांची आठवण शासनाला आहे पण नक्षलवाद्यांशी लढतांना जे सामान्य पोलीस शहीद होत आहेत त्यांचे मृतदेह नेण्यासाठी साधी वाहनाची सुध्दा व्यवस्था होत नाही. म्हणून या ज्या वीर पत्नी आहेत, त्यांच्या पुनर्वसनाच्या दृष्टिकोनातून व त्यांच्या कुटुंबाला न्याय मिळण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने विचार केला पाहिजे. नागपूरमध्ये अधिवेशन होत आहे. सुरक्षिततेसाठी पोलीस कशा पध्दतीने लढणार आहेत? विधिमंडळातसुध्दा फोर्स वन-1 च्या मार्फत सुरक्षितता राखली जात आहे म्हणून या विशेष उल्लेखाच्याद्वारे शासनाला विनंती आहे की, या गडचिरोली जिल्हयामध्ये नक्षलवाद्याशी लढतांना जे वीर शहीद झालेले आहेत त्यांच्या वीर पत्नींसाठी एक खास कार्यक्रम शासनाने त्वरित अंमलात आणावा आणि त्यांच्या अश्रुंना न्याय द्यावा अशी माझी कळकळीची विनंती आहे.

उपसभापती :शासनाने या विशेष उल्लेखाची योग्य ती दखल घेऊन या संदर्भात आवश्यक ती उपाययोजना करावी.

श्री. शिवाजीराव मोघे :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्याची शासन निश्चितपणे दखल घेईल.

उपसभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2. 45 वाजता पुन्हा भरेल.

(2.06 ते 2.45 मध्यंतर)

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

मु.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(प्रस्ताव पुन: प्रस्तुत झाला)

उपसभापती : आता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु होईल.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावाला अनुमोदन देण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे. हे अनुमोदन देत असताना मला या ठिकाणी काही गोष्टींवर प्रकाश टाकावयाचा आहे. 2004 साली सर्वंकष विकास कार्यक्रम घेऊन आघाडी सरकार सत्तेवर आले. हे राज्य जागतिक दर्जाचे झाले पाहिजें, मुंबईसह महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा दर वाढला पाहिजे, मानवी विकास निर्देशांक वाढला पाहिजे, कृषीच्या क्षेत्रामध्ये, शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये, आरोग्याच्या क्षेत्रामध्ये, औद्योगिक क्षेत्रामध्ये आणि सर्वच क्षेत्रामध्ये महाराष्ट्राची प्रगती झाली पाहिजे या पार्श्वभूमीवर आपण काम करण्यास सुरुवात केली. हे काम करीत असताना अनेक संकटांचा आपल्याला मुकाबला करावा लागला. त्यात सर्वात मोठे संकट म्हणजे 26/11 चा जो हल्ला झाला त्या हल्ल्यातून महाराष्ट्राला यशस्वीपणे उभे करण्याची जबाबदारी महाराष्ट्र सरकारने यशस्वीपणे पार पाडली. त्या हल्ल्यात जे शहीद झाले त्यांच्या संदर्भामध्ये योग्य ती भूमिका घेऊन त्यांच्या विकासासाठी योग्य तो न्याय देण्याचा आपण प्रयत्न केलेला आहे. परंतु असा हल्ला पुन्हा होऊ नये यादृष्टीने दक्षता घेण्यासाठी ज्या जबाबदाऱ्या आपल्याला पार पाडावयाच्या होत्या त्याबाबत शासनाने गांभीर्यपूर्वक भूमिका घेऊन सुरक्षा आणि संरक्षणाच्या बाबतीत योग्य ती पावले उचलण्याच्या दृष्टीने फोर्स वन दल तयार केले. अत्याधुनिक साधनसामुग्री देऊन फोर्स वन दलाची स्थापना केली. सागरी सुरक्षेमध्ये वाढ केलेली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

ॲड. उषा दराडे ....

आहे. या सागरी सुरक्षेमध्ये वाढ करीत असताना नवीन बोटी सुध्दा त्वरेने देण्याचा प्रयत्न केलेला आहे. शासनाने फक्त 26/11 च्या हल्ल्याच्या संदर्भातच विचार केला नाही तर गडचिरोली क्षेत्रामध्ये जे नक्षलवादी हल्ले होत आहेत त्या क्षेत्रासाठी सुध्दा विशेष कृती योजना देऊन नक्षलग्रस्त गडचिरोली क्षेत्रामध्ये वेगळ्या पध्दतीने नियोजन करुन, वेगळी आर्थिक तरतूद करुन तेथील लोकांना आणि त्या भागाला न्याय देण्याचा आपण प्रयत्न केलेला आहे.

मागच्या पंचवार्षिक योजनेमध्ये पाच वर्षामध्ये विकास करीत असताना सर्वात महत्वाचे क्रांतिकारक पाऊल कोणते उचलले असेल तर ते म्हणजे शेतीच्या क्षेत्रामध्ये केंद्र सरकारने आणि केंद्रीय कृषी मंत्री नामदार शरद पवार साहेबांनी अशा प्रकारचे धोरण स्वीकारले की, शेतीच्या विकासाचा दर 4 टक्केपर्यंत न्यावयाचा. कृषी क्षेत्रामध्ये फार मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करावयाची आणि आपला देश अन्नधान्याच्या बाबतीत, कडधान्याच्या बाबतीत स्वयंभू करावयाचा आहे. हे करीत असताना महाराष्ट्रातील आणि विशेषत: विदर्भातील, मराठवाड्यातील शेतकरी अत्यंत मागासलेला असल्यामुळे तो विकास दर, उत्पन्न वाढीचा दर पेलू शकणार नाही. त्यांना यामध्ये सहभगी करुन घ्यावयाचे असेल तर त्यांना कर्ज माफीच्या स्वरुपात सहकार्य करणे गरजेचे आहे. हा विचार करुन केंद्र आणि महाराष्ट्र शासनाने मिळून 14 हजार कोटी रुपये 78 लाख शेतकऱ्यांना दिले आणि त्यातून शेतकऱ्यांना आपल्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न केला. त्याचा असा परिणाम झाला की, जवळपास 50 लाख शेतकऱ्यांनी 8732 कोटी रुपयांचे नवीन कर्ज घेण्याचा आणि उभे राहण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांच्या संदर्भामध्ये नेहमी बोलत असताना एका गोष्टीचा आग्रह करते की, शेतीला कृषी उद्योगाचा दर्जा देणे गरजेचे आहे आणि शेतकरी स्वत:च्या पायावर उभा राहिला पाहिजे अशा पध्दतीने आपण पुढे जाणे गरजेचे आहे. या चर्चेच्या निमित्ताने माझा तो आग्रह मी कायम ठेवलेला आहे. यासंदर्भात शासनाने काही भूमिका घेणे गरजेचे आहे. याबाबतीमध्ये अजून काही महत्वाची विशेष भूमिका आपण पार पाडली असेल तर ती म्हणजे मागच्या दहा वर्षामध्ये जो महाराष्ट्र पूर्णपणे अंधारात बुडालेला होता, जगाच्या पातळीवर महाराष्ट्रामध्ये कोणीही पैशाची गुंतवणूक करण्यास तयार नव्हते ती गुंतवणूक खेचून आणण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सरकारने यशस्वी प्रयत्न केलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे....

आणि त्याचा परिणाम म्हणून आज अधिकारवाणीने सांगते की, 2012 मध्ये महाराष्ट्र राज्य हे भारनियमनमुक्त झाल्याशिवाय राहणार नाही. कोणत्याही परिस्थितीत पुन्हा लोडशेडिंग होणार नाही. उद्योगधंद्याला, कृषी क्षेत्राला लागणारी वीज कमी पडू दिली जाणार नाही अशाप्रकारची भूमिका या शासनाने यशस्वीपणे पार पाडलेली आहे.

सिंचनाच्या बाबतीत संपूर्ण महाराष्ट्राची परिस्थिती पाहिली तर मागील 10 वर्षापूर्वीची परिस्थिती आणि आजच्या परिस्थितीमध्ये प्रचंड तफावत दिसून येत आहे. मराठवाडयातील बीड जिल्हयातील गोदावरी नदीमध्ये बॅरेजेस बांधलेले आहेत त्यामुळे आमच्या बीड जिल्हयातील, मराठवाडयातील सिंचनाचा अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न झाला आहे. अनेक प्रकारचे साठवण तलाव झालेले आहेत. मराठवाडयाचा सिंचनाचा अनुशेष दूर झालेला नाही हे मान्य आहे. परंतु अनुशेष दूर करण्याच्यादृष्टीने यशस्वी प्रयत्न निश्चितपणे झाला आहे. यासाठी काही अवधी लागणार आहे. शासनाने अनेक नवीन साठवण तलाव तयार केलेले आहेत. जायकवाडी धरणातून जाणाऱ्या कालव्यांची दुरुस्ती करुन वेगवेगळे साठवण तलावांची निर्मिती करुन, पाझर तलावांची निर्मिती करुन सिंचनाचा हा अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न केलेले आहे. परंतु मला शासनाला विनंती करावयाची आहे की, अनुशेषाची गणती करीत असताना मराठवाडयामध्ये, मागासलेल्या भागामध्ये 20-25 वर्षापूर्वी जे पाझर तलाव बांधण्यात आले होते त्यामध्ये प्रचंड गाळ साचलेला आहे. त्याचे सांडवे मोठया प्रमाणावर नादुरुस्त आहेत. जवळपास 300 तलावांच्या सांडव्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. मांजरा खोऱ्यातील पाणी आजतागायत बीड जिल्हयाला दिले जात नाही. हे सर्व अलिखित आहे. यासंबंधी शासनाने निश्चितपणे भूमिका घेण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने विचार करण्याची आवश्यकता आहे. दरवर्षी साधारणपणे पाणलोट क्षेत्रातून 2 लाख 5 हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण केली जाणार आहे. ग्लोबल वार्मिंगमुळे महाराष्ट्रासमोरच नाही तर देशासमोर, संपूर्ण जगासमोर फार मोठे आव्हान उभे राहिले आहे. बर्फ वितळत आहे, पाण्याची पातळी वाढत आहे, अकाली वादळे येत आहेत या सर्व परिस्थितीचा मुकाबला करण्याच्यादृष्टीने महाराष्ट्र शासन सतर्क आहे. नुकतेच फयान नावाचे वादळ येऊन गेले. या फयान वादळासंबंधी सभागृहात सविस्तर चर्चा झालेली आहे. या वादळामुळे शेतकरी उद्ध्वस्त

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

ॲड.उषा दराडे....

झाला. कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, सातारा, सांगली या जिल्हयातील पिकांचे अतोनात नुकसान झाले. आम्हाला असे वाटत होते की, हे संकट केवळ कोकणावर आलेले आहे, परंतु या वादळामुळे केवळ कोकणपट्टीतील शेतकऱ्याचेच नुकसान झाले नाही तर मराठवाडा, खानदेशातील भाग 15 दिवस पावसाच्या सावटाखाली राहिला. त्यामुळे त्या भागातील पिकांचे नुकसान झाले. त्या भागातील शेतकऱ्यांना पुन्हा जगविणे, त्यांना उभे करणे, त्यांना मोडू न देणे यासाठी शासनाने सातत्य ठेवून प्रयत्न केला आहे. फयान वादळ झाल्यावर आपद्ग्रस्तांना शासनाने शेतकऱ्यांना भरीव मदत देण्याचा प्रयत्न केला आहे आणि आजही तो सुरु आहे. या वादळामुळे सुपारीच्या बागा, नारळाच्या बागा, कोलमडून पडल्या, भाताची शेती गेली. आमच्या भागातील बाजरी, हायब्रीड ज्वारी, तूर, कापूस, या सर्व पिकांवर परिणाम झाला. या शेतकऱ्यांना पुन्हा उभे करण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. त्यामुळे या शेतकऱ्यांना काही अडचण येणार नाही अशाप्रकारचा मला विश्वास वाटतो.

सभापती महोदय, हे शासन मुंबई शहराला जागतिक दर्जाचे शहर करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याचा एक भाग म्हणून वरळी-वांद्रे हा सागरी सेतू मार्ग तयार झाला आहे. त्याप्रमाणे अनेक नागरी सुविधा देण्याबाबत महाराष्ट्र शासन आग्रही आहे. पूर्वी 80 टक्के ग्रामीण भागात व 20 टक्के शहरी भागात लोक रहात होते. आता शहरांमध्ये मायग्रेशन मोठया प्रमाणावर होत आहे. शेतकऱ्यांची मुले शहराकडे आकर्षित होत आहेत. मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, अमरावती ही शहरे वाढत्या लोकसंख्येमुळे फुगत चालली आहेत.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

(ॲड. उषा दराडे...)

छोट्या नगरपालिका होत्या त्या महानगरपालिका करण्यात आल्या. लातूर, औरंगाबाद ही पूर्वी छोटी छोटी गावे होती. त्यांना आता महानगरपालिकांचा दर्जा द्यावा लागला आहे. आजूबाजूची गावे त्या महानगरपालिकामध्ये समाविष्ट झाली. आज त्यांचे रस्त्याचे, पाणी पुरवठयाचे, सार्वजनिक आरोग्याचे वेगवेगळे प्रश्न निर्माण झालेले आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करुन आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविण्याचा प्रयत्न नगर विकास खात्यामार्फत केला जात आहे. सर्वात महत्वाची बाब कोणती असेल तर महिला बचत गटांना 4 टक्के दराने कर्ज देण्याचा घेतलेला निर्णय ही आहे. हा एक मानाचा तुरा छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेणा-या महाराष्ट्राच्या मुकुटामध्ये रोवला गेलेला आहे. महिलांना सक्षम करण्याचे स्वप्न बघणा-या या महाराष्ट्राने त्यासंदर्भात एक चांगला निर्णय घेतलेला आहे. महाराष्ट्र शासनाच्या कॅबिनेटने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण देण्याच्या बाबतीत महाराष्ट्र अग्रेसर आहे असे सांगून त्यासंबंधात आश्वासन दिलेले आहे. पंचायती राज व्यवस्थेमध्ये 50 टक्के महिला कार्यरत होतील त्यावेळी "जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी" या ऐवजी "जिच्या हाती इ ोंड्याची दोरी ती जगाते उद्धारी" असे म्हणणे सार्थ ठरेल आणि तो दिवस काही लांब नाही. अशा प्रकरचे चांगले निर्णय राज्य शासनाने घेतलेले आहेत.

सभापती महोदय, एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, मराठी भाषेचा गौरव, वैभव आणि प्रतिष्ठा सांभाळण्याची भूमिका राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आहे. या भाषेचा आम्ही या ठिकाणी गौरव करतो. परंतु दुसरीकडे आपण मराठी राज भाषेचा गौरव करीत असताना, तिचा सन्मान करीत असताना कोणी जर जात, वंश, धर्म मध्ये आणून सामाजिक समतोल बिघडविण्याचा प्रयत्न करणार असेल तर त्या संदर्भात कठोर उपाययोजना केली जाईल अशा प्रकारची भूमिका राज्य शासनाची आहे.

सभापती महोदय, संपूर्ण देशामध्ये आणि संसदेमध्येही लिबरहान आयोगाच्या अहवालावर चर्चा चालू आहे. बाबरी मशिद पाडण्याच्याबाबतीत कोण दोषी आहे हे सर्व देशाला आणि जगाला माहीत झाले आहे. अशा ज्या शक्ती धर्मा-धर्मामध्ये, जाती-जातीमध्ये भांडणे लावण्याचा प्रयत्न करतात...(अडथळा) जातीच्या, धर्माच्या, वंशाच्या नावावर विद्वेष पसरविणा-या ज्या शक्ती असतील

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांचा बिमोड करणे आणि महाराष्ट्राची एकात्मता टिकविणे ही या सरकारची बांधिलकी आहे अशी भावना व्यक्त करुन मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाला अनुमोदन देऊन माझे भाषण संपविते.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, गेली 10 वर्षे महाराष्ट्रातील सर्वसामान्य जतनेचे, शेतक-यांचे, श्रमजिवी जनतेचे कोणतेही भले न करता ज्यांनी सत्ता केली ते पुनश्च एकदा सत्तेत आलेले आहेत. महाराष्ट्राचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. महाराष्ट्र स्वतंत्र झ ाल्यानंतर या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये महाराष्ट्राचा किती सन्मान वाढवतो हा प्रश्न आहे. आपण आज स्वतंत्र भारतामध्ये बसलो आहोत. हा भारत स्वतंत्र होण्यासाठी हजारो लोकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, स्वातंत्र्य सैनिकांनी हौतात्म्य पत्करले. स्वातंत्र्य सैनिकांचा तेजसूर्य विनायक दामोदर सावरकर यांनी जगाच्या आणि देशाच्या इतिहासातील सागरी उडी मारली. ....

...नंतर श्री. भोगले..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

त्यानंतर त्या सागराला प्राणपणाने आवाहन करणारे, स्वातंत्र्याकरिता आवाहन करणारे गीत लिहिले, "ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला." स्वातंत्र्याकरिता तळमळीने लिहिलेल्या या गीताला 100 वर्षे पूर्ण होत आहेत. त्या गीताचा मी सुरुवातीला सन्मान करतो आणि महाराष्ट्र शासनाला सांगतो की, तुम्ही आम्ही ज्या स्वातंत्र्यकाळात सन्मानित म्हणून बसलो आहोत, सभागृह चालवित आहोत, राज्य चालवित आहोत त्या गीताचाही सन्मान सुवर्णमहोत्सवी वर्षात केला तर ते उचित होईल अशा प्रकारची सूचना करतो.

सभापती महोदय, माझे सरकार असा उल्लेख करीत असताना माननीय राज्यपाल महोदयांनी अनेक गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. त्या मनाला क्लेष देणाऱ्या आहेत. त्या अभिनंदनीय अशा नाहीत. माननीय राज्यपालांचे अभिभाषण असल्यामुळे विधीनिषेध असल्यामुळे, प्रथा व परंपरा असल्यामुळे सरकारचा निषेध करता येतो परंतु माननीय राज्यपालांचा करता येत नाही. खेदच व्यक्त करता येतो. दुसऱ्या परिच्छेदामध्ये माननीय राज्यपालांनी म्हटले आहे की, राज्याच्या जनतेकडून पुन्हा मिळालेल्या विश्वासदर्शक जनादेशामुळे राज्यातील जनतेच्या आशा आकांक्षांची शासनाने यशस्वीपणे पूर्तता केल्याचे सिध्द होते. माझे शासन सत्तारुढ झाले. कसे झाले? पुन्हा तुम्ही सत्ताधारी बाजूला आहात. अगदी जेमतेम 144 संख्येच्या बळावर तुम्ही सत्तेत आलेले असताना अपक्षांच्या दाढ्या कुरवाळण्याची पाळी तुमच्यावर आली. युतीकरिता प्रचंड भांडण झाले. झाली युती एकदाची. जागा वाटपात कोण मागे गेले, कोण पुढे झाले हा तुमचा विषय आहे. परंतु जनतेने तुम्हाला सन्मानाने 144 जागा देऊन बहुमत सिध्द केले, सरकार स्थापा म्हणून सांगितले ते सरकार स्थापन व्हायला 15-20 दिवस उलटले. संपूर्ण महाराष्ट्राची एवढी हेळसांड यापूर्वी कधी झाली नव्हती. कशाला तुम्हाला निवडून दिले असे जनतेला वाटायला लागले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा असलेले श्री.शरद पवारांना कसली अडचण होती? सन्माननीय मंत्री डॉ.पंतगराव कदम यांचे मी समजू शकतो. ते म्हणाले, मुख्यमंत्रीपद नको पण महसूलमंत्री पद द्या. त्यांचे भांडण मी समजू शकतो. परंतु दोन पक्षामधील भांडण कोणते होते? मंत्रीपदावरुन भांडण? 3 मंत्रीपदाचे भांडण? 15 दिवस रडतरडत, लोकलज्जेस्तव मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी शपथ घेतली, सत्ता आली म्हणून सांगण्याकरिता. मग सत्ता स्थापन केल्यानंतर मंत्रिमंडळाची बैठक होऊ शकली नाही. कारण दोनच मंत्री. तीन मंत्रीपदे आम्हाला पाहिजेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

मी सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांना प्रश्न विचारु इच्छितो. कारण सभागृहात माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे उपस्थित नाहीत. ते महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आहेत. त्यांची उपस्थिती याक्षणी आवश्यक होती. तुम्हाला सत्ता मिळाली. गेल्यावेळी काँग्रेस पक्षाच्या वाट्यातील 3 मंत्रीपदे तुम्ही रिक्त ठेवली होती. असलेले आमदार फुटतील, शरद पवारांच्या पक्षात जातील अशी भीती वाटत होती. त्यामुळे तीन मंत्रीपदे तुम्ही कायम लटकवत ठेवली. असलेली मंत्रीपदे तुम्हाला देता आली नाहीत. निवडणूक होईपर्यंत ती पदे रिक्त ठेवली. महाराष्ट्राला वेठीस धरले. हा सन्मान तुमचा? सत्ता आल्यानंतरही 15 दिवस 35 बैठका झाल्या. रोज टी.व्ही.वर पहायला मिळत होते. मुंबईत एकत्र बसले, दिल्लीत एकत्र बसले. जणूकाही गोलमेज परिषद भरली आहे. दृश्ये कशी होती? एकमेकाच्या कानात गुलूगुलू बोलत आहेत किंवा हातात हात धरुन उभे आहेत. पदांच्या खेचाखेचीमध्ये 15 दिवस उलटून गेले. गेल्या वेळेस तुम्ही 3 मंत्रीपदे रिक्त ठेवली होती. आता तुमच्या वाट्यातील 5 मंत्रीपदे रिक्त आहेत. कशाला मारामारी केली राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर? 5 मंत्रीपदे रिक्त आहेत. मला एक गोष्ट आठवते. एका गाढवाचा मालक गाढवाला चालविण्याकरिता पाठीवर बसतो.

(नंतर श्री.खर्चे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

आणि काठीला गाजर लावतात व त्या गाजराच्या आशेने ते गाढव चालत राहते. असे हे सर्व आमदार या पाच मंत्रीपदाच्या रिकाम्या जागेसाठी आशा धरुन आहेत. त्यांच्या पाठीवर आमचे मुख्यमंत्री स्वार झाले आहेत आणि काठीवर गाजर लावून चालले आहेत. हे चित्र एखाद्या व्यंगचित्रकाराने काढावे असेच आहे. माननीय मंत्री महोदय श्री. नितीन राऊत यांना थोड्या काळासाठी राज्यमंत्र्याचा अनुभव मिळाला परंतु आता ते कॅबिनेट मंत्री झाले त्याच वेळेस मी त्यांचे फोनवरुन अभिनंदनही केले होते. नुकताच मालवणी "वस्त्रहरण" या नाटकाचा 5000 वा प्रयोग मुंबईत झाला आपण सगळेच त्या प्रयोगाला गेला होता अशाच प्रकारे या शासनाचाही प्रयोग चालू झालेला आहे.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील तिसऱ्या क्रमांकाचा मुद्दा हा राज्याच्या सुरक्षिततेसंबंधीचा आहे. राज्यात हे कसले वस्त्रहरण चालले आहे तेच मला समजत नाही. दि. 26/11/2009 चे एनकाऊंटर झाल्यानंतर इतरही एनकाऊंटर्स वाढत चालले आहेत. त्यात तीन मंत्र्यांचे एनकाऊंटर झाले, आमच्याही तीन आमदारांचे एनकाऊंटर झाले. आम्ही प्रधान समितीचा अहवाल सादर करण्याची मागणी केली म्हणून आम्हाला निलंबित करण्यात आले होते. त्याचप्रमाणे पोलिसांच्याही तीन अधिकाऱ्यांचे एनकाऊंटर झाले. त्यात के.एल.प्रसाद, व्यंकटरमण् आणि परमवीर सिंह असे हे अधिकारी आहेत. हसन गफूरवर आपल्याला कोणती कारवाई करायची आहे त्याचाही उल्लेख सभागृहात करावा लागणार आहे. अशा प्रकारे तीन मंत्री, तीन आमदार आणि तीन पोलीस अधिकाऱ्यांचे एनकाऊंटर झाले. ही आपली कायदा व सुव्यवस्था. या मारामारीत आता गृह खाते अडकले आहे, ते कासवाच्या गतीनेही चालायला तयार नाही. माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील, हे आर.आर.पाटील, त्यांना आपले नाव मराठीत लिहिण्यास लाज का वाटत आहे हे मला समजत नाही. मी त्यांना रिचर्ड्स रॉबर्ट पाटील असे विनोदाने म्हणतो. त्यांचे खाते या मारामारीत अत्यंत धीम्या गतीने चालत आहे. काय तुमची दशा आहे, कसले कौतूक करता ? तिकडे भिवंडीत मात्र दोन पोलिसांना मारले जाते, त्यांचे डोळे काढले जातात, कवटी पोखरली जाते तरी देखील चौकी होत नाही. माननीय उपसभापतींनी यासाठी निधी दिला होता तरी देखील चौकी पूर्ण होत नाही. दुसरीकडे मात्र माननीय बाळासाहेबांवर टीका केली म्हणून आयबीएन

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

वाल्यांना थप्पड बसली म्हणून 307 चे कलम लावून गुन्हे नोंदविले जातात. भिवंडीत मात्र लादेनचे फोटो गळ्यात अडकवून फिरतात त्यांना काहीच नाही, हीच आपली मर्दुमकी आहे. एटीएस म्हणजे मरणाला सामोरे जाणे. हीच अवस्था असेल तर शासनाचे । सभागृहातून बाहेर घालविण्यासाठी एकमुखी ठराव केला. मी तर त्यावेळेस माझ्या जागेवरच्गृह खाते काय करीत होते ? त्यांचे जॅकेट कुठे हरविले त्यावरुन गोंधळ. आम्हाला मात्र बसून होतो तरी देखील माझे नाव टाकून ठराव केला. आम्ही सुध्दा आपल्यासारखेच देशासाठी व देशभक्तीसाठी तीव्र संताप व्यक्त करीत होतो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

आपण सगळे देशभक्त आहोत. हा विषय तुमच्या माझ्या पक्षाचा नव्हता. यासंदर्भात आमची काही तक्रार नसल्यामुळे मी त्या ठिकाणी पाऊल सुध्दा टाकले नव्हते. करकरे जाऊन एक वर्ष उलटून गेले तरी सुध्दा त्यांचे जॅकेट अजूनपर्यंत सापडत नाही ही किती लाजिरवाणी गोष्ट आहे. आबा जेंव्हा गृहमंत्री झाले तेव्हा त्यांनी करकरे यांचे जॅकेट शोधण्यासाठी एक चौकशी समितीची स्थापना केली. करकरे यांची वीर पत्नी जनतेमध्ये आंकत करते की, माझा पती कसा गेला ? माझ्या पतीचे अजून जॅकेट सुध्दा सापडत नाही ? त्या वीर पत्नीला करकरे यांच्या पोस्टमार्टेमचा रिपोर्ट देखील हे सरकार देऊ शकत नाही. जॅकेट सापडत नाही म्हणून शासनाने मखलाशी केली की, करकरे यांच्या गळयावर गोळया लागल्या होत्या, जॅकेटवर एकही गोळी लागली नव्हती असे सांगितले जाऊ लागले आहे, खरे म्हणजे असे बोलण्यासाठी लाज वाटली पाहिजे. आता आबांना पोलिसांच्या सुटलेल्या पोटाच्या संदर्भात चिंता लागलेली आहे. पोलिसांचे पोट सुटता कामा नये, आपदग्रस्तांना मदत दिली पाहिजे असे ते सांगत आहेत. सभापती महोदय, माननीय आबांची यादी वाचली तर फटाक्याची माळ जेवढी लांब असते तेवढी आबांची यादी लांबलचक आहे. त्यावर भाषण करण्यास मला कमीतकमी दीड तास लागेल. शीतावरुन भाताची परीक्षा केली जाते तशी या सरकारची परीक्षा करावी एवढेच मला या निमित्ताने म्हणावेसे वाटते.

सभापती महोदय, आयबीएन लोकमतवर जो हल्ला झाला होता त्या हल्यातील शिवसैनिकांवर जीवे मारण्याचा गुन्हा दाखल करावा अशा प्रकारचे कोर्टाचे आदेश आहेत. मग तुम्ही शिवसैनिकांवर जीवे मारण्याचा गुन्हा दाखल करणार का ? अजून पर्यंत अशा प्रकारचा गुन्हा का दाखल केला नाही. आमचे सैनिक आयबीएनवर जाब विचारण्यासाठी गेले होते तर ते काही लाठया, काठया, तलवारी घेऊन गेले नव्हते तर तो एक उद्रेक होता. काँग्रेसवाल्यांनी सुध्दा कार्यालये फोडली होती, आरपीआयने सुध्दा तुमच्या कार्यालयावर हल्ला केला होता, निवडणूकीतील तिकिटाच्या भानगडीत अनेक ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसची कार्यालये जाळण्यात आली होती परंतु त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले नाहीत. माननीय श्रीमती सोनिया गांधी यांचा आयबीएनच्या श्री. निखिल वागळे यांनी घाणेरडया शब्दात उल्लेख केला होता. आपण हे सर्व विसरला असाल आम्ही हे विसरु शकत नाही. देशाच्या एका जेष्ठ नेतृत्वावर घाणेरडी टीका

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

केली होती त्यावेळेला काँग्रेसवाल्यानी "महानगर" वृत्तपत्रावर हल्ला केला होता. ज्यांनी घाणेरडी टीका केली होती त्यांच्यावर ज्या काँग्रेसवाल्यांनी हल्ला केला होता त्यांचा मला अभिमान वाटतो. शासनाने त्यावेळेस मात्र काँग्रेस कार्यकर्त्यांवर कलम 302 चा गुन्हा दाखल केला नाही. आई-बहिणीच्या संदर्भात ज्यावेळी हीन पातळीवरुन बोलले जाते किंवा लिहिले जाते ते कधीही योग्य नाही. आता आमचा प्रश्न आहे की, नेत्यांबद्दली तुमची इभ्रत, तुमचा सन्मान, तुमचा अभिमान, तुमचा स्वाभिमान तुमच्याकडे असू द्या. वैयक्तिक मतभेद असू शकतात, मतभेद तात्विक असू शकतात परंतु व्यक्तिगत द्वेश असू शकत नाही. देशाच्या सर्वोच्च नेतृत्वावर एवढी चिखलफेक केली असतांना कार्यकर्त्यांनी जे काही केले त्याचा आम्हाला अभिमान आहे. आमच्याही नेतृत्वावर चिखलफेक झाल्यामुळे आमचाही तो उद्रेक होता. त्यावेळेस माझी प्रतिक्रिया काय आहे ? असे मला पत्रकारांनी विचारल्यावर मी सांगितले की, "मी त्या ठिकाणी नव्हतो याचे मला दु:ख होत आहे" असे सांगितले होते.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : आयबीएनवर जो हल्ला झाला होता त्यावेळेस तुमच्या खासदारांनी " ही उत्सर्फूर्त प्रतिक्रिया होती" असे सांगितले होते यासंदर्भात माझ्याकडे कात्रण देखील आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, त्यावेळेस शिवसेनेने उघड जबाबदारी घेतली होती. आपण कात्रण कसले दाखवता ? काल महसूल मंत्र्यांनी सांगितले होते की, "कात्रणं खरी नसतात" असे सांगून तुमच्याच कानफडात मारली हे आपण इतक्या लवकर कसे काय विसरता? त्यावेळेस आपण त्यांना कसल्याही प्रकारचे उत्तर दिले नाही. राज्यपाल महोदयाच्या अभिषणातील मुद्दा क्रमांक 6 हा शेतक-यांच्या संदर्भातील आहे. या सभागृहात आम्हाला शेतक-यांच्याा संदर्भातील अपमान सहन करावा लागला आहे. मी आपल्याला विनंती करतो की, आपण एकमेकाबंद्दल राजकीय सूड जो काही उठवायचा तो उठऊ, राजकीय आसूड जे काही मारायचे मारु आणि राजनितीमध्ये वर्चस्वही प्रस्तापित करु. मी माझ्या जीवनात शेतक-यांच्या प्रश्नाबद्दल कधीच राजकारण केले नाही आणि करणारही नाही. मी आपल्यासाठी एवढे केले म्हणून तुम्ही माझ्या पक्षाला मते द्या असे मी शेतक-यांशी कधीही बोललो नाही आणि बोलणार देखील नाही.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

तुम्ही सर्वजण विदर्भातील आणि ग्रामीण भागातील शेतक-यांचे प्रतिनिधी आहात. तेव्हा ज्यांच्या जीवावर या सभागृहापर्यंत येऊन आपण पोहोचतो त्यांचा सन्मान आपल्याकडून अपेक्षित `केला असतांना त्याबाबतीत आपल्याला वाईट वाटले असेल तर तो विषय सोडून द्यावा. परंतु मी आपल्याला अत्यंत आदरपूर्वक सांगू इच्छितो की, अशा प्रकारची चूक तुम्ही पुन्हा कधीही करु नका. शेवटी काय झाले ? तुम्ही वाजविलेल्या टाळया फुकट गेल्या आहेत तसेच तुमचा जल्लोष देखील फुकट गेला असून ही गोष्ट तुम्हाला मान्य करावी लागली. तेव्हा या सर्व गोष्टी आपण समजावून घेतल्या पाहिजेत. देशाची सुरक्षितता आणि राज्यातील पोलीस दलाचे मॉरल खच्ची होणार नाही अशा प्रकारची मानसिकता तयार करणे तसेच या देशातील शेतकरी इत्यादीच्या संदर्भात आपण कधीही एकमेकावर कुरघोडी करता कामा नये. हे मी आपल्याला अत्यंत नम्रपणें सांगत आहे.

सभापती महोदय, टीकेचा अधिकार तुमचा आमचा आहे व तो अधिकार राखून ठेवूनच तुम्ही आम्ही काम केले पाहिजे. दर्जेदार बी बियाणे राज्यात उपलब्ध झाले नाही म्हणून ते मिळावे या मागणीसाठी शेतक-यांना लाठया आणि गोळया खाव्या लागल्या ही गोष्ट सत्य आहे ती वस्तुस्थिती नाकारता येत नाही. त्यामुळे माननीय राज्यपालापासून ही सर्व धादांत व असत्य माहिती लपवून ठेवून त्यांच्या मुखातून या शासनाने समृध्द शेतक-याचे भाषण वदवून घेंतले आहे फियान चर्चेच्या निमित्ताने मी त्या संदर्भातील उल्लेख केला असल्यामुळे त्या बाबतीत आता मी पुन्हा बोलणार नाही.या संदर्भात केवळ तुमचे आणि माझे अपयश आहे अशातला भाग नाही. हा कोप निसर्गाने केला आहे त्याला सरकार म्हणून कसे तोंड देत आहात यासंबंधी आम्ही टीका केली होती. या सरकारने "फियान" आणले होते वा पाऊस अडविला होता असे आम्ही कधीही म्हटलेले नाही. परंतु सरकार म्हटल्यानंतर सरकारच्या ज्या काही जबाबदाऱ्या असातात त्या जबाबदा-या सरकारने निभवल्याच पाहिजे. जर सरकारने जबाबदारी पार पाडली नसेल तर ती बाब निदर्शनास आणून देणे हे विरोधी पक्षाचे काम आहे. बी बियाणे आणि खतासाठी राज्यातील शेतक-यांनी लाठया खाल्यानंतर माझ्या राज्यामध्ये शेतक-यांसाठी खते आणि बी बियाणे प्रचंड प्रमाणात उपलब्ध आहे असे जेव्हा आपण सांगता तेव्हा आदरणीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी दिल्लीवरुन असे

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सांगितले की, " महाराष्ट्र राज्याने खताची मागणी नोंदविलेली नाही त्यामुळे खताचा प्रचंड तुटवडा निर्माण झालेला आहे" तेव्हा या दोन विधानापैकी आम्ही नेमके कोणाचे विधान खरे मानावयाचे ? त्या संदर्भात प्रत्येक वेळेस हक्कभंगाची सूचना द्यावयाची काय ? या पूर्वी खताच्या संदर्भात मी लक्षवेधी सूचना मांडली होती तेव्हा माननीय कृषी मंत्र्यानी मला असे सागितले की, " राज्यात मुबलक खत उपलब्ध आहे व खताचा तुटवडा नाही ".दोन दिवसानंतर आदरणीय कृषी मंत्री श्री शरद पवार यांनी दिल्लीवरुन असे सांगितले की, "महाराष्ट्र राज्यामध्ये खत नाही, त्या ठिकाणी खताचा तुटवडा आहे व या राज्याने मागणी नोंदविलेली नाही.तेव्हा दोन दिवसात मागणी नोंदवावी ? तेव्हा आम्ही कोणाचे म्हणणे खरे मानावयाचे ? राज्याच्या कृषी मंत्र्यांचे म्हणणे खरे मानावयाचे की देशाच्या कृषी मंत्र्याचे म्हणणे खरे ` मानावयाचे .महामहिम राज्यपाल ज्यावेळी शेतकरी समृध्द असल्याबद्दल समर्थन करतात, राज्य सरकारच्या धोरणाचे समर्थन करतात त्यावेळी अत्यंत नम्रपणे याबद्दल आम्हाला खेद व्यक्त करावा लागतो . दुर्देवाने माननीय राज्यपालांच्या विरुध्द हक्क भंग आणता येत नाही. त्यामुळे खेद व्यक्त करण्या शिवाय मी काहीही करु शकत नाही. सकाळ वर्तमानपत्रामध्ये एक मोठे आर्टिकल छापून आले होते आणि ते मी वाचले होते .त्या आर्टिकलमध्ये असे सांगण्यात आले होते की, आम्हाला शेतकरी नवरा नको असे मुली सांगत आहेत. बी.ए., बी.कॉम व बी.एससी झालेल्या अनेक मुलींच्या अशा प्रकारच्या प्रतिक्रिया त्या आर्टिकलमधून छापून आलेल्या आहेत. त्यांनी असे सांगितले आहे की, शिपाई नवरा चालेल परंतु शेतकरी नवरा नको अशा प्रकारे शेतक-यांची दैन्य अवस्था निर्माण करणा-या सरकारचे माननीय राज्यपाल ज्यावेळी कौतुक करता तेव्हा कोणत्या तोंडाने तुमचा निषेध नोंदवावा, खेद व्यक्त करावा, नाकर्तेपणा सांगावा हे मला समजत नाही. शेतकरी नवरा नको अशा प्रकारे सांगणारी अनेक मुलींची प्रतिक्रिया असेल तर त्या पेक्षा दुसरे दुर्देव कोणते असू शकेल ?

सभापती महोदय, शेतक-यांना दिलासा देण्या ऐवजी धान्या पासून दारु तयार करण्याचे लायसेन्स आपल्या मुला बाळाना वा नातेवाईकांना देण्यात येत आहे. त्यामध्ये सुध्दा त्यांना सबसिडी दिली जाते. लातूरला तीन कोटी रुपयांची सबसिडी दिली होती.त्या ठिकाणी फक्त दोनच कारखाने सुरु करण्यात आले होते बाकीच्या कारखान्यांचे लायसेन्स रिव्होक करुन 2012

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

पर्यंत कारखाने सुरु करण्याची परवानगी दिली आहे व त्यांना असे सांगण्यात आले आहे की जनतेच्या खिशातील पैसे आम्ही तुम्हाला देतो हे कारखाने लवकर सुरु करावेत. जनतेच्या खिशातील सरकारच्या तिजोरीत जमा झालेले पैसे तुम्हाला देतो परंतु तुम्ही लवकर दारुचे कारखाने सुरु करुन दारुचे उत्पादन करा.असे त्यांना सांगितले जात आहे. एका ठिकाणी माननीय महसूल मंत्री असे सांगतात की , शेतक-यांच्या आत्महत्येस दारु कारणीभूत आहे आणि दुस-या बाजलूला मात्र दारु तयार करणारें कारखाने सबसिडीवर सुरु करा असे सांगण्यात येत आहे तेव्हा अशा प्रकारचे धोरण आपल्या राज्याचे आहे काय ? या धोरणाचे कौतुक करावयाचे काय ? शेतक-यांच्या दृष्टीकोनातून या धोरणाला मी विरोध करतो.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

कारण कर्जमाफीच्या बाबतीत मी पुढे बोलणारच आहे. मात्र मुद्दा क्र.6 जो आहे हा अशा प्रकारे शेतकरी धोरणाचा अत्यंत दुर्दैवी असा मुद्दा या सुवर्ण महोत्सवी वर्षात आलेला आहे. साडेसात हजारावर आत्महत्या झाल्यावरदेखील अजूनही शेतकऱ्यांच्या आत्महत्या चालूच आहेत. सरकार बनविण्याचा निर्णय लागला 24 तारखेला. त्या 24 तारखेपासून पुढील 24 तारखेपर्यंत म्हणजे माननीय मुख्यमंत्री महोदय पदाची शपथ घेईपर्यंत 60 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. त्यातील 42 आत्महत्या या एकट्या यवतमाळ जिल्ह्यात झालेल्या आहेत. मी काँग्रेस पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष श्री.माणिकराव ठाकरे यांना धन्यवाद देतो. वेळीच त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली आणि त्यामुळे त्यांनी ती रोखून धरली. आपले सरकार स्थापन होण्यात एक महिन्याचा काळ गेला आणि त्या काळात झालेल्या 60 पैकी एकट्या यवतमाळ जिल्ह्यात 42 आत्महत्या झाल्या. त्या आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या घरी आमचे मुख्यमंत्री शपथ घेतल्यानंतर गेले असते तर एक वेगळा असा संदेश सर्वत्र गेला असता. लोकांना उभारी आली असती, धीर आला असता आणि भविष्यामध्ये हे राज्य शेतकऱ्यांसाठी काही करणारे आहे, उद्ध्वस्त होणाऱ्या शेतकरी कुटुंबाला मदतीचा हात देणारे आहे, पाठीवरून हात फिरवील आणि आधार देईल असे वाटले असते. पण तसे न होता यवतमाळ आणि नांदेडमध्ये मुख्यमंत्र्यांच्या भव्य नागरी सत्काराचे आयोजन केले गेले होते. काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांना मी एवढ्याचसाठी धन्यवाद देतो की, त्यांच्या ही गोष्ट वेळीच लक्षात आली आणि त्यांनी आपले सत्कार रद्द केले. ही सारी परिस्थिती खेद व्यक्त करण्याजोगी आहे आणि तुम्हीही खेद व्यक्त कराल अशीच आहे. आता शेतकऱ्यांच्या कर्जाबद्दल मी आपल्याला काही सांगू इच्छितो. 4 जुलै 2009 रोजी सरकारने हा अध्यादेश काढला. बहुधा माननीय डॉ. पतंगराव कदम यांच्या काळातील तो असावा. कृषी कर्जावर आकारण्यात येणाऱ्या व्याजासंबंधात तो आहे. त्याबद्दल तुम्हाला सहकार आयुक्त आणि सहकार निबंधक यांचे पत्रही आलेले आहे. त्यांनी बँकांना दम देणारे पत्र लिहिले आहे. त्या पत्रात काय लिहिले आहे ? तर कृषी कर्जावर आकारण्यात येणाऱ्या व्याजाबाबत असे निदर्शनास आले आहे की, राज्यात बहुतेक सहकारी बँका कृषी कर्जावरील व्याजाची आकारणी करताना दरमहा पद्धती मुदलीकरण करीत आहेत ते थांबवा. हे राज्य शेतकऱ्यांसाठी काही करते आहे असे दाखविताना खालची यंत्रणा इतकी नासली, सडली आहे की, तुमची त्यांच्यावर काही पकडच नाही. सत्तेची पकड नाही, सरकारवर पकड नाही

.... क्यूक्यू 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ...

मंत्र्याची देखील पकड नाही. त्याचा परिणाम असा झाला आहे की, खाली कोणीही तुम्हाला मानत नाही. शेवटी मग अशा प्रकारे दमबाजीचे आदेश काढावे लागतात. शेतकऱ्याच्या कर्जाच्या आणि कर्ज आकारणीच्या आणि व्याजाच्या पुनर्रचनेसाठी हे करावे लागते. ही काय आपली पद्धत आहे ? आतापर्यंत आपण कोणावर कारवाई केली आहे ? कोणती कारवाई केली आहे ? माझ्याकडे या बाबत पुष्कळ माहिती आहे. पण हे प्रकरण कसे मांडायचे ? हे तर भ्रष्टाचाराचे प्रकरण आहे, त्यामुळे मी ते नंतर मांडेन. वाटल्यास, पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी मी हे प्रकरण उपस्थित करीन. आपल्या आदेशाने भ्रष्टाचार काही प्रमाणात थांबविला, त्यासाठी सीआयडी चौकशी थांबवली, करोडो रूपयांचा भ्रष्टाचार थांबविला. सभापती महोदय, हे सर्व करीत असताना मी राष्ट्रवादीच्या ताब्यात असलेल्या एका सहकारी बँकेचे प्रकरण, पुण्याच्या अजित सहकारी बँकेचे प्रकरण येथे मांडणार आहे. आता ही बँक अजितदादांची आहे हे कशाला म्हणायचे ? नावातच सारे काही आले आहे. ही बँक कोणाची आहे हे मला माहिती नाही. तुमच्या सहकार मंत्र्यांमध्ये हिंमत आहे का ? त्या बँकेच्या संचालक मंडळाचे तुम्ही दोन वर्षे लाड केलेत, पण त्याच काळात त्यांनी 62 कोटीचा भ्रष्टाचार केलेला आहे. संचालकांनीच बेकायदेशीरित्या कर्जे घेतली. तरीही संचालक मोकळे. मात्र आता ती बॉडी बरखास्त केली. आता चार महिन्यापूर्वी आपण ही बॉडी बरखास्त केलीत. का तुम्ही त्यांच्यावर कारवाई करीत नाही ? काल पर्यंत तेथून निवडून आलेले श्री.रामराजे निंबाळकर हे तुमच्या बरोबर होते. आता त्यांचे सुपुत्र आमदार आहेत. कारखाना त्यांच्या ताब्यात आहे. तुम्ही शेतकऱ्यांना किती छळणार आहात त्याचे उत्तर सहकाराच्या माध्यमातून द्या. गाळपाकरिता ऊस घेण्यासाठी कारखान्यांना बँकेकडून कर्ज घ्यावे लागते मात्र त्यासाठी साखर तुमच्याकडे सील होते, गहाण पडते. त्याला तारण लागत नाही. पवनराजे सुरूवातीस तुमच्याबरोबर होते, पण आता तुमच्यामधून ते गेले आहेत. त्यांचे चिरंजीव आता आमदार झाले आहेत आणि त्यांच्याच ताब्यात तो कारखाना देखील आहे. ते येथे अधिवेशनाला येण्याऐवजी तेथे उपोषणाला बसले आहेत. कारण काय तर कारखाना चालविण्यासाठी बँक कर्ज देत नाही. बँक म्हणते की कारखाना तारण ठेवता येणार नाही, तो अगोदरच तारण ठेवलेला आहे. साडेतीनशे कोटी रूपयांचे कर्ज कारखान्यावर अगोदरचेच आहे. हे कर्ज कोणी घेतले होते ? पण गाळपासाठी कर्ज देण्यासाठी तारण लागत नाही कारण येणाऱ्या साखरेची गोदामे हीच तुमची तारण असतात. पण मुद्दाम अडवणूक करायची.

.... क्यूक्यू 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

ही शेतकऱ्याची अडवणूक नाही का ? आता पवनराजेंचे चिरंजीव जे आमदार झाले आहेत ते या प्रश्नावर उपोषणाला बसले आहेत. असाच आणखी एक कारखाना आहे, नरसिंह सहकारी साखर कारखाना. केवळ हव्यासापोटी तेथील बॉडी बरखास्त केली. निवडणुका लांबवल्या. काँग्रेसचेच लोक नेमणार असे मंत्र्यांनीच मला सांगितले. मध्यंतरी त्या ठिकाणी एक खून झाला. ..

(यानंतर श्री. सरफरे ...2आर 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

त्यामध्ये एक माणूस मेला. आणि तो कारखाना पुन्हा निवडून आलेल्या संचालक मंडळाच्या ताब्यात दिला. आता त्यांना गाळप करण्याकरिता कर्ज देत नाही. ऊस गाळपासाठी येत असतांना सुध्दा कर्ज देत नाही. ही सत्तेची मस्तवाल अडवणूक शेतकऱ्यांनी कां सहन करावयाची, असा प्रश्न निर्माण झाला आहे? तुमच्याकडे सत्ता आली आहे, तेव्हा तुम्ही शेतकऱ्यांकरिता राज्य चालवा. विरोधकांनाही सन्मान द्या. कायद्यातील तरतूदीमध्ये समावेश असतांना आपण त्याची अंमलबजावणी करा. बँकांचे काय झाले? एकटया कोल्हापूर जिल्हयात साडे तीन हजार छोटया छोटया पतपेढयांमध्ये भ्रष्टाचार झाला आहे. तर मग संपूर्ण महाराष्ट्रामध्ये काय परिस्थिती असेल? तुमचे सहकार खाते काय करीत आहे? माननीय मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील हे गेली पाच वर्षे सहकार मंत्री होते. त्यांनी गेल्या पाच वर्षात एकही कारवाई केली नाही. आता पुन्हा ते मंत्री झाल्याबद्दल त्यांचे स्वागत करावयाचे काय? काय हा आबादी आबाद कारभार आहे? एकटया सांगली जिल्हयात खूप गोंधळ आहे. त्याबाबत माननीय सदस्य श्री. शिंदे साहेब आपल्याला सांगतील. तुमच्याबरोबर सत्तेत असलेल्या धनदांडग्यांनी सर्व साफसूफ करावयाचे, घरी न्यायचे तरीही त्यांच्यावर कारवाई काही नाही. तेथील एका संचालकाच्या बाबतीत हायकोर्टाने निर्णय देऊन आज सात वर्षे झाली, त्यांनी खाल्लेले 33 कोटी रुपये त्यांच्याकडून भरुन घ्या असे हायकोर्टाने सांगितले. तरीही अजूनपर्यंत कारवाई झालेली नाही. ते राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये आहेत की, कॉंग्रेसमध्ये आहेत हे मला माहीत नाही. अशाप्रकारे सांगली जिल्हयामध्ये भ्रष्टाचाराने धुमाकूळ घातला आहे, अशी संपूर्ण विचित्र परिस्थिती असल्यामुळे यामध्ये परिणाम शून्यता निर्माण झाली आहे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती माननीय डॉ. वसंत पवार)

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये मुंबई शहर जागतिक दर्जाचे करणार असल्याचे सांगितले आहे. शासनाने सन 2000 पर्यंतच्या झोपडया अधिकृत केल्या आहेत. आणि आता सन 2010 पर्यंतच्या झोपडया अधिकृत केव्हा करणार? असे मी विचारीत असतांना हे जागतिकीकरण कसे काय करणार आहेत? हा प्रश्न निर्माण झाला आहे. आणि म्हणून या शहरासंबंधी आमचे सहकारी सविस्तर बोलतील. वरळीचा सागरी सेतू आमच्या काळात निर्माण झाला आणि तुमच्या काळात तो बांधून पूर्ण झाला. त्या सेतूला नाव देण्याची आपण केवढी घाई केली? त्या सेतूला सावरकरांचे नाव देण्याचा त्यावेळच्या भाषणातील प्रस्ताव असतांना आपण तो मोडून काढला. "ज्याच्या हाती ससा तो पारधी" याप्रमाणे सत्ता तुमच्याकडे आहे. तुम्ही त्या सेतूला राजीव गांधी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. दिवाकर रावते...

यांचे नाव दिले त्याला हरकत नाही. ते कसे दिले? मी रोज त्या सेतूवरुन जात असतांना कोपऱ्यामध्ये राजीव गांधी हात ठेवून बसलेले मला दिसतात. आणि म्हणतात, हे काम केव्हा पूर्ण होणार, आणि माझे नाव पुढे केव्हा चालणार? तो सेतू पूर्ण झाल्यानंतर आपण नाव द्यावयास हवे होते.परंतु नाव देण्यासाठी सुध्दा आपली घाई. हे सर्व अर्धवट कशासाठी करता? आणि म्हणून आपण सत्तेची हौस भागवीत आहात. माझ्याकडे विमानतळ असले पाहिजे म्हणून नांदेडला असलेले विमानतळ आपण वाडवून घेतले. त्याठिकाणी आंतरराष्ट्रीय विमाने येणार. मग आमचे विलासराव मागे कसे राहतील? त्यांचेही विमानतळ वाडले. त्याचप्रमाणे सिंधुदुर्गवाले माजी मुख्यमंत्री म्हणाले माझ्याकडे कां नाही? माझी पर्यटनाची हौस भागवा. त्याठिकाणी सुध्दा विमानतळाचे भूमिपूजन झाले. विमानतळ झाल्यावर सांगतील की, आमच्याकडे विमाने रोज उडत आहेत. तुमच्याकडे बसायला माणसे नाहीत म्हणून विमाने बंद झाली. तुम्ही हौसेखातर जनतेचे करोडो रुपये त्या मातीमध्ये टाकले. विमानात बसायला माणसे नाहीत म्हणून तुमच्याकडे उडायला विमाने नाहीत. विमानामध्ये 15-16 किंवा 24 माणसे सुध्दा नाहीत. संभाजीनगर-नांदेड-लातूर आणि मुंबई अशा तीन ठिकाणी विमान फिरुन सुध्दा त्यात बसायला माणसे नाहीत. ही हौस कशासाठी? आता याबाबत सिंधुदुर्ग जिल्हयात मोठे कॉंट्रॅक्ट दिले आहे. त्याचे तीन वेळा त्याच मंत्र्यांनी भूमिपूजन केले. ही तुमची हौस आहे म्हणून मी तुम्हाला विनंती करुन सांगतो की, करणार असाल तर माननीय श्री. राऊत साहेब तुम्हीच करावे. ही बाब अभिमानाची आहे, आणि अनुकरणीय तर आहेच, अभिमानास्पदही आहे. खूनाच्या आरोपाखाली गेली सात वर्षे संध्या जाधव तुरुंगात असतांना तिने कला शाखेची पदवी घेतली. कौतुक म्हणून एका संस्थेने तिला 7 हजाराची नोकरी सुध्दा मंजूर केली. हे कुणी केले? नाशिकच्या एका मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुधीर गव्हाणे यांनी या मुलीला शिकविले, तिला पदवीधर केले , तिला नोकरी मिळाली. माझा प्रश्न असा आहे की, डॉ. सुधीर गव्हाणे यांचा यानिमित्ताने आपण सन्मान करणार काय? आणि संध्या जाधव हिचा तुरुंगामधील उर्वरित शिक्षेचा जो कालावधी आहे तो माफ करुन तिने कष्टाने उभे केलेले सामान्य जीवन तिला प्राप्त करुन देणार काय? हा प्रश्न मी आपणापुढे उपस्थित करतो?

(यानंतर श्रीमती थोरात)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

शिवसेनेचा वचननामा या शासनाने स्वीकारल्याबद्दल मी या शासनाला मनापासून धन्यवाद देतो. जमिनीची मशागत करणाऱ्या आदिवासींना त्या जमिनी देण्याची या शासनाने घोषणा केलेली आहे.

मराठीच्या सन्मानाबदल माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख केलेला आहे. सभापती महोदय, मी हा फोटो आपल्याकडे पाठवून देतो. शासकीय फलक उर्दूमध्ये लावलेले आहेत. मराठीच्या गप्पा कसल्या करता? उद्घाटनाचा फलक उर्दूमध्ये लिहिलेला आहे. हे शासनाचे मराठी प्रेम आहे काय?. आजही वर्तमानपत्रामध्ये जिल्हापरिषदेच्या, नगरपालिकेच्या जाहिराती मराठीतून आल्या पाहिजेत असा दंडक असताना त्याला कोणी जुमानत नाही. यासंदर्भात लिहिलेल्या पत्रांची मोठी फाईल माझ्याकडे आहे. मराठी वर्तमानपत्रात इंग्रजीमध्ये जाहिराती येतात. उर्दूचे फयान आता येऊ घातलेले आहे. " वंदेमात्रम" हे गीत आमच्या लोकांसाठी उर्दूमधून देण्यात यावे, अशा प्रकारची मागणी ऑल इंडिया शिया पर्सनल लॉ बोर्डने केली आहे. ते उर्दूतून दिले की, मग उर्दूची मान्यता घेणार. या महाराष्ट्रामध्येही तोच प्रकार चालू झालेला आहे. या महाराष्ट्रात उद्घाटनाचे उर्दूमध्ये बोर्ड लिहायला सुरुवात केलेली आहे. मी हे सगळे फोटो वर्तमानपत्राकडे छापण्यासाठी पाठवून देणार आहे. हेच या शासनाचे मराठी प्रेम आहे काय?. हा बोर्ड मी हातोडयाचे घाव घालून तोडला त्याबद्दल मला अभिमान वाटतो. रात्री अडीच वाजता हा बोर्ड मी तोडला पोलिसाची गाडी आली. मी त्या पोलीसाला जवळ बोलावले व तू मराठी आहेस ना मग तुला हा उर्दू बोर्ड मान्य आहे काय?असे विचारले तेव्हा तो म्हणाला साहेब आपण हा बोर्ड तोडा, मी बाजूला थांबतो. पोलीसांनासुध्दा मराठीचा अभिमान आहे. म्हणून हे उर्दूचे फयान थांबविण्यात यावे. राजभाषेची मस्ती चालली आहे म्हणून रिचर्ड रॉबर्ट पाटील यांना मी पुन्हा विनंती करतो की, आपण मराठी नाव दिले तर या महाराष्ट्रावर उपकार होतील. सभापती महोदय, सांगण्यासारखे भरपूर असले तरी वेळे अभावी बोलता येणार नाही. पण अशा प्रकारची दहा वर्षाची उद्ध्वस्त राजवट पुन्हा सुरु झाल्याबद्दल आणि या धोरणांबद्दल माझा खेद व्यक्त करतो आणि माझे भाषण थांबवितो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेतांना माननीय राज्यपालांनी आपल्या भाषणात माझ्या शासनाला पुन्हा एकदा विश्वासदर्शक जनादेश मिळाल्याचा उल्लेख केला. हा विश्वासदर्शक जनादेश म्हणजे काँग्रेस आणि राष्ट्रवादीला मिळालेल्या 33 टक्के मतांचा आहे. 67 टक्के मते ही त्यांच्या राज्याच्या कारभाराच्या विरोधात होती. पण मतांच्या विभाजनाचे गणित असेल त्यामुळे आपण सत्तेत आला असाल. पण 33 टक्के मतांचा माननीय राज्यपालांना एवढा अभिनिवेश असल्यामुळे त्यांनी त्यांच्या भाषणात पुन्हा एकदा सत्ता आली याबद्दलचा उल्लेख केलेला आहे. जवळ जवळ 67 टक्के जनतेने आपल्या शासनाचा कारभार नाकारला आहे याचा त्यांनी विचार केला असता तर बहुदा त्यांनी या पध्दतीने आपल्या भाषणात नक्कीच उल्लेख केला नसता. सभापती महोदय, सरकार स्थापन झाल्यानंतर आकडेवारीच्या गणितामध्ये बहुमत आले कोणाला कोणते खाते मिळणार हा त्या त्या पक्षांच्या नेत्यांचा अधिकार आहे त्यांनी ते ठरविले पाहिजे.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

त्यांनी ते ठरवावयाचे आहे. मी त्यावर बोलणार नाही. मला आपल्यामार्फत शासनाला एवढेच म्हणावयाचे आहे की, जवळजवळ गेली दोन वर्षे शासनाने शिक्षण खाते गांभीर्याने घेतलेले नाही. एका माननीय मंत्रिमहोदयांकडे शिक्षण खात्याचा अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे. या शासनाचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोन हा करिक्युलर ॲक्टिव्हिटिज सारखा आहे काय ? केव्हा तरी पुढच्या मार्च-एप्रिल महिन्यामध्ये नवीन शिक्षण मंत्री येणार आणि ते पुन्हा माननीय श्री. विखे-पाटील यांच्यासारखी 90:10 ची घोषणा करणार आणि मग कोणी तरी कोर्टामध्ये जाणार. आम्ही विद्यार्थी चळवळीमध्ये काम करीत असताना शिक्षण मंत्री कसे निवडले जातात याबाबत चर्चा करीत होतो. आधी पाटबंधारे, महसूल, गृह, बांधकाम इत्यादी विभागांचे वाटप करावयाचे आणि शेवटी जे खाते उरले असेल त्या खात्याचा अतिरिक्त कार्यभार कोणाकडे तरी देऊन टाकावयाचा असे चालले आहे. शिक्षणाकडे बघण्याचा हा जो दृष्टीकोन राज्य सरकारने आपल्या मंत्र्यांचे खाते वाटप करताना दाखविला आहे त्यातून शिक्षण, विद्यार्थी, शिक्षक या सगळ्या विषयामध्ये हे सरकार कोणत्या दृष्टीकोनातून पाहात आहे हे दुर्दैवाने या मंत्रिमंडळाच्या खाते वाटपातून लक्षात येते. कोणाला कोणते खाते दिले याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. कारण तो त्यांचा अधिकार आहे. परंतु आपण या खात्यांचे वाटप करीत असताना विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन प्रायोरिटीने काही करणार की नाही ? याचा विचार शासनाने केलेला नाही. जनतेने विश्वासदर्शक जनादेश दिल्यानंतर सुध्दा हे झालेले नाही असे खेदाने म्हणावेसे वाटते. हा जनादेश मिळत असताना आपल्या पोलीस खात्यातील अधिकारी कसे काम करीत होते ? मी उल्हासनगरमधील एका घटनेचा उल्लेख करीन. त्या ठिकाणी श्री. पप्पू कलानी हे कॉंग्रेसचे उमेदवार होते. त्यांच्या विरोधात आमचे श्री. कुमार आयलानी उमेदवार होते. दुपारी 12 ते 12.30 वाजता जेव्हा लक्षात आले की, आपल्या विरोधामध्ये मतदारांची रीघ लागलेली आहे तेव्हा श्री. पप्पू कलानी यांनी जो मिळेल त्याला रस्त्यावर बडवत जावयाचे आणि त्यांनी मग पोलिसांमध्ये तक्रार करण्यासाठी जावयाचे असा सपाटा चालू केला. आमचे उमेदवार श्री. कुमार आयलानी याचे निवडणूक प्रतिनिधी श्री. नरेंद्र राजानी यांनी त्या ठिकाणचे डीसीपी श्री. संजय एनपुरे यांच्याकडे तक्रार केली. तुम्ही श्री. पप्पू कलानी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

यांचे नोकर म्हणून काम करीत आहात काय अशी विचारणा केली. लोकांना सटासट मारत जावयाचे, समोरच्या बाजूच्या कार्यकर्त्यांना मारावयाचे आणि त्यांना अडकवून ठेवावयाचे मग त्याबाबत डीसीपी म्हणून तुम्ही काय करणार आहात ? डीसीपी श्री. एनपुरे यांनी निवडणूक प्रतिनिधी श्री. नरेंद्र राजानी यांना तेथल्यातेथे गाडीत घेतले. गाडी म्हणजे त्यांची मोठी व्हॅन असते. त्यांचा मोबाईल घेतला. त्यांना आई-बहिणीवरुन शिव्या दिल्या. दादागिरी केली. त्यांनी अशी विनंती केली की, मी निवडणूक प्रतिनिधी आहे आणि मला मतदान करावयाचे आहे तरीही श्री. एनपुरे यांनी दादागिरीच्या जोरावर श्री. पप्पू कलानी यांना मदत करण्याचा प्रयत्न केला. त्यांची काही हप्ताबाजी असेल. परंतु याबाबत माननीय उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे. याची चौकशी केली पाहिजे. आपण निवडणूक प्रतिनिधीला डांबून ठेवता, त्याला आई-बहिणीवरुन शिव्या देता. समोरच्या उमेदवाराला निवडणुकीमध्ये फायदा होईल अशा पध्दतीचे वर्तन डीसीपी करतात आणि या ठिकाणी असे म्हणतात की, आम्हाला विश्वासदर्शक जनादेश मिळाला. तरी सुध्दा उल्हासनगर मधील जनतेने जे करावयाचे ते केले आणि श्री. पप्पू कलानी यांचा पराभव झाला.

सभापती महोदय, 26/11 च्या घटनेचा उल्लेख करीत असताना माननीय राज्यपालांनी सांगितले की, आम्ही फोर्स वन तयार केला आहे. मला आपल्या मार्फत दु:खद अंत:करणाने विचारावयाचे आहे की, याबाबत राज्य सरकार ठोस काही करणार आहे की नाही ? माननीय पंतप्रधान कार्यालयातून चेक आले. या हल्ल्यामध्ये जे जखमी झाले, जे मृत झाले त्यांच्या घरच्या लोकांना देण्यासाठी जे चेक आले ते पाच ते साडेपाच महिने ज्या डेस्कवर होते त्याच ठिकाणी पडून राहिले

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

आणि मग चेक बाऊन्स झाले त्या अधिका-यांवर सरकार काय कारवाई करणार आहे ? या हल्ल्यात लोकांचे प्राण गेले, लोकांनी प्राण दिले. त्यावेळी सरकारने एक कार्यक्रम केला, श्री.करकरे यांच्या पत्नीला आणले, श्री.साळसकर यांच्या पत्नीला आणले त्यांना स्टेजवर बसविले आणि त्यांना पेट्रोल पंपाच्या चाव्या दिल्या. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, राज्य सरकारने पेट्रोल पंपासाठी जमीनच दिली नाही. त्यासाठी राज्य सरकार जमीन देत नाही. पेट्रोल पंप नाही म्हणून महानगर गॅसच्यावतीने त्यांना दरमहा 25 हजार रुपयांचा चेक दिला गेला. म्हणजे शासनाला या शहीदांच्या पत्नींविषयी किती कदर आहे ती दिसून येते ? पण त्यांच्या फोटोंचा मात्र निवडणुकीच्या जाहीरनाम्यात वापर केला गेला, टी.व्ही.वर फोटो दाखविले गेले. मी श्रीमती साळसकर वहिनी यांना विचारले की, तुम्हाला कोठे पेट्रोल पंप दिला आहे, त्या पेट्रोल पंपाला एक दिवशी भेट द्यावयाची आहे. त्यांनी मला म्हटले की, राज्य सरकारने पेट्रोल पंपासाठी लागणारी जमीनच दिलेली नसल्यामुळे पेट्रोल पंप अस्तित्वात आलेला नाही. त्यामुळे पुन्हा एक वर्षांनी कार्यक्रम झाला. म्हणजे राज्य सरकार या गंभीर विषयात सुध्दा किती संवेदनशून्य आहे ते दिसून येते.

सभापती महोदय, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात गोळी लागून जखमी झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची शस्त्रक्रिया शासन मोफत करुन देईल अशी घोषणा करण्यात आली होती. परंतु आजही सीआरपीच्या जवानांच्या पायात गोळया आहेत. सरकारच्यावतीने त्यांची शस्त्रक्रिया केली जात नाही आणि या शस्त्रक्रियेचा खर्च परवडत नाही म्हणून ते करुन घेऊ शकले नाहीत. अशा जखमी झालेल्या जवानांची मी सन्माननीय मंत्री महोदय श्री.सुरेश शेट्टी यांना यादी दिली, त्याला एक वर्ष झाले आहे. परंतु या सरकारने या विषयी प्रामाणिकपणे प्रयत्न केलेले नाहीत. जे प्राणपणाने लढले त्यांच्या प्रकृतीची हे शासन कोणती काळजी घेत आहे याचा आढावा राज्यपालांच्या अभिभाषणात घेतला असता तर त्यांना ती गोष्ट अभिमानाने सांगता आली असती, परंतु तो उल्लेख या अभिभाषणात नाही हे दुर्दैव आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

सभापती महादेय, अशा अनेक गोष्टींचा उल्लेख करता येईल. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी नक्षलवाद्यांचा प्रभाव वाढत असल्याबाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली होती. निवडणुकीच्या काळामध्ये नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात पोलीस दलातील 17 सुरक्षा कर्मी मारले गेले. त्यापैकी एक पोलीस शिपायाची बॉडी त्याच्या गावी शिफ्ट करावयाची होती. निवडणुकीच्या काळामध्ये सगळे राजकीय पक्षाचे नेते हेलिकॉप्टरमधून प्रचारासाठी फिरत होते. त्यावेळी एका चॅनेलवर त्याबाबतची बातमी आली. म्हणून मी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांशी संपर्क साधून त्यांना विचारले की, टी.व्ही.वर जी बातमी पाहिली आहे ती खरी आहे काय ? खरी असेल तर भारतीय जनता पार्टीच्यावतीने एक हेलिकॉप्टर आम्ही पाठवितो, त्यातून त्या शिपायाची बॉडी त्याच्या घरी पोहोचवावी. याठिकाणी सन्माननीय मंत्री महोदय श्री.नितीन राऊत आहेत. त्यावेळी त्यांच्याकडे गृह खाते होते. त्यांनी सांगावे की त्यांनी यासाठी काय प्रयत्न केले होते ? ज्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली त्याचे शव त्याच्या घरामध्ये वेळेत पोहोचविण्यासाठी एखादे हेलिकॉप्टर आपल्या पक्षाने तैनात केले होते काय ? त्यासाठी आचारसंहितेची आडकाठी नव्हती. अशाप्रकारच्या वागणुकीमुळे राजकीय पक्षांची विश्वासाहर्ता कमी होत आहे. सरकारला हेलिकॉप्टर उपलब्ध करुन देता आले असते, राजकीय पक्षाला ते करता आले असते, परंतु दुर्दैवाने तसे झाले नाही. ही वस्तुस्थिती माननीय राज्यपालांच्या अभिभाषातून दिसली असती तर वस्तुस्थिती समोर आली असती.

सभापती महोदय, विद्यापीठ कायद्यामध्ये एक बदल होऊ घातला आहे त्याची शिक्षण क्षेत्रात चर्चा सुरु आहे. हा बदल काय आहे ? जे पीएचडी, डॉक्टर झालेले आहेत त्यांनाच विद्यापीठांच्या काही समित्यांवर जाता येईल. म्हणजे आम्ही त्या समित्यांचे सदस्य होऊ शकत नाही. पीएचडी पदवीधारक म्हणजे एखाद्या विषयाचे ज्यांना ज्ञान आहे पण बाकीच्या विषयाचे ज्ञान त्यांना असेलच असे नाही.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

(श्री. विनोद तावडे....)

सभापती महोदय, विद्यापीठ कायद्यामध्ये काय दुरुस्ती करावयाची आहे ? तर जो आमदार ग्रज्युएट नाही त्याला विद्यापीठाच्या सिनेटमध्ये जाता येणार नाही, अशी दुरुस्ती करावयाची आहे. ज्यानी शिक्षण क्षेत्रामध्ये ख-या अर्थाने भरीव कार्य केले त्या वसंतदादा पाटलांना सिनेटमध्ये जाता आले नसते. पण राज्यपालांच्या येथे बसणारे जे कुलगुरु आहेत त्यांना मनमानी कारभार करावयाचा असल्यामुळे ग्रॅज्युएट आमदार सिनेटवर पाठविला जाणार नाही यादृष्टीने ते कायद्यात दुरुस्ती करीत आहेत. सभापती महोदय, ग्रज्युएट आमदार सिनेटवर पाठवू नका असे म्हणणे हा या सभागृहातील सन्माननीय सदस्यांचा, या सभागृहाचा हक्कभंग नाही काय ? अशा प्रकारची दुरुस्ती करण्याबाबत उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्र्यांकडे सातत्याने पाठपुरावा होत आहे. आमदार हे कुलगुरुंचे मिंधे होत नाहीत, त्यांना मनमानी करु देत नाहीत, त्यांचा भ्रष्टाचार उघडकीस आणतात म्हणून त्यांना सिनेटवर न आणण्याचा प्रयत्न होत आहे हे विद्यापीठ विकास मंचाच्या माध्यमातून मांडले गेले आहे. दुर्दैव हे आहे की, राज्यपालांचे शिक्षण विषयक सल्लागार जे शिक्षण सचिव आहेत यांच्याकडे ही दुरुस्ती लवकरात लवकर व्हावी म्हणून पाठपुरावा सुरु आहे. मला हे समजते की, शिकलेला असेल तर त्याच्या ज्ञानाचा फायदा होत असतो. परंतु बोर्ड ऑफ स्टडीज, ॲकेडमी, सिनेट, मॅनेजमेंट कौन्सिल या प्रशासकीय बाबी आहेत. या ठिकाणी पीएचडी व्यक्ती कशाला पाहिजे ? आपल्याला मनमानी करता यावी हा कुलगुरुंचा या मागे उद्देश आहे.

सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी सामजिक समतेचा उल्लेख केला. त्यांनी जात-पात संपविण्याचा अभिमानाने उल्लेख केला. त्यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी सामाजिक समतेसंबंधी श्री. रेणके यांनी जो क्रांतीकारी अहवाल दिलेला आहे त्याचा अभ्यास करावा. मातंग समाज हा महार समाजापेक्षा किती मागासलेला आहे हे त्या अहवालामध्ये दिलेले आहे. तेव्हा मातंग समाजाला कसा आधार देता येईल यासंबंधीचा विचार सामाजिक समतेची भाषा करणा-या सन्माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी केला असता, त्यांचे प्रश्न लावून धरले असते तर त्या मातंग समाजाला न्याय देता आला असता. कुठे तरी दिल्लीतील ऐकायचे, पूर्वीच्या जुन्या समाजवादी चळवलीतील गोष्टी आठवून बोलायचे ही त्यांची सवय जात नाही अशा प्रकारचा अनुभव मघाशी आला.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विनोद तावडे...

सभापती महोदय, मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क वेळेत भरले नाही तर त्यांच्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात येईल असे शासनाने सांगितलेले आहे. सोशल वेल्फेअर हॉस्टेलमधील 515 जागा मंत्र्यांमार्फत भरल्या जातात. ह्या 515 जागा भरल्या गेल्या नाहीत असे उत्तर आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील एका प्रश्नाला दिलेले आहे. वसतिगृहातील 15 टक्के जागा सामाजिक न्याय मंत्र्यांनी न भरल्यामुळे 515 मागासवर्गीय विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहले. मंत्री महोदय निवडणुकांमध्ये गुंतल्यामुळे 515 मुले शिक्षणापासून वंचित राहिली. मग सामाजिक न्याय मंत्र्यांवर आपण ॲट्रॉसिटी गुन्हा लावणार काय हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, भिवंडी पंचायत समितीच्या गटविकास अधिका-यांची कशी मनमानी चाललेली आहे याचे मी एक उदाहरण देतो.

..नंतर श्री. भोगले...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद जमा : सभापति महोदय, माननीय राज्यपाल के अभिभाषण पर जिन सम्माननीय सदस्यों को बोलना है, उन्होंने आपके पास नाम दिए हैं. आप नियम के अनुसार सभी सम्माननीय सदस्यों को समय बांट दें. कब तक हाऊस चलाना है, उसके हिसाब से सभी सदस्यों को समान रुप से समय का बंटवारा कर दें. क्योंकि पिछले अधिवेशनों में हमें ऐसा अनुभव आया है कि अंत में बोलने वाले सदस्यों को ऐसा कहा जाता है कि एक मिनट में, दो मिनट में बोलिए. इसलिए मेरा आपसे अनुरोध है कि सभी सदस्यों को समान रुप से समय का बंटवारा कर दें.

तालिका सभापती (डॉ.वसंत पवार) : सन्माननीय सदस्यांनी 10 मिनिटांपेक्षा अधिक वेळ न घेता आपले भाषण पूर्ण करावे अशी विनंती आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, भिवंडी पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्याचा मनमानी कारभार कसा चाललेला आहे याचे उदाहरण मी सांगतो. या गटविकास अधिकाऱ्याने मागील दोन वर्षात शिक्षकांच्या ज्या बदल्या केल्या, म्हणजे तेथे ज्या मंजूर जागा आहेत त्यापेक्षा 15-15 जास्त बदल्या केल्या. उघडपणे दुकान मांडले आहे. दुकान मांडून पैसे समोरासमोर घेऊन बदलीचे पत्र दिले गेले. सगळ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या. परंतु इतक्या उघडपणे चाललेल्या भ्रष्टाचाराची प्रकरणे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या त्या त्यावेळी ध्यानात आणून देऊनही या राज्यातील कारभार चालविणाऱ्या सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले आहे.

सभापती महोदय, 2012 पर्यंत भारनियमन संपुष्टात येईल असे सरकारचे म्हणणे आहे. माझे एक डॉक्टर मित्र आहेत. त्यांचे मॅटर्निटी हॉस्पिटल आहे. त्यांनी सांगितलेला किस्सा मी सभागृहाला सांगू इच्छितो. त्यांच्या हॉस्पिटलमध्ये बाळ जन्माला आले. त्या बाळाने नर्सला विचारले लाईट आहे का? नर्स म्हणाली, नाही. हथ तेरी की, यावर्षी पुन्हा महाराष्ट्रात जन्मलो का? एवढी वाईट अवस्था आहे. 2012 च्या घोषणा करता. मागील वेळच्या घोषणा पहा. अशाच घोषणा आहेत. कशाला फसवता. राज्यातील पाच वीजनिर्मिती प्रकल्प आजारी आहेत. हे प्रकल्प आजारी असताना 2012 पर्यंत लक्ष्य कसे गाठणार? कशा पध्दतीने पूर्ण करु शकता? कोणता आराखडा तयार केला आहे? राज्यपाल महोदय कौतुक करतात. या खात्याला स्वतंत्र मंत्री मिळाले नाहीत. दादाबाज मंत्र्यांकडे कारभार दिला आहे. पाटबंधारे आणि ऊर्जा खाते ते पाहणार आहेत. कसे लक्ष्य पूर्ण होईल माहित नाही. लोकांना शंका आहे. सभापती महोदय, सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदयांच्या माहितीसाठी नाशिक जिल्हयातील एक प्रकरण सांगू इच्छितो. नाशिक

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे .....

जिल्हयामध्ये सीग्राम नावाच्या कंपनीला धान्यापासून मद्यनिर्मिती करण्याचा परवाना देण्यात आला. 100 टक्के स्थानिक जमीन, विदेशी कंपनी, ना हरकत प्रमाणपत्र घेतली पाहिजे ते नाही. हायकोर्टाचे आदेश महसूल खात्याला आणि उत्पादन शुल्क खात्याला आहेत. मी जबाबदारीने आरोप करतो, या खात्यांनी काही कोटी रुपयांचा गैरव्यवहार करुन सीग्राम कंपनीला त्याठिकाणी दारु उत्पादनासाठी परवानगी दिली. सभागृहाच्या आत सांगेन कारण संरक्षण असते. परंतु सभागृहाच्या बाहेरही सांगेन. सीग्राम कंपनीला दारु उत्पादनासाठी दिलेली परवानगी निकष आणि नियमानुसार दिली होती. परंतु हायकोर्टामध्ये पीआयएल दाखल झाल्यानंतर जो आग्रह धरला होता त्या सगळ्याला बगल देऊन उत्पादन शुल्क खात्यांतर्गत ही बाब येत नाही, महसूल खात्याच्या अंतर्गत येते असा सोयीस्कर अर्थ लावून या कंपनीला परवानगी दिली गेली. ही कंपनी त्याठिकाणी सुरु व्हावी म्हणून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार त्या खात्यामध्ये झाला हे मी जबाबदारीने सांगतो. ही सर्व प्रकरणे एवढ्यासाठी मांडतो की, खरोखर जनतेने 33-34 टक्के जनादेश दिला, मागील चुका दुरुस्त करुन पुन्हा नव्याने या राज्यातील जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न, प्रमाणिक विचार होत असेल तर मी जी 7-8 प्रकरणे सांगितली याचा कुठेतरी विचार व्हावा.

(नंतर श्री.खर्चे..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

आणि त्यासंबंधी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या प्रस्तावाला उत्तर देण्याच्या निमित्ताने तरी सभागृहाला याबाबतची माहिती दिली पाहिजे. अन्यथा खालच्या सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी जे उत्तर दिले त्याचा अर्धा अधिक भाग आजच्या उत्तरात आला तर ते योग्य नाही. शासनाने या उत्तराच्या माध्यमातून ठोस असे धोरणात्मक निर्णय कोणते घेण्यात येणार याबाबतची माहिती दिली पाहिजे. जुनी दारु आणि बाटली नवीन असा प्रकार होऊ नये अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, महामहीम राज्यपालांच्या अभिभाषणाला पाठिंबा देण्यासाठी व त्यांचे अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे माननीय राज्यपालांनी निवडणुकीनंतर पहिल्याच विशेष अधिवेशनात नव निर्वाचित सदस्यांचे कौतूक केले आणि त्यांना पुनश्च जोमाने कामाला लागण्यासाठी प्रोत्साहन दिले. जाहिरनाम्यात दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी हे सरकार कंबर कसून कामाला लागले आहे ही गोष्ट खरी आहे. आमचे शासन गेल्या 10 वर्षांसून सत्तेवर आहे तिकडे मात्र सन्माननीय सदस्यांनी जाहिरनाम्याला वचननामा हा शब्द वापरलेला आहे. परंतु असे म्हटल्याने त्यांचा नाकर्तेपणा लपून राहत नाही. आपण काही काम करणारे आहोत असा आभास विरोधी पक्षाने निर्माण केलेला आहे. पण खरे नाही आणि खोटेही नाही हे जनतेला समजले आहे. राज्याच्या गेल्या निवडणुकीत जनतेने पुन्हा या सरकारला सत्तेवर बसविलेले आहे म्हणून काम करणे वेगळे आणि आभास निर्माण करणे वेगळे असते. काँग्रेस पक्षाने मात्र कधीही आभास निर्माण केलेला नाही तर प्रत्यक्षात काम केले आहे आणि काम करण्याची काँग्रेसची परंपरा आहे. कै. यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील, शंकरराव चव्हाण यांच्या काळापासून हे कार्य अखंडपणे सुरु असून स्व. शंकरराव चव्हाण यांचे सुपुत्र व माननीय मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण हा वारसा पुढे चालवित आहेत. माननीय राहुल गांधींनी देखील पाठिंबा दिला असून आमच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी यांनी तरुणांना संधी दिलेली आहे त्याबाबत मी त्यांचा शतश: आभारी आहे. माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात केवळ शासनाच्या ध्येय धोरणांवरच प्रकाश टाकला नाही तर संपूर्ण राज्याला हैराण करणारा म्हणजे दहशतवाद, भारनियमन, फयान अशा संकटांतून सोडवणूक करण्याचा विशेष कार्यक्रम सभागृहासमोर दिलेला आहे. शासनाने गेल्या 10 वर्षात देशात कोणत्याही राज्याने दिला नसेल इतका अवाढव्य निधी एससी/एसटीच्या विकासासाठी दिलेला आहे. दलितांसाठी सर्वात जास्त निधी देणारे हे देशातील एकमेव असे राज्य आहे. दहाव्या पंचवार्षिक योजनेबाबत सांगावयाचे झाले तर .....

यानंतर श्री जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ....

बारा बलुतेदारांच्या योजनांचा विचार करुन त्यावेळचे तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. सुशीलकुमारजी शिंदे यांनी सामाजिक न्यायाचा अर्थसंकल्प राज्याला दिला. त्यांच्या कालखंडात दबलेल्या समाजाचा प्रशासनात अनुशेष भरण्यास सुरुवात झाली. परंतु हा बॅकलॉग भरत असतांना त्यावेळी फक्त चतुर्थ श्रेणीमधीलच कर्मचारी मिळत होते परंतु यावेळी प्रशासनातील सर्वश्रेष्ठ असे मुख्य सचिव हे पद दलित समाजाला आघाडी शासनाने दिले असून या सर्वश्रेष्ठ पदी श्री. जे.पी.डांगे यांची नियुक्ती झालेली आहे. गेल्यावेळी अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करतांना मी चार ओळी बोलल्या होत्या त्या मी मुद्दाम येथे वाचून दाखवतो. त्यावेळी मी म्हटले होते की, "श्री. जे.पी.डांगे हे 1973 चे आयएएस अधिकारी असून ते चर्मकार समाजातील दलित असून ते अतिरिक्त मुख्य सचिव आहेत. लोकसभेच्या विद्यमान सभापती श्रीमती मीरा कुमार याही त्यांच्या बॅचमेंट आहेत. 1973 मध्ये त्यांनी लाल बहादूर शास्त्री ॲकॅडमी, मसूरी येथे आयएएस व आयएफएस याचे पहिले सहा महिने एकत्र ट्रेनिंग घेतलेले आहे. मुख्य सचिव या पदासाठी या दलित अधिका-याचे पहिले नाव असतांनाही त्यावेळचे मुख्य सचिव श्री. जॉनी जोसेफ यांना सहा महिन्याची मुदतवाढ त्यावेळच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी दिल्यामुळे श्री. डांगे यांच्यावर अन्याय झालेला आहे." ही बाब शासनाच्या नजरेस आणून द्यावी यासाठी मी त्यावेळेस बोललो होतो. त्या बाबीची पूर्तता श्री. जे.पी.डांगे यांच्या नियुक्तीमुळे आता झालेली आहे.

श्री. दिवाकर रावते : श्री. डांगे साहेबांना मुख्य सचिव केले ही चांगली बाब आहे, अभिमानाची बाब आहे. डांगे साहेबांचे अभिनंदन श्री. चव्हाण साहेबांनी केले हे सुध्दा बरोबर आहे. श्री. जे.पी. डांगे हे दलित आहेत म्हणून त्यांना मुख्य सचिव पद दिले की, त्यांच्या योग्यतेमुळे त्यांना मुख्य सचिव पद दिले ? म्हणून तुम्हाला अभिमान आहे काय ? श्री. जे.पी.डांगे यांची योग्यता आहे म्हणूनच त्यांना मुख्य सचिव पदी बसविण्यात आलेले आहे. दलित हा विषय महत्वाचा नाही. श्री. जॉनी जोसेफ यांना सहा महिन्याची मुदतवाढ दिल्यामुळे श्री. जे.पी.डांगे यांच्यावर अन्याय झाला असा आपण जो उल्लेख केलेला आहे तो चुकीची आहे, कारण श्री. जॉनी जोसेफ यांची मुदतवाढ दिल्लीवरुन झाली होती त्यामुळे तुम्ही मघाशी दिल्लीतील नेत्यांचा जो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

उल्लेख केला त्यांचा तुम्ही धिक्कार करणार आहात काय? श्री. डांगे साहेबांची मुख्य सचिव पदी बसण्याची पात्रता असल्यामुळेच त्यांना मुख्य सचिव पदी बसविण्यात आलेले आहे, ते दलित आहेत म्हणून अभिमान आहे असे आपण म्हणावयास पाहिजे होते. श्री. डांगे हे दलित आहेत म्हणून त्यांना डावलले होते असे म्हणणे योग्य नाही तर श्री. डांगे यांच्या कर्तुत्वावर अन्याय होतो असा माझा मुद्दा आहे.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, श्री. जे.पी.डांगे यांची योग्यता असल्यामुळेच त्यांची मुख्य सचिव पदी नियुक्ती झालेली आहे. महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राज्यात एक दलित व्यक्ती मुख्य सचिव पदी विरोजमान होतो याबाबत आनंद आहे. माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे यांना मुख्यमंत्री पदावरुन लवकर जावे लागले ...(अडथळा) याबाबत मी टीका करीत नाही. शासनाने श्री. जे.पी.डांगे यांची मुख्य सचिव पदी नियुक्ती केल्यामुळे मी शासनाचा शतश: आभारी आहे. (अडथळा) मी माझे शब्द मागे घेतो.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी आता उच्चारलेले शब्द कामकाजातून काढून टाकण्यात यावेत.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, आमच्या आघाडी शासनाच्या नेत्यांनी सामाजिक न्याय हा विभाग दलित प्रतिनिधीला दिला नाही तसेच आदिवासी विकास विभागाचे काम सवर्णाला दिलेले आहे. (अडथळा) हा एक चांगला उपक्रम आहे.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य या ठिकाणी जे काही बोलत आहेत ते बरोबर नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. गायकवाड.....

श्री.दिवाकर रावते .....

असे म्हणणे बरोबर नाही. हा जातीयवाद नाही काय ?

श्री. सुभाष चव्हाण :सभापती महोदय, या निमित्ताने आघाडी सरकारचे आणि आमचे नेते श्री. माणिकराव ठाकरे यांचा मी शतश: आभारी आहे.हा अत्यंत स्तुत्य असा उपक्रम आहे. या पदावर चांगल्या व्यक्तीची निवड केल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

सभापती महोदय, आघाडी सरकारने संयुक्त जाहीरनाम्यात जी आश्वासने दिली होती त्याप्रमाणे दादर येथील इंडियन युनायटेड मिलची जागा डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या चैत्यभूमीसाठी देण्यासाठी शासनाने पाठपुरावा करावा व त्या ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाची वास्तू उभी करावी अशी मी या चर्चेच्या निमित्ताने सूचना करीत आहे. त्याचबरोबर मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. श्री.अरविंद सावंत (विधान सभेने निवडलेले): सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव ज्या दिवशी सत्ताधारी पक्षाच्या बाजूने मांडण्यात आला होता त्यावेळी राज्यपालांचे अभिनंदन सुरु आहे की श्रध्दांजली वाहिली जात आहे हे समजत नव्हते. हे राज्य सरकार खरोखर काही करीत आहे आणि त्याचा अभिमान वाटावा अशा प्रकारचा तो अभिनंदनपर प्रस्ताव नव्हता. माननीय राज्यपालांचे संपूर्ण अभिभाषण वाचल्यानंतर तो अभिनंदनाचा प्रस्ताव नव्हता असेच म्हणावेसे वाटते. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील शेवटच्या मुद्यापासून मी माझ्या भाषणाला सुरुवात करणार आहे.

सभापती महोदय, एका गोष्टीचा आज मला अत्यंत खेद होत आहे.माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये वर्षानुवर्षापासून महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्नाचा उल्लेख करण्यात येत असतो. त्या संदर्भात वेदना इतक्या आहेत की, त्याच्या खपल्या काढल्यानंतर आपण रक्तबंबाळ होऊ.या प्रकरणी शासन कोर्टात गेलेले आहे असे माननीय मंत्री महोदय उत्तर देतांना सांगतील. त्या बाबतीत दुसरा शब्द वापरता येत नाही. यासाठी "निर्लज्जपणापेक्षा" दुसरा शब्द मला यथायोग्य वाटत नाही. सभापती महोदय, काल तेलंगणा राज्य निर्मितीच्या संदर्भात केन्द्र सरकारने निर्णय तत्परतेने घेतला होता. 1956 साली भाषावार प्रांतरचना झाल्यानंतर संयुक्त महाराष्ट्रासाठी आपण जोरदार लढा दिला होता ...

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय,तेलंगणा राज्य निर्माण करण्याचा निर्णय केन्द्र सरकारने अजून घेतलेला नाही.त्यामुळे रेकॉर्डवर चुकीचे राहता कामा नये.

श्री.अरविंद सावंत : ठीक आहे. मी त्यात सुधारणा करतो. केन्द्र सरकार हे नवीन राज्य निर्माण करण्याच्या दिशेने चालले आहे हे तरी आपण मान्य करावे. माननीय गृह मंत्र्यांचे संपूर्ण भाषण मी रात्री ऐकले होते श्री. के.सी. राव यांनी काल मध्यरात्री उपोषण सोडले होते.त्यांना असे आश्वासीत करण्यात आले होते की, याच अधिवेशानामध्ये आम्ही कायदा आणू व नवीन राज्य निर्माण करु त्यामुळे तेलंगणामध्ये जयघोष सुरु आहे. आता त्यांचे असे म्हणणे आहे की हैद्राबादसुध्दा तेलंगणामध्येच आले पाहिजे. त्या वेगळया मुद्यामध्ये मला जावयाचे नाही. त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठिकाणच्या मराठी विद्यार्थ्यांची वाट लागली आहे. तेथील सर्व कॉलेजेस बंद पडल्यामुळे मराठी विद्यार्थी मुंबईला परत आले आहेत. तेलंगणाचा विषय सतत मांडला जातो तेव्हा आमचे राज्य शासन , केन्द्रात बसलेली, सत्तेत बसलेली, मंत्रीपदावर बसलेली, लोकसभेत, राज्यसभेत असलेली मराठी माणसे मात्र पायावर पाय ठेवून निवांतपणे बसून आहेत. सन्माननीय सदस्य श्री सुभाष चव्हाण यांनी या शासनाबद्दल अनेक गौरवशाली उद्‌गार काढले आहेत. या लोकांनी महाराष्ट्राकडे बघावे असे आपण त्यांना एकदा सांगावे.महाराष्ट्राने सीमा प्रश्नाच्या बाबतीत कोणत्या पध्दतीने लढावयाचे ? तेलंगणामध्ये जसे घडले तसे सर्वानी जाळून घ्यावयाचे काय ? जाळून घेंतल्यानंतर केन्द्र सरकार आम्हाला न्याय देणार आहे काय ?

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ...

आम्ही कायद्याने लढत आहोत, नियमाने लढत आहोत, भाषावार प्रांत रचनेतील सगळे मुद्दे मांडतो आहोत. माननीय श्री.एन.डी.पाटील यांच्यासारखी थोर माणसे त्या ठिकाणी यासाठी झगडताहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील सगळ्या धुरिणांना आजही या गोष्टीचा आनंद होत नसेल. हुतात्मा चौकात जाऊन आपण मान वाकविली म्हणजे काही आपण त्यांच्यावर फार काही उपकार केलेले नाहीत. प्रबोधनकार ठाकरे, आचार्य अत्रे, डांगे, एस.एम.जोशी, या साऱ्या माणसांचे आत्मे आजही सुखात नसतील. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातून मुंबई जरी महाराष्ट्रात आली असली तरी बेळगाव, कारवार, निपाणी भालकीसह संयुक्त महाराष्ट्र आजही झालेला नाही म्हणून मी माझा खेद प्रगट करतो आहे. राज्यपाल महोदय, केव्हा तरी येथे थांबा. ज्या दिवशी आपण येथे येऊन सांगाल की, मला आनंद होतो आहे हे सांगण्यास की महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली त्यावेळी हे हे प्रांत या राज्यात यायचे राहिले होते आता केंद्र सरकार तुमच्याही बाबतीत तसा निर्णय घेण्याची पावले उचलत आहे. असे जेव्हा राज्यपालांकडून सांगावा येईल त्या दिवशी प्रकाशाची किरणे कोठे तरी आमच्या खिडकीतून थोडी थोडी आत येतील असे वाटते. ही पळवाट पाहिली तर आम्हाला याची लाजदेखील वाटत नाही पुन्हा पुन्हा तेच तेच किती वर्षे लिहायचे, बोलायचे. सभापती महोदय, या अगोदरच्या परिच्छेदामध्ये माननीय राज्यपालांनी म्हटले आहे की, 'मराठी भाषा ही राजभाषा असल्यामुळे तिचा गौरव वैभव आणि प्रतिष्ठा राखण्यास शासन बांधिल आहे. माझे शासन महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेचे जतन करण्यासाठी आणि राज्यात राहणाऱ्या व काम करणाऱ्या प्रत्येकाचे संरक्षण करण्यासाठी, आवश्यक त्या सर्व उपाय योजना करील. राज्यात जातीय सलोखा तसेच भाषिक ऐक्य राखण्यास राज्य शासन कटिबद्ध आहे. राज्यामध्ये जात, वंश किंवा भाषा या कारणांमुळे सामाजिक समतोल व जातीय सलोखा बिघडविण्याचा कोणताही प्रयत्न कठोरपणे मोडून काढण्यात येईल.' सभापती महोदय, राज्यात जात.. खास करून जात, जी कधी जात नाही तिला 'जात' म्हणतात., या संदर्भात शिवसेना प्रमुखांचे वाक्य फार मोठे आहे. जात नाही ती जात. म्हणून त्यांनी म्हटली आहे की, पोटाला जात नसते. पण दुर्दैवाने तो विचार पचविण्यासाठी फार आयुष्य घालवावे लागेल. साधा 'जय महाराष्ट्र' कळण्यासाठी 40 वर्षे गेली, घालवावी लागली. तर मग हे सारे विषय कळण्यासाठी आणखी कित्येक वर्षे जावी लागतील. यात माननीय राज्यपालांनी म्हटले आहे की, '... जात, वंश किंवा भाषा या कारणांमुळे सामाजिक समतोल व जातीय सलोखा

..... 3ए 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सावंत ...

बिघडविण्याचा कोणताही प्रयत्न कठोरपणे मोडून काढण्यात येईल.' राज्यपाल महोदय, आनंद आहे. आपण दोन टोके एकाच परिच्छेदामध्ये गाठली आहेत. भाषेचा गौरव करावयाचा आणि आमच्याच नियमामध्ये 'मराठी राज्य', 'राजभाषा' असे शब्द वापरले. मग आम्ही या सदनामध्ये मराठी भाषेचा वापर करा असे म्हणतो तेव्हा आम्हाला नियम दाखविला जातो. कारण आमच्या नियमामध्ये तरतूद अशी आहे की, "..विधान परिषदेचे कामकाज मराठी किंवा हिंदी किंवा इंग्रजीत चालेल.." आम्हीच हा नियम केला आहे. त्यामुळे दरवाजा अगदी खुला ठेवला आहे. मग तुम्हाला कोणता प्रश्न येतो ? सरळ आत घुसा. तुम्ही आयुष्यात मराठी शिकू नका. कितीही वर्षे या राज्यात राहिलात तरी शिकू नका. परंतु पूर्वोक्त भाषांपैकी कोणत्याही भाषेत आपले विचार स्पष्टपणे व्यक्त करता येत नसलेल्या एखाद्या सदस्यास आपल्या मातृभाषेत विधान परिषदेस उद्देशून भाषण करण्याची परवानगी सभापती देऊ शकतील." सभापती महोदय, सगळ्यांनाच तेलंगणात पाठविण्याची गरज आहे. आपण सगळेच जण तेलंगणात जाण्याची गरज आहे. एका मंत्र्याने शपथ हिंदीमध्ये घेतली म्हणून, कर्नाटक राज्याच्या एका मंत्र्याला त्याने कानडी भाषेतून शपथ घेतली नाही म्हणून आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. कानडीतून शपथ घेतली नाही म्हणून मंत्र्याला मंत्रीपद सोडावे लागले. आमच्याकडे आम्ही मराठीचा नुसता शब्द जरी काढला तरी मिरच्या झोंबतात. आताच थोड्या वेळापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.रावते म्हणाले की, वंदे मातरम् ऊर्दूमध्ये मागितले आहे. आनंद आहे, भाषांतर कराना, कोठे बिघडले ? अनेक चांगल्या गोष्टींची, चांगल्या पुस्तकांची भाषांतरे होणे आवश्यक आहे. पण यामध्येही आणखी एक गोम आहे. माननीय श्री.भुजबळ साहेब येथे उपस्थित आहेत, त्यांच्यासाठी म्हणून मी खास हे सांगतो आहे. गोष्ट अशी आहे की, भाषावार प्रांतरचना झाल्यानंतर केंद्र सरकारच्या एका समितीने 1976 साली एक नियमावली तयार केली आणि त्या नियमावलीमध्ये देशाचे तीन गट तयार करण्यात आले. अ, ब आणि क गट. हिंदी भाषिक गट म्हणून गट अ. या गटामध्ये बिहार, हरियाणा, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, केंद्र शासित अंदमान, दिल्ली ही राज्ये आहेत. त्यानंतर ब गटात महाराष्ट्र, गुजरात,पंजाब, चंदिगड ही राज्ये असून हा पूर्णपणे 'गैरहिंदी राज्य' असा शब्द वापरून 'क' गट तयार करण्यात आला. 'क' गटामध्ये दक्षिणेकडील केरळ, तामिळनाडू, आंध्र, कर्नाटक, उत्तरपूर्व भागातील आसाम, बंगाल, मिझोरम ही राज्ये टाकली आहेत. हे सारे

.... 3ए 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ...

केल्यानंतर पुन्हा एकदा कुणी तरी शहाणपणा करून, चातुर्याने 1987 मध्ये या नियमावलीतील प्रकरण 9, भाग 9(2)(2) मध्ये बदल केला. ...

(यानंतर श्री. सरफरे .... 3बी 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

याठिकाणी ही जी दुरुस्ती करण्यात आली त्याबाबत 16 फेब्रुवारी 1988 रोजी घोषणा करण्यात आली. त्या दुरुस्तीमध्ये म्हटले की, "या दुरुस्तीनंतर वैकल्पिक भाषा म्हणून केंद्र शासन व त्यांच्या अधिकृत उपक्रमामध्ये करावयाच्या भरतीसाठी घेतलेल्या परिक्षांमध्ये वैकल्पिक भाषा म्हणून हिंदी भाषेचा वापर "ब" गटातील राज्यांसाठी करता येईल". आपण "ब" गटात असतांना हे गुपचूप कुणी केले हे आम्हाला कळलेच नाही. आता याठिकाणी मंत्रिमहोदय बसले आहेत. माननीय राज्यपालांना वाटते की, मराठी भाषेचा गौरव व्हावा, मराठी भाषेचे वैभव आहे. हे वैभव संभाळण्यासाठी "ब" गट तसाच ठेवण्यास सांगावे. याठिकाणी भरती सुरु झाल्यानंतर हिंदीमधून जाहिरात कुणी द्यावयाची? "अ" गटातील राज्यांनी द्यावी. म्हणजे सर्व उमेदवार तिकडून ईकडे येणार. अशापरिस्थितीत "आम्ही भूमिपुत्रांना न्याय देणार आहोत" अशाप्रकारचे वक्तव्य सुध्दा माननीय राज्यपाल महोदयांनी केले. राज्यकर्ते मंडळी, शासनाचे अधिकारी नियमांचे अवलोकन न करता अशाप्रकारची वाक्ये माननीय राज्यपालांच्या मुखामधून जनतेपुढे आणतात. प्रत्यक्षात जेव्हा अंमलबजावणी करण्याची पाळी येईल त्यावेळी तुम्हाला ते करता येणार नाही म्हणून मी हे जाणीवपूर्वक याठिकाणी मांडीत आहे..

सभापती महोदय, मी शेवटचे दोन मुद्दे मांडणार आहे. पुरवणी मागण्यांच्या वेळी गृह विभागाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये मी बोलणार आहेच. मला एक गोष्ट सांगितली पाहिजे की, दिनांक 26 नोव्हेंबर 2008 रोजी मुंबईवर अतिरेक्यांचा हल्ला झाल्यानंतर ज्या काही गोष्टी घडल्या आहेत त्या आपणास माहीत आहेत. त्यामध्ये राम प्रधान समितीचा अहवाल फुटला. त्याचबरोबर कसाबची मुलाखत ज्या इन्सपेक्टरने घेतली ती इन कॅमेरा असतांना सुध्दा त्या मुलाखतीची सी.डी. आज पहाण्यासाठी उपलब्ध आहे. आणि ती मी याठिकाणी आणली आहे. माननीय सभापती ज्यावेळी आसनावर येतील त्यावेळी मी त्यांना देईन. ही सी.डी. आज जगभर पाहिली जात आहे. त्याचबरोबर पोलीस आयुक्त श्री. हसन गफूर यांची जी काही मुलाखत प्रसिध्द होत आहे त्याची कल्पना माननीय राज्यपालांना नाही काय? आम्ही किती नादान आहोत, आमच्या नादानपणामुळे हे अतिरेकी कसे घुसले? त्यामध्ये आम्हाला अपयश कसे आले? राज्यकर्त्यांच्या नादानपणामुळे हे सर्व घडले हे सर्वांना समजले आहे.आणि म्हणून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल मला अत्यंत खेद होत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

सभापती महोदय, मला याठिकाणी पिण्याच्या पाण्यासंबंधी मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. या अभिभाषणामध्ये "सुजल महाराष्ट्र-निर्मल महाराष्ट्र अभियान" या कार्यक्रमांतर्गत शासनाने पुढील दोन वर्षामध्ये राज्यातील सर्व शहरी व ग्रामीण कुटुंबांना स्वच्छ पिण्याचे पाणी आणि स्वच्छता सुविधा पुरविण्याचा निर्णय घेतला आहे" असे म्हटले आहे. आपण पहिल्यांदा टँकरमुक्त महाराष्ट्र करा. यावर्षी कमी पाऊस झाल्यामुळे पुढील महिन्यापासून टँकर लावण्यास सुरुवात होईल. या विषयावर सातत्याने गेली 12 वर्षे मी या सभागृहामध्ये हा विषय मांडीत आहे. कोकणासाठी पिण्याच्या आणि सिंचनाच्या पाण्यासाठी असलेले सर्व निकष बदलण्याची गरज आहे. मध्यंतरी मंत्रिमहोदय निकष बदलत आहोत असे म्हणाले होते, परंतु अजूनपर्यंत निकष बदलले नाहीत. हे निकष बदलण्याची मागणी करुन सुध्दा कोकणाला आशा वाटावी अशी कृती करण्यात आली नाही. कोकणामध्ये उदंड जाहले पाणी , पण मुखात नाही जाई अशाप्रकारची अवस्था झाली आहे. हा महत्वाचा मुद्दा मांडीत आहे.

त्याचप्रमाणे शेवटी आदिवासींच्या आश्रमशाळेविषयी मी विचार मांडणार आहे. आश्रमशाळेतील मुले कुणाची आहेत? ती आश्रम शाळेमध्ये कशी रहात आहेत? माझ्याकडे एक "उघडया-बोडक्या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात." या शीर्षकाचे छायाचित्र आहे. त्यांच्याकरिता केंद्र शासनाकडून एवढा जास्त पैसा येतो. त्यामधून त्यांना टूथब्रश, साबण, तेल इत्यादी सर्व वस्तू मिळावयास पाहिजेत, परंतु त्या मिळत नाहीत. आश्रमशाळेच्या वर्गांना दरवाजे, खिडक्या नाहीत. टॉयलेटची व्यवस्था नाही, स्वच्छतागृह नाही. इयत्ता दहावीपर्यंतच्या मुली आजही ओहळयावर जाऊन आंघोळ करीत आहेत. मुंबई-औरंगाबाद रस्त्यावरील वसई तालुक्यातील मेंढवण नावाचे गाव आहे. सभापती महोदय, यानिमित्ताने मी आपणास विनंती करतो की, या आश्रमशाळांच्या संदर्भात अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावा. जशी प्राथमिक आरोग्य केंद्रांची अवस्था आहे तशी या आश्रमशाळांची अवस्था आहे. त्याठिकाणी वीज नाही, पाणी नाही, टॉयलेट असतील तर त्यांना दरवाजे नाहीत. इतकी दुरावस्था असतांनाही आम्ही शाहू-फुले-आंबेडकरांचे नाव घेऊन राज्य करतो.आमच्यातील दलित हा खऱ्या अर्थाने जातीवाचक नाहीतर तो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

श्री. अरविंद सावंत...

पिडीत आहे. तो गेल्या साठ वर्षानंतर तसाच आहे. त्याचे उत्थापन करण्यासाठी,त्याला कुठेतरी आशा वाटेल अशाप्रकारचे माननीय राज्यपालांचे अभिभाषण नाही म्हणून मी खेद व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माझ्या अगोदर भाषण केलेल्या सदस्यांनी अनेक मुद्यावर आपले विचार या ठिकाणी मांडलेले आहेत. राष्ट्रीय सुरक्षा , संरक्षण या विषयाचा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख आहे. या निमित्ताने मी एवढेच सांगेन की, पुढच्या काळामध्ये मुंबईला आणि या देशाला धोका निर्माण होऊ नये यासाठी किनारपट्टी सुरक्षित ठेवण्याकडे अधिक लक्ष द्यावे लागेल. मोठया प्रमाणात दहा ते पंधरा हजार पोलिसांची भरती करण्यात येणार आहे अशी माननीय गृहमंत्र्यांनी मध्यंतरी वर्तमानपत्रामध्ये घोषणा केली होती. मी या निमित्ताने विनंती करतो की, कोकणतील 750 कि.मी. ची किनारपट्टी सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे. मागच्यावेळी बॉम्बस्फोट झाले, त्यावेळी याच किनापट्टीवर आर.डी.एक्स. उतरवले गेले. आजही याच किनारपट्टवरुन माणसे आली आणि त्यानी हल्ले केले. त्यामुळे पोलिसांची भरती करतांना किनारपट्टीवरील लोकांकरिता काही जागा आरक्षित ठेवण्यात याव्यात व त्यांचा यामध्ये अंतर्भाव करण्यात यावा जेणेकरुन ज्यांना किनारपट्टीचा अनुभव आहे त्या अनुभवाचा उपयोग करुन घेता येईल. अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने आपण होमगार्ड्स, सिव्हिल डिफेन्सचा उपयोग करुन घेतो.अशा प्रकारे या निरनिराळया संस्थांचा उपयोग करुन घेतो. गेल्या तीन अधिवेशनामध्ये मी या संबंधीचा प्रश्न मांडतो पण या सिव्हिल डिफेन्ससाठी कुठल्याही प्रकारची तरतूद केली जात नाही. ठाणे जिल्हयामध्ये सिव्हिल डिफेन्सच्या सल्लागार समितीमध्ये मी आहे. त्यांच्याकडे स्ट्रेचरसुध्दा नाहीत. प्रात्यक्षिक दाखविण्यासाठी स्ट्रेचर लागतात ते स्ट्रेचर देखील आम्ही रोटरी क्लब, लायन्स क्लब यांच्या माध्यमातून जमा करुन त्यांना उपलब्ध करुन दिले. गाडी, सायरन व बाकीच्या गोष्टी तर बाजूलाच राहिल्या. ज्या लोकांना यासंबंधीचे प्रशिक्षण दिले आहे त्यांना वेळेवर भत्ता मिळत नाही. गणवेश मिळत नाहीत. या सगळया सिव्हिल डिफेन्स सारख्या संस्थाचा उपयोग डिझास्टर मॅनेजमेंटकडून अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने देखील उपयोग होतो. कधी महापूर आला, कुठे मोठा अपघात झाला तर त्यांचा उपयोग करुन घेता येतो.परंतु एक पैशाची तरतूद या सिव्हिल डिफेन्सकरिता करण्यात येत नाही. माझी या निमित्ताने आग्रहाची मागणी आहे की, या सिव्हिल डिफेन्सकरिता योग्य त्या निधीची तरतूद केली जावी. त्यांच्याकडून याबाबतची मागणी केली जाते, प्रस्ताव पाठविले जातात पण यासाठी तरतूद केली जात नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ KGS/

श्री. संजय केळकर....

सभापती महोदय, पोलीस स्टेशनच्या निर्मितीच्या संदर्भात मागणी करावयाची आहे. भिवंडीचे पोलीस स्टेशन कुठल्या राजकारणामुळे अडकलेले आहे हे मला कळत नाही. अनेक लोकप्रतिनिधींनी त्यासाठी पैसे दिलेले आहेत. त्यामुळे कोणाला काय वाटते म्हणून त्या पोलीस स्टेशनची निर्मिती करण्यात येत नाही की,काय? असा प्रश्न मला पडतो. कुठलीही कोर्ट केस त्या ठिकाणी नाही तरी देखील या शासनाने भिवंडीसारख्या अत्यंत महत्वाच्या शहरामध्ये पोलीस स्टेशनची निर्मिती केलेली नाही. त्याबाबतचे कारण सांगण्यात येत नाही. आता पर्यंत सांगण्यात येत होते की, कोर्टात केस आहे, अमुक आहे तमुक आहे परंतु आता त्याठिकाणी कुठलीही कोर्ट केस नाही. ठाणे जिल्हयामध्ये जिथे वाढती लोकसंख्या आहे त्या ठिकाणी पोलीस स्टेशनच्या निर्मितीची गरज आहे. परंतु त्या त्या ठिकाणच्या पोलीस स्टेशनचे प्रस्ताव मंत्रालयात धूळ खात पडलले आहेत त्यामुळे त्या त्या ठिकाणी पोलीस स्टेशनची निर्मिती झालेली नाही. आम्ही एका बाजुला सुरक्षा आणि संरक्षण असे म्हणतो परंतु दुसऱ्या बाजूला या सगळया व्यवस्था निर्माण केल्या नाहीत तर कायदा व सुव्यवस्था योग्य पध्दतीने चालणार नाही. आदिवासी भागाबद्ल आम्ही अनेक गोष्टी बोलतो परंतु आदिवासी भागा करिता निर्माण केलेला निधी प्रत्यक्षात त्या त्या वर्षामध्ये खर्च होतो काय? आदिवासी भागाकरिता जो 9 टक्के निधी दिला गेला पाहिजे तो त्याठिकाणी प्रत्यक्षात उपयोगात आणला जातो का? थोडयावेळा पूर्वी या ठिकाणी आश्रमशाळांचा उल्लेख करण्यात आला. मी जवळ जवळ 18 आश्रमशाळाना भेटी दिल्या. ये रे माझ्या मागल्या. कितीही वेळा शासनाकडे पाठपुरावा करा. कितीही वेळा मंत्र्यांना भेटा, विधिमंडळामध्ये प्रश्न उपस्थित करा पण त्याचा काहीही उपयोग होत नाही. आम्ही आदिवासी भागामध्ये बोर्ड लावलेले आहेत. "खूप खूप शिक ग पोरी ताठ मानेने जगशील तरी."

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखीय नोंदी

श्री. संजय केळकर ...

या मुलींनी आश्रमशाळेमध्ये कसे जगावयाचे ? पालकांनी त्या आश्रमशाळांमध्ये आपल्या मुलींना कसे पाठवावयाचे ? त्या आश्रमशाळांमध्ये मुलींच्या आंघोळीची व्यवस्था नाही. त्यांच्यासाठी शौचालयाची व्यवस्था नाही. त्या मुलामुलींच्या आश्रमशाळांचे दरवाजे आणि खिडक्या तुटलेल्या आहेत. दुर्दैवाने मला असे सांगावयाचे आहे की, या वर्षी ठाणे जिल्ह्यामध्ये सर्पदंशामुळे पाच मुलांचा मृत्यू झाला. त्या ठिकाणी ॲम्ब्युलंस किंवा अन्य व्यवस्था नव्हती. त्यामुळे त्यांना उपचारासाठी आरोग्य केंद्रावर पोहोचता आले नाही. त्यामुळे पाच विद्यार्थ्यांना सर्पदंशाने मृत्यू झाला. त्याला आपल्याला अभिमान वाटणार आहे काय ? एका बाजूला आदिवासींचे नाव घ्यावयाचे, आम्हाला आदिवासींचा विकास करावयाचा आहे असे सांगावयाचे आणि दुसऱ्या बाजूला या आदिवासी मुलांना मारण्याचा धंदा सुरु केला आहे की काय अशी अवस्था आहे. आदिवासींसाठी बाकीच्या ज्या योजना आहेत त्या तर बाजूलाच राहिल्या परंतु आदिवासींची जी पुढची पिढी आहे त्या पिढीची अशा प्रकारे जर क्रूर चेष्टा करणार असू तर कोणतेही पालक आपल्या मुलांना आश्रमशाळांमध्ये पाठविणार नाहीत.

सभापती महोदय, हे शासन सातत्याने मागासवर्गीयांचा उल्लेख करते. हा महाराष्ट्र पुरोगामी आहे, शाहू, फुले, आंबेडकरांचा महाराष्ट्र आहे असे आपण सांगतो परंतु आपण प्रत्यक्षात मागासवर्गीयांना काय देतो ? स्वाभिमानी योजना नावाची आपली एक योजना आहे. मी कोकणातील चारही जिल्ह्यातील समाजकल्याण अधिकाऱ्यांना विचारले की, या स्वाभिमानी योजनेखाली ज्यांच्याकडे कोणत्याही प्रकारची जमीन नाही अशा मागासवर्गीय, दलित लोकांना 1 एकरापासून 5 एकरापर्यंत पडीक जमीन दिलेली आहे काय ? मला असे उत्तर मिळाले की, आतापर्यंत एकाही माणसाला जमीन दिलेली नाही. हे शासन केवळ आश्वासनेच देणार काय ? आपण केवळ अशा घोषणाच करणार काय ? आपण केवळ अशा प्रकारच्या योजनाच जाहीर करणार काय ? महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये जमीन दिली काय हे माहीत नाही पण कोकणातील या चार जिल्ह्यामधील समाजकल्याण अधिकाऱ्यांना तसेच जिल्हाधिकाऱ्यांना विचारले त्यावरुन असे दिसते की, या ठिकाणी एकाही दलिताला, मागासवर्गीयाला कोणत्याही प्रकारची जमीन दिलेली नाही.

सभापती महोदय, आपली सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना आहे. त्यामध्ये प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना दैनिक भत्ता दिला जातो. आपण मोठमोठ्या घोषणा करतो परंतु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्री. संजय केळकर .....

प्रत्यक्ष विद्यार्थ्यांपर्यंत दैनिक भत्ता पोहोचलेला नाही. आपण जाऊन चौकशी करावी. माननीय राज्यपालांच्या अभिनंदनाचा ठराव कशासाठी करावयाचा ? कशाबद्दल त्यांचे आभार प्रदर्शन करावयाचे ? गेल्या अनेक वर्षापासून अशा प्रकारचा अन्याय महाराष्ट्रातील मागासवर्गीय, आदिवासी लोकांवर या शासनाकडून होत आहे. हे शासन केवळ पोकळ घोषणा देण्यामध्ये मग्न आहे. परंतु त्या योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली पाहिजे अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, आरोग्याच्या संबंधामध्ये तर हाहाकार आहे. यासंदर्भात सुध्दा सन 2012 चा उल्लेख केलेला आहे. आपण सन 2012 चे टारगेट कसे काय धरले आहे ? वीज पुरवठ्याचा प्रश्न असो, भारनियमन मुक्तीचा प्रश्न असो, आरोग्याच्या बाबतीत 100 टक्के सक्षम करण्याचा विषय असो या बाबतीत 2012 साल धरलेले आहे. त्या ठिकाणी अनेक जागा रिक्त आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये तयार आहेत परंतु ते सुरु झालेले नाहीत. जी आरोग्य केंद्रे आहेत त्या ठिकाणी डॉक्टर्स नाहीत, कर्मचारी नाहीत, औषधे नाहीत. त्या ठिकाणी सर्पदंशाचे औषध नाही. 2012 सालापर्यंत आरोग्य व्यवस्था सक्षम करण्याच्या आपण गप्पा मारता. माझी अशी विनंती आहे की, आपण त्या ठिकाणी ग्रामीण भागातील लोकांना संधी द्यावी. त्या भागातील लोकांना आपण त्या ठिकाणी नियुक्त करावे. त्या भागातील कर्मचारी आपण नेमावेत. कारण ग्रामीण भागामध्ये कोणी जाण्यास तयार नाहीत. जे त्या ठिकाणी रुजू होतात ते लगेच बदलून जातात. ते वशिल्याच्या चिठ्ठ्या घेतात आणि दुसरीकडे निघून जातात. आरोग्याच्या बाबतीत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. ती सुधारणा झालेली नाही त्याबद्दल मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, या ठिकाणी वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाचा प्रश्न आहे. शहरामध्ये मोनोरेल, मेट्रोरेल करण्याच्या बाबतीत आपण मोठमोठ्या गप्पा मारतो परंतु ग्रामीण भागामधील रेल्वेसंबंधी कोणी बोलावयास तयार नाही. त्याचे सर्व्हेक्षण करण्यास देखील तयार नाही. ठाणे जिल्ह्यातील कल्याण-माळशेत आणि पुढे नगर मार्गाचे सर्व्हेक्षण करण्यास शासन तयार नाही. डहाणू-नाशिक मार्ग असेल त्याच्या माध्यमातून हा आदिवासी भाग विकसित होणार आहे. त्या माध्यमातून त्या ठिकाणी मोठी बाजारपेठ निर्माण होणार आहे. परंतु या रेल्वेच्या संबंधामध्ये राज्य शासन उदासीन आहे. वर्षानुवर्षे मागणी केली जाते परंतु प्रत्यक्षामध्ये ती उतरवली जात नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर....

सभापती महोदय, न्यायदानाच्या प्रक्रियेसंबंधी अभिभाषणात उल्लेख करण्यात आलेला आहे. राज्यातील न्यायाधीशांची संख्या वाढली आहे, परंतु न्यायालयांची संख्या कधी वाढणार आहे ? हजारो केसेस वर्षानुवर्षे प्रलंबित राहिलेल्या आहेत, त्यामुळे अनेक ठिकाणी नवीन न्यायालयांची स्थापना करण्याची आवश्यकता आहे. अनेक ठिकाणी न्यायालयाची निर्मिती झालेली नाही, कर्मचा-यांच्या नेमणुका झालेल्या नाहीत. त्यामुळे लोकांना फार त्रास होत आहे. म्हणून शासनाने न्यायालयांची संख्या त्वरित वाढविली पाहिजे अशी यानिमित्ताने पुन्हा एकदा मागणी करीत आहे.

सभापती महोदय, जेएनयुआरएमच्या माध्यमातून केंद्र सरकारकडून राज्यातील महानगरपालिकांना मदत मिळणार आहे. त्यासाठी राज्य सरकारकडून 35 टक्के, संबंधित महानगरपालिकांनी 15 व केंद्राकडून 50 टक्के निधी मिळू शकतो अशी ही योजना आहे. परंतु अनेक महानगरपालिका डबघाईला आलेल्या आहेत, त्यामुळे या स्थानिक स्वराज्य संस्था आपला वाटा उचलू शकत नाही. परिणामी त्या महानगरपालिका क्षेत्रातील प्रकल्प रखडले आहेत. ठाणे जिल्हयात एमएमआरडीएच्या कामांचा मोठया प्रमाणात अनुशेष शिल्लक आहे. हे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी शासनाने एमएमआरडीएला 1.25 कोटी रुपये देणे आवश्यक आहे. एमएमआरडीएला शासनाकडून पैसा उपलब्ध झाला तरच हे प्रकल्प पूर्ण होतील. एमएमआरडीएच्या माध्यमातून ठाणे जिल्हयासाठी पैसा खर्च करावा अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, औद्योगिक विकासासंबंधी मला असे वाटते की, कोकणाच्या सर्व भागामध्ये आयटी पार्क होण्याला प्राधान्य दिले गेले पाहिजे. कोकणात होऊ घातलेल्या ऊर्जा प्रकल्पाला विरोध होत आहे. तेथील लोकांना या प्रकल्पामुळे पर्यावरणाच्या माध्यमातून त्रास होईल अशी भीती वाटत आहे. परंतु आयटी पार्कमधून हजारो विद्यार्थी शिकून बाहेर पडल्यावर त्यांना रोजगार मिळू शकतो. कोकणातील अनेक लोक परदेशामध्ये गेलेले आहेत त्यांनी टेलिकॉन्फरन्सिंगद्वारे कोकणात आयटी उद्योग सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यासाठी पैसा देण्यास तयार आहोत, आम्ही तेथे उद्योग सुरु करण्यास तयार आहोत असे सांगितले आहे. परंतु शासनाने त्याला प्रतिसाद दिलेला नाही. राज्यात रोजगार उपलब्ध करावयाचा असेल तर कोकणात आयटी पार्कची शासनाने निर्मिती केली पाहिजे. एमआयडीसीकडे जमीन उपलब्ध नसेल

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.संजय केळकर....

तर शासनाने यासाठी जमीन उपलब्ध करुन दिली पाहिजे. गेली 5 वर्षे मी त्याचा पाठपुरावा करीत आहे, परंतु शासनाकडून त्याला कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही.

सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील रेमण्ड, कॅडबरी हया कंपन्या दुसरीकडे चालल्या आहेत. पूर्वी बेलापूर शहरातून सोन्याचा धूर निघत असे. वागळे इण्डस्ट्रियल इस्टेट ही सगळयात मोठी इण्डस्ट्रियल इस्टेट मानली जात होती. परंतु आज त्या जागेवर मॉल व इमारती उभ्या रहात असल्याचे दुर्दैवी चित्र पहावयास मिळत आहे. त्या भागातील अनेक कंपन्यांच्या जमिनी विकल्या जात आहेत, कामगार उद्ध्वस्त होत आहेत. शासन या कामगारांसंबंधीचे धोरण ठरविण्यास तयार नाही. उद्योजक जमिनी विकून दुसरीकडे जात आहेत, त्या जागेवर दुसरेच उद्योग येत आहेत. या कामगारांपैकी शेकडो कामगार मृत्यूमुखी पडलेले आहेत, परंतु त्यांना देय असलेला पैसा त्यांना मिळालेला नाही. ठाणे जिल्हा औद्योगिकदृष्टया पुढारलेला जिल्हा होता आता तो डबघाईला आलेला जिल्हा आहे. त्याच्याकडे अग्रक्रमाने लक्ष दिल्यास पुन्हा रोजगार देणारे उद्योग निर्माण होऊ शकतात.

सभापती महोदय, मराठी ही राजभाषा आहे. न्यायालयांमध्ये मराठी भाषेतून कामकाज चालले पाहिजे असा शासनाचा निर्णय आहे, धोरण आहे. प्रत्यक्षात जिल्हा स्तरावरील न्यायालयांमध्ये मराठीतून कामकाज होत नाही. त्यासाठी आवश्यक तेवढी तरतूद केली गेली पाहिजे. परंतु ती केली जात नाही. केवळ मराठीचा अभिमान बाळगायचा, परंतु त्यासाठी तरतूद करावयाची नाही असे शासनाचे धोरण असेल तर हे दुर्दैव आहे. राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल या सर्व गोष्टींचा अंतर्भाव नसल्यामुळे मी खेद व्यक्त करतो आणि या सर्व गोष्टींचा त्यात समावेश करावा अशी सूचना करुन मी माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत पत्र/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलचा जो अभिनंदनाचा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, 2004 या वर्षामध्ये माननीय राज्यपालांचे अभिभाषण झाले. त्यावेळी त्यांनी राज्य शासनाकडून ज्या अपेक्षा व्यक्त केल्या हेत्या त्या मागच्या 5 वर्षामध्ये राज्य शासनाने पूर्ण केल्या, जनतेच्या आशा आकांशा पूर्ण केल्या. त्याचा परिणाम पाच वर्षानंतर झालेल्या लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांमध्ये दिसला. मागील 5 वर्षामध्ये या राज्यामध्ये अनेक प्रश्न होते. विजेचा प्रश्न सोडला तर कोणतेही प्रश्न राहिलेले नाहीत असे मी म्हणणार नाही. पण ज्या योजनांचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये करण्यात आला आणि ज्या योजना यशस्वीरीत्या राबविल्यामुळे राज्यातील जनतेसमोर आल्या त्यामुळे राज्यातील जनतेपुढे असे चित्र निर्माण झाले की, हे जनतेच्या हिताचे राज्य आहे, जनतेच्या आशा आकांक्षा पूर्ण करणारे राज्य आहे. त्याचा परिणाम असा झाला की, जनतेने पुन्हा आघाडी सरकारला निवडून दिले. लोकसभेच्या जागा देखील काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँगेसला अधिक मिळाल्या. त्यानंतर होणा-या विधानसभेच्या निवडणुकीच्यावेळी अशी चर्चा होत होती की बरेचसे प्रश्न न सुटल्यामुळे, विजेसारखा प्रश्न न सुटल्यामुळे आघाडी शासनाच्या विरोधात जनता मतदान करील आणि तशा प्रकारचे परिणाम समोर येतील. परंतु राज्यातील जनतेला मनापासून वाटत आहे की, मागील 5 वर्षामध्ये आघाडी सरकारने चांगल्या प्रकारचे काम केलेले आहे, महत्वाचे प्रश्न सोडविलेले आहेत, त्यामुळे राज्यासमोर जे काही प्रश्न असतील ते आघाडी सरकारच सोडवू शकेल आणि तशा प्रकारचा विश्वास आघाडी सरकारने जनतेच्या मनामध्ये निर्माण केलेला आहे. मागील 5 वर्षामध्ये माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये ज्या योजना समोर आलेल्या आहेत त्या सदनाला माहीत आहेत. राज्यातील शेतकरी आर्थिकदृष्टया अडचणीत आलेला असताना त्याला राज्याने कशा प्रकारे आर्थिक मदत करावयाची, त्याचा आर्थिक भार कसा उचलायचा, ज्या भागामध्ये शेतक-यांच्या आत्महत्या होतात त्या भागातील शेतक-यांना आर्थिक मदत कशी करावयाची, सावकारांच्या तावडीतून त्याची कशी सुटका करायची यासंबंधीची भूमिका घेतली. या शेतक-याचे कर्ज माफ झाले तर त्याला पुन्हा कर्ज मिळेल आणि तो शेती करायला लागून आर्थिकदृष्टया मजबूत होईल. त्यादृष्टीने आघाडी सरकारने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निर्णय घेतला. शेतक-यांच्या कर्जमाफीसंबंधी आपण या ठिकाणी चर्चा करतो. माजी मुख्यमंत्री श्री. अंतुले यांनी शेतक-यांचे 51-52 कोटीचे कर्ज माफ केले होते. त्यावेळेपासून मोठ्या संख्येने शेतकरी शेतीच्या प्रवाहामध्ये आला.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे..

पुन्हा शेतकऱ्यांचे कर्ज तुंबले, त्यांची आर्थिक परिस्थिती ढासळली, त्यांच्या मालाला योग्य भाव मिळाला नाही त्यामुळे विशेषत: कापूस उत्पादक परिसरातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती अधिक ढासळली. मग त्यात आंध्रप्रदेश असो, कर्नाटक असो, केरळ असो, मराठवाड्यातील काही भाग आणि विदर्भातील कापूस उत्पादक परिसरातील जिल्हे असोत, या जिल्हयातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती ढासळल्यामुळे त्याठिकाणचे शेतकरी हवालदिल झाले. या भागात शेतकऱ्यांच्या आत्महत्या व्हावयास सुरुवात झाली. हे काही एका वेळचे कारण नव्हते. अलिकडचेच कारण आहे असे मी म्हणणार नाही. अनेक वर्षापासून ही स्थिती निर्माण झाली होती. ज्या शेती उत्पादनावर शेतकऱ्यांचे जीवनमान अवलंबून होते, ज्या कापसाला पांढरे सोने म्हणत होतो, त्या पांढऱ्या सोन्याला अपेक्षित भाव मिळवून देऊ शकलो नाही, त्यामुळे शेतकऱ्यांवर ही परिस्थिती ओढावली हे आपल्या सर्वांना मान्य करावे लागेल. मागील काळात अत्यंत चांगले निर्णय झाले. शेतकऱ्यांसाठी कापूस एकाधिकार योजना राबविण्यात आली. कापूस एकाधिकार योजनेच्या माध्यमातून शासनाने शेतकऱ्यांना मदतीचा हात दिला. शेतकऱ्यांना अपेक्षा होती ती अपेक्षा आपण पूर्ण करु शकलो नाही तरी हमी किंमत जाहीर केल्याने व्यापाऱ्यांनी त्यांचा कापूस अधिक किंमतीमध्ये खरेदी केल्यामुळे शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कापसाला अधिक भाव मिळण्यास सुरुवात झाली. मागील काळात 2500 रुपये प्रती क्विंटल भाव देण्याचे जाहीर केले होते. परंतु श्रीमती सोनियाजी गांधी आणि केंद्र शासनाने निर्णय घेतल्यानुसार 1950 रुपयांवरुन 3000 रुपये प्रती क्विंटल कापसाला भाव जाहीर केला गेला. आम्हाला याची जाणीव आहे की, कापसाचे भाव वाढलेले आहेत. परंतु काही मर्यादेपर्यंत हमी भाव देत असल्यामुळे व्यापाऱ्यांना जादा भावाने कापूस घ्यावा लागला. त्यामुळे कापूस उत्पादक परिसरातील शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न राज्य शासनाने निश्चितपणे केला आहे. त्या भागामध्ये होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण कमी झाले पाहिजे, त्या भागातील परिस्थिती सावरली पाहिजे यासाठी त्या ठिकाणी नवीन उद्योगधंदे निर्माण झाले पाहिजेत, कापसावर आधारित प्रकल्प निर्माण झाले पाहिजेत. शेतकऱ्यांवरील व्याजाचे पैसे तुंबले होते. शासनाने कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या 3 टक्के रक्कम डेव्हलपमेंटसाठी कापून घेतली होती, त्या 3 टक्के रक्कमेचे 700 कोटी रुपये शेतकऱ्यांना परत केले गेले. कापसावर तुडतुड्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे..

होते, जवळजवळ 300 कोटी रुपयांचे नुकसान झाले होते. त्यामुळे शेतकऱ्यांना दुधाळ जनावरे देण्याची योजना राज्य शासनाच्या माध्यमातून राबविण्यात आली. राज्य शासनाचे 1600 कोटी रुपये आणि केंद्र शासनाचे 3750 कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला. सिंचनाची व्यवस्था करण्याच्या संदर्भात, दुधाळ जनावरे पुरविण्यासाठी, अवजारे पुरविण्यासाठी, विधवांना आर्थिक मदत करण्याच्या दृष्टीकोनातून राज्य शासनाने पावले उचलली. आज कोणी काहीही म्हणत असले तरी राज्य शासनाने उचललेल्या पावलांच्या माध्यमातून आम्हाला मदत मिळाली ही भावना शेतकऱ्यांच्या मनामध्ये निश्चितपणे आहे. एक नाही तर अनेक निर्णय मागील काळात घेतले गेले. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात निर्णय घेतला गेला. विदर्भामध्ये असलेला अनुशेष कमी करण्याच्या संदर्भातील निर्णय राज्य शासनाने घेतला. अनुशेषाच्या संदर्भातील काही विषय सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी मांडले. त्यांनी सांगितले की, अनुशेष पूर्ण केला असे शासन म्हणत असले, आर्थिकदृष्टया अनुशेष पूर्ण केला असला तरी खऱ्या अर्थाने भौतिक अनुशेष दूर करण्याच्या संदर्भात राज्य शासनाकडून भूमिका घेणे गरजेचे आहे अशी मागणी त्यांनी केली ती संयुक्तिक आहे. आतापर्यंत ज्या आधारावर अनुशेष भरुन काढण्याचा प्रयत्न चालविला होता त्या दांडेकर समितीच्या अहवालानुसार मोठया प्रमाणात अनुशेष पूर्ण करण्याचा प्रयत्न झाला. परंतु नव्याने अनुशेष निर्माण झाला त्या संदर्भात राज्य शासनाने चांगली भूमिका घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर वैधानिक विकास मंडळांची मुदत पुढील वर्षी 10 एप्रिल रोजी संपणार आहे.....

(नंतर श्री.खर्चे..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री. माणिकराव ठाकरे .....

त्यात अनेक अडचणी येऊ शकतात म्हणून विदर्भ, मराठवाडा आणि कोकण, ज्या ज्या ठिकोणी वैधानिक विकास मंडळे आहेत ती बंद होता कामा नये यासाठी पावले उचलणे आवश्यक आहे. पुढील काळात सुध्दा ज्या योजना शासनाने हातात घेतल्या आहेत त्या महत्वाच्या असून त्यांची अंमलबजावणी व्हावी. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका नुकत्याच झाल्या असून त्यात जो जाहिरनामा काँग्रेस आणि राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने संयुक्तपणे प्रसिध्द केला होता, जी आश्वासने जनतेला दिलेली आहेत त्यांची पुर्तता हे शासन केल्याशिवाय राहणार नाही. तसेच मागील काळात जी कामे राहिली त्यात विजेचा प्रश्न हा सर्वात महत्वाचा आहे. गावागावात आजही वीज नाही आणि हा प्रश्न आता देशाचाच प्रश्न झाला याची जाणीव सर्वांनाच आहे. संपूर्ण देशातच हा प्रश्न निर्माण व्हायला लागल्यामुळे केंद्रशासनाने असा निर्णय घेतला की, वीज पुरवठ्याची व्यवस्था आता राज्यांच्या हातात ठेवून चालणार नाही तर खाजगी कंपन्यांना सुध्दा यामध्ये आणावे लागणार आहे. म्हणून विजेच्या संदर्भात संपूर्ण देशात राष्ट्रीयीकरण झाले आणि सन 1949 जो जुना कायदा होता त्यात सन 2003 मध्ये बदल करण्यात आला. त्या बदलानुसार आता कोणीही वीज तयार करु शकेल व कोणालाही वितरित करता येईल अशी सिस्टम शासनाने तयार केली. त्या अनुषंगाने एमएसईबीच्या तीन कंपन्या स्थापन केल्या. त्यात वीज निर्माण करणे हा सर्वात महत्वाचा भाग आहे अलिकडच्या काळात खाजगी कंपन्यांचा सहभाग झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात वीज निर्माण करण्याच्या कामाला या वेगवेगळ्या कंपन्या लागल्या आहेत. अशा प्रकारचे प्रयत्न सर्वांकडून होत आहेत. विशेष म्हणजे राज्यशासनाकडून सुध्दा या कामासाठी मोठ्या प्रमाणात जी तरतूद केली आहे त्यानुसार महाजनको कंपनीने 27215 कोटीची तरतूद केली आणि सन 2012 पर्यंत संपूर्ण राज्य भारनियमन मुक्त झाले पाहिजे असे ठरविले. मला खात्री आहे की ज्या पध्दतीने वीज मंडळामध्ये काम होत आहे त्यानुसार तीन वर्षात हे झाल्याशिवाय राहणार नाही. प्रश्न आमच्यासमोरचे आहेत त्यात दुसरा प्रश्न म्हणजे राज्यात झालेल्या भाववाढीचा प्रश्न देखील तितकाच महत्वाचा आहे आणि त्यावर कशा प्रकारे नियंत्रण आणता येईल यासाठी सामुहिक प्रयत्न होण्याची गरज आहे. विरोधी पक्षाच्या वतीने मोर्चे, आंदोलने वगैरे झाली ते स्वाभाविकच आहे. ते विरोधी पक्षाचे कामच आहे. यासाठी प्रयत्न मात्र दोन्ही बाजुकडून होणे आवश्यक असते. सर्वच

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे ....

प्रश्न शासनाने निर्णय घेतल्यामुळे सुटतात असे नाही तर ते पूर्णपणे सोडविण्याच्या दृष्टीने विरोधी आणि सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांचेही सहकार्य आवश्यक असते. असे काही प्रश्न आहेत त्यात मग 26/11/2009 रोजी झालेल्या आतंकवादी हल्ल्यासंबंधीचा प्रश्न असेल किंवा राज्यात वाढत असलेल्या नक्षलवाद्यांचा प्रश्न असेल, असे प्रश्न आता उग्र स्वरुप धारण करु लागले आहेत. बाहेरच्या राज्यातील माओवादी सुध्दा आपल्या राज्यात घुसायला लागले म्हणून केवळ तात्पुरते प्रयत्न करुन भागणार नाही तर संयुक्तरित्या प्रयत्न करावे लागतील. शेवटी राज्य व देशाच्या बाबतीत विरोधी पक्ष असो अथवा सत्ताधारी पक्ष असो सर्वांच्याच मनात त्याबद्दलची भावना एकच असते. म्हणून यादृष्टीने सामुहिक प्रयत्नांची गरज आहे. माननीय राज्यपालांनी बऱ्याच प्रश्नांना स्पर्श करण्याचा प्रयत्न केला. अनेक सनमाननीय सदस्यांनी सांगितले की, अमुक प्रश्नाचा उल्लेख नाही वगैरे. परंतु सर्वच प्रश्नांचा उल्लेख अभिभाषणात असतो असे मी म्हणणार नाही तर महत्वाचे जे मुद्दे असतात त्यांच्या बाबतीत शासन पुढे काय करणार आहे याचे चित्र सभागृहासमोर मांडण्याचा तो एक प्रयत्न असतो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ...

याचे चित्र त्यांनी सादर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. वेळो वेळी यासंदर्भातील चर्चा या सदनात होणार आहे. या प्रश्नाच्या संदर्भात अधिवेशनात चर्चा होईल तेव्हा सन्माननीय सदस्यांना काही सूचना करता येतील व त्यामाध्यमातून आपल्याला नवीन सुधारणा करता येऊ शकतील. एखादी योजना राज्य शासनाने हातात घेतली म्हणजे ती अंतिम असत नाही तर सभागृह जोपर्यंत मान्यता देत नाही तोपर्यंत ती योजना अंतिम रुप घेऊ शकत नाही. त्यामुळे प्रत्येक योजनेला सन्माननीय सदस्यांच्या सूचना आणि सर्व सदस्यांचा सहभाग आवश्यक असतो. सर्वांच्या सूचना आणि सर्वांचा सहभाग घेऊनच राज्यशासन पुढील काळात काम करेल अशा प्रकारचा आशावाद मी या ठिकाणी व्यक्त करतो. दारिद्रय रेषेखालील जे लोक आहेत त्यांना जीवनदायी योजनेच्या माध्यमातून कागदपत्र तयार करावी लागतात व कागदपत्र तयार केल्यानंतरच त्यांना जीवनदायी योजनेचा लाभ घेता येतो. रुग्ण हॉस्पिटलमध्ये पोहचलेला असतो परंतु पैसे पोहचत नसल्यामुळे रुग्णावर उपचार करण्यास वेळ लागतो. जीवनदायी योजनेतील लाभार्थ्याला तात्काळ लाभ मिळाला पाहिजे म्हणून आरोग्य विषयाच्या संदर्भातील कार्ड काढण्याच्या बाबत शासनाने आपल्या जाहीरनाम्यात उल्लेख केलेला असल्यामुळे यासंदर्भात राज्यशासन भविष्यात निश्तिचपणे निर्णय घेऊ शकेल. अपंगासाठी मोफत औषधोपचार आणि ऑपरेशन्स करण्याची व्यवस्था राज्य शासन करणार आहे अशी घोषणा आजच विधानसभेत करण्यात आलेली आहे. काही विषय असे असतात की, त्यातून काहीही निष्पन्न निघत नाही, राजकीय दृष्टिकोनातून आपण ते बोलत असतो परंतु राज्य पुढे गेले पाहिजे अशी भावना या सदनातील सर्व सदस्यांची असते. विरोधी पक्षाला जर यामध्ये चूक दिसली तर ती चूक दुरुस्त करा आणि चांगल्या प्रकारची योजना करा असे म्हणण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे. आम्ही काही तरी वेगळे करीत आहोत त्यामुळे तुम्ही काहीही सांगितले तरी आमची भुमिका तीच राहील अशी भुमिका राज्य शासनाची कधीही राहणार नाही. विरोधी पक्षाने जर चांगली सूचना केली तर ती आम्ही मान्य करणारच नाही असे नाही तर त्यांच्या चांगल्या सूचनांचा जरुर विचार केला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. संपूर्ण राज्याच्या समस्या सोडविण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन पुढे जाऊ अशी भुमिका आमच्या सरकारची राहणार आहे. त्यामुळे राज्याच्या विकासासाठी विरोधकांनी सुध्दा सहकार्य करण्याची गरज आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ...

सभापती महोदय, मी माननीय राज्यपाल महोदयांचे देखील अभिनंदन करतो. माननीय राज्यपाल महोदयांनी अनेक मुद्यांना तसेच राज्य शासनाने हाती घेतलेल्या कामाच्या संदर्भात आपल्या अभिभाषणात उल्लेख केलेला असल्यामुळे मी त्यांचे मनापासून आभार व्यक्त करतो व या ठिकाणी माननीय जयप्रकाशजी छाजेड यांनी राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाचा जो प्रस्ताव आहे त्या ठरावाला पाठिंबा देऊन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेले) : माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर चर्चा करण्यासाठी आणि त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभी आहे. राज्य शासनाने गेल्या दहा वर्षामध्ये सर्वसामान्य जनतेच्या विकासासाठी जी जनहिताची धोरणे राबवली त्यामुळेच जनतेने लोकसभेच्या व विधानसभेच्या निवडणुकीमध्ये भरघोस मताने केंद्रात व राज्यात एक विचाराचे सरकार निवडून दिलेले आहे. माननीय मुख्यमंत्री श्री. अशोकरावजी चव्हाण साहेब तसेच माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगनरावजी भुजबळ हे त्यामुळेच या पदावर विराजमान होऊ शकले आहेत. हे वर्ष महाराष्ट्र राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. या सुवर्ण महोत्सवी वर्षात केंद्र शासनाने एक महत्वपूर्ण निर्णय घेतलेला आहे. यामध्ये महिलांना ग्रामपंचायत, जिल्हापरिषद, महानगरपालिका, नगरपालिकेमध्ये 50 टक्के आरक्षण मंजूर केले असून या निर्णयाला महाराष्ट्र शासनाने देखील पाठिंबा दर्शविला आहे. दिवगंत पंतप्रधान राजीव गांधी यांनी देशातील महिलांना 33 टक्के आरक्षण लागू केल्यामुळे महिलांना नगरसेविका म्हणून सभागृहात येण्याचे भाग्य लाभले. त्यावेळी या राज्याच्या मुख्यमंत्रीपदी माननीय श्री. शरदचंद्रजी पवार विराजमान होते. ही योजना संपूर्ण देशात तसेच महाराष्ट्र राज्यात राबवली गेली. केंद्र शासनाने महिलांच्या 50 टक्क्याच्या संदर्भात जे बील केले त्याला मी मनापासून धन्यवाद देते. ख-या अर्थाने महिलांचे सक्षमीकरण करावयाचे असेल तर आपल्या शासनाने आपल्या राज्यात तरी सुरुवात केली पाहिजे. महाराष्ट्रातील महिलांना 33 टक्के आरक्षण नसले तरी 10 टक्के आरक्षण महिलांना दिले पाहिजे असे मला वाटते.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे..

असा सर्व महिला सदस्यांचा विचार आहे. महिलांना 33 टक्के आरक्षण देण्यासंबंधीचे विधेयक अजूनही प्रलंबित आहे. त्या संदर्भातसुध्दा लवकरात लवकर विचार झाला तर विधान सभा आणि लोकसभेमध्ये महिलांची संख्या वाढलेली दिसून येईल. महिला ज्या प्रमाणें घराचे चांगल्या प्रकारे नियोजन करु शकतात त्याप्रमाणें गावाचे,राज्याचे आणि देशाचेही ते चांगले नियोजन करु शकतील .याबाबतीत एक उदाहरण देऊ इच्छिते. माननीय श्रीमती प्रतिभा पाटील या राष्ट्रपती पदावर विराजमान झालेल्या आहेत. त्याचबरोबर श्रीमती मीराकुमार लोकसभेचे सर्वोच्च अध्यक्षपद भूषवत आहेत. श्रीमती सोनिया गांधी यांनी हे दाखवून दिलेले आहे की महिला सक्षमपणे व चांगल्या प्रकारे काम करु शकतात. त्यामुळे महिलांना 50 टक्के आरक्षण देण्यच्या बाबतीत जे विधेयक पास करण्यात येत आहे त्याबद्दल मी केन्द्र सरकारचे आणि राज्य सरकाराचे अभिनंदन करत आहे.

सभापती महोदय, महिलाच्या आर्थिक विकासासाठी राज्य सरकारने अनेक चांगले निर्णय घेतलेले आहेत. महिला बचत गटांना 4 टक्के या सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध करुन दिलेले आहे. त्यामुळे महिला बचत गटाच्या माध्यमातून स्वयंरोजगार निर्माण झालेला आहे. त्यातून निर्माण होणा-या वस्तूच्या विक्रीसाठी विविध ठिकाणच्या मॉलमध्ये स्टॉल सुरु करण्यात आलेले आहेत. अशा प्रकारे महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न महिला बचत गटाच्या माध्यमातून केला जात आहे. गेल्या दोन वर्षापासून आम्ही या सभागृहात सतत मागणी करीत आहोत की राज्यातील ज्या महिला सरपंच आहेत. त्या अत्यंत गरीब आहेत व त्यांना अत्यंत कमी मानधन दिले जात आहेत. त्यामुळे त्यांना एस.टी.चा मोफत पास देण्यात यावा. सन्माननीय सदस्या डॉ नीलम गो-हे नेहमीच महिला सरपंचाना भेटावयास जातात त्यामुळे त्यांना महिलां सरपंचाची आर्थिक स्थिती कशी आहे हे माहीत आहे.काही महिला सरपंचाच्या पायामध्ये चप्पल सुध्दा नसते.तालुक्याच्या वा जिल्हयाच्या ठिकाणी त्यांना जावयाचे असेल तर कोणाच्या तरी गाडीतून त्यांना प्रवास करावा लागतो त्यामुळे या महिलांना एसटीतून मोफत प्रवास करण्यासाठी पास देण्यात यावा अशी मागणी आम्ही दोन वर्षापासून सातत्याने करीत होतो त्याप्रमाणें राज्य सरकाराने गेल्यावर्षी निर्णय घेतला आणि राज्यतील महिला सरपंचाना दिलासा दिला आहे त्याबद्दल मी राज्य शासनाचे अभिनंदन करते.

2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे..

सभापती महोदय, राज्य शासनाने सामुदायिक विवाह आणि आरोग्याच्या संदर्भात अनेक योजना जाहीर केलेल्या आहेत त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते.गर्भवती महिलांना पूरक आहार देण्याचे सरकारने धोरण स्वीकारले आहे. त्यबाबत मला एक सूचना करावयाची आहे सन्माननीय सदस्य डॉ दीपक सावंत हे माझ्या बरोबर चंद्रपूरला आले होते.त्या ठिकाणी गर्भवती माता त्यांनी आणि मी पहिलेल्या आहेत .चंद्रपूर मध्ये 15,16 व 17 वयाच्या मुली गर्भवती होत्या. त्यांना सकस आहार मिळाला नसल्यामुळे कुपोषित मुले जन्माला येतात व त्यांचे वजनसुध्दा कमी भरते. तेव्हा ज्यावेळी गरोदर असल्याचे निदान होते त्याच महिन्यापासून तिला पूरक दिला गेला पाहिजे. परंतु पाच महिन्यानंतर तिला पूरक आहार दिला तर त्याचा काहीही उपयोग होत नाही. तेव्हा गर्भवती असल्याचे निदान जेव्हा होईल त्या महिन्यापासून त्या महिलेला जर पूरक आहार दिला तर बाळाचे वजन वाढण्यामध्ये मदत होईल.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा एक मुद्दा येथे मांडावयाचा आहे. दिनांक 26.11.2008 रोजी मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला होता त्यानंतर सर्व मुंबई पुन्हा एकदा उभी राहिली आणि आमच्यावर कितीही हल्ले झाले तरी आम्ही धावतच राहू अशा प्रकारे मुंबई सतत धावणारी आहे. हे मुंबईने सर्व जगाला दाखवून दिले आहे. मुंबईवर दहशवादी हल्ला झाल्यानंतर सर्व सामान्य लोकानी वा सर्व पक्षातील लोकानी एकत्र येऊन मदतीसाठी प्रयत्न केले होते या हल्ल्यात जे शहीद झाले आहेत त्याच्या कुटुंबियाना पेट्रोल पंप देण्याचे शासनाने मान्य केले होते परंतु त्यांना अजूनही जागा देण्यात आलेली नाही. शासनाकडे जर जागा नसेल तर माझी अशी सूचना आहे की, नवीन मुंबईमध्ये 8 पेट्रोल पंप देण्यासाठी निविदा काढण्यात आल्या आहेत त्या रद्द कराव्यात आणि तेथील जागा शहीद झालेल्या व्यक्तीच्या पत्नीला पेट्रोल पंप सुरु करण्यासाठी देण्यात याव्यात अशी माझी सूचना आहे. गडचिरोलीमध्ये जे काही पोलीस शहीद झालेले आहेत ते सुध्दा देशाच्या व राज्याच्या संरक्षणासाठी शहीद झालेले आहेत त्यांच्या बाबतीत हाच न्याय लावण्यात यावा.

सभापती महोदय, यानंतर मला आणखी एक सूचना करावयाची आहे राज्यामध्ये मिहान प्रकल्प येत आहे.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत पत्र / शीघ्रलेखासाठी नाही

श्रीमती म्हात्रे ....

त्याचप्रमाणे अनेक प्रकल्पांसाठी अनेक जिल्ह्यातील जागा गेलेल्या आहेत. कोठे विमानतळासारखे प्रकल्प उभे राहणार आहेत. सभापती महोदय, ज्यावेळेस आमची नवी मुंबई वसली तेव्हा तेथील शेतकऱ्यांनी जे योगदान त्यासाठी दिले त्यामुळे त्या भागात अनेक शाळा-कॉलेजे, मॉल्स वगैरे आलेले आहेत. परंतु तेथील भूमिपुत्रांचे काय झाले याचा शोध घेतला पाहिजे. सभापती महोदय, हा जो मिहान प्रकल्प होत आहे वा झाला आहे त्या प्रकल्पग्रस्तांना चांगल्या प्रकारचा मोबदला दिला गेला आहे. परंतु असे अनेक प्रकल्प आहेत, उदाहरणार्थ धरण प्रकल्प आहेत की तेथील प्रकल्पग्रस्तांचे अजूनही योग्य प्रकारे पुनर्वसन झालेले नाही. त्यांना त्यांच्या जागांचा योग्य तो मोबदला मिळालेला नाही. जेथे पुनर्वसन करण्यात आलेले आहे तेथे शाळा नाही, पाणी नाही. शाळा असल्याच तर त्या केवळ चौथी पर्यंत असतात. तेव्हा विनंती आहे की, प्रकल्पांसाठी ज्यांच्या जमिनी गेलेल्या आहेत त्यांचे पूर्णार्थाने पुनर्वसन झाले पाहिजे, प्रशिक्षण देऊन तेथील भूमिपुत्रांना नोकऱ्यांमध्ये समाविष्ट करून घेतले गेले पाहिजे.

सभापती महोदय, आज बाजारातील वाढत्या महागाईला तोंड देण्यासाठी राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख आलेला आहे की, लहरी निसर्गामुळे महागाई वाढलेली आहे. खरे तर महागाई वाढली की सर्व प्रथम त्याचा विचार महिलांनाच करावा लागतो, या महागाईला तोंड महिलांना द्यावे लागते. कारण रोज काय जेवण करायचे, महागड्या डाळी घ्यायच्या की नाही ? याचा विचार त्यांच्यासमोर असतो. एक प्रकारे त्यांची यामध्ये कुचंबणा होत असते. आमचे नेते माननीय श्री.शरद पवार साहेब यांनी परवा मंत्रिमंडळामध्ये प्रश्नोत्तराच्या वेळी पुरवणी उत्तरात सांगितले की, देशभरामध्ये केलेल्या निरीक्षणानुसार संपूर्ण देशात 10 कोटी पेक्षाही अधिक बोगस रेशनकार्डे आढळून आली आहेत. तेव्हा विविध राज्य सरकारांनी याबाबत दखल घेऊन संबंधित बोगस रेशनकार्डधारकांवर कारवाई करावी. अन्यथा धान्य पुरवठा करणे कठीण होईल. सभापती महोदय, हे खरे आहे कारण दारिद्र्य रेषेखालील जनतेच्या नावाने बोगस रेशनकार्ड करून लोक त्यांच्या नावे धान्य उचलतात त्यामुळे त्या मूळ दारिद्र्य रेषेखालील माणसाला धान्य मिळू शकत नाही. आज मी त्या समितीवर असल्यामुळे विमुक्त जाती-भटक्या जमातीचे जे लोक आहेत, जे दारिद्र्य रेषेखालील आहेत त्यांना आपल्याला धान्य द्यावे लागते पण ते अशा बोगस रेशनकार्डांमुळे देता येऊ शकत नाही. अधिकारी सांगतात की, धान्याचा कोटा संपला. परिणामी बीपीएलचे कार्ड

..... 3के 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती म्हात्रे ....

देऊ शकत नाही. तेव्हा ही जी वाढणारी महागाई आहे तिला तोंड देताना सरकारने प्रथमत: बोगस रेशनकार्डधारकांवर कारवाई करणे आवश्यक आहे. त्यामुळे सरकारवर अतिरिक्त बोजा पडतो आहे. याची गंभीर दखल शासनाने घेतली पाहिजे एवढे बोलून आणि शासनाचे पुन्हा एकदा अभिनंदन करून मी भाषण संपविते. जयहिंद, जय महाराष्ट्र.

***

..... 3के 3...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करून घेणे.

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहालासादर करतो.

विधान परिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक गुरूवार, दिनांक 10 डिसेंबर 2009 रोजी दुपारी 3.30 वाजता विधान भवन, नागपूर येथे झाली. सदरहू बैठकीत समितीने विचार विनिमय करून सोमवार, दिनांक 14 डिसेंबर 2009 ते बुधवार, दिनांक 23 डिसेंबर 2009 पर्यंतचे सभागृहाचे कामकाज पुढीलप्रमाणे असावे असा निर्णय घेतला.

डिसेंबर 2009.

सोमवार, दिनांक 14 : 1) सन 2009-10 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा.(पहिला दिवस)
2) शासकीय विधेयके.

मंगळवार,दिनांक 15 : 1) सन 2009-10 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस)
2) संसदेच्या दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या संविधान (एकशे नववी सुधारणा) विधेयक, 2009 द्वारा करण्यात येणाऱ्या भारताच्या संविधानाच्या सुधारणेच्या अनुसमर्थनार्थ ठराव.
3) शासकीय विधेयके.
4) सत्तारूढ पक्षातर्फे सुचविण्यात येणाऱ्या प्रस्तावावर चर्चा.

बुधवार, दिनांक 16 : 1) पुरवणी विनियोजन विधेयक.
2) शासकीय विधेयके.

गुरूवार, दिनांक 17 : बैठक होणार नाही.

शुक्रवार, दिनांक 18 : बैठक होणार नाही.

....3के 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील ....

शनिवार, दिनांक 19 : बैठक होणार नाही.

रविवार, दिनांक 20 : सुट्टी.

सोमवार, दिनांक 21 : सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10.30 ते दुपारी 12.30 वाजे पर्यंत.
दिनांक 10 डिसेंबर 2009 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविलेला विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर चर्चा.

सभागृहाची नियमित बैठक 1.00 वाजता सुरू होईल.

1) जगविख्यात क्रिकेटपटू श्री.सचिन तेंडुलकर यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव.
2) विरोधी पक्षातर्फे सुचविण्यात येणाऱ्या प्रस्तावावर चर्चा.
3) शासकीय विधेयके.
4) श्री.कपिल पाटील व इतर वि.प.स. यांचा म.वि.प.नियम 260 अन्वये प्रस्ताव.

मंगळवार, दिनांक 22 : 1) निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप.
2) शासकीय विधेयके.
3) अंतिम आठवडा प्रस्ताव.

बुधवार, दिनांक 23 : 1) शासकीय विधेयके.
2) अशासकीय कामकाज - ठराव.

(यानंतर श्री.सरफरे ... 3एल 1 ..

अशुद्धारित प्रत / शोधनासाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये चर्चा करीत असतांना आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेला आमचा नियम 260 अन्वये प्रस्ताव सोमवार, दिनांक 14.12.2009 रोजी चर्चेला घेण्याचे ठरले आहे. त्यासाठी सभागृहाची विशेष बैठक सकाळी साडे दहा वाजता घेण्याचे ठरले आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, होय. त्याप्रमाणे सोमवार, दिनांक 14 डिसेंबर, 2009 रोजीचे सभागृहाचे सुधारीत कामकाज पुढीलप्रमाणे होईल.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10.30 ते दुपारी 12.30 वाजता सुरु होईल.

दिनांक 10 डिसेंबर, 2009 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविलेला विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर चर्चा.

सभागृहाची नियमित बैठक 1.00 वाजता सुरु होईल.

(1) सन 2009-10 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा. (पहिला दिवस)

(2) शासकीय विधेयके

तालिका सभापती (डॉ.वसंत पवार): कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सुधारल्याप्रमाणे सभागृहाला सादर झाले आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

मु.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(प्रस्ताव पुनः प्रस्तुत झाला)

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माझे विचार आणि खेद व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या सभागृहाची परंपरा अशी आहे की, सभागृहाचे कामकाज "वंदे मातरम्" हे गीत म्हणून सुरु करतो. तसेच, अधिवेशन "जन गण मन" हे राष्ट्रगीत म्हणून संपवितो. या निमित्ताने मला असा प्रश्न पडला आहे की, गेल्या एक-दोन वर्षापासून मध्यवर्ती सभागृहामध्ये माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाची सुरुवात आणि सांगता "जन गण मन" या राष्ट्रगीताने करीत होतो. आता सभागृहाचे नेते उपमुख्यमंत्री माननीय श्री. छगन भुजबळ याठिकाणी उपस्थित आहेत. मला आपल्याला विचारावयाचे आहे की, ही पध्दत आपण कधीपासून बदलली? याचे विश्लेषण करावे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये पहिले वाक्य म्हटले आहे की, "सागरी सुरक्षेमध्ये प्रचंड वाढ केली आहे". दोन दिवसापूर्वी वर्तमानपत्रात बातमी आली होती की,वसईच्या समुद्र किनाऱ्यावर फक्त तीन पोलीस होते.तसेच, हे अधिवेशन सुरु होण्यापूर्वी अनेक वृत्त वाहिन्यांवरुन दाखविण्यात आले होते की, गेट ऑफ इंडियाचे रक्षण करणारे सी.आर.पी.एफ. चे जवान किंवा मुंबई पोलीस असतील त्यांची त्याठिकाणी राहण्याची काय व्यवस्था आहे? गेल्यावर्षी गेट वे ऑफ इंडिया, ताज महाल हॉटेलवर समुद्र मार्गाने हल्ला करण्यासाठी अतिरेकी आले.त्यांच्याबरोबर मुकाबला करणारे आपले पोलीस आज रस्त्यावर झोपतात, रस्त्यावर जेवण करतात. गेट वे ऑफ इंडियाच्या त्या इमारतीमध्ये झोपतात. अशाप्रकारची पोलीस खात्याची दैन्यावस्था आहे. या विषयाकडे आपण गांभीर्याने पहाणार आहात की नाही? या वृत्त वाहिन्यांवरील चित्र त्या जवानांच्या नातेवाईकांनी पाहिले तर त्यांना काय वाटत असेल? आपला मुलगा, आपला भाऊ, आपला नवरा कसा रहातो, कुठे आंघोळ करतो, त्याच्या अंगावरील कपडे कसे आहेत? हे सर्व पाहिल्यानंतर आपल्याला लाज वाटली पाहिजे. आपले रक्षण करणाऱ्या जवानांची ही दैन्यावस्था

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

डॉ. दीपक सावंत....

आहे. आम्ही अनेक लोकांना मदत केली असे आपण सांगाल. त्याबाबत एक उदाहरण मी आपणास देतो. आपण वैद्यकीय शिक्षण मंत्री असतांना गेल्या वर्षी अतिरेक्यांच्या हल्ल्यामध्ये सेंट जॉर्ज हॉस्पिटलमधील तिखे नावाचा एक कर्मचारी जखमी झाला.

(यानंतर सौ. थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याचे ऑपरेशन झाले, त्याला कॉम्पेन्सेशन दिले गेले पण तो ज्या कालावधीमध्ये रुग्णालयात होता त्या कालावधीची त्याची रजा बिनपगारी ठरविली. तो आपले कर्तव्य बजावतांना गोळीबारात जखमी झाला. त्यामुळे रुग्णालयात होता. पण त्याची ती हॉस्पिटलायझेशनची रजा या सरकारने बिनपगारी ठरविली आहे. त्याचा पगार अजूनही दिलेला नाही. अशा दोन किंवा तीन केसेस या सेंट जॉर्ज रुग्णालयातील आहेत. मी या ठिकाणी त्यापैक्री फक्त एकाचे नाव सांगितलेले आहे. त्याचे नाव तिखे आहे. त्याची सर्व कागदपत्रे माझ्या कडे आहेत सभापती महोदय, पाहिजे असतील तर ही सर्व कागदपत्रे मी आपल्याला देतो. सभापती महोदय, आज शरीरावर जखमा आहेत. मनावर जखमा आहेत. शरीरात गोळया घेऊन ते फिरत आहेत. या संदर्भात थोडयावेळा पूर्वी श्री. विनोद तावडे यांनी सांगितले की, त्यांचे ऑपरेशन होणे गरजेचे आहे. पण ते ऑपरेशन होत नाही. माननीय आरोग्य मंत्री आपण वैद्यकीय शिक्षण मंत्री पदावरुन आता आरोग्य मंत्री पदावर आला आहोत. त्यांच्या ऑपरेशनची व्यवस्था लवकरात लवकर करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे. (अडथळा) आपण हे चेष्टेवर घेऊ नका. सन्माननीय सदस्य श्री. तावडे यांनी संगितले की, अनेकांच्या शरीरामध्ये अजूनही गोळया आहेत, त्या गोळया काढण्याची प्रक्रिया झालेली नाही. पाहिजे असल्यास मी त्यांची नावे देतो. 79 लोकांना अजूनही कॉम्पेन्सेशन मिळालेले नाही. त्यापैकी 43 लोक मृत झालेले आहेत आणि 36 लोक जखमी आहेत. काही जणांच्या बाबतीत आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता न झाल्यामुळे माननीय पंतप्रधान कार्यालयाकडून त्यांना अद्यात मदत मिळालेली नाही. तर काही लोकांची राज्य सरकारच्या स्तरावर कागदपत्रांची पूर्तता झालेली नाही म्हणून त्यांना अद्याप मदत मिळालेली नाही. भुजबळहसाहेब आपण हा सगळा थरकाप आपल्या डोळयांनी पाहिलेला आहे तेव्हा आता तरी निदान त्यांना कॉम्पेन्सेशन द्यावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी दि.17 मार्च, 2009 रोजी केलेल्या अभिभाषणातील 19 वा मुद्दा देखील हाच मुद्दा होता. त्यामध्ये असे म्हटले आहे की," औद्योगिक विकासामध्ये महाराष्ट्र हे अग्रेसर राज्य आहे. कमीत कमी अडीच लाख कोटी रुपयाची गुंतवणूक आकर्षित करण्यात येत आहे. सुमारे पाच लाख भूमिपुत्रांना रोजगार पुरविला जाईल." आणि या अभिभाषणात देखील हेच वाक्य आहे. फक्त संख्या जास्त आहे आधीच्या भाषणात तीन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ SBT/

डॉ. दीपक सावंत...

लाख भूमिपुत्रांना म्हटले होते आताच्या भाषणात पाच लाख भूमिपुत्रांना म्हटले आहे. तीन लाखाचे पाच लाख, चार ते पाच महिन्यात कसे झाले हे मला माहीत नाही. अडीच कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे आणि पाच लाख भूमिपुत्रांना नोकऱ्या देण्यात येणार आहेत. 80 टक्के भूमिपुत्रांना नोकऱ्या देण्याच्या बाबतीत शासनाने जी.आर.काढलेला आहे.जे भूमिपुत्रांना नोकऱ्या देणार नाहीत त्यांना शासन करण्यात येणार आहे, दंड लावण्यात येणार आहे. पण शासनाचा हा जी.आर. कचऱ्याच्या टोपलीत टाकला जातो. आस्थापना शाखा शासनाचा जी.आर. मानत नाही. त्या जी.आर.चे जोपर्यंत कायद्यात रुपांतर करण्यात येत नाही, जोपर्यंत मोठी दंडाची शिक्ष त्यांना करण्यात येत नाही, जोपर्यंत आस्थापनेच्या मॅनेजरला किंवा त्यांच्या प्रमुखाला तुरुंगवासाची शिक्षा करीत नाही तोपर्यंत शासनाचा जी.आर. केराच्या टोपलीतच जाईल म्हणून त्याचे कायद्यात रुपांतर करण्यात यावे. त्याला ॲक्ट म्हणून मान्यता देण्यात यावी अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, माझा पुढचा मुद्दा सेवायोजन कार्यालयाच्या संदर्भात आहे. ॲना दाणी नावाच्या सचिवांना मी परवा भेटलो त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, आम्ही आता हे ऑफिस बंद करीत आहोत. सेवायोजन कार्यालय आम्ही बंद करीत आहोत आणि त्या ठिकाणी करीअर गाईडन्स सेंटर सुरु करीत आहोत. कारण सेवायोजन कार्यालय चालविण्याची आमची क्षमता नाही. राज्य शासन आम्हाला दर वर्षी सात ते सव्वासात कोटी देते. आमचे बजेटच तेवढे आहे. आमच्याकडे हे कार्यालय चालविण्यासाठी स्टाफ नाही, मॅनपॉवर नाही. म्हणून आम्ही हे बंद करीत आहोत. आपल्याकडे एवढा मोठा रोजगार उपलब्ध होतो आहे.हा रोजगार शासनाच्या सेवायोजना कार्यालयामार्फत रुट होणार असेल तर लोकांना केवढी मोठी मदत मिळणार आहे. त्यामुळे सभापती महोदय, हे सेवायोजना कार्यालय बंद करण्यासंबंधीचा निर्णय चुकीचा आहे तेव्हा याबातीत जर निर्णय घेण्यात येणार असेल तर तो ताबडतोब बदलण्याची गरज आहे.

सभापती महोदय, राजीव गांधी सी-लिंकच्या कामाच्या प्रगतीचा वेग पाहिला तर हा चौपदरी रस्ता किती दिवसात तयार करण्यात येणार आहे याबद्दल कोणीही सांगितलेले नाही. तिकडे वर्सोव्यापर्यंत आणि इकडे नरीमन पॉइंटपर्यंत तो करण्यात येणार आहे असे आपण सांगितलेले आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. चंद्रकांत पाटील)

डॉ. दीपक सावंत .....

हा सी लिंक कधी पूर्ण करणार हे सांगणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 30 मध्ये असे म्हटले आहे की, भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांनुसार 2012 पर्यंत राज्यात सर्व आरोग्य विषयक सुविधांची दर्जावाढ करण्याची शासनाची योजना आहे. आपल्याकडे एनआरएचएमतर्फे दरवर्षी 800 कोटी रुपये येतात. गेल्या वर्षीचे 200 कोटी रुपये परत का गेले ? गेल्या वर्षी 200 कोटी रुपये परत केले त्यामुळे आपल्याला या वर्षी फक्त 600 कोटी रुपये मिळणार आहेत. एनआरएचएमचे पैसे अजून आपण वापरलेले नाहीत. माननीय आरोग्य मंत्र्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट द्यावी. त्यांनी ग्रामीण रुग्णालयास भेट द्यावी. आपण माझ्याबरोबर यावे. माननीय मंत्रिमहोदय श्री. सुरेश शेट्टी साहेब, आपण सकाळी सांगितले. स्वाईन फ्ल्यू विषयीच्या लक्षवेधी सूचनेवर चर्चा झाल्यानंतर अनेक गोष्टी अंधारात ठेऊन आपण निघून गेलात. आज नागपूरमध्ये काय परिस्थिती आहे ? नागपूरच्या मेयो हॉस्पिटलची काय परिस्थिती आहे ? ते मेडिकल एज्युकेशनखाली जरी येत असले तसेच आयजीजीएमसीखाली येत असले तरी तेथील 150 ते 200 डॉक्टर्स आजही होस्टेलमध्ये राहात आहेत. कारण त्या ठिकाणी जे व्हर्टिकल एक्स्पांशन व्हावयास पाहिजे ते आपण करु शकत नाही. कारण आपले जे कंत्राटदार होते त्यांनी त्यातून माघार घेतलेली आहे. आयजीजीएमसीचा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, नागपूर जीएमसीला 200 कोटी रुपये देणार आहेत. हे पैसे अजूनपर्यंत प्राप्त झालेले नाहीत. मुंबईच्या जे.जे. हॉस्पिटलला 150 कोटी रुपये पहिल्या वर्षामध्ये दिले गेले परंतु त्यामध्ये 60 कोटी रुपयांची खरेदी बाकी आहे. ती खरेदी राज्य शासन करणार आहे परंतु अजून खरेदी झालेली नाही. 24 कोटी रुपयांची खरेदी केंद्र शासनातर्फे झाली. त्याची प्रतिपूर्ती झालेली नाही. नागपूर जीएमसीला जे 150 कोटी रुपये दिलेले आहेत ते प्रत्यक्षात कधी देणार ?

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक 33 मध्ये अंगणवाड्यांच्या जाळयामध्ये मोठ्या प्रमाणात विस्तार केलेला आहे असा उल्लेख करण्यात आलेला आहे. माझ्याकडे मेळघाटचा कृती आराखडा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

आहे. हे शासकीय डॉक्युमेंट आहे. वेळ कमी असल्यामुळे मी संपूर्ण राज्याच्या बाबतीत सांगू शकत नाही पण उदाहरण म्हणून मेळघाटच्या बाबतीत सांगत आहे. राज्य शासनाने गेल्या वर्षी मेळघाटचा कृती आराखडा तयार केला. त्यामध्ये असे म्हटले आहे की, मेळघाटमध्ये 315 अंगणवाड्या पाहिजेत. केंद्र शासनाने 36 अंगणवाड्या मंजूर केल्या आहेत आणि मिनी अंगणवाड्या 12 आहेत. यापैकी पुढचे जे काम आहे ते सुरु झालेले नाही. ते काम कधी सुरु होणार ? या मुद्यामध्ये पुढे उल्लेख केल्याप्रमाणे कुपोषित किंवा कमी वजनाच्या मुलांची विशेष जोपासना करण्यात येत आहे. मी नुकताच मेळघाटचा दौरा केला. ज्यावेळी त्यासंबंधीची लक्षवेधी सूचना येईल त्यावेळी मी त्यावर सांगेन. कुपोषणाच्या बाबतीत आज काय परिस्थिती आहे ? आज नागपूर भागामध्ये 473 मुले कुपोषणाच्या छायेत आहेत. गेल्यावर्षी पेक्षा 46 जास्त मुले कुपोषणाने मयत झालेली आहेत. बालमृत्यूचे प्रमाण वाढत आहे. आयएमआर वाढत आहे. जसे नवजात शिशूंच्या मृत्यूमध्ये वाढ झालेली आहे त्याचप्रमाणे बालमृत्यूचे प्रमाण वाढलेले आहे. त्याकडे शासनाने लक्ष द्यावे.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी आश्रमशाळांच्या परिस्थितीबाबत सांगितले. मेळघाटमधील टेंबरु-सोडणी येथील मुलींच्या आश्रमशाळेत 800 मुली आहेत. त्यांच्यासाठी 25 न्हाणीघर आणि 10 संडास आहेत. 800 मुली सकाळचे प्रात:विधी उरकण्यासाठी 25 न्हाणीघरात आणि 10 संडासमध्ये कशा जातील ? त्या सर्व मुली आहेत. त्या उघड्यावर जाऊ शकत नाही परंतु दुर्दैवाने त्या उघड्यावर जातात.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

मंत्रिमहोदयांनी त्या आश्रमशाळेला भेट द्यावी. नागपूरपासून केवळ 70-80 कि.मी.वर ही आश्रमशाळा आहे. त्याच आश्रमशाळेमध्ये मुलींना किडे असलेले जेवण मिळते. त्याचे फोटोग्राफ्स माझ्याजवळ आहेत, मंत्रिमहोदयांना ते बघायचे असल्यास मी ते देण्यास तयार आहे. त्या आश्रमशाळेचे अधीक्षक फारच माजलेले आहेत. ते सरळ सांगतात की, सरकारकडून आम्हाला निकृष्ट दर्जाचे व असेच धान्य मिळते, त्याला मी काय करु ? या मुद्याकडेही शासनाने लक्ष घालावे.

सभापती महोदय, ग्लोबल वार्मिंगसंबंधी सध्या कोपनहेगन येथे परिषद सुरु असून त्या परिषदेमध्ये 193 देशांचे 15 हजार प्रतिनिधी सहभागी झालेले आहेत. राज्य सरकार महाराष्ट्रासाठी यासंदर्भात काय काय करीत आहे ते समजले पाहिजे. या राज्याला 720 कि.मी.चा समुद्र किनारा लाभला आहे. परंतु ग्लोबल वार्मिंगचा सगळयात मोठा धोका मुंबई व कोकणाला आहे. नुकतेच फयान नावाचे वादळ येऊन गेले आहे, हा धोक्याचा इशारा आहे. त्यापूर्वी त्सुनामी लाटा येऊन गेल्या आहेत. म्हणून शासनाने नगरविकास विभागाच्या नियमांमध्ये बदल केला पाहिजे. मुंबईतील रस्ते कोठून जायला पाहिजे, इमारती कोठे बांधल्या पाहिजेत, इमारतींची उंची किती असावयास पाहिजे ते ठरविले पाहिजे. सीआरझेडच्या माध्यमातून त्याचा विचार होणे आवश्यक आहे. कार्बनचे उत्सर्जन कमी करण्यासाठी किंवा त्यावर विचार करण्यासाठी राज्यात कोणतीही समिती गठित झालेली नाही. ही समिती नेमून या विषयाचा अभ्यास करण्यात आला पाहिजे. यासाठी समिती गठित केली आहे असे मंत्रिमहोदय मला खुणवून सांगत आहेत. परंतु त्या समितीची एकही बैठक झालेली नाही. त्यावेळी मंत्रिमहोदय श्री.गणेश नाईक यांनी या समितीची बैठक घेतली जाईल असे सांगितले होते. या समितीची बैठक घेऊन पिरियॉडिकल रिव्हू घेण्यात यावा अशी विनंती करतो आणि राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रात जुलै व ऑगस्ट महिन्यामध्ये पूर्व विदर्भामध्ये पुरेसा पाऊस पडला नाही त्यामुळे धान उत्पादक शेतक-यांचे हाल हाल झाले. त्यांना दुबार पेरणी करावी लागली. राज्यातील 27 जिल्हयातील 221 तालुक्यांमध्ये गंभीर परिस्थिती असल्याचे माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात नमूद केलेले आहे. दर्जेदार बियाणे, कृषी पंपांचा पुरवठा उपलब्ध करुन देणे ही माझ्या शासनाची जबाबदारी आहे असे खुद्द राज्यपाल महोदय म्हणत आहेत. परंतु दुर्दैवाने शेतक-यांना दर्जेदार बियाणे मिळालेले नाही. निकृष्ट दर्जाचे बियाणे मिळाले, पण पावसाने दगा दिल्यामुळे त्यांना दुबार पेरणी करण्याची वेळ आली. पतपुरवठा करणाऱ्या सहकारी सोसायटयांच्या माध्यमातून शेतक-यांना कर्ज दिले जाते त्यांचे व्याजदर अधिक आहेत. शासनाने 3 टक्के दराने, 4 टक्के दराने कर्जपुरवठा केला जाईल अशी घोषणा केली आहे. प्रत्यक्षात या दराने त्यांना कर्ज मिळते काय हा खरा प्रश्न आहे. ही जी विसंगती आहे ती शासनाने त्वरित दूर करुन शासनाने जाहीर केल्याप्रमाणे 3 टक्के दराने कर्जपुरवठा करावा. शेतक-यांसाठी एक धोरण जाहीर केले पाहिजे असे मी प्रतिपादन करतो.

सभापती महोदय, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली हे जिल्हे तलावांसाठी प्रसिध्द आहेत. मुद्दा क्रमांक 7 मध्ये फलोत्पादन, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय यासाठी 1.40 कोटींची तरतूद केल्याचे नमूद केले आहे, परंतु ही तरतूद अपुरी आहे. या चारही जिल्हयात मोठया प्रमाणावर तलाव आहेत. या तलावांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे, त्यामध्ये गाळ साचलेला आहे तो काढून टाकला पाहिजे. तलावांमध्ये गाळ साचलेला असल्यामुळे मत्स्यव्यवसाय चांगल्या प्रकारे होऊ शकत नाही. या प्रश्नाकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. केशवराव मानकर....)

सभापती महोदय, धान पिकविणारा शेतकरी पहिल्या पावसावर आणि शेवटच्या पावसावर अवलंबून असतो. परंतु सुरुवातीला पाऊस येत नाही आणि शेवटी देखील तो येत नाही. अशा वेळी त्याला तळ्यातील पाण्याचा आधार होऊ शकतो. परंतु तळयामध्ये पाणी साठण्यासाठी तळ्यांची मोठया प्रमाणात दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे, तळयातील गाळ काढण्याची आवश्यकता आहे. राज्यपालांच्या अभिभाषणातील अकराव्या मुद्यामध्ये असे म्हटलेले आहे की, एकूण 70,400 शेततळी बांधण्यात येतील आणि त्यामुळे 2.5 लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येईल. परंतु ही शेततळी केंव्हा होणार आहेत ? ती पाच वर्षात होतील की नाही, यासंबंधीचा उल्लेख अभिभाषणामध्ये नाही. देश स्वतंत्र होऊन 60 पेक्षा जास्त वर्षे उलटून गेली तरी शेतीच्या सिंचनाची व्यवस्था आपण करु शकलो नाही. विदर्भामध्ये शेतकरी आत्महत्या करीत आहेत. शेतक-याला शेतीसाठी ज्या ज्या गोष्टी मिळायला पाहिजेत त्या त्याला मिळत नाहीत हे दुर्दैव आहे. सिंचनाचा अनुशेष शासनाने प्राधान्याने दूर केला पाहिजे. अनुशेष दूर करण्यासंबंधी माननीय राज्यपालांनी सरकारला निर्देश दिलेले आहेत. परंतु त्या निर्देशांचे तंतोतंत पालन होत नसल्यामुळे अनुशेष कमी न होता तो सारखा वाढतच आहे.

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेंतर्गत 85 दिवसांची श्रमनिर्मिती केलेली आहे. जोपर्यन्त मजुरांचा विकास होत नाही तोपर्यन्त महाराष्ट्राचा ख-या अर्थाने विकास होणार नाही. आज शेतीच्या बाबतीत विचार करावयाचा झाला तर शेतात काम करण्यासाठी शेतमजूर मिळत नाहीत. पूर्व विदर्भामध्ये बांधावर माती टाकायची असेल तर त्यासाठी मजूर उपलब्ध होत नाहीत. रोजगार हमी योजनेवर मजुराला सव्वाशे रुपयापर्यन्त मजुरी मिळते त्यामुळे शेतामध्ये तो 100 रुपयावर काम करण्यास तयार होत नाही. रोजगार हमी योजनेवरील मजुरीच्या दरामध्ये वाढ केली ही चांगली गोष्ट आहे. मी हे देखील सांगू इच्छितो की, शेतक-याच्या मालाला उत्पादन खर्चावर आधारित किंमत मिळत नसल्यामुळे शेतमजुराला आवश्यक तेवढी मजुरी मिळत नाही. आपल्या कृषीप्रधान राज्यामध्ये शेतक-याला न्याय देण्याच्या दृष्टीने राज्यपालांनी ज्या ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांची अमलबजावणी करण्याच्या बाबतीत हे सरकार उदासीन आहे हे मला खेदाने नमूद करावेसे वाटते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. केशवराव मानकर...)

सभापती महोदय, शिक्षणाची अवस्था तर चिंताजनक आहे. विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान व्हावे यासाठी शासनाने शाळांना संगणक पुरविले. परंतु संगणक शिकविणारे शिक्षक शाळेत उपलब्ध नाहीत. राज्य शासनाच्या माध्यमातून जेव्हा शालांत परीक्षा घेतल्या जातात त्यावेळी दिवाबत्ती आणि जनरेटरची व्यवस्था करण्यास संस्थेला सांगितले जाते. एक जनरेटर घ्यायचा म्हटले तर त्यासाठी लाखो रुपये खर्च येतो.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर.....

त्यासाठी येणारा हा खर्च त्यांनी कुठून उभा करायचा? शालेय शिक्षकांच्या वेतनाचे अनुदान 2004 पासून महाराष्ट्र शासनाने बंद केले आहे. कोणतीही आर्थिक मदत या संस्थांना मिळत नाही. या ज्या सुविधा आहेत त्या संस्थांनी कशा उपलब्ध करुन द्यायच्या? शेवटी हा सर्व बोजा शिक्षकांवर पडणार आहे. म्हणून मी शासनाला निवेदन करु इच्छितो की, परीक्षा मंडळाने सुप्रीम कोर्टाच्या अनुषंगाने घेतलेला निर्णय आहे त्यानुसार जनरेटर व त्यासाठी लागणारा खर्च राज्य शासनाने द्यावा. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर जितका खेद व्यक्त करावा तेवढा तो कमी आहे. म्हणून आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो आणि माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांनी जे अभिभाषण केले त्या अभिभाषणासंबंधी त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांनी मांडला, सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी त्या प्रस्तावाला अनुमोदन दिले आणि अनेक वक्त्यांनी या ठिकाणी प्रस्तावावर भाषणे केली त्या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी आणि त्यांचे अभिनंदन करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, पहिल्यांदा मला आनंद वाटला. माननीय राज्यपाल महोदय म्हणतात की, 2004 या वर्षामध्ये माझ्या शासनाने सर्वंकष विकासासाठी एक कार्यक्रम राज्यासमोर ठेवला होता. राज्याच्या जनतेकडून पुन्हा मिळालेल्या विश्वासदर्शक जनादेशामुळे, राज्यातील जनतेच्या आशा आकांक्षांची शासनाने यशस्वीपणे पूर्तता केल्याचे सिध्द होते. महाराष्ट्राचा सर्वांगीण व सर्वंकष विकास घडवून, जागतिक दर्जाचे राज्य बनविण्यासाठी माझे शासन नियोजित कार्यकालात नावीन्यपूर्ण प्रयत्न करण्यासाठी वचनबध्द आहे. हे अत्यंत महत्वाचे आहे. याला वचनपूर्ती म्हणतो. जाहीरनाम्याला वचननामा म्हणण्याऐवजी जाहीरनामा निवडणुकीच्या निमित्ताने लोकांपुढे दिला त्याची वचनपूर्ती केली यावर विश्वास ठेवून या राज्यातील जनतेने पुन्हा सत्तेवर पाठविले याची सुरुवात भाषणात केली ते सर्वंकष सत्य आहे. मला याठिकाणी आवर्जून सांगावेसे वाटते की, 26.11 च्या दुर्दैवी दहशतवादी हल्ल्यानंतर पोलीस दलामध्ये सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम व सबळ करण्यासाठी शासनाने केवळ निधीची तरतूद केली असे नाही तर 37 बोटींमध्ये 29 स्पीड बोटींची भर घालून विस्तीर्ण समुद्र किनाऱ्याच्या ठिकाणी अशा प्रकारचा धोका पुन्हा निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याच्या दृष्टीने महत्वाची पावले उचलली आहेत. दुर्दैवाने महाराष्ट्रापुरता नक्षलवाद मर्यादित न राहता विदर्भातील संपूर्ण पट्टा आणि दूर्गपासून ओरिसा ते छत्तीसगढ, मराठवाडा, आंध्रप्रदेशपर्यंतच्या परिसराचा बंदोबस्त करण्यासाठी पावले उचलली. नुकतेच मी वर्तमानपत्र वाचले आणि आपणही वाचले असेल. या चार राज्यांनी मिळून संयुक्त अशी समिती नेमून नक्षलवादी कारवायांचा कसा सामना करता येईल या संदर्भात धाडसी निर्णय घेतला, तोही महत्वाचा आहे. त्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद केली. सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण जे म्हणाले, ते सांगताना त्यांना हे सांगायचे होते की, आतापर्यंत सर्वसाधारण असे होत होते की, विशिष्ट खात्याकरिता विशिष्ट लोक असे होते. तसे न होता यावेळी असे झाले हे त्यांना सांगायचे होते. परंतु ते सांगताना सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते उभे राहिल्यामुळे ते बाचकले.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार.....

त्यांना असे सांगायचे होते की, आतापर्यंतची प्रथा होती की, विशिष्ट खाते विशिष्ट समाजाच्या माणसाकडे दिले जात असे. ती प्रथा मोडून यावेळी हे खाते वेगळ्या समाजातील मंडळींकडे देऊन दुर्बल, अतिशय दुर्गम भागामध्ये राहणारे आदिवासी बांधव असतील, मागासवर्गीय असतील, त्यांच्या सर्वंकष विकासासाठी त्यांच्या घराची, शिक्षणाची, आरोग्याची योजना असेल त्यांना आर्थिक मदत करण्याची योजना असेल या योजनांमध्ये सुध्दा या मंडळींनी सहभागी व्हावे म्हणजे खऱ्या अर्थाने सामाजिक अभिसरण हे शब्द वापरतो ते अस्तित्वात येतील हे सांगण्याचा आशय होता. त्यादृष्टीने राज्य शासनाने घेतलेला निर्णय अभिनंदनीय आहे हे विनम्रपणे सांगू इच्छितो.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा मुद्दा सिंचनाच्या बाबतीत आहे. केंद्र शासन आणि राज्य शासनाने 14 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी केली त्याचा फायदा 50 लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांना झाला. त्यामध्ये 5 एकर आणि 15 एकरमधील पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भामध्ये तफावत होती त्यामुळे गैरसमज झाला होता. विदर्भातील शेतकऱ्यांवर अन्याय होत होता. ती तूट भरुन काढण्यासाठी राज्य शासनाने आपल्या तिजोरीतून 7 हजार कोटी रुपयांची तरतूद केली. त्यामुळे त्याचा फायदा 50 लाखापेक्षा अधिक शेतक-यांना होणार आहे. कर्जाच्या बाबतीत कोणत्या दराने शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देणार हा प्रश्न आहे. देशामध्ये जी मोजकी राज्ये आहेत त्यामध्ये महाराष्ट्र हे एक राज्य आहे. 3 ते 4 टक्के दराने 25 हजार रुपयांपर्यंत रक्कम, 3 लाखापर्यंत विशिष्ट व्याजाची तरतूद आणि परतफेड करणाऱ्यांना अधिक सवलत.....

नंतर श्री.खर्चे.....

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

अशा प्रकारे ही योजना केल्यामुळे लक्षावधी शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार आहे म्हणून माननीय राज्यपाल अभिनंदनास पात्र आहेत असे मी समजतो. मी सभागृहाचा जास्त वेळ घेऊ इच्छित नाही, कारण बराच वेळ गेलेला आहे. तसेच सर्वच मुद्यांचा परामर्ष मी घेणार नाही परंतु या निमित्ताने मी एवढेच सांगू इच्छितो की जगत्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांची चारशेवी जन्मशताब्दी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जन्मशताब्दी, गजानन महाराजांच्या समाधिची शताब्दी हे तिन्ही वर्ष या वर्षामध्ये सामाविलेले आहेत. असे असताना मला एक गोष्ट नमूद केली पाहिजे की शासनाने निर्णय घेतला व मागील वर्षी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात त्याचा उल्लेखही झालेला होता. त्या अनुषंगाने शासनाने काय कामकाज केले, कोणते निर्णय घेतले, कुठल्या तत्वापर्यंत आपण काम करतो यासंबंधीचा उल्लेख मात्र महामहीम राज्यपालांच्या अभिभाषणात दुर्दैवाने आलेला नाही म्हणून मी शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. शासनाने तीर्थक्षेत्र विकासासाठी 425 कोटीपेक्षा अधिक तरतूद यासाठी जरुर केली, त्यातून तीर्थक्षेत्र विकास अथवा पर्यटन विकास शासनाला करावयाचा असेल. पण या निमित्ताने मला असेही निदर्शनास आणावयाचे आहे की, जन्मशताब्दीच्या वर्षात पंढरपूर, शेगाव आणि देहू-आळंदी तसेच गुरुकुंज आश्रम येथे हजारो, लक्षावधी भाविक मंडळी एकत्र येणार. या राज्यात अनेक तीर्थक्षेत्र आहेत. एवढेच नव्हे तर भागवत संप्रदायाच्या माध्यमातून जगत्गुरु श्री. संत तुकाराम महाराज, संत शिरोमणी ज्ञानेश्वर महाराज, नामदेव महाराज ते चोखोबापर्यंत तसेच अलिकडे तुकोबापर्यंत या सर्व संत मंडळींनी वैश्विक धर्माची, मानवता धर्माची उदात्त कल्पना समाजामध्ये रुजविण्याचा प्रयत्न केला, ज्याची आज जगाला गरज आहे, ते कार्य या संत लोकांनी केलेले आहे. त्यांची चतु:शताब्दी, त्यांची जन्मशताब्दी साजरी होत असताना केवळ आर्थिक तरतूद करुन जमणार नाही तर तीर्थक्षेत्र विकासाच्या माध्यमातून इतरही सुविधा निर्माण केल्या गेल्या पाहिजेत. पंढरपूरच्या विकासासाठी शासनाने प्राधिकरण स्थापन केले पण त्याच्या गतिमानतेबाबत काही पावले उचलल्याचे मला तरी दिसत नाही म्हणूनच हे सर्व मुददे या निमित्ताने मी शासनाच्या लक्षात आणून देत आहे. नांदेड हे देशातीलच नव्हे तर जगातील फार मोठे स्थळ आहे. मला आनंद आहे की, 350 वी जयंती, गुरु-ता-गद्दी नांदेडला झाली. त्या ठिकाणी केंद्रसरकार व राज्यसरकार यांनी मिळून जवळपास 1500 कोटी रुपये खर्च केले. अतिशय उत्तम विमानतळ निर्माण केले,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

रस्त्यांचा विकास केला, धर्मशाळा व निवासाची व्यवस्था करुन अतिशय उत्तर प्रकारे नांदेड सजवून टाकले त्याबद्दल खरोखरच आनंद वाटला म्हणून मी शासनाचे व केंद्रशासनाचे अभिनंदन करतो. त्यावेळेस असेही सांगितले होते की, जगभरातून नांदेडला 25 लाख लोक तेथे येतील, जगातील स्पेशल विमाने येतील परंतु काय झाले माहीत नाही. दुर्दैवाने जगातील एकही स्पेशल विमान नांदेडला आले नाही व अपेक्षेएवढे लोक आले नाहीत, उलट लंगरसाठी लोकांनाही बोलवावे लागले. त्या निमित्ताने नांदेड शहराचा विकास झाला. गुरु गोविंदसिंहांची गुरु-ता-गद्दी आहे, तेथे विकास झाला याचा आनंद आहे. त्या तुलनेत मला एवढेच सांगावयाचे आहे की, 350 वर्षानंतर लक्षावधी लोक येणार होते, अर्थात ही श्रध्देची गोष्ट आहे, अभिमानाची गोष्ट आहे. पण ज्या पंढरपूर सारख्या ठिकाणी आषाढी वारीला दरवर्षी 12 ते 14 लाख लोक येतात, कार्तिकी एकादशीच्या वारीला 6 ते 8 लाख लोक येतात, देहू आळंदीला सुध्दा लक्षावधी लोक येतात. चैत्र आणि माघ वारीला 3-3, 4-4 लाख लोक येतात. अशी सातत्याने भाविक मंडळी येणारी ही नगरे आहेत पण या ठिकाणी ज्या गतीने विकास व्हावयास पाहिजे होता त्या गतीने विकास झाला नाही. मी वारकरी सांप्रदायातील असल्यामुळे वारकऱ्यांच्या श्रध्देपोटी हे मांडत आहे. पण अजुनही वेळ गेलेली नाही. म्हणून पुन्हा सांगू इच्छितो की, गुरुकुंज या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या आश्रमात अजुनही त्यांची जन्मशताब्दी चालूच आहे, त्यांचे जन्मशताब्दी वर्ष अजून सुरुच आहे. ग्राम स्वच्छता अभियान राबविणाऱ्या गावांना संत गाडगेबाबांच्या नावाने आंदोलन उभे झाले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या नावाने आदर्श स्वच्छ ग्राम पुरस्कार आपण देतो. देशाच्या पातळीवर ही पहिली योजना आहे ज्यामध्ये सरकारचा पैसा कमी खर्च होतो आणि जनतेचा आर्थिक सहभाग जास्त असतो, या अनुषंगाने शासनाने विचार केला पाहिजे. तसेच या योजनेच्या निमित्ताने हा जो प्रतिसाद मिळाला आहे त्या प्रतिसादाला आपला प्रतिसाद त्या अनुषंगाने मिळाला पाहिजे. गुरुकुंज आश्रमात अजुनही राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जन्मशताब्दी सुरुच आहे. राष्ट्रसंतांची किर्ती आंतरराष्ट्रीय स्तरावर, युनोपर्यंत पोहचली आहे. त्यांच्या ग्राम गीतेचे पुनर्मुद्रण झाले पाहिजे, या ग्रामगीतेच्या लक्षावधी प्रती निर्माण करणे आवश्यक आहे त्याबाबतही शासनाने विचार करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर गुरुकुंज आश्रम किंवा तीर्थक्षेत्र असेल अथवा त्यांचे वाड़मय असेल त्या माध्यमातून शासन काय प्रयत्न करीत आहे .....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार ....

यासाठी शासनाने गतिमान पाऊल उचलण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आज दुर्दैवाने डॉ. दिलीप चित्रे यांचे निघन झाले आहे. डॉ.दिलीप चित्रे यांनी जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या चतुर्थ शताब्दी वर्षात त्यांच्या अभंगांचे इंग्रजी भाषेत भाषांतर केले व हे भाषांतर लंडन, वाशिंग्टंन तसेच युरोप पर्यंत गेले. वैश्विक मानवतावादी धर्माचा अतिशय उदात्त असा विचार त्यांनी संपूर्ण जगात पोहचविला होता. डॉ. दिलीप चित्रे यांनी संपूर्ण जगापर्यंत संत तुकाराम महाराजांचे वाङमय पोहचवले आहे. मी तर असे म्हणेन की जगदगुरु संत तुकाराम महाराजांबरोबर जे 14 टाळकरी होते ते विविध जाती-धर्माचे होते त्यावेळी संत तुकोबा महाराजांनी जातीचा समन्वय चांगल्या प्रकारे साधलेला होता. त्यांनी ब्राम्हणांपासून तेली समाजापर्यंतच्या जातीचा समन्वय साधला होता. देहूच्या तीर्थ स्थळाबरोबरच संत बहिणाबाईंचेही नाव घेतले पाहिजे. संत बहिणाबाई या मुळच्या कुलकर्णी होत्या. मी या ठिकाणी कवियत्री बहिणाबाई यांचा उल्लेख करीत नाही. संत बहिणाबाई यांनी खूप चांगले अभंग लिहिले आहेत. त्यांचे औरंगाबाद जवळील जे स्थान आहे ते अत्यंत दुर्लक्षित आणि उपेक्षित आहे. त्यामुळे शासनाने अशा सर्व स्थांनाचा विकास केला पाहिजे तसेच वैश्विक मानवतावादी धर्माचा विकास केला तर त्यांचे ख-या अर्थाने पुनरुत्थान होईल. समाजाचे जे ऐक्य आहे, सामाजिक अभिसरण आहे तसेच ख-या अर्थाने जो मानवतावादी धर्म आहे त्याचे उदात्तीकरण होईल. या ठिकाणी सर्व भाषणाचा उहापोह न करता एक मर्यादित मुद्दा मी या ठिकाणी मांडतो आणि जगदगुरु संत तुकाराम महाराज यांच्या चतुर्थ जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने, गजाननन महाराज-शेगाव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा जन्म झाल्याच्या निमित्ताने,समाधीच्या शताब्दीच्या वर्षाच्या निमित्ताने सर्व तीर्थक्षेत्रांचा विकास, संतांनी निर्माण केलेल्या वाङमयाचे वितरण किंवा पुनर्मुद्रण तसेच त्यादृष्टीने प्रबोधन शासनाने केले तर महाराष्ट्र ख-या अर्थाने देशाचा जो आधार आहे तो ख-या अर्थाने सिध्द होईल अशी नम्र भावना व्यक्त करुन माननीय राज्यपाल महोदयांचे अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांनी केलेल्या अभिभाषणावरील अभिनंदनाचा ठराव आमच्या सहकारी बांधवांनी मांडला त्याला पाठिंबा देण्यासाठी आणि माननीय राज्यपाल महोदयांचे अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे. आपले राज्य छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे पुरोगामी राज्य आहे. या राज्यातील सामान्य माणूस तसेच शतक-याला समोर ठेवून राज्य शासन काम करीत आहे. मागच्या पाच वर्षाच्या कालखंडात आघाडी शासनाने जनहिताचे चांगले अनेक निर्णय घेतल्यामुळेच परत एकदा आघाडी सरकार केंद्रात आणि राज्यात सत्तेवर आलेले आहे हे नाकारुन चालणार नाही. जे चांगले आहे, जे चांगले दिसते त्याला चांगले म्हणण्याची महाराष्ट्राची आणि मराठी माणसाची संस्कृती आहे त्यामुळे या बाबीला दुर्लक्षित करुन चालणार नाही. मागच्या वर्षी 26 नोव्हेंबर रोजी दहशतवाद्यांनी समुद्र मार्ग मुंबईवर हल्ला केल्यामुळे एक मोठे संकट आपल्या राज्यावर आले होते. अशा परिस्थितीत माननीय मुख्यमंत्र्यांनी तसेच उपमुख्यमंत्र्यांनी जनतेचा आदर करुन राजीनामा दिला होता व तशी परंपरा आपल्या राज्याची राहिलेली आहे. अशा पध्दतीचे संकट पुन्हा येऊ नये यासाठी राज्य शासनाने फोर्स वन दलाची स्थापना केली. आता महाराष्ट्राला दुसरी समस्या नक्षलवादाची भेडसावत आहे. विदर्भातील नक्षलवाद्यांच्या चळवळीचा बिमोड करण्याचे काम राज्य शासनाच्या मार्फत केले जात आहे. राज्यातील विदर्भ-मराठवाडयामध्ये सातत्याने कमी पाऊस पडत असल्यामुळे हा भाग नेहमीच दुष्काळग्रस्त राहिलेला आहे. ओला दुष्काळ किंवा कोरडा दुष्काळ तसेच फयान सारख्या वादळाचे संकट महाराष्ट्रातील शेतक-यांवर किंवा सामान्य जनतेवर जेव्हा जेव्हा येते तेव्हा तेव्हा मदत करण्याचे काम राज्य सरकारने केलेले आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे ..

किंवा सामान्य लोकांवर येईल तेव्हा तेव्हा या सरकारने मदत करण्याचे काम केलेले आहे. सोयाबीनवर लष्करी आळीचा प्रादूर्भाव झालेला असेल वा ऊसावर रोग पडलेला असेल तर सबंधित शेतक-यांना मदत करण्याची भूमिका राज्य सरकारने सातत्याने घेतलेली आहे.त्यासाठी आघाडी सरकारने काही महत्वाचे निर्णय देखील घेतलेले आहेत. देश स्वातंत्र्य होऊन जवळपास 50 वर्षाचा कालावधी लोटलेला आहे या 50 वर्षाच्या कालावधीत राज्य सरकारने काही महत्वाचे निर्णय घेतले आहेत. राज्यातील 78 लाख शेतक-यांवरील 70 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्याचा अत्यंत क्रांतिकारक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.त्याचबरोबर सिंचनाचा अनुशेष दूर करण्याचे काम सुध्दा राज्य सरकारने केलेले आहे. विदर्भातील महत्वाचा गोसीखूर्द प्रकल्प हा राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित केलेला आहे. हे आपल्याला नाकारता येणार नाही.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे. आज राज्यामध्ये विजेची टचाई आहे परंतु त्यावरसुध्दा मात करण्याचे काम आघाडी सरकारने केले असून त्यासाठी काही ठोस पावले उचलली आहेत, त्याचबरोबर काही धोरणात्मक निर्णय घेतलेले आहेत . 2012 पर्यत विजेच्या बाबतीत राज्य स्वयंपूर्ण होईल आणि भविष्य काळात राज्याला झिरो लोडशेडीगवर आणले जाईल अशा प्रकारचे वचन आघाडी सरकारने दिलेले असून त्या दृष्टीने पावले उचलली आहेत याबद्दल आपणा सर्वांना आनंद वाटला पाहिजे.

सभापती महोदय, मुंबईमध्ये अनेक विकासाचे महत्वाचे प्रकल्प सुरु करण्यात आलेले आहेत. लोकांना चांगले रस्ते , पुरेशी वीज व शुध्द पाणी मिळाले पाहिजे. त्यालाच विकावस असे म्हटले जाते. लोकांच्या ज्या दैनंदिन भौतिक गरजा आहेत त्या पूर्ण झाल्या पाहिजेत अशीच सामान्य लोकांची अपेक्षा असते. या अपेक्षा पूर्ण् करण्यासाठी राज्य सरकारने काही महत्वाचे निर्णय घेतलेले आहेत.असे मला आपल्याला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, मुंबईमध्ये वरळी येथे राजीव गांधी सी लिंक तयार करण्यात आला आहे. त्यामुळे मुंबईतील वाहतूकीचा प्रश्न सुटलेला आहे.या निमित्ताने मला असे सांगावेसे वाटते की,परळी - बीड - अहमदनगर रेल्वे मार्गसुध्दा झाला पाहिजे त्याचबरोबर नांदेड -पुसद -यवतमाळ नागपूर हा रेल्वे मार्ग भविष्यकाळात मराठवाडयाच्या विकासाच्या दृष्टीने होणे आवश्यक आहे.या दोन रेल्वे मार्गाची मागणी आघाडी सरकारने पूर्ण करावी अशी मी मागणी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे..

सभापती महोदय , प्रत्येक जिल्हा चौपदरी मार्गाने जोडण्यात आला पाहिजे आणि हे काम आघाडी सरकार भविष्यामध्ये निश्चितपणे हातामध्ये घेईल अशी मला आशा आहे.

सभापती महोदय, आज शिक्षणाचे महत्व सामान्य माणसाला समजलेले आहे`. ग्रामीण भागातील टोपी वा फेटे घालणारा माणूस असला तरी त्याला शिक्षणाचे महत्व समजलेले आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर असे सांगून गेले आहेत की,शिक्षण हे वाघिणीचे दूध असून हे दूध प्यायल्यामुळे ती व्यक्ती गुरगुरल्यशिवाय राहणार नाही. महात्मा फुले तसेच शाहू महाराजांनीसुध्दा हेच सांगितलेले आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी असे सांगितले आहे की, "विद्ये विना मती गेली, मती विना गती गेली, गती विना निती गेली, निती विना वित्त गेले, वित्त विना क्षुद्र खचले एवढे सगळे अनर्थ एका अविद्येमुळे घडले आहे. " सभापती महोदय, शिक्षणाच्या बाबतीत राज्य सरकारने अनेक चांगले निर्णय घेतलेले आहेत. माननीय मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण व तत्कालिन शिक्षण मंत्री श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांनी हे निर्णय घेतलेले आहेत. सभागृहामध्ये शिक्षक प्रतिनिधींनी कायम विना अनुदानित शाळा मधील "कायम" हा शब्द काढून टाकण्यासाठी अनेक वेळा आवाज उठविला होता . या मागणीसाठी सर्वानी एकत्रितपणे मागणी केली होती आणि त्यासाठी कोणत्याही प्रकारचे राजकारण केले नाही. या एका मागणीसाठी सभागृहामध्ये सर्वानी जोरदार आवाज उठविला होताञ त्याप्रमाणे आघाडी सरकारने चांगला निर्णय घेऊन प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या संदर्भातील " कायम " हा शब्द काढून टाकलेला आहे त्याबद्दल मी शासानाचे अभिनंदन करतो. त्याचबरोबर सन्माननीय मंत्री श्री. सुरेश शेट्टी यांना मला असे सांगावयाचे आहे की,प्राथमिक आणि माध्यमिक शाळेच्या संबंधातील "कायम" हा शब्द काढण्यात आला आहे परंतु कनिष्ठ महाविद्यालय आणि वरिष्ठ महाविद्यालयासंबंधी कायम शब्द काढून टाकण्यात आला पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, अल्पसंख्याक समाजासाठी राज्य सरकारने अनेक महत्वाचे निर्णय घेतलेले आहे. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून अनेक महत्वाच्या योजना राबविण्यात येत आहे परंतु अल्पसंख्याक विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात यावा या दृष्टीकोनातून सुध्दा पहिली ते दहावी आणि मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय राज्य सरकारने आणि केन्द्र सरकारने घेतलेला आहे

नंतर श्री.सुंबरे

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

परंतु ती शिष्यवृत्ती देत असताना केवळ 10-20 हजार मुलांनाच देऊ अशी मर्यादा घालून आपल्याला चालणार नाही. तर खऱ्या अर्थाने मुस्लिम बांधवांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणावयाचे असेल तर जेवढे काही मुस्लिम विद्यार्थी शिक्षणासाठी प्रवेश घेतील त्या सगळ्यांना यया शिष्यवृत्तीचा लाभ दिला गेला पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करतो आणि निश्चितपणे हे आघाडी शासन भविष्यामध्ये या दृष्टीने निर्णय घेईल अशी मी आशा करतो. धन्यवाद.

उपसभापती : मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करीन की, राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा आणि त्यावरील उत्तराचे भाषण हे आपल्याला आजच पूर्ण करावयाचे आहे. आता सगळ्या सदस्यांना बोलण्याची संधी द्यावयाची झाल्यास 2-2 मिनिटे द्यावी लागतील आणि त्या वेळेच्या मर्यादेतच त्यांनी आपले भाषण आटोपते घ्यावे. प्रत्येक जण 15-15 मिनिटे बोलू लागला तर ही चर्चा आजच संपविणे किंवा सगळ्या सदस्यांना बोलण्याची संधी देणे कठीण होईल.

श्री सय्यद जमा : सभापति महोदय, मेरा पाइंट ऑफ ऑर्डर है. इस विषय पर जितने सदस्य बोलना चाहते हैं उनको बोलने के लिए समान समय दिया जाए. समय का बंटवारा समान रुप से होना चाहिए. शुरु में बोलने वाले सम्माननीय सदस्यों ने समय का पालन नहीं किया. अब आखिर में बोलने वाले सदस्यों को कहा जाता है कि दो मिनट में भाषण समाप्त करें. इसलिए मेरी विनती है कि सभी सदस्यों को समान रुप से समय का बंटवारा किया जाए.

उपसभापति : आपके सुझाव का सम्मान रखते हुए मैं यह कहना चाहूंगा कि आप भी उतना ही समय लीजिए जितना समय दूसरे सम्माननीय सदस्यों ने लिया है. सन्माननीय सदस्यांच्या सूचनेचा मी आदर करतो आणि यापुढे जेव्हा जेव्हा असे महत्त्वाचे प्रस्ताव चर्चेला येतील तेव्हा प्रथमतः त्यांना बोलावयला संधी देईन म्हणजे मग त्यांना देखील अधिक वेळ बोलण्यासाठी मिळू शकेल. आता यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.गोऱ्हे या भाषण करतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपली खरोखरी आभारी आहे. कारण विधान परिषदेत अशा प्रकारे शेवटी घाईघाईत बोलल्यामुळे मी गेल्या 6-7 वर्षात खूप राजकारण शिकले आहे. त्यामुळे मोठ्या सभांमध्ये असो वा छोट्या सभांमध्ये असो, कशा पद्धतीने थोडक्या वेळात मुद्दे कसे मांडावेत याचे खूप प्रशिक्षण आपल्यामुळे आम्हाला मिळाले आहे मिळते आहे. कारण नेहमीच उशीराने नंबर येणाऱ्या वक्त्यांना हा अनुभव येतो. त्यामुळे आपण अजिबात काळजी करू नये. थोड्या वेळात कसे आटोपशीर बोलावे आणि लांबलचक भाषणाचा जो प्रभाव असतो तो प्रभाव फार महत्त्वाचा जसा असतो तसेच आम्ही शेवटी कमी वेळात बोलणारे जे आम्ही सदस्य त्या थोड्या वेळात जे मुद्दे मांडतो त्याचाही प्रभाव तेवढाच महत्त्वाचा असतो यावर आमचा विश्वास आहे. मी कोणाचेही नाव घेऊन बोलत नाही.मी या सभागृहाबद्दल बोलते. सभापती महोदय, मी आपल्याकडे पाहून बोलते आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.रावते यांनी येथे सविस्तर आणि सुंदर असे भाषण केले आहे आणि खरोखरी समर्थ रामदास जसे म्हणतात ..

क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे, विचारे मना तूच शोधूनी पाहे

म्हणजे त्यांनी अजून सविस्तर भाषण तुमच्यासारख्या क्रियाहीन लोकांसाठी करायला पाहिजे असे माझे मत आहे.

सभापती महोदय, माझा पहिला मुद्दा शेतकरी पॅकेजसंबंधात आहे. विदर्भामध्ये आता हे अधिवेशन होत आहे आणि यापूर्वी मुंबईत राज्यपालांचे अभिभाषण झाले आणि त्या भाषणामध्ये अनेक गोष्टींबद्दल समाधान व्यक्त करणे हे प्रथा आणि परंपरेला धरून असते. परंतु आज दै.सकाळ मध्ये पूर्ण पानभर 'पॅकेजचे पाकीट मारले' अशा पद्धतीने संपूर्णपणे लेखापरीक्षणातील ताशेरे आहे त्यासंबंधात उल्लेख केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी बोलत असताना असे सांगितले की, विदर्भामध्ये आम्ही जे काम केले त्यामुळे लोकांनी आम्हाला निवडून दिले. या संदर्भात याच नाही अनेक वृत्तपत्रांमध्ये 'अशोक पर्व' म्हणून पुरवण्याच्या पुरवण्या प्रसिद्ध झाल्या. ज्याच्या बद्दल पी.साईनाथ यांनीही त्यांची व्यथा मांडली. सभापती महोदय, आपण स्वत: श्री.गोविंद तळवळकर यांना वैयक्तिक ओळखता, त्यांच्यासारखे सन्माननीय संपादक जेव्हा याबद्दल व्यथा व्यक्त करतात तेव्हा आपण नेमके काय काम करतो आणि जेव्हा 'अशोक पर्व'निमित्ताने आपण लोकांपर्यंत काय मुद्दे पोहोचविले हा ज्याचा त्याने आत्मपरिक्षण करण्याचा मुद्दा आहे. आपल्याला बहुमत मिळाले आणि बहुमत मिळाल्यानंतर जो काही जनतेकडून जनादेश मिळालेला आहे त्यानुसार काम करणे आपल्याला क्रमप्राप्त आहे. ... (यानंतर श्री.सरफरे ... 3व्ही 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

परंतु मला आपले याठिकाणी लक्ष वेधावेसे वाटते की, लेखा परिक्षण अहवालामध्ये जे ताशेरे मारले आहेत त्याबाबत आपण गंभीरपणे विचार करणार आहात की नाही? निवडणुकीच्या निकालानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कॉंग्रेसचे बरेचसे लोक आमच्याकडे सत्ता कशी काय आली? याबद्दल चकीत झाल्यामुळे महाराष्ट्रभर त्यांचा जल्लोष दिसला नाही. आत्महत्त्यांना अपात्र ठरविणारी एखादी यंत्रणा असेल किंवा एखादे 239 कोटींचे फुगवून सांगितलेले पॅकेज असेल हे आर्थिक व्यवस्थापनातील अपयश आहे, या संदर्भात मी खेद व्यक्त करते. नद्यांच्या प्रदूषणा संदर्भात मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे. महाराष्ट्रातील नद्यांचे मोठया प्रमाणावर प्रदूषण होत आहे. त्यामुळे ग्लोबल वॉर्मिगच्या संदर्भात संपूर्ण जगभर चर्चा सुरु आहे. अशावेळी आपण कशाप्रकारे सुधारणा करु शकतो याबाबत विचार करणे अपेक्षित होते. यामध्ये गोदावरी, कृष्णा सारख्या प्रत्येक नदीच्या संदर्भात असेल किंवा पर्णफुटी, कचरा टाकणे असेल, महानगरपालिका अस्वच्छ पाणी नद्यांमध्ये सोडते यादृष्टीने व्यवस्थापनाच्या यंत्रणा नाहीत. या संदर्भातील नद्यांचे प्रदूषण थांबविण्यासंबंधी आराखडा तयार करु असे राज्य शासनाने मागील अधिवेशनामध्ये मला आश्वासन दिले होते. त्याबाबत गेल्या वर्षभरात कोणतेही पाऊल उचलले नाही. आज सुध्दा अनेक ठिकाणी नद्यांचे पाणी काळेकुट्ट झाले आहे. त्यामध्ये मासे सुध्दा जीवंत रहात नाहीत ही वस्तुस्थिती आहे. अशावेळी नद्यांच्या प्रदूषणाबाबत करावयाच्या उपाय योजनेबाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख नाही. याचा मला निश्चितपणे खेद होतो.

सभापती महोदय, मघाशी माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी तीर्थक्षेत्र विकास आराखडयासंबंधी आपले विचार मांडले. पंढरपूर विकास आराखडयाचा आपण कायदा केला. त्यानंतर आषाढी-कार्तिकी वारी होऊन गेल्या. माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर हे पंढरपूरला त्यानिमित्ताने गेले होते. आता पुन्हा मांढरदेवीची यात्रा होणार आहे. सभापती महोदय, आपण स्वत: मांढरदेवीच्या प्रश्नामध्ये लक्ष घातले होते. राजन कोचर समितीने जी तीर्थक्षेत्रे डोंगरावर आहेत त्याठिकाणी तीर्थक्षेत्र व्यवस्थापन आराखडा तयार करावा असे सुचविले होते. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक जिल्हयामध्ये सूचना दिल्या आहेत. परंतु या तीर्थक्षेत्रांसाठी आपण कोणती आर्थिक व्यवस्था केली आहे. प्रत्यक्षात किती ठिकाणी रस्ते बांधण्यासाठी, स्वच्छता गृहे बांधण्यासाठी पैसे मिळाले? याचे आपण आत्मपरिक्षण करणार की नाही? सप्तश्रृंगी गडावर अस्वच्छतेचे साम्राज्य आहे. देहू-आळंदी विकास आराखडयासाठी 464 कोटी रुपयांची घोषणा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात त्याठिकाणी एक दमडी सुध्दा अजून मिळाली नाही.कार्तिकी एकादशीला आळंदीला टँकरने पाणी विहिरीमध्ये ओतून सोडल्यामुळे लोक आजारी पडतात. पंचगंगेच्या नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न आहे. हे आराखडे जसे दुर्लक्षित आहेत त्याप्रमाणे शेगावच्या आराखडयाचे काय झाले? आज आपण विदर्भामध्ये अधिवेशन घेतो. प्रत्येक वेळेला अधिवेशनामध्ये घोषणा केली जाते. परंतु त्याची अंमलबजावणी होत नसल्यामुळे जनता सुध्दा त्रस्त झाली आहे. त्याचप्रमाणे शासनाचे धार्मिक व सांस्कृतिक धोरण नाही. तीर्थक्षेत्रांच्या संदर्भातही धोरण नाही.. जे मान्यवर लेखक निधन पावतात त्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी सुध्दा शासनाच्या वतीने कुणीही प्रतिनिधी जात नाहीत. त्यांची व्यवस्थित माहिती कुणाकडेही नसते. त्याचबरोबर अनेक सांस्कृतिक महोत्सव केले जातात. आपल्या राज्यामध्ये अनेक महत्वाच्या घटना घडतात त्या संदर्भात आपल्याकडे कधीही उल्लेख होत नाही. सांस्कृतिक धोरण करणार असे सरकार म्हणते परंतु त्या धोरणाची अंमलबजावणी करणारे लोक कोण आहेत? याची कुणालाही माहिती नाही. त्यामुळे सरकारचे नक्की कोणते सांस्कृतिक धोरण आहे याबाबत मोठे प्रश्नचिन्ह आहे? सेन्सॉर बोर्डावर करणाऱ्या, नाटय सृष्टीमध्ये काम करणाऱ्या लोकांना पाच-पंचवीस लाख रुपये द्यायचे एवढयापुरते सांस्कृतिक धोरण मर्यादित नसावे. याकडे देखील मला लक्ष वेधावेसे वाटते.

सभापती महोदय, सन 2003 मध्ये मानव विकास निर्देशांक अहवाल महाराष्ट्र राज्याने प्रकाशित केला होता. तो अहवाल एकदाच प्रकाशित झाला. यु.एन.डी.पी. मानव विकास निर्देशांकावरुन प्रत्येक राज्याला किती निधी द्यावयाचा हे ठरविण्यात आले होते. दरवर्षी केंद्र सरकार मानव विकास निर्देशांक अहवाल प्रसिध्द करते. त्याप्रमाणे राज्याने सुध्दा मानव विकास निर्देशांक अहवाल प्रसिध्द केला तर आपल्याला विकासासाठी केंद्र सरकारकडून किती निधी प्राप्त झाला पाहिजे हे त्यामधून स्पष्ट होईल. त्या निधीचा विनियोग कसा करणार आहोत?हे सुध्दा ठरविले पाहिजे. गेली सात वर्षे राज्याने मानव विकास निर्देशांक अहवाल प्रकाशित केला नाही. तो कां केला नाही? याचे उत्तर संबंधित अर्थ व नियोजन विभागाचे मंत्री देत नाहीत. सभागृहामध्ये अभ्यासू आमदार असतांना कुणीही या विषयावर बोलत नाही. मानव विकास निर्देशांक अहवालातून स्पष्ट होत असते की, शिक्षणासाठी किती अधिक पैसे उपलब्ध होऊ शकतात,आरोग्यासाठी किती पैसे उपलब्ध होऊ शकतात.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

यानंतर मला असंघटित कामगारांच्या बाबतीत सांगावयाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.सचिनजी अहिर तुम्ही सदनामध्ये उपस्थित आहात. मी ऊस तोड कामगारांच्या बाबतीत 6-6,7-7 वर्षे प्रश्न मांडत आहे. सन्माननीय मंत्री महोदय श्री.हसन मुश्रीफ यांनी मला सभागृहामध्ये राणा भीमदेवी थाटामध्ये आश्वासन दिले आहे. त्यावेळी श्री.हसन मुश्रीफसाहेब, माझे खरेच तुमच्याबद्दलचे मत चांगले झाले होते की, तुम्ही काहीतरी करुन दाखवाल.परंतु पुढे मंत्री पद बदलले आणि त्यानंतर तुम्ही ऊस तोड कामगार, मोलकरीण, माथाडी कामगार या सगळया असंघटित क्षेत्राला वाऱ्यावर सोडलेले आहे. त्यांचे बोर्ड देखील तयार केलेले नाही. आता त्यांचे डिपार्टमेंट गेल्यानंतर ते त्याबाबतीत बोलत असतात. म्हणून मला या गोष्टीकडे सभागृहाचे लक्ष याकडे वेधावयाचे आहे की, मानव विकास निर्देशांक प्रकाशित झाला पाहिजे.

सभापती महोदय, राजीव गांधी सी-लिंकच्या संदर्भात मुद्दा मांडावयाचा आहे. याबाबतीत परत-परत उल्लेख करण्यात येत आहे. मला सभागृहामध्ये हे नोंदविले पाहिजे की, महाराष्ट्रामध्ये सी-लिंकला स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नाव देण्यावरुन वाद करण्याची वेळ विरोधी पक्षावर आली हे निश्चितपणे आमचे दुर्दैव आहे असे मी मानते. कारण आपण आज नागपूर येथे आहोत. म्हणून मी मुद्दाम सदनामध्ये मागणी करीत आहे की, नागपूर शहरामधून जे हायवे जातात, त्यांना तुम्ही इकडच्या मातीशी म्हणजे विदर्भातील सुख-दु:खांशी जोडलेल्या ज्या काही व्यक्ती आहेत मग ते गजानन महाराज असतील, संत गाडगे महाराज असतील, प्राचार्य राम शेवाळकर असतील अशा मान्यवर व्यक्तींची नावे या हायवेनां दिली पाहिजेत. कै.पु.ल.देशपांडे यांच्याबद्दल सांगावयाचे तर मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे ला त्यांचे नाव दिलेले असताना, ते बदलून आपण कै.यशवंतराव चव्हाण यांचे नाव देतो. मला असे म्हणावयाचे आहे की, कै.यशवंतराव चव्हाण यांचे नाव कोल्हापूर पासून पुणे शहरा-पर्यंतच्या रस्त्याला देता आले असते. पण तसे न करता आपण मुंबई-पुणे रस्त्यासाठी कै.यशवंतराव चव्हाण यांचे नाव दिले. कै.पु.ल.देशपांडे यांच्याबद्दल एका बाजूला आदर व्यक्त करतो, त्यांचा आदर्श मानतो, मग आपण या सगळया गोष्टींमध्ये राजकारण का आणत आहोत ? जर तुम्हाला या सर्व गोष्टींमुळे मते मिळत असतील आणि म्हणून तुम्ही असे करीत असाल तर मग मी याबाबतीत काय बोलणार ? कारण युध्दात सर्व क्षम्य असते.पण कै.पु.ल.देशपांडे यांच्या नावाला काळे फासून तेथे कै.यशवंतराव चव्हाण यांचे नाव लावण्यात आले.पण स्वत: कै.यशवंतराव चव्हाण

. . . .3 डब्ल्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

हे कै.पु.ल..देशपांडे यांचे चाहते होते आणि त्या दोघांमध्ये एकमेकांबद्दल जिव्हाळा होता.असे असताना आपण महाराष्ट्रामध्ये अशा गोष्टी घडवित आहोत त्याबद्दल खेद वाटावा तेवढा थोडाच आहे.

सभापती महोदय, माझ्या भाषणातील शेवटचा आणि महत्वाचा मुद्दा असा आहे की, शिवाजी महाराज अफझलखानाचा कोथळा बाहेर काढत आहेत या मुद्यावरुन सरकारने सांगली-मिरज मधील गणेश विसर्जन रोखले. अनेक लोकांना अटक झाली, सध्या त्यांच्यावर केसेस सुरु आहेत. आमच्या पश्चिम महाराष्ट्रातील सर्व आमदारांनी बाहेर पायरीवर बसून धरणे धरले होते. मला असे वाटते की, प्रत्येकजण कितीही निर्धमी असला तरी प्रत्येकाच्या घरामध्ये विवाह प्रसंगी जी लग्न पत्रिका छापली जाते, त्यावर गणेशाचे चित्र असतेच, पण सांगली-मिरज मध्ये अशा गणेशाचे विसर्जन पांढऱ्या कपडया मध्ये गुंडाळून कॉर्पोरेशनच्या ट्रकमधून पुलावरुन खाली सोडून करण्यात आले. माझे असे म्हणणे आहे की, याबाबतीत चौकशी केली पाहिजे, पहाणी केली पाहिजे, याची माहिती किंवा याची कोणी दाद-फिर्याद घेणार आहे की नाही ? की प्रत्येक ठिकाणी मुस्कटदाबी करीत जाणार आणि कसेतरी निवडून येणे एवढेच जर कोणाचे ध्येय असेल तर ते असू शकते. परंतु जनतेचा आवाज तुम्हाला प्रत्येक ठिकाणी प्रश्न विचारल्याशिवाय सोडणार नाही. म्हणून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल मी निश्चितपणे खेद व्यक्त करते. पण त्याचबरोबर सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी शांतपणे वेळ दिला आणि आम्हाला प्रशिक्षणाची संधी दिली त्याबद्दल सभागृहाचे आभार मानते.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय,डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी भाषणामध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा उल्लेख केला आहे.स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी एक गीत लिहिले होते "ने मजसी ने परत मातृभूमीला सागरा प्राण तळमळला. . . . " या गीताबाबत मला अशी माहिती द्यावयाची आहे की, आज या गीताला 100 वर्षे पूर्ण झालेली आहेत. याचीही नोंद घेण्यात यावी.

. . . .3 डब्ल्यू-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे माननीय राज्यपालांनी जेव्हा भाषण करण्यासाठी प्रवेश केला, तेव्हापासूनच्या प्रत्येक गोष्टीबाबत खेद व्यक्त केला पाहिजे. याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उल्लेख केला आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणापूर्वी "वंदे मातरम्" होत असते. पण गेल्या दोन वेळेपासून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणा पूर्वी "जन गण मन" या गीताने सुरुवात झाली आहे. माझे असे म्हणणे आहे की, "वंदे मातरम्" हे गीत का लावले जात नाही, ते का बंद करण्यात आले ? याचा कुठेही उल्लेख करण्यात आलेले नाही. त्यामुळे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या सुरुवातीला "वंदे मातरम्" न होणे ही सुध्दा एका अर्थाने विचार करण्यासारखी गोष्ट आहे. त्यांनी असा मुद्दा मांडलेला आहे की, मराठीची गरिमा वाढावी यासाठी यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्न करेल. पण प्रत्यक्षात त्याचे भाषण मात्र इंग्रजीमध्ये झाले आहे. जेव्हा केंद्र शासनामध्ये माननीय श्री.देवेगौडा पंतप्रधान होते, त्यावेळी त्यांना हिंदी भाषा शिकण्यासाठी महाराष्ट्रातून शिक्षकाला नियुक्त केले होते आणि आपण या देशाचे पंतप्रधान आहोत त्यामुळे आपण हिंदी मध्ये बोलले पाहिजे या विचाराने त्यांनी हिंदीतून बोलण्यास सुरुवात केली. महाराष्ट्रामध्ये ज्या-ज्या व्यक्ती राज्यपाल म्हणून येतात, ते बहुतेक अमराठी असतात. असे का होते हे माहिती नाही. कदाचित तशी योजना असेल. मग ते माननीय श्री.एस.एम.कृष्णा असतील किंवा माननीय श्री.एस.सी.जमीर असतील.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील ..

त्यांनी या ठिकाणी आल्यानंतर मरठी शिकून मराठीमध्ये भाषण केले पाहिजे. तरच मराठी भाषेचे वैभव प्राप्त करण्यासाठी माझे शासन प्रयत्न करणार आहे वगैरे म्हणण्याला अर्थ राहील. यावर्षी दोन हजार नवीन शाळांना परवानगी मिळाली आहे. पण त्या दोन हजार शाळा इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत. मराठीचा प्रसार व्हावयाचा असेल तर मराठी शाळेला परवानगी मिळाली पाहिजे पण यामध्ये एकही मराठी माध्यमाची शाळा नाही. हा कुठला न्याय आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळा वाढत असल्यामुळे मराठीचा वापर कमी होईल. परंतु मराठी शाळा मोठया प्रमाणात बंद पडतील. आपली मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिकावीत असा पालकांचा ओघ असतो. त्यामुळे मराठीचा आग्रह धरीत असतांना भाषणामध्ये आग्रह आणि व्यवहारात नाही अशी परिस्थिती आहे. आम्ही ज्या कोल्हापूर जिल्हयात राहतो तेथून 100 कि.मी. पलीकडे गेलो तर बेळगावमध्ये कन्नड भाषेचा बोर्ड लावण्याची सक्ती असते. कन्नड भाषेत बोलले नाही तर शासन होते. कोल्हापूरमध्ये आम्ही मराठी भाषेचा आग्रह धरला तर आम्ही जातीय वाद मांडतो असे होते. मराठी भाषेच्या अभिमानामध्ये भाषणाबरोबरच व्यवहारामध्ये सुध्दा मराठीचा वापर केला पाहिजे.

सभापती महोदय, एका बाजुने आपण असे म्हणतो की, शेतकऱ्यांचे कर्ज आपण माफ केले. शेतकऱ्यांना तीन टक्के व्याज दराने कर्ज देणार, महिला मोठया प्रमाणावर उद्योगामध्ये याव्यात यासाठी त्यांना चार टक्के दराने कर्ज देणार. एखादा प्रश्न गळयाशी आल्यानंतर शासन त्याच्याकडे बघणार आहे काय? लघु उद्योजक मोठया प्रमाणात अडचणी आलेला आहे. आपण 2 लाख 50 हजार करोड रुपयांची गुंतवणूक ॲट्रॅक्ट करण्यात येईल असे म्हणतो. त्याचप्रमाणे पाच लाख नवीन रोजगार निर्माण करण्यात येईल असे म्हणतो. पण महाराष्ट्रामध्ये ग्रामीण भागातील तरुण शहराकडे येत आहेत. आपण आतापर्यंत असे म्हणत होतो की, ग्रामीण भाग 70 टक्के आहे आणि 30 टक्के भाग शहरी आहे. आता झालेल्या सर्वेक्षणात 53 टक्के आणि 47 टक्के असे प्रमाण झालेले आहे. 53 टक्के भाग शहरी झाला आणि 47 टक्के भाग फक्त ग्रामीण राहिला याचे कारण गावामध्ये त्याच्यासाठी रोजगार उपलब्ध होण्याची व्यवस्था नाही. आपण एक तरी एमआयडीसी सांगू शकतो काय की, ती तालुक्याच्या ठिकाणी झाली आणि ती मोठया प्रमाणात विकसित झाली. कुठल्याही तालुक्याच्या ठिकाणी एमआयडीसी सुरु झाली नाही, त्या ठिकाणी उद्योजग टिकले नाहीत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती :शिरुर तालुक्यात एमआयडीसी झालेली आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : मी माननीय उपसभापतींना धन्यवाद देईन की, असे एखादे उदाहरण त्यांनी मला सांगितले परंतु असे एखादेच उदाहरण असेल. साधारणपणे एका जिल्हयामध्ये दहा तालुके म्हटले तरी महाराष्ट्रातील 300 तालुक्यात एखादेच अशा प्रकारचे उदाहरण असेल की तालुक्याच्या ठिकाणी एमआयडीसी विकसित झाली. ती विकसित होणार नाही याचे कारण त्या गावामध्ये जे पिकते त्याच्यावर प्रक्रिया करणारा कुठल्याही प्रकारचा उद्योग आपण करत नाही. त्याला कमी व्याज दाराने कर्ज देत नाही. त्यमुळे महिलांना चार टक्के दराने कर्ज देण्याचे जसे स्वागत करतो, शेतकऱ्यांना तीन टक्के दराने कर्ज देण्याचे स्वागत करतो तसे तरुणांना सुध्दा कमी व्याज दराने कर्ज देणे आणि सुरुवातीच्या काळामध्ये उद्योगधदा उभा करण्यासाठी मदत करणे आवश्यक आहे. आपण डी झोनमध्ये बारा वर्षाचा सेल्सटॅक्स गोळा करुन तो वापरण्याची परवानगी देतो. डीझोन इतका अविकसित ग्रामीण भाग आहे. पश्चिम महाराष्ट्रातील तालुके विकसित आहेत असे गृहीत धरु पण मराठवाडयाची काय परिस्थिती आहे? मराठवाडयातील तालुके डी-झोनमध्ये टाकले पाहिजेत. त्या डीझोनमध्ये उद्योग करणाऱ्या तरुणाला बारा वर्षाचा सेलटॅक्स गोळा करुन वापरण्याची आणि बारा वर्षानंतर भरण्याची परवानगी दिली पाहिजे. डॉ. नीलमताईनी माझ्या भागातील एका मुद्याचा उल्लेख केलेला आहे. आम्ही त्यामध्ये होरपळलेलो असल्यामुळे मी त्याचा पुन्हा उल्लेख करु इच्छितो. एका बाजुला आम्ही सर्वधर्म समभाव असे म्हणतो. सर्वधर्म समभावाचे जे काही अनुकरण करावयाचे ते फक्त हिंदू समाजाने करावयाचे. त्यामुळे येथे दुजाभाव चाललेला आहे. कोल्हापूर सारख्या शहरात एकाद्या विशिष्ट धर्माच्या लोकांना त्यांची प्रार्थना म्हणण्यासाठी पावसाळयात सोय व्हावी म्हणून महानगरपालिका त्यांच्यासाठी पत्र्यांची शेड बांधून देते पण आम्ही आमच्या खर्चाने अफझलखानच्या वधाचा जो इतिहास आहे त्याचे पोस्टर लावले तरी सुध्दा आम्हाला विरोध होतो. हा सर्वधर्म समभाव कुठला याचा विचार केला पाहिजे. स्वातंत्र्यांनंतर इतके दिवस कुठल्याही शहरात संचारबंदी नव्हती. सांगली, मिरज आणि इचलकरंजीमध्ये तेरा दिवस संचारबंदी होती. त्यामुळे सर्व जनजीवन विस्कळीत झाले होते. एकूण चार हजार लोकांना वेगवेगळया कारणाने अटक झाली. काल सुध्दा 22 जणांना अटक झाली. त्या काळामध्ये ज्यांनी एसएमएसद्वारे काही संदेश पोहचवले त्यासंदर्भात काल 22 जणांना अटक झालेली आहे. हे

..3.

.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील...

अटकसत्र संपणार आहे की नाही? एकाच गुन्हयामध्ये दोन धर्माच्या,दोन जातीच्या लोकांना अटक करावयाचे. एकाला एक कलम लावायचे, दुसऱ्याला एक कलम लावायचे. त्यामुळे एका बाजुने आमचे राज्य प्रगतीशील आहे. आम्ही जात मानत नाही, धर्म मानत नाही. असे म्हणत असताना एका जातीला एक न्याय आणि दुसऱ्या जातीला एक न्याय दिला जातो याचाही शासनाने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, या संपूर्ण भाषणाच्या प्रत्येक मुद्यावर खेद व्यक्त करावा असेच हे संपूर्ण अभिभाषण आहे. कुठल्याही प्रकारचा विकास गेल्या दहा वर्षात झाला नाही. पाच वर्षापूर्वी शासनाने घोषणा केली होती की, आम्ही मोफत वीज देणार. वचनांची पूर्ती करत असातांना मोफत वीज दिली का?पैसे देऊन सुध्दा वीज दिली नाही हे सांगावे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील .....

केवळ 33 टक्के लोकांनी आपल्याला मतदान केले. आमच्या कोल्हापूर जिल्ह्यामध्ये विरोधी पक्षाच्या चार जागा निवडून आल्या. म्हणजे त्या चार विधानसभा मतदारसंघामध्ये आपण वचनपूर्ती केली नाही असे म्हणावयाचे काय ? केवळ 33 टक्के लोकांनी आपल्या बाजूने मतदान केले आणि 67 टक्के लोकांनी आपल्या विरोधात मतदान केले तरीही आपण असे म्हणत आहात की, आम्ही वचनपूर्ती केली आणि लोकांनी आमच्यावर विश्वास व्यक्त केला. एक उदाहरण म्हणून सांगतो की, विजेच्या बाबतीत आपण काहीही केले नाही म्हणून मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करतो आणि आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल श्री. एस. सी. जमीर यांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा जो प्रस्ताव चर्चेसाठी आलेला आहे त्यावर माझे विचार मी पाच मिनिटांमध्ये मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आपल्या शासनाकडून माननीय राज्यपालांच्या नावाचा "एस.सी.जमीर" असा उल्लेख झालेला आहे. त्यांच्या "एस.सी." या आद्याक्षरांचे नीट विस्तारीकरण करुन दिले असते तर मला अधिक आनंद झाला असता. आपण मराठीचा आग्रह धरतो. महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाला या भाषेबद्दल सार्थ अभिमान आहे. माझे काही चुकत असेल तर आपण त्याकडे लक्ष देऊ नका पण काही शब्दांच्या बाबतीत जर दुरुस्ती करणे आवश्यक असेल त्याचा विचार करावा. मराठी ही राजभाषा आहे की राज्यभाषा आहे याचा खुलासा भाषा संचालनालयाकडून करुन त्याबद्दलचे स्पष्टीकरण आपण द्यावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, निवडणुकीच्या वेळेला राजकीय पक्ष जेव्हा निवडणुकीला सामोरे जातात तेव्हा त्यांचा एक जाहीरनामा, वचननामा प्रसिध्द केला जातो. निवडणुकीमध्ये यश मिळाल्यानंतर त्या जाहीरनाम्याचे रुपांतर एका कृती आराखड्यामध्ये केले जाते आणि जाहीरनाम्यामध्ये दिलेली वचने पाच वर्षाच्या कालावधीमध्ये पूर्ण करण्यासाठी कोणत्या पध्दतीचा राजकीय कार्यक्रम किंवा पॉलिटिकल अजेंडा किंवा अजेंडा फॉर गव्हर्नन्स मांडावयाचा असतो तो मांडण्याचा प्रयत्न या ठिकाणी माननीय राज्यपाल महोदयांच्या भाषणामध्ये करण्यात आलेला आहे. व्यापक प्रमाणात या राज्यापुढील प्रश्नांचा या अभिभाषणामध्ये उल्लेख आलेला आहे. जवळपास सर्वच मुद्दे माननीय राज्यपालांनी आपल्या या विवेचनामध्ये निश्चितपणे घातलेले आहेत. सगळे मुद्दे एकाच वेळी येणे शक्य नाही. परंतु लोकांनी विश्वास दाखवून ज्यांच्यावर या राज्याचा कारभार विश्वस्त म्हणून करण्याची जबाबदारी सोपविली आहे त्यांनी लोकभावनांचा आदर करुन जी लोकसत्ता मिळालेली आहे ती योग्य प्रकारे राबविली पाहिजे अशा प्रकारचा एक संदेश या भाषणामधून जातो. म्हणून मला या भाषणाबद्दल माननीय राज्यपाल महोदयांचे मनापासून अभिनंदन करावेसे वाटते.

सभापती महोदय, शेतकऱ्यांचे प्रश्न आहेत, मजुरांचे प्रश्न आहेत, शिक्षणाचे प्रश्न आहेत. राज्याला मिळणारे एकूण उत्पन्न, केंद्र शासनाकडून राज्याला मिळणारा निधी या सगळ्यांचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .....

एकत्रित आर्थिक आराखडा मांडल्यानंतर त्यातून शेवटच्या माणसाला जेवढा न्याय देता येणे शक्य असेल त्या दृष्टीकोनातून जर हे सरकार काम करीत असेल आणि त्या कामाचे एकूण स्वरुप जर या भाषणामध्ये आलेले असेल तर ती बाब निश्चितपणे स्वागत करण्यासारखी आहे. पायाभूत सुविधांपासून आरोग्यापर्यंत आणि शिक्षणापर्यंत तसेच दुर्लक्षित अशा आदिवासी, भटके विमुक्त या सगळ्या समाज घटकांचा विचार करुन आणि राज्याच्या भौतिक सुधारणेमध्ये मग विजेच्या बाबतीत असतील, रस्त्याच्या बाबतीत असतील, धरणांच्या बाबतीत असतील, त्याच्या मधून या सर्व योजना जेव्हा फलद्रूप होतील त्यानंतरच सामान्य माणसांचे जनजीवन आज आहे त्यापेक्षा अधिक वरच्या स्तरावर गेलेले असेल अशा पध्दतीचा एक विचार या भाषणामधून व्यक्त होतो. म्हणून मला त्यांचे मनापासून अभिनंदन करावेसे वाटते. काही मुद्यांचा उल्लेख यामध्ये आलेला नाही. राज्यामध्ये जेव्हा लोकसंख्येची पाहणी केली जाते तेव्हा स्त्री आणि पुरुषांच्या प्रमाणाबद्दल अनेक जिल्ह्यांमध्ये एक विचित्र परिस्थिती निर्माण होण्यासारखी अवस्था आज राज्याची झालेली आहे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अरविंद सावंत)

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

त्यामुळे त्या समस्येकडे राज्य शासनाने निश्चितपणे लक्ष दिले पाहिजे आणि तशी सुधारणा आपल्या कार्यक्रमामधून केली पाहिजे अशी एक विनंती मला याद्वारे करावयाची आहे. हे सर्व चालू असताना राज्य शासन म्हणून जी नैमित्तिक कामे आहेत, जी योग्य योजना राबविण्यासाठीची आवश्यक उपाययोजना आहे त्याबरोबरच अचानक उद्भवणारी जी नैसर्गिक संकटे आहेत, त्या संकटांसाठी सुध्दा जे अनुभव सत्तेवर आल्यानंतरच्या पहिल्या महिन्यातच या शासनासमोर प्रश्न म्हणून उभे राहिलेले आहेत आणि त्यासाठी तरतूद करण्याची आवश्यकता आहे त्याचा भविष्यातील अंदाज घेऊन त्याप्रमाणे आर्थिक तरतुदी आणि त्याबद्दलची रचना व त्याबद्दलची यंत्रण या राज्यात निर्माण व्हावी अशा पध्दतीचे धोरण शासनाने आखावे. सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करताना आपल्याला या राज्याचे जे सांस्कृतिक ठेवे आहेत मग ती मोठे तीर्थस्थाने असतील, संत महात्मे असतील या सगळयांचे स्मरण किंवा त्यांनी दिलेल्या विचारांची गतिमानता अधिक वाढविण्यासाठी आणि त्यांचा समाजकारणासाठी उपयोग करुन घेण्यासाठी एक कृतिशील कार्यक्रम आखण्याची गरज आहे असेही मला वाटते. मला निश्चित खात्री आहे की, जे शासन आता सत्तेवर आलेले आहे त्या शासनातील सर्वजण विरोधी पक्षाला बरोबर घेऊन अत्यंत संवेदनशीलतेने या राज्याचा कारभार चांगला व्हावा, पारदर्शी व्हावा, स्वच्छ प्रशासन या राज्याला मिळाले पाहिजे अशा पध्दतीने व्हावा असाच पुढच्या पाच वर्षाच्या कालावधीचा हा कृती आराखडा या अभिभाषणात मांडलेला असल्यामुळे मी या अभिभाषणाचे समर्थन करतो आणि राज्यपाल महोदयांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत) : सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांना मी विचारु इच्छितो की, राजभाषा की राज्यभाषा यापैकी काय असावे असे आपल्याला वाटते ?

श्री.हेमंत टकले : राज्यभाषा असे असावयास पाहिजे.

यानंतर श्री.शर्मा...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जमा (महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, काफी लम्बे इन्तजार के बाद मेरा नम्बर आया है. आप इस समय पीठासीन अधिकारी हैं, इसलिए मैं उम्मीद करता हूँ कि मुझे बोलने के लिए ज्यादा समय मिलेगा. माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड ने माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण पर धन्यवाद का प्रस्ताव पेश किया है, मैं इस प्रस्ताव का समर्थन करने के लिए और माननीय राज्यपाल महोदय को धन्यवाद देने के लिए खड़ा हूँ.

सभापति महोदय, महाराष्ट्र में लगातार तीसरी बार काँग्रेस और राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी की सरकार आने के लिए मैं उनका अभिनन्दन करता हूँ. हमारी सरकार प्रो-एक्टिव रही है. उन्होंने यह इन्तजार नहीं किया कि किसी विषय पर विरोधी पक्ष के लोग कहेंगे, तब हम उस बारे में कार्रवाई करेंगे. इस सरकार ने स्वत: अच्छा काम किया है. 26 नवम्बर 2008 की घटना के बाद मुंबई में जो स्थिति पैदा हुई, एक-एक व्यक्ति को तो सुरक्षा देना बहुत कठिन बात है, लेकिन पिछले एक साल में हमारी सरकार ने महाराष्ट्र की जनता के दिल में सेन्स ऑफ सिक्योरिटी पैदा करने का काम किया है, हमारे पुलिस दल ने यह काम किया है और यह सराहनीय है. नई सरकार के अगले 5 साल लिए माननीय राज्यपाल महोदय ने जो अभिभाषण किया है, उसके विस्तार में मैं नहीं जाऊंगा, लेकिन चाहे कृषि का क्षेत्र हो, चाहे किसानों की आत्महत्या का प्रश्न हो, चाहे ग्रामीण अर्थ-व्यवस्था की बात हो, चाहे शहरी विकास की बात हो, चाहे महिलाओं के आरक्षण की बात हो, चाहे अपंगों की बात हो, सरकार ने उस पर नीति बनाई है और कार्रवाई चालू है. चाहे कैसी भी स्थिति हो, सरकार सतत चलने वाली प्रक्रिया है. हम ऐसा नहीं कह सकते कि आज सरकार काम नहीं करेगी या कल से सरकार काम नहीं करेगी. मुझे आशा है कि महाराष्ट्र की जनता के हित में संसदीय परम्पराओं के अनुसार सत्ताधारी पक्ष और विपक्ष मिलकर कार्य करेंगे.

सभापति महोदय, इस सभागृह के माध्यम से मैं सरकार का ध्यान कुछ बातों की ओर खींचना चाहता हूँ. हमारे देश में पिछले कुछ सालों से जब से इलेक्ट्रॉनिक मीडिया आया है, तब से युवाओं और पढ़े-लिखे वर्ग में बड़ी चेतना आई है और सरकार की नीतियों के बारे में, पॉलिटिकल लीडर्स और वर्कर्स के करेक्टर के बारे में भी चर्चा होने लगी है. ऐसी स्थिति में

. . . 4A 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . . श्री. सय्यद जमा जारी

सरकार सुदृढ़ होनी चाहिए, उसका कारभार पारदर्शी होना चाहिए, भ्रष्टाचार की कम से कम गुंजाइश होनी चाहिए और ब्यूरोक्रेट्स एकाउन्टेबल होने चाहिए. ऐसी भावना देश की जनता के मन में है. इसलिए राजनैतिक कार्यकर्ताओं को जनता देखती है, समझती है, परखती है और इसलिए हम लोगों की जबाबदारी बहुत ज्यादा हो जाती है. चाहे सत्तारुढ़ पक्ष के लोग हों, चाहे विपक्ष के लोग हों, संसदीय लोकशाही में दोनों पक्षों को मिलकर काम करना पड़ता है. हमारे महाराष्ट्र के नेता वैचारिक दृष्टि से अच्छे लोग हैं और सांस्कृतिक धरोहर को मानने वाले लोग है, इसलिए हम सब मिलकर अच्छा काम करेंगे, ऐसा मुझे पूरा विश्वास है और आने वाले 5 वर्षों में हम लोग सरकार के माध्यम से अच्छा काम कर सकेंगे.

सभापति महोदय, सब से ज्यादा चिन्ता मंहगाई के बारे में है. मंहगाई बढ़ती जा रही है और हम कंट्रोल नहीं कर पा रहे हैं. हमारी आदरणीय नेता श्रीमती सोनिया गांधी भी प्रधान मंत्री से कह रही हैं कि मंहगाई कम करो, इसके लिए कुछ उपाय कीजिए. इसलिए मुझे ऐसा लगता है कि इस सभागृह के सभी सदस्यों की मंहगाई कम करने के लिए जबाबदारी है. मंहगाई कम होनी ही चाहिए. मंहगाई कम करने के लिए कदम उठाने ही चाहिए और कानून पर सख्ती से अमल करना चाहिए. हम सभी को मालूम है कि व्यवसाय करने वाले लोग कहीं न कहीं राजनैतिक लोगों से जुड़े रहते हैं. अगर किसी व्यवसायी पर छापा मारा गया तो उसका राजनेताओं को फोन आता है कि आप थाने में फोन कर दीजिए. आम जनता मंहगाई से त्रस्त है, अगर आपको कोई कानून बनाना है तो बनाइए, लेकिन मंहगाई रोकने का प्रयास महाराष्ट्र शासन को करना चाहिए. इसके साथ ही सभी माननीय सदस्यों को पार्टी की लाइन से हटकर मंहगाई को रोकने और कालाबाजारी खत्म करने के लिए कार्य करना चाहिए.

सभापति महोदय, पिछले कुछ समय से मिलावट की बहुत सारी घटनाएं हो रही है. खाद्य पदार्थों में मिलावट हो रही है, नकली दवाइयां बाजार में मिल रही है, दीवाली के समय मावा, तेल और घी में मिलावट हो रही है. मेरा कहना है कि महाराष्ट्र जैसे प्रगतिशील राज्य में मिलावट करने पर मौत की सजा देना का कानून बनाना चाहिए. इन केसों की सुनवाई के लिए फास्ट ट्रॅक कोर्ट बनाए जाने चाहिए. अगर संबंधित व्यक्ति दोषी है तो उसे फाँसी की सजा दीजिए और अगर वह दोषी नहीं है तो फिर उसे कम्पेनसेसन देकर सरकार को माफी मांग लेनी

. . . .4A 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . . श्री. सय्यद जमा जारी

चाहिए. किसी भी कीमत पर मिलावट से समझौता नहीं होना चाहिए. हमारी प्रोग्रेसिव सरकार को इस बारे में कड़ी कार्रवाई करनी चाहिए. अगर कोई बुजुर्ग हॉर्ट अटॅक का मरीज है और अगर उसे सोरबीकेट जैसे लाइफ सेविंग ड्रग्स में मिलावट मिले तो मिलावट करने वाले व्यक्ति को मौत की सजा देनी चाहिए.

. . . . भाषण जारी, नंतर तालेवार

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री ज़मा .....

मिलावट को रोकने के लिए कानून तो बहुत है लेकिन वे असरकारक नहीं है इसलिए मिलावट के मामलों में मौत की सज़ा का प्रावधान होना चाहिए. कुछ राज्यों ने इस प्रकार का कानून बनाया है इसलिए महाराष्ट्र सरकार भी इस प्रकार का कानून बनाए, ऐसा मेरा अनुरोध है.

तीसरा मेरा मुद्दा जिसके बारे में माननीय राज्यपाल के अभिभाषण में यह जिक्र किया गया है कि हमारे राज्य में औद्योगिक प्रगति हो रही है, उद्योगों में करोड़ो रुपयों का विनियोग होगा, औद्योगिक प्रगति की दृष्टि से अच्छा वातावरण है, कानून और व्यवस्था अच्छी है, साधन-सामग्री प्रचुर मात्रा में है, सरकार उद्योग के संबंध में अच्छी तरह से ध्यान दे रही है. ये सब ठीक है. लेकिन मैं यह जानना चाहता हूं कि ऐसा होने के बावजूद हमारे राज्य में उद्योग बंद क्यों पड़े हुए हैं ? हमारे राज्य में बहुत सारे लघु उद्योग, मध्यम उद्योग एवम् बड़े उद्योग बंद हैं. इन उद्योगों में करोड़ों रुपये की पूंजी लगी हुई है.

तालिका सभापति (श्री अरविंद सावंत) : माननीय सभापति जी ने अनुरोध किया है कि कामकाज जल्दी निपटाने के लिए सहयोग करें. माझी सर्वांना विनंती आहे की कामकाज लवकर संपविण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी मदत करावी.

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, मैं अपना भाषण जल्दी समाप्त करना चाहूंगा. मैं पूरी निष्ठा के साथ यह कहना चाहूंगा कि मुझे मराठी भाषा से पूरा लगाव है. मैं नागपुर में नौकरी करने के लिए आया तो हिन्दी भाषा भूल गया हूं, क्योंकि मेरे साथ काम करने वाले सारे कर्मचारी भोजपुरी में बोलते थे. मराठी भाषा के प्रति मेरे मन में पूरा सम्मान है. मैं मराठी भाषा सीखने की कोशिश कर रहा हूं.

सभापति महोदय, मैं यह कह रहा था कि बंद उद्योगों को शुरु करने के बारे में सरकार को तुरन्त कदम उठाना चाहिए क्योंकि इन उद्योगों में बहुत सारी जमीन और पूंजी लगी हुई है. दूसरा मेरा मुद्दा यह है कि आज एसईझेड के अन्तर्गत श्रम कानून लागू नहीं है. आज हम 21 वीं सदी में है, क्या इस 21 वीं सदी में बिना श्रम कानून के काम होगा ? इसलिए मेरा यह सुझाव है कि एसईझेड के अन्तर्गत श्रम कानून लागू किया जाना चाहिए और उस सिलसिले में मशीनरी स्थापित की जानी चाहिए.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री ज़मा .....

सभापति महोदय, मेरा चौथा मुद्दा यह है कि अल्पसंख्यकों के विकास के लिए केन्द्र तथा राज्य में अलग विभाग बनाया गया है लेकिन इस विभाग के लिए किया गया प्रावधान कम है. महाराष्ट्र सरकार ने 2006 में एक जी.आर. जारी किया है, उसके अनुसार बजट में हेडवाईज़ 15 प्रतिशत राशि का अलोकेशन होना चाहिए, ऐसी मेरी विनती है.

सभापति महोदय, स्वतंत्र तेलंगाना राज्य के लिए तेलंगाना राष्ट्र समिति के नेता श्री के. चंद्रशेखर 11 दिनों से अनशन पर बैठे हैं. प्रधानमंत्री, श्रीमती सोनिया गांधी और विपक्ष के सारे नेताओं ने उन्हें अनशन समाप्त करने के लिए अनुरोध किया है. वहां पर स्वतंत्र तेलंगाना राज्य के लिए प्रक्रिया प्रारंभ हो गई है. विधानसभा में प्रस्ताव पारित कर इस काम की शुरुआत हो गई है. अनशन समाप्त करने के लिए जिन लोगों ने गांधीवादी तरीके से प्रयास किये, मैं उन सभी को धन्यवाद देना चाहता हूं.

सभापति महोदय, मेरा अगला मुद्दा यह है कि महाराष्ट्र में क्रीड़ा विकास फंड बनाया जाना चाहिए. जिस प्रकार से हमारी सरकार ने तीर्थ स्थलों का विकास करने के लिए सभी 288 विधायकों के फंड से वन टाईम 5-10 लाख रुपये देने की अनुमति दी है, उसी प्रकार से क्रीड़ा विकास के लिए फंड शुरु किया जाए. इस प्रकार से जो फंड जमा होगा उसे फिक्स डिपाजिट में रखकर खेल के विकास में उपयोग कर सकते हैं. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

.....

इसके बाद श्री पावसकर का भाषण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : महोदय, दि 11 नोव्हेंबर, 2009 रोजी माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाच्या निमित्ताने जो प्रस्ताव आलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, मी सुरुवातीलाच या निमित्ताने खेद व्यक्त करतो. त्याचे कारण असे की, माननीय राज्यपालांचे अभिभाषण हे शासनाची दिशा काय आहे यासंबंधीचा आरसा असतो. पण हे अभिभाषण म्हणजे आश्वासनांचा वर्षाव, पोकळ घोषणा आणि जनतेच्या अपेक्षाभंग करणारे असेच आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी यावर आपले विचार व्यक्त केले. मी या अनुषंगाने मुद्दा क्र. 2 मध्ये "राज्यातील जनतेकडून सरकारला विश्वासदर्शक जनादेश मिळाला यावरुन राज्यातील जनतेच्या आशा-आकांक्षांची पुर्तता केल्याचे सिध्द होते" असे म्हटले आहे. माननीय राज्यपालांनी शासनाची पाठ जरुर थोपटली. जनादेश मिळाला पण तरी देखील 15-20 दिवस मंत्रिमंडळ स्थापनेसाठी का लावले हेच समजत नाही. हा एक प्रकारे ज्या जनतेने कौल दिला त्या जनतेचा विश्वासघात करण्यासारखे आहे. अशा प्रकारे लोकांच्या भावनांशी खेळण्याचा जो प्रयत्न असतो तो निवडणुकीपर्यंत ठीक आहे पण निवडणुका झाल्यानंतर असे करणे कितपत योग्य आहे याचाही जनता विचार करील. आज आपल्या राज्यावर कर्जाचा डोंगर वाढत चालला आहे. युतीच्या काळात राज्यावर 42766 कोटीचे कर्ज होते त्यावेळेस हे सरकार विरोधी पक्षात असताना रान उठवित होते परंतु आता तर राज्यावर दहा वर्षाच्या काळात 1,85,801 कोटीचे कर्ज झालेले आहे. दरवर्षी 15 हजार कोटी रुपये फक्त या कर्जाच्या व्याजापोटी शासनाला मोजावे लागतात. ही परिस्थिती पाहिली आणि बिहारशी तुलना केली तर ते राज्य सुध्दा मागे पडलेले आहे. तरी देखील माननीय राज्यपाल म्हणतात की राज्याची प्रगती चांगली आहे. खरे पाहिले आणि सत्यता जाणून घ्यावयाची असेल तर आज या राज्यात जगणं महाग आणि मरणे स्वस्त अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. एके काळी आपण म्हणत होतो की, "बहु असोत सुंदर, संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा" पण आजची परिस्थिती पाहिली तर माननीय राज्यपालांनी क्र. 3 या मुद्यात म्हटले की, "सामान्य नागरिकांची सुरक्षा व संरक्षण करणे हे माझ्या शासनाचे प्रथम आणि आद्य कर्तव्य असेल" तसेच "दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी राज्याचे पोलीस दल गतिमान करण्याबरोबरच त्यांना अत्याधुनिक शस्त्रे पुरविली." पण ही वस्तुस्थिती आहे काय ?

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

आणि खरे असेल तर 26 नोव्हेंबर रोजी राज्यात जो हल्ला झाला त्यामध्ये कर्तबगार पोलीस अधिकारी हेमंत करकरे, विजय साळसकर आणि अशोक कामटे यांच्यासह 22 पोलीस अधिकारी शहीद झाले आणि 200 निरपराध नागरिकांचे बळी गेले त्याचबरोबर राज्यातली कायदा व सुव्यवस्थाही बिघडली. या घटनेनंतर माननीय केंद्रीय गह मंत्री, राज्याचे गृहमंत्री आणि माननीय मुख्यमंत्री यांना राजीनामा द्यावा लागला. पण हल्ला होण्यापूर्वी समुद्रामार्गे हल्ला होणार यासंबंधीची कल्पना केंद्रशासनाकडून मिळालेली असतानाही त्याकडे दुर्लक्ष करणारे अनामी रॉय मात्र मोकळेच राहिले. मंत्र्यांनी राजीनामे दिले पण खरे जबाबदार असलेले पोलिसांचे प्रमुख आजही त्याच पध्दतीने काम करीत आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्याची हिंमत या शासनाकडे आहे काय ? हल्ल्याच्या वेळेस हेमंत करकरे यांच्याकडील बुलेट प्रुफ गाडी काढून घेण्यात आली, विजय साळसकर यांची एके-47 काढून घेतली आणि ज्यांनी अशा ऑर्डर्स दिल्या त्यांच्यावर मात्र काहीच कारवाई होत नाही. यामध्ये राजीनामा दिलेल्या मंत्र्यांचे पुनर्वसन झाले व श्री. आर.आर.पाटील पुन्हा गृह मंत्री झाले. केंद्रीय मंत्री श्री. शिवराज पाटील हे देखील एखाद्या राज्याचे राज्यपाल होतील पण ज्या निरपराध लोकांचा बळी गेला त्यांचे पुनर्वसन करण्याचा विचार शासनाने केला आहे काय ? आज ते कोणत्या परिस्थितीत जगत आहे, त्यांना कोणती मदत द्यावी लागणार आहे, तसेच अपंग झालेले लोक आपल्या रोजगारावर जाऊ शकतील की नाही हे जाणून घेण्याचा शासनाने कधी प्रयत्न तरी केला काय ? पोलीस अधिकाऱ्यांना दिलेली बुलेटप्रुफ जॅकेट्स हलक्या दर्जाचे होते आणि त्यासंदर्भात सभागृहात सुध्दा अनेक वेळा चर्चा झाली. यासंबंधीचे आरोप केल्यानंतर त्यासंबंधीची फाईलही गहाळ झाली आणि दहशतवाद्यांचा मुकाबला करताना जॅकेटही गहाळ झाले त्यामुळे हसावे की रडावे हेच कळत नाही. जॅकेट गहाळ झाल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री श्री. पी. चिदंबरम् आणि मुंबईचे आयुक्त श्री. डी. शिवानंदन यांनी देखील शहीद करकरे यांच्या पत्नीची माफी मागितली....

यानंतर श्री जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

तरी माननीय राज्यपाल महोदय या सरकारचे कौतुक करतात. माननीय राज्यपाल महोदय आपल्या अभिभाषणात सांगतात की, या शासनाने जी कामे केलेली आहेत ती फार चांगली केलेली आहेत.

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक 4 व 5 मध्ये माननीय राज्यपाल महोदय म्हणतात की, राज्यातील नक्षलवादाचा बिमोड करण्यास सरकार कटिबद्ध आहे. इतकेच नव्हेतर सन 2009 ते 2012 या तीन वर्षात 1306 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले जातील असेही सांगतात. नक्षलवाद्यांनी 2009 मध्ये केलेल्या हल्ल्यात 34 पोलीस शहीद झाले होते. परंतु या शहीद झालेल्या 34 पोलिसांच्या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात एका ओळीने सुध्दा उल्लेख केला नाही, या 34 पोलिसांना श्रध्दांजली वाहण्यासाठीच्या एकाही ओळीचा उल्लेख केलेला नाही. नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यासाठी 2004 पासून ते आतापर्यंत 58 पोलीस शहीद झालेले आहेत. नक्षलवाद्यांचा सामना करण्यासाठी या पोलिसांकडे दारुगोळा नाही, हे पोलीस किडया मुंग्यांसारखे मारले जात आहेत. सन 2009 मध्ये नक्षलवाद्यांनी 34 पोलीस जवानांचे डोळे फोडले, त्यांच्या शरीराचे तुकडे केले होते परंतु त्यासंदर्भात शासनाने अजून पर्यंत काहीही ॲक्शन प्लॅन केलेला नाही. पोलिसांच्या एका गंभीर समस्येकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. गेल्या वर्षभरात महाराष्ट्रातील 336 पोलिसांचा मृत्यू झालेला आहे. विधिमंडळाचे काम सुरु असतांना विधी मंडळाच्या बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या एका उपनिरीक्षकाचा मृत्यू झाला आहे. आजपर्यंत 77 पोलीस अधिकारी व कर्मचा-यांचा मृत्यू झालेला आहे, आत्महत्येमुळे 36 पोलिसांचा मृत्यू झाला आहे, क्षयरोगामुळे 29 जवानांचा मृत्यू झालेला आहे, काविळीमुळे 19 जवानांचा तसेच अपघातामध्ये 9 जवांनाचा व एड्समुळे 4 जवानांचा मृत्यू झालेला आहे. पोलिसांच्या घरांची समस्या वर्षानुवर्षे कायम आहे. पोलिसांच्या घराची समस्या दूर करण्यासाठी माननीय गृहमंत्री वारंवार घोषणा करतात पण त्याची अंमलबजावणी होत नाही ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 19 मध्ये औद्योगिक विकासामध्ये महाराष्ट्र राज्य देशात अग्रेसर आहे असे म्हटले आहे. खरे म्हणजे देशात गुजरात

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

राज्य पहिल्या क्रमांकावर आहे व आपल्या महाराष्ट्राचा नंबर आठवर गेलेला आहे. महाराष्ट्रामध्ये किती नवीन कारखाने सुरु झाले याची माहिती सरकार देऊ शकेल काय? माननीय राज्यपाल महोदयांच्या मागच्या अभिभाषणामध्ये सांगितले होते की, 70 लाख लोकांना रोजगार मिळणार आहे. माननीय मंत्री महोदय श्री. सचिनभाऊ अहिर आपण सुध्दा ट्रेड युनियनमध्ये काम केलेले आहे. महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यासाठी करार झाले परंतु प्रत्यक्षात किती उद्योगांनी महाराष्ट्रात उद्योग स्थापन केले आहे याची माहिती आपण दिली तरी चांगले होईल.

सभापती महोदय, कोणताही कर्मचारी कामाला लागल्यानंतर त्याला वाटते की, मी आज ना उद्या पर्मनंन्ट होईल, उपदान मिळेल, सर्व बेनिफिट्स मिळतील परंतु गेल्या 10 वर्षामध्ये टेंपररी कामगारांची संख्या जास्तीत जास्त वाढलेली आहे. या कामगारांना हायर आणि फायर बेसिसवर कधीही ठेवले जाते आणि कधीही काढले जाते. शहरामध्ये जगू शकत नाही आणि खेडयात शेती करु शकत अशी महाराष्ट्रातील जनतेची स्थिती झालेली आहे. आज नोक-यांचे प्रमाण कमी झालेले आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 25 मध्ये मुंबई शहर झोपडपट्टी मुक्त करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे यासंदर्भात उल्लेख आहे. झोपडपट्टी पुनर्विकास योजना ठप्प झालेली आहे. या योजनेला ख-या अर्थाने बिल्डरांचा विळखा पडला आहे आणि बिल्डरांचा विळखा मंत्रालयाला पडलेला आहे. पुनर्विकास योजना जेव्हा राबविली जाते तेव्हा तेथील लोकांना ट्रान्झीट कॅम्पमध्ये शिफ्ट् केले जाते. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, ट्रान्झीट कॅम्पमध्ये काही ठराविक दिवसापर्यंत ठेवले जाते परंतु काही ठिकाणचे रहिवासी 10-10,15-15,25-25 वर्षापासून ट्रान्झीट कॅम्पमध्येच राहत आहेत त्यामुळे यासाठी आपण काही नियम बनविणार आहात काय ? या रहिवाश्यांना अजून स्वत:ची घरे मिळाली नाहीत. त्यामुळे यासंदर्भात आपण काही नियम बनविणार आहोत की, नाही ?

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 34 मध्ये सर्वशिक्षा अभियानातर्फे 20 लाख 53 हजार विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण पुरवण्यात येईल असा उल्लेख आहे. परंतु अजूनही 70 हजार विद्यार्थी शिक्षणापासून वंचित आहेत याची कल्पना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

सरकारला आहे काय ? राज्यातील 20 जिल्हयात सर्वशिक्षा अभियांनाचा बोजवारा उडालेला आहे. धुळे जिल्हा परिषदेत 15 वर्षे पडून राहिलेल्या लाखो रुपये किमतीच्या पुस्तकांना वाळवी लागल्यामुळे 3 ट्रक लगदा बाहेर काढण्यात आलेला होता.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक-45 मध्ये महाराष्ट्र-कर्नाटक सीमेच्या संदर्भात उल्लेख करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील मराठी बांधवांवर आजही कानडी भाषेची सक्ती केली जात आहे. बेळगाव महानगरपालिकेवरील ध्वज उतरवण्यात आला होता तसेच बेळगावचे महापौर श्री. काळे यांच्या तोंडाला काळेही फासण्यात आले होते.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर ..

महाराष्ट्र सरकारने सीमा भागातील मराठी भाषिकांना वा-यावर सोडले होते ही वस्तुस्थिती आहे. सीमा प्रश्नासबंधीची याचिका सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रलंबित आहे परंतु तेथे महाराष्ट्राची बाजू मांडत असतांना कोणत्याही प्रकारची कुचराई होणार नाही एवढी काळजी घ्यावी अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द येथेच संपवितो. जय हिंद , जय महाराष्ट्र

तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत) : सन्माननीय सदस्यांनी मुद्यांची पुनरावृत्ती न करता थोडक्यात भाषण करावे अशी माझी त्यांना विनंती आहे. यानंतर सन्माननीय सदस्य श्री रामनाथ मोते भाषण सुरु करतील.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) सभापती महोदय,माननीय राज्यपालांच्या अभिभाषावर माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 46 मध्ये असे म्हटलेले आहे की, "अधिकाराचे विकेन्द्रीकरण करुन ते स्थानिक स्तरापर्यंत पोहोचविण्याची प्रक्रिया शासन हाती घेईल " त्याचबरोबर पारदर्शी आणि संवेदनशील प्रशासन देण्यात येईल अशा प्रकारची भूमिकासुध्दा शासनाने मांडलेली आहे.

सभापती महोदय, प्रत्यक्षात मात्र सत्तेचे विकेन्द्रीकरण करण्यात आलेले नाही. त्यामुळे दिशाभूल करणारे हे वाक्य आहे असे म्हणावेसे वाटते. आज शिक्षण क्षेत्राचा विचार केला तरी सत्तेचे विकेन्द्रीकरण करण्याची किंवा प्रशासनातील क्षेत्रीय अधिका-यांना काही अधिकार देण्याची आवश्यकता आहे परंतु हे अधिकार दिले गेलेले नाहीत. शिक्षण क्षेत्रातील तुकडयांचा विषय असो, पायाभूत पदांच्या मान्यतेचा विषय असो, सेवा खंडाचा विषय असो, पद मान्यतेचा विषय असो तुकडी मान्यतेचे विषय असो या सर्व विषयासंबंधीचे प्रस्ताव शिक्षणाधिकारी, शिक्षण उप संचालक, शिक्षण संचालक यांच्या मार्फत शासन स्तरावर येतात त्यामुळे चार चार वर्षे यासंबंधीचा निर्णय होत नाही. श्री. हसन मुश्रीफ हे शिक्षण राज्य मंत्री होते ते आता सभागृहात उपस्थित आहेत. त्यांच्या काळातील म्हणजेच 2005-2006 सालातील प्रस्ताव अजूनही मंजूर झालेले नाहीत त्यामुळे ख-या अर्थाने जर सत्तेचे विकेन्द्रीकरण करावयाचे असेल तर सध्याच्या व्यवस्थेमध्ये बदल कारण्याची आवश्यकता आहेअसे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. अधिका-यांनी दिलेल्या अभिप्रायावरच शासन निर्णय घेत असते म्हणून संबंधित विभाग प्रमुखाला, शिक्षण संचालकाला हे अधिकार देण्याची आवश्यकता आहे. वैद्यकीय खर्चाची बिले मंजूर करणे, तुकडयाची मान्यता देणे, पायाभूत पदांना मान्यता देणे इत्यादी सबंधीचे निर्णय घेण्याचे अधिकार शिक्षण संचालकांना देण्यात यावेत आणि या बाबतीत निर्णय घेण्यासाठी सत्तेचे विकेन्द्रीकरण करण्यात यावे अशी माझी शासनाला सूचना आहे.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे. मराठी ही राज भाषा असल्यामुळे तिचा गौरव, वैभव आणि प्रतिष्ठा राखण्यास शासन बांधिल आहे असे या अभिभाषणात म्हटलेले आहे.परंतु त्याबाबतीत कृती मात्र वेगळया पध्दतीने केली जात आहे. राज्यामध्ये मराठी भाषिक शाळांना परवानगी दिली जाणार नाही असा राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेतलेला

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे राज्य सरकारने मागच्या वर्षी ज्या शाळांना परवानगी दिली होती त्या सर्व इंग्रजी शाळा होत्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना परवानगी देण्याच्या बाबतीत आमची काहीही हरकत नाही परंतु त्याचबरोबर ज्या ठिकाणी गरज आहे त्या ठिकाणी अनेक संस्था चालकांनी मराठी माध्यमाच्या शाळा चार पाच वर्षापासून सुरु केलेल्या आहेत त्या शाळांना परवानगी देण्यासंबंधीचे प्रस्ताव रद्द करण्यात आलेले आहेत. या महाराष्ट्रातील मराठी माध्यमांच्या शाळांना जर परवानगी दिली जात नसेल तर ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे.तेव्हा राज्यातील मराठी शाळांना देखील परवानगी देण्यात यावी अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे.न्यायालयाचे कामकाजसुध्दा मराठीतून होण्याची आवश्यकता आहे. त्याही दृष्टीने शासनाने कार्यवाही करावी अशी माझी सूचना आहे.आदिवासी भागात काही आश्रम शाळा आहेत. शासनाने असे धोरण जाहीर केले होते की, आदिवासी भागातील आश्रम शाळारमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांना इंग्रजीतून शिक्षण देण्यात येईल. दरवर्षी 2500 व्दिार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या विशेष शाळा सुरु करुन त्यांना शिक्षण देण्यात येणार आहे. आदिवासी मुलांना इंग्रजीतून शिक्षण देण्यास माझी काहीही हरकत नाही . परंतु त्याचबरोबर आश्रम शाळेतील अवस्था विचारात घेतली तर आपल्याला असे दिसून येईल की, त्या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत.

(सभापतीस्थानी माननीय उपसभपती)

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोते ...

त्यांच्या जेवणाचा विषय असेल, कपड्यांचा विषय असेल, राहण्याचा विषय असेल, स्नानगृहांचा विषय असेल, स्वच्छतागृहांचा विषय असेल या बाबतीतील गंभीर परिस्थितीचा आपण विचार केला तर पुन्हा दरवर्षी या 2500 विद्यार्थ्यांचे आपण हाल व शोषण करणार आहात. तेव्हा प्रथम आपण त्यांच्या आश्रमशाळांची परिस्थिती सुधारा आणि मग या इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या बाबतीत विचार करावयास हरकत नाही. सभापती महोदय, मागासवर्गीयांना त्यांनी भरलेल्या फीची प्रतिपूर्ती करण्याची आपण तरतूद केली आहे परंतु आजही अनेक अनुदानित शाळांतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी त्यांना परत केली जात नाही. सभापती महोदय, त्यानंतर माझा शेवटचा मुद्दा मांडून मी भाषण संपविणार आहे. सभापती महोदय, आज राज्य सरकारने कायम विनाअनुदानित शाळांच्या बाबतीतील 'कायम' हा शब्द काढून टाकला आहे आणि त्या शाळा विनाअनुदानित झाल्या असून हळूहळू त्याही अनुदानित होणार आहेत. पण त्यांचेही मूल्यांकन होण्याची आवश्यकता आहे. याचाही गांभीर्याने विचार व्हावा. तसेच विनाअनुदानित शाळांमध्ये संगणक व अन्य बाबतीत मदत मिळण्यासाठी आमदार आणि खासदार निधीतून आम्ही मदत देऊ करतो. लोकप्रतिनिधी देखील या विनाअनुदानित शाळांना, ज्यांना खऱ्या अर्थाने कोणत्याही प्रकारची मदत मिळत नाही त्यांना मदत करू इच्छितात म्हणून आमदार खासदारांना त्यांच्या निधीतून या विनाअनुदानित शाळांना संगणक वगैरे सुविधा उपलब्ध करून देण्यास आपण परवानगी देण्याची आवश्यकता आहे ती आपण द्यावी अशी विनंती करून मी भाषण संपवितो.

***

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : अजून किती सन्माननीय सदस्य बोलण्याचे राहिले आहेत ? ... माझ्या अंदाजाप्रमाणे अजून 5-6 जण बोलावयाचे आहेत. ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेमध्ये विरोधी पक्ष सदस्य प्रामुख्याने बोलत असतात परंतु येथे तर असे दिसून येते की, सत्तारूढ पक्षाचे सदस्य अगदी सगळेच्या सगळे बोलत आहेत. वास्तविक त्यांचे सरकार आहे, त्यांच्या सरकारने केलेल्या योजना आहेत त्याबद्दल अगदी सगळ्यांनीच अभिनंदन केले पाहिजे असे नाही. का त्यांनाही त्यांच्या सरकारचे धोरण, योजना पसंत नाहीत का ? त्यांनाही त्यात काही त्रुटी आहेत असे वाटते आहे का ? खरे तर सत्तारूढ पक्षाच्या नेत्यांनी त्यांना सांभाळले पाहिजे. विरोधी पक्षासारखीच सत्तारूढ पाक्ष सदस्यांची भूमिका आहे काय? हे बरोबर नाही.

..... 4एफ 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांनी माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे अभिनंदन करणारा जो ठराव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलत असताना मी पहिल्या प्रथम आपल्याला सांगू इच्छितो की, माननीय राज्यपालांनी सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केलेले आहे. राज्यपाल हे सुसंस्कृत, सुविद्य आहेत आणि त्यांच्या या मनस्वीपणाबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये राज्याच्या संकल्पित धोरणाचा आणि योजनांचा आढावा असतो. तो आढावा राज्यपालांच्या याही अभिभाषणामध्ये आपल्याला निश्चितपणे पहावयास मिळतो. त्यामुळे हे भाषण अतिशय सुरेख असेच आहे. यापूर्वीची राज्यपालांची अभिभाषणे पाहिली तर राज्यपालांच्या अभिभाषणानुरूप राज्य सरकारने अमलबजावणी केली आहे आणि त्याचा परिणाम असा झाला आहे की, महाराष्ट्रात तिसऱ्यांदा कॉंग्रेस-राष्ट्रवादी कॉंग्रेसचे संयुक्त सरकार सत्तेवर आले आहे. सभापती महोदय, आमच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तसेच महसूल मंत्री आणि दोन्ही पक्षांचे सर्व सन्माननीय नेते यांच्या संयुक्त प्रयत्नांचा परिणाम म्हणूनच राज्यपालांना पुन्हा येथे अभिभाषण करावे लागले आहे. सभापती महोदय, थोर विचारवंत प्लुटो असे म्हणतो की, राज्यसत्ता ही विवेकी व्यक्तीच्या हाती असावी....

(यानंतर श्री. सरफरे ....4जी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले...

आणि राज्यकर्ते हे तत्व विवेकपूर्णत: कामकाज करणारे असावेत. मला वाटते की, महाराष्ट्रामध्ये विवेकपूर्ण व्यक्तींच्या हाती सत्ता असल्यामुळे या अभिभाषणामधील आश्वासनांची अंमलबजावणी निश्चितपणे महाराष्ट्रात होत आहे.सभापती महोदय, यापूर्वीच्या अभिभाषणामध्ये माननीय राज्यपालांनी फोर्स वनची स्थापना केली जाईल असे सांगितले होते. त्याची पूर्तता राज्य सरकारने करुन या राज्यातील लोकांना दिलासा दिला आहे. त्यांच्या जीविताचे व मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी हे शासन कटिबध्द आहे. म्हणून मी या कृतीशील अभिभाषणाचे मनापासून स्वागत व अभिनंदन करीत आहे. सभापती महोदय, फोर्स वन ही राज्यातील जनतेचे संरक्षण करणारी सक्षम संघटना आहे. त्यामुळे मला खात्री आहे की,यानंतर 26/11 चा प्रयोग या महाराष्ट्रामध्ये होणार नाही. आणि दुर्दैवाने तसा कुणी करण्याचा प्रयत्न केला तर या महाराष्ट्रात व या देशात त्याचे नामोनिशाण शिल्लक राहणार नाही. अशाप्रकारचा विश्वास माननीय राज्यपालांनी महाराष्ट्रातील जनतेला दिला आहे, म्हणून मी त्यांचे मनापासून अभिनंदन करीत आहे.

सभापती महोदय, मी अतिरेक्यांचे समजू शकतो परंतु या देशातील भूमिपुत्र असलेला नागरिक आज नक्षलवादी कां होत आहे? याबाबत चिंतन करण्याची गरज आहे. महाराष्ट्र सरकारच्या वतीने कृती आराखडा तयार करण्यात आला त्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आहे. परंतु या नक्षलवादी चळवळीला प्रशासनामधून छुपा पाठिंबा आहे काय? याबाबत विचार करण्याची गरज आहे. त्यांना व्यापारी आर्थिक पुरवठा करतात काय, याबाबत विचार करण्याची गरज आहे. त्यादृष्टीने राज्य सरकारने प्रयत्न केला तर मला खात्री वाटते की, आज ना उद्या नक्षलवादी चळवळ आपण पूर्णपणे मोडीत काढून शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करु. त्यासाठी राज्यामध्ये समन्वयाची आवश्यकता आहे, तो समन्वय प्रस्थापित करण्यासाठी उच्च स्तरीय प्रयत्न करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी अभिभाषणामध्ये आदिवासींसाठी प्रत्येक वर्षी 100 कोटी रुपये देण्याचे आश्वासन दिले आहे. ही आदिवासी मुले या देशाची नागरिक आहेत, या देशाचे भूमिपुत्र आहेत. त्यांचा पूर्वज वाल्मिकी आहे, ज्याने रामायणासारखे महाकाव्य केले. "प्रभाते मनी राम चिंतीत जावा! नभासारखे रुप माझ्या राघवाचे ! ब्रम्हांड भेदून राम कथा पल्याड न्यावी" अशाप्रकारचे महाकाव्य देणारा वाल्मिकी समाज आज उपेक्षित आहे. त्यांना न्याय देण्यासाठी शासनाने प्रत्येक वर्षी 100 कोटी रुपये दिले आहेत त्याबद्दल मी राज्य सरकारला मनापासून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

प्रा. सुरेश नवले...

धन्यवाद देतो. आणि म्हणून आदिवासी जनतेचा विकास करण्यासाठी आणि शाहू-फुले-आंबेडकरांच्या राज्यामध्ये, छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारावर चालणाऱ्या राज्याला हे विसरुन चालणार नाही.

सभापती महोदय, हे राज्य सरकार 70 हजार 400 शेततळी उभे करणार आहे. त्यासाठी करोडो रुपये खर्च येणार आहे. राजस्थानमध्ये उंट प्राणी आढळतो. त्या उंटाच्या पोटामध्ये नैसर्गिकरित्या पाणी साठविण्याची क्षमता आहे. आणि म्हणून ही शेततळे महाराष्ट्र राज्यातील उंट ठरणार आहेत. या कामासाठी जे कापड वापरले जाते ते अतिशय निकृष्ट दर्जाचे असते.त्यामुळे त्या कापडाचा दर्जा सुधारण्यासाठी कृषी विद्यापीठातील तज्ज्ञांना कामाला लावले तर त्याचा उपयोग होईल. आज प्राध्यापक मंडळींचे पगार वाढले आहेत. त्यामुळे त्यांनाही काम केल्याचे मानसिक समाधान मिळेल. त्यांचा शासनाने उपयोग करुन घ्यावा अशी मी सूचना करतो.

सभापती महोदय, या राज्यामध्ये अनादी काळपासून शेतकरी उपेक्षित आहे. राज्य शासन सुध्दा त्यांना शक्य तेवढी मदत करीत आहे. मध्यंतरी फयान वादळ आले ,त्यामध्ये शेतकऱ्याचे कंबरडे मोडले.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ही वस्तुस्थिती असताना या राज्यातील माननीय महसूल मंत्र्यांनी त्याठिकाणी पायपीट करुन गोर गरीबांना, शेतकऱ्यांना मदत देण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला आणि त्यांच्या अंगामध्ये ताप असताना सुध्दा मी या राज्यातील शेतकऱ्यांचे काही देणे लागतो या विचाराने माननीय महसूल मंत्री महोदय शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले.तेथे काम केले आणि त्याचा परिणाम असा झाला की, अति श्रमाचा परिणाम म्हणून शेवटी त्यांना रुग्णालयामध्ये दाखल करावे लागले. त्यांची ॲन्जोप्लास्टी करावी लागली ही बाब विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी विसरता कामा नये. महाराष्ट्र शासनाने विहिरीवरुन जे शेतकरी पाणी घेतात, त्यावरील पाणीपट्टी महाराष्ट्र शासनाने संपूर्णपणे माफ केलेली आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये पाणीपट्टीबाबत उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यामुळे मी माननीय राज्यपालांचे मनापासून अभिनंदन करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासन 20 ते 25 हजार हेक्टर पाणलोट क्षेत्र निर्माण करणार आहे. यावर्षी सिंचनासाठी 7578 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. मला असे वाटते की, यापूर्वी अर्थसंकल्पामध्ये जी तरतूद केलेली आहे, त्यापेक्षाही सर्वांत जास्त करण्यात आलेली तरतूद असा याचा उल्लेख करावा लागेल. महाराष्ट्र शासनाने सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी मराठवाड्यासाठी 159.20 कोटी रुपये, विदर्भासाठी 778.76 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. तशा प्रकारचा प्रयत्न केलेला आहे. म्हणून हे शासन या राज्यातील शेतकरी, शेतमजूर, उपेक्षित, गोरगरीब यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कटिबध्द आहे आणि त्याचा परिपाक म्हणून या तरतुदीकडे लक्ष द्यावे लागेल.

सभापती महोदय, सुजल आणि निर्मल ही जी जल पाणीपुरवठा योजना आहे आणि महाराष्ट्र शासनाच्यावतीने राबविण्यात येणार आहे. परंतु ग्रामीण भागातील पाण्यामध्ये क्षार जास्त आढळतात. अशा पाण्याचा दुष्परिणाम लोकांच्या त्वचेवर होतो, पचनसंस्थेवर होतो, संपूर्ण आरोग्यवर होतो. तेव्हा सुजल आणि निर्मल अभियान राबवित असताना शासनाने याकडे देखील लक्ष द्यावे अशी मी विनंती करणार आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाचा महिलांकडे पहाण्याचा दृष्टीकोन अतिशय पुरोगामी स्वरुपाचा आहे. माझेही मन गहिवरुन येते की, महाराष्ट्राचे शासन महिलांच्या बाबतीत किती उदार आहे आणि त्यामुळें महिलांचे आरक्षण 33 टक्क्यावरुन 50 टक्क्यापर्यंत नेलेले आहे. त्यामुळे या

. . . .4 एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले . . . .

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील काम करणाऱ्या महिला आहेत, त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये प्रातिनिधिक स्वरुपामध्ये जाता येईल आणि महाराष्ट्राचे जे काही प्रश्न आहेत, ते तेथे निश्चितपणे मांडता येतील.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये चौपदरी रस्त्यांच्या बाबतीत उल्लेख केलेला आहे. माझी शासनाला विनंती राहील की, केवळ राज्यस्तरीय चौपदरी रस्त्यांच्या बाबतीत विचार न करता, प्रत्येक जिल्ह्याला चौपदरी रस्त्याने जोडण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. तसेच माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये या राज्यातील विना अनुदानित शाळा आहेत, संस्था आहेत, त्यातील विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाने 1200 कोटी रुपयांच्या तरतुद केल्याबाबत उल्लेख करण्यात आलेला आहे. त्याबद्दल देखील मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, मी केवळ दोन मुद्दे सांगून माझे भाषण पूर्ण करणार आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये ज्या-ज्या मुद्यांचा उल्लेख करण्यात आलेला आहे, तो संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासाच्यादृष्टीने अनिवार्य आहे. यामध्ये राज्य शासनाने महागाईला आळा घालण्या-साठी प्रयत्न करावेत अशी माझी विनंती आहे. विदर्भामध्ये मिहान सारखा प्रकल्प आहे. जर मराठवाडयामध्ये हाच प्रकल्प आला तर तेथील सुशिक्षित बेकारांच्या हाताला काम देता येऊ शकेल. यादृष्टीने राज्य शासनाने निश्चितपणे प्रयत्न करावेत. तसेच राज्य शासन मुंबई येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ तयार करण्यात येणार आहे. मुंबईमध्ये जास्त सुविधा देणार आहे. त्यामुळे मुंबईतील जे सन्माननीय सदस्य आहेत, त्यांच्याही मनामध्ये राज्य शासनाच्या बाबतीत निश्चितपणे आदरयुक्त भावना आहेत. परंतु ते प्रदर्शित करु शकत नाहीत. फक्त खेद व्यक्त करण्याव्यतिरिक्त त्यांच्या पक्षाच्या आदेशाप्रमाणे त्यांच्या वाटयास काही आलेले नाही हे त्यांचे दुर्भाग्य आहे.

सभापती महोदय, सागरी सेतूला कै.राजीव गांधी यांचे नाव देण्यात आले. तुम्हाला आठवत असेल की, मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात आले. त्याही वेळेस डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाला विरोध करणारी ही मंडळी होती.

अशुद्धीत पत्र / शीघ्रलेखापाठी नाही

यानंतर कु.थोरात . . . .

श्री. सुरेश नवले...

राजीव गांधी यांच्या नावाला विरोध करणारी हीच मंडळी आहेत. या राज्यामध्ये हिंसक कारवाया करुन समाजामध्ये विष पेरण्याचे काम जे करतात त्यांचे निर्दालन या राज्यातील राज्य शासनाने कठोरपणे केले पाहिजे, अशा प्रकारची विनंती मी राज्य शासनाला करतो आणि माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचे मी पुन्हा एकदा अभिनंदन करुन माझे भाषण पूर्ण करतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. नवले यांनी आमच्याकडे हात करुन तसेच विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासंबंधी या मंडळींनी विरोध केला. असे म्हटले आहे.....

श्री. सुरेश नवले : सभापती महोदय, भारतीय जनता पार्टीने विरोध केलेला नाही. आपले जे.....

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात)

श्री. अरविंद सावंत : माननीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ज्या पध्दतीने बोलत आहेत ते दुर्दैव आहे. सन्माननीय सदस्य दुसऱ्या पक्षात गेल्यानंतर त्यांची विचारप्रणाली बदलली गेली हे ठीक आहे. पण आपण काल काय होतात हे विसरु नका. "कोण होतास तू काय झालास तू, हे विसरु नका." सन्माननीय सदस्य याच शिवसेनेत जिल्हा प्रमुख होते. याच शिवसेनेत आमदार होते. याच शिवेसेनेत ते मंत्री होते. नामांतराच्या संदर्भात सर्वात चांगली भूमिका कोणी घेतली असेल तर ती शिवसेना प्रमुखांनी घेतलेली आहे. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सुध्दा सन्मान ठेवायला सांगितले आणि मराठवाडयाचा सुध्दा सन्मान ठेवायला सांगितले. हे नाव त्यांनी किती तरी अगोदर सुचविले होते. जसे सीमा प्रश्नाबाबत ते सूचवत असतात. म्हणून सभापती महोदय, सन्माननीय सदस्य या ठिकाणी जे बोलले आहेत ते कृपया रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावे. अशी मी मागणी करतो. चुकीचे रेकॉर्डवर येता कामा नये. माणसाने उचलली जीभ लावली टाळयाला असे न करता, एवढे तरी तारतम्य बाळगावे एवढीच माझी विनंती आहे.

उपसभापती : आपण माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करीत आहोत. कृपया या ठिकाणी कुठलाही गैरसमज पसरेल अशा प्रकारचे वक्तव्य कोणीच करु नये. यानंतर श्री. उपरकर बोलतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ KGS/ SBT/ KTG/

श्री. परशुराम उपरकर (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करण्यासाठी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या आर्थिक वर्षात माननीय राज्यपालांचे दोन वेळा भाषण ऐकण्याची आमच्या सारख्या सदस्यांना संधी मिळाली. पहिल्या मंत्रिमंडळात असलेल्या मंत्र्यांनी जाता जाता कोकणात एक बैठक घेतली. या बैठकीमध्ये कोकणाला गाजर दिले. कोकणातील लोकांना सांगितले की, 5232 कोटी रुपयाचे पॅकेज देणार. सर्व मंत्री पावसात कोकणात आले. त्यांनी तिकडच्या माशांवर ताव मारला. लॉफस्टर खाल्ले. आणखी काय हवे ते खाल्ले (अडथळा) सभापती महोदय, आपण नव्हतात पण मंत्रिमहोदय होते. पण त्या ठिकाणी आल्यानंतर त्या पॅकेजच्या माध्यमातून पोकळ घोषणा केल्या आणि निवडणुकीला सामोरे गेले. जसे कोकणसाठी पॅकेज दिले तसे नाशिकमध्ये कोणाच्या तरी हट्टासाठी बैठक घेतली. दोन्ही ठिकाणी बैठकी झाल्या पण त्या बैठकीतून दोन्ही ठिकाणी काय मिळाले. जसा पदरात धोंडा पडतो तसा धोंडा पडला. बाकी काही मिळाले नाही. त्या ठिकाणच्या मतदारांना फसवून हे शासन परत सत्तेवर आले. पण सत्तेवर आल्यानंतर जुन्या मंत्रीमंडळाने दिलेला शब्द पाळलेला नाही. पण या ठिकाणी सादर झालेल्या पुरवणी मागण्यांमध्ये त्याचा कुठेही उल्लेख केलेला नाही. कोकणासाठी 5232 कोटी रुपयाचे पॅक्ेज दिले. काही वृत्तपत्रांत आणि मासिकांत छापून आले की, कोकणात मंत्रिमंडळाची बैठक झाली.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ....

आणि त्या बैठकीमध्ये 5232 कोटीची भानामती आली. ती खरोखर भानामतीच होती. त्या बैठकीत घोषणा झाल्या परंतु प्रत्यक्षात एक रुपया देण्याबाबतची सुध्दा उपाययोजना झाली नाही, हे खेदाने नमूद करावे लागते. दुसऱ्यांदा मंत्रिमंडळ स्थापन झाल्यानंतर माननीय राज्यपालांच्या भाषणामध्ये त्यांनी याबद्दल उल्लेख केलेला नाही त्याबद्दल मी खेद व्यक्त करतो. कोकणच्या बाबतीत सातत्याने दुजाभाव करण्याचा प्रयत्न होत आहे. अशा प्रकारे कोकणाला फसविण्याचा प्रयत्न चालू आहे. फसवत फसवत इथपर्यंत आणलेले आहे.

माननीय राज्यपालांनी मुद्दा क्रमांक 3 मध्ये सुरक्षेच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. कोकणच्या किनारपट्टीवर 1993 साली आरडीएक्स आले असे बोलले जात होते. ते आरडीएक्स आल्यानंतर उपाययोजना म्हणून पोलीस विभागाकडे एक गस्ती नौका आणली. त्या ठिकाणी जी गस्ती नौका दिली त्यावर 1 कोटी रुपये खर्च केला परंतु त्या गस्ती नौकेसाठी डिझेलची तरतूद केली नाही तसेच ऑपरेटर दिला नाही. ती गस्ती नौका देवगड येथे सडली आहे. ती गस्ती नौका बंदरे विभागाने 13.3.2009 ला लिलावात काढली. आता परत 26/11 चा हल्ला झाल्यानंतर शासनाने मोठा गाजावाजा करुन 2 बोटी पाठविल्या. एका बोटीचे नाव सावित्री असून दुसरी जी 12 टनाची बोट आहे तिचे नाव कल्याणी आहे. या बोटी मालवण बंदरामध्ये उभ्या आहेत. वर्तमानपत्रांमध्ये अशी बातमी छापून आली की, त्या ठिकाणी ऑपरेटर दिलेला नाही. दहशतवादी हल्ला झाल्यानंतर उपाययोजना म्हणून कोकणच्या किनारपट्टीवर गस्ती नौका दिली परंतु त्या गस्ती नौका समुद्र किनाऱ्यावर उभ्या आहेत. त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची गस्त घातली जात नाही. त्यासाठी त्यांना ऑपरेटर दिलेला नाही. त्यासाठी ऑपरेटर देण्याची कृपा करावी. त्याचप्रमाणे त्यासाठी डिझेलची तरतूद करावी. नाही तर परत भ्रष्टाचाराच्या मार्गाने घेतलेल्या या ज्या बोटी आहेत त्या सडतील आणि लिलावात काढव्या लागतील असे मी खेदाने सांगू इच्छितो. काही वर्तमानपत्रामध्ये बातमी आली की, उपाययोजना म्हणून 126 कोटी रुपयांची तरतूद केली. परंतु महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने त्याला कट लावला आणि 126 कोटीवरुन 90 कोटीच्या प्रस्तावाला मान्यता दिली. वित्त विभाग जसे इतर बाबतीत कट लावते त्याप्रमाणे वित्त विभागाने या उपाययोजनेच्या संदर्भात जो कट लावलेला आहे तो योग्य नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर .....

सभापती महोदय, कोकणातील मार्गाचे चौपदरीकरण करण्याची घोषणा करण्यात आली. कोकणातील रस्ता कोकणातील सर्व जिल्ह्यातून गोवा राज्यात जातो. आम्ही दहा वर्षापासून या चौपदरीकरणाबाबत ऐकत आहोत परंतु ते चौपदरीकरण काही होत नाही. कोकणातील सागरी महामार्ग होत नाही. याबाबतीत सुध्दा मी खेद व्यक्त करतो.

या ठिकाणी माननीय आरोग्य मंत्री उपस्थित आहेत. 2012 पर्यंत आरोग्याच्या चांगल्या सुविधा देणार आहोत असा उल्लेख या अभिभाषणामध्ये केलेला आहे. कणकवली येथील उपजिल्हा रुग्णालयातील शवागाराची काय परिस्थिती आहे ? त्या ठिकाणी जे वातानुकुलीत यंत्र बसविले आहे ते दिल्लीवरुन मागविले. ते यंत्र बसविल्यानंतर बंद पडले. पण त्या कंपनीचे लोक इकडे फिरकले नाहीत. त्या कंपनीची 10 टक्के रक्कम ठेवली परंतु कंपनीला जी 90 टक्के रक्कम दिलीत्यातून त्या कंपनीला भरपूर फायदा मिळाला. ती कंपनी या ठिकाणी बघण्यासाठी येत नाही. आता त्या ठिकाणी पोलिसांना एखादे बेवारस प्रेत ठेवावयाचे असेल तर बर्फाचा वापर करतात. त्या ठिकाणी शवागारात बर्फाचा वापर करावा लागतो. मी त्या ठिकाणी स्वत: गेलो होतो. मी त्या रुग्णालयाच्या डॉक्टरांची बैठक घेतली. त्या बैठकीमध्ये डॉक्टरांनी सांगितले की, या रुग्णालयामध्ये नोव्हेंबर महिन्यापर्यंत एक रुपयाचे सुध्दा औषध आलेले नाही. आम्ही 18 लाख रुपयांच्या औषध खरेदीचा प्रस्ताव पाठविलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर....

आम्ही मागील वर्षी आलेली औषधे वापरतो, राष्ट्रीय ग्रामीण योजनेतील पैसे वापरुन औषधे घेतो असे त्यांनी मला सांगितले. अशाप्रकारची दुर्दशा तेथे निर्माण झालेली आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात डॉक्टर्स नाहीत हे मी अनेक वेळा सांगितले आहे, परंतु पालथ्या घडयावर पाणी अशी स्थिती राज्य सरकारची आहे. सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी राज्यपालांच्या अभिभाषणातील बऱ्याच मुद्यांचा समाचार घेतलेला असल्यामुळे मी त्याची पुनरावृत्ती करीत नाही. परंतु अनेक मुद्दे राज्यपालांच्या अभिभाषणात न आल्यामुळे मी खेद व्यक्त करतो आणि येथेच थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनाचे आदरणीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांनी राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल अभिनंदन करण्याचा प्रस्ताव मांडलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सप्टेंबर महिन्यामध्ये कोकणात अतिवृष्टी झाली. परंतु राज्यात इतर भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती त्यासाठी सरकारने शेतकऱ्यांना भरीव मदत केली आहे त्याबद्दल सरकारचे जाहिररित्या अभिनंदन करतो. त्यानंतर फयान वादळामुळे शेतकऱ्यांचे व मच्छिमारांचे अतोनात नुकसान झालेले आहे. अतिवृष्टीमध्ये मातीची घरे पडल्यामुळे त्या घरांचे पंचनामे झाले. शासनाच्या धोरणाप्रमाणे एक भिंत पडल्यानंतर 2400 रुपयांची मदत दिली जाते. पण कालांतराने ते घर पूर्णपणे पडते. म्हणून माझी सरकारला विनंती आहे की, या मातीच्या घराची पूर्ण किंमत द्यावी. ही मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या गोरगरीब जनतेला शासनाने न्याय द्यावा.

सभापती महोदय, मत्स्यव्यवसाय क्षेत्रामध्ये कोकणात 70 कोटी एवढया रकमेच्या 30 लहान धक्क्यांना मंजुरी देण्यात आली आहे. त्याबद्दल शासनाला धन्यवाद देतो. फयान वादळामुळे मच्छिमार संकटामध्ये सापडलेले आहेत त्यांना शासनाने मदत केलेलीच आहे. परंतु यानिमित्ताने माझी शासनाला विनंती आहे की, त्या लोकांना कमी व्याज दराने कर्जही उपलब्ध करुन द्यावे. परराज्यातून राज्यातील या चारही जिल्हयांमध्ये मच्छिमारांचे आक्रमण होते. त्याला प्रतिबंध योग्य त्या पध्दतीने करण्यात यावा. रास्त दराने त्यांना रॉकेल द्यावे. गुजराथ, कर्नाटक राज्यामध्ये ज्याप्रमाणे गॅसकिट बसविले आहे तसे आपल्याकडे बसवून त्यांना दिलासा द्यावा. गेली 4 वर्षे मच्छिमार बांधव संकटामध्ये आहे. ज्याप्रमाणे शेतक-यांना कमी व्याज दराने कर्ज दिले गेले त्याप्रमाणे मच्छिमार बांधवांना कर्जमाफी द्यावी व कमी दराने कर्ज उपलब्ध करुन द्यावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, पाणलोट अभियान या राज्यामध्ये राबविले गेले. तसेच कोकणामध्ये हे अभियान राबवावे अशी विनंती करतो. कोकणामध्ये जवळपास 73 लाख 93 हजार हेक्टर जमीन पडीक आहे. या जमिनीसाठी हे अभियान राबविले तर शेतकऱ्यांना दिलासा मिळेल. कोकणातील

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ SBT/

श्री.राजन तेली....

पाटबंधारे प्रकल्पांसंबंधी सभागृहात अनेकदा चर्चा होते. कोकणातील चार जिल्हयातील जवळपास 90 पाटबंधारे प्रकल्प प्रलंबित आहेत. त्यासाठी 37 कोटींची तरतूद केली आहे त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. परंतु 1982 सालापासून हे प्रकल्प प्रलंबित आहेत. या प्रकल्पांसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, माझी शासनाला एक विनंती आहे. कोकण रेल्वे या विषयावर मी अशासकीय ठराव मांडला होता. या अभिभाषणात मुंबई शहरासाठी मेट्रो रेल्वे व मोनोरेलचा उल्लेख करण्यात आलेला आहे. कोकण रेल्वेसाठी कोकणातील लोकांनी आपली जमीन दिलेली आहे. कोकणातील लोकांसाठी एकच कोकण कन्या गाडी उपलब्ध आहे. परंतु कोकण रेल्वेतून कोकणातील लोकांना प्रवास करण्यासाठी जागा मिळत नाही. या विषयी पाठपुरावा करण्यासाठी कोकणातील सर्व आमदारांना घेऊन केंद्र सरकारकडे जाण्याचे मंत्रिमहोदयांनी मान्य केले होते. सावंतवाडी येथे एक टर्मिनल सुरु करुन कोकण कन्यासारखी विशेष गाडी केवळ कोकणासाठी सुरु करण्यात यावी.

यानंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राजन तेली....)

लांब पल्ल्याच्या गाड्या कोकण सोडून इतर राज्यामध्ये थांबतात. या लांब पल्ल्याच्या गाड्या कोकणामध्ये आणि विशेषत: सिंधुदुर्ग हे पर्यटन स्थळ असल्यामुळे सिंधुदुर्गमध्ये थांबविण्यात येण्यासाठी केन्द्राकडे पाठपुावा कावा अशी माझी मागणी आहे. कोकणातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याच्या संबंधात मागील अधिवेशनामध्ये कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन्यासंबंधीचा ठराव आला होता. याबाबतीत राज्य सरकारने केन्द्र सरकारकडे आग्रही मागणी लावून धरावी अशी मी या निमित्ताने राज्य शासनाला विनंती करुन माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अरविंद सावंत)

श्री. भगवान साळुंके (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील अभिनंदनाच्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 3 मध्ये राज्यातील सामान्य नागरिकांची सुरक्षा व संरक्षण यासंबंधी उल्लेख करण्यात आलेला आहे. दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत असल्याचे त्यामध्ये नमूद केलेले आहे. परंतु त्यासाठी किती रकमेची तरतूद केलेली आहे याचा उल्लेख नाही. दहशतवाद निर्माण करणारी जी शक्ती आहे तिच्या पासून तरुणांनी दूर रहावे यासाठी त्यांचे प्रबोधन करण्याकरिता कोणती यंत्रण निर्माण करण्यात येणार आहे यासंबंधीचा उल्लेख अभिभाषणामध्ये नाही. दहशतवाद रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक उपाय करण्याची आवश्यकता आहे.

अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 5 मध्ये नक्षलग्रस्त जिल्ह्यांकरिता एक विशेष कृति-योजना तयार केल्याचा आणि त्यासाठी आर्थिक तरतूद केल्याचा उल्लेख आहे. केवळ आर्थिक तरतूद केली म्हणजे जबाबदारी संपली असे होता कामा नये. तर विशेष कृति-योजनेंतर्गत कोणता कृति-कार्यक्रम राबविला जाणार आहे याचा उल्लेख अभिभाषणामध्ये असता तर बरे झाले असते. गडचिरोली जिल्ह्याचा उल्लेख या ठिकणी करण्यात आला. गडचिरोली जिल्ह्यामध्ये सरकारी यंत्रणेतील मंडळींना वाहन आणि इतर भत्ते मिळण्यासाठी कमिशन द्यावे लागते अशी माझी माहिती आहे. याप्रकरणी योग्य ती कारवाई करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, चालू वर्षी अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे. ग्लोबल वॉर्मिंग आणि प्रदूषणाचा प्रश्न दिवसेंदिवस तीव्र होत चालला आहे. ऋतूचक्रामध्ये अनियमितता निर्माण झालेली आहे. या परिस्थितीसंबंधी शासन कोणती उपाययोजना करणार आहे याचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये असणे गरजेचे होते.

शेतक-यांच्या उत्पादनामध्ये वाढ होण्यासाठी मत्स संवर्धन, मत्स्यव्यवसाय, दुग्ध व्यवसाय या जोडधंद्याबरोबर फुलांच्या शेतीचा तसेच औषधी वनस्पतींचा उल्लेख आला असता तर बरे झाले असते.औषधी वनस्पतींच्या लागवडीकडे देखील शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. शेतातून

.2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. भगवान साळुंके....)

सकस आणि दर्जेदार उत्पादन मिळण्यासाठी सेंद्रिय शेती करण्यावर भर दिला जाणे आवश्यक आहे. आता निरनिराळया रासायनिक खतांच्या वापरामुळे जमिनी क्षारपट होऊन नापीक होऊ लागल्या आहेत. तेव्हा सेंद्रिय शेतीचा पुरस्कार करण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे या संबंधीचा उल्लेख अभिभाषणामध्ये येणे आवश्यक होते.

अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 8 मध्ये राज्यातील शेतक-यांना केलेल्या कर्जमाफीचा उल्लेख आहे. शेतक-यांचे कर्ज माफ केल्यानंतर त्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण किती घटले आणि त्यांची क्रयशक्ती किती वाढली याचा आढावा घेणे जरुरीचे होते. शेतक-यांची क्रयशक्ती वाढण्याच्या दृष्टीने शासन पुढे कोणता कार्यक्रम राबविणार आहे याचा उल्लेख अभिभाषणामध्ये नाही.

अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 10 मध्ये कोकण, नाशिक व अन्य ठिकाणी प्रतवारी व वेष्टन केंद्रे तसेच शीतगृहांची शृंखला निर्माण करण्यासंबंधीचा उल्लेख आहे. तसेच मुद्दा क्रमांक 11 मध्ये शेततळी बांधण्याच्या भरीव कार्यक्रमाचा उल्लेख आहे. आज जी नैसर्गिक शेततळी अस्तित्वात आहेत ती जतन केली पाहिजेत. राज्यामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातील किती तळी आहेत आणि किती तळी बांधली जाणार आहेत आणि त्यासाठी किती तरतूद केलेली आहे याचा उल्लेख येणे गरजेचे होते. नैसर्गिक तळी अशास्त्रीय पध्दतीने बुजवून नवीन तळी बांधण्यावर खर्च करणे संयुक्तिक नाही. नवीन तळी बांधण्याबरोबरच जुनी तळी सुरक्षित ठेवण्याची आवश्यकता आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नाही

श्री.भगवानराव साळुंखे..

विदर्भ पाणलोट विकास क्षेत्र आणि मराठवाडा पाणलोट विकास क्षेत्र याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम राबविणार असल्याचा उल्लेख आहे. केवळ मराठवाडा आणि विदर्भाला विशेष महत्व देणे मी समजू शकतो. परंतु उर्वरित महाराष्ट्रामध्ये पाणलोट विकास क्षेत्राची आवश्यकता आहे. खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, कोकण असेल त्याठिकाणी या कार्यक्रमाची आवश्यकता आहे. म्हणून या भागात पाणलोट विकास कार्यक्रम राबविण्यासाठी कोणती योजना राबविली जाणार आहे याचा उल्लेख होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, जलसिंचनासंबंधी अभिभाषणामध्ये उल्लेख केलेला आहे. त्यामध्ये असमतोल कसा वाढत जाणार आहे, स्थानिक नैसर्गिक साधनसामुग्रीचा उपयोग करुन जलसिंचन कसे केले जाणार याचा उल्लेख केलेला नाही. शासनाचा दृष्टीकोन केवळ त्या भागात फार मोठी रक्कम दिली म्हणजे आपले उत्तरदायित्व संपले, आपली जबाबदारी रहात नाही असे चित्र मांडणीमध्ये येते असे मला वाटते. केवळ निधीची तरतूद करणे ही प्राथमिकता आहे. परंतु त्याचबरोबर इतर कार्यक्रम समाविष्ट होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक-14 मध्ये गोसीखूर्द प्रकल्पाचा उल्लेख केला आहे. केंद्र शासन 90 टक्के रक्कम खर्च करणार आहे आणि राज्य शासन 10 टक्के रक्कम घालणार आहे. परंतु माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये राज्य शासनाची 10 टक्के रक्कम घालणार आहे ती बाब गुलदस्त्यात ठेवली आहे. राज्य शासन ही रक्कम कधी देणार याचा उल्लेख असण्याची आवश्यकता होती. याबाबत सभागृहामध्ये स्पष्टता होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक-15 मध्ये विहिरींच्या पाण्यावर सिंचन केलेल्या पिकांवरील पाणीपट्टी माफ करण्याबाबत उल्लेख केलेला आहे त्याबद्दल धन्यवाद दिले पाहिजेत. परंतु अस्तित्वात असलेल्या विहिरींची पाणीपट्टी माफ केली जाणार असली तरी नवीन विहिरींद्वारे जलसिंचन वाढविण्याच्या संदर्भात कोणता कार्यक्रम राज्य शासनासमोर आहे याचा उल्लेख अभिभाषणात केलेला नाही.

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक-17 मध्ये रोजगार हमी योजनेद्वारे 85 कोटी श्रमदिनाच्या निर्मितीचा उल्लेख केला आहे. पुढील पाच वर्षात 113 कोटी श्रम दिवसांचे लक्ष्य ठेवले आहे. शासनाचे आणि सभागृहाचे लक्ष मी एका महत्वाच्या बाबीकडे वेधू इच्छितो. व्यवसाय कराची

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवानराव साळुंखे..

निर्मिती 1972-73 मध्ये केली त्यामागील हेतू हाच होता की, रोजगार हमी योजनेसाठी ती रक्कम खर्च केली जावी. परंतु सभागृहात सन्माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले होते की, ती रक्कम योजनेवर खर्च केली जात नाही, ती रक्कम डायव्हर्ट केली जाते. व्यवसाय कराद्वारे संकलित होणाऱ्या निधीचा उपयोग अग्रक्रमाने रोजगार हमी योजनेसाठी केला तर महाराष्ट्रात मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न मार्गी लागू शकेल.

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक-19 मध्ये औद्योगिक विकासामध्ये महाराष्ट्र राज्य हे देशात अग्रेसर राज्य असून राज्यामध्ये अनेक विशाल प्रकल्प सुरु करण्यात येत असल्याचा उल्लेख केलेला आहे. परंतु मुंबई शहरामध्ये राज्यातून येणारे आणि राज्याबाहेरुन येणारे लोंढे रोखण्यासाठी आणि आलेल्यांना सामावून घेण्यासाठी कोणती योजना राज्य शासनासमोर आहे याचा उल्लेख होण्याची आवश्यकता होती.

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक-23 मध्ये नवीन विमानतळांचा विकास करण्याचे शासनाने निश्चित केले असल्याचा उल्लेख आहे. परंतु विमान सेवा मात्र जनसामान्यांना कशी उपलब्ध करुन देणार याचा उल्लेख केलेला नाही. केवळ प्रस्थापितांसाठी हे विमान सेवा उपलब्ध होणार असेल तर जनसामान्यांना ती कधीही मिळणार नाही. याबाबत सभागृहापुढे स्पष्टता होण्याची आवश्यकता आहे एवढे बोलून मी माझे भाषण वेळेअभावी पूर्ण करतो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : माननीय सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणासंबंधी त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव याठिकाणी मांडला आहे. मी अभिनंदन करु शकत नाही. परंतु ज्या पध्दतीने हा प्रस्ताव आणला आहे, या प्रस्तावामध्ये ज्या बाबींचा उल्लेख केला आहे त्या बाबी वाचल्यानंतर आणि सकाळपासून सभागृहामध्ये सत्तारुढ पक्षाकडील सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकल्यानंतर राज्यापुढे कोणतेच प्रश्न शिल्लक राहिलेले नाहीत असे आम्हाला जाणवू लागले आहे.

(नंतर श्री.खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

परंतु परिच्छेद क्र 2 मध्ये असे म्हटले आहे की, "सन 2004 या वर्षामध्ये शासनाने सर्वंकष विकासासाठी काही कार्यक्रम राज्यासमोर ठेवला आणि राज्याच्या जनतेकडून पुन्हा मिळालेल्या विश्वासदर्शक जनादेशामुळे राज्यातील जनतेच्या आशा-आकांक्षांची पुर्तता केल्याचे सिध्द होते. मी सकाळपासून प्रत्येक सन्माननीय सदस्यांची भाषणे येथे ऐकत आहे. त्यात प्रत्येकाच्या भाषणातून हेच उद्धृत होत आहे की आमच्या सरकारला बहुमत मिळाले, जनतेने विश्वास ठेवला आमच्या कार्यक्रमावर, आम्ही जनतेचे पाच वर्षात भले केले म्हणून पुन्हा निवडून दिले वगैरे वगैरे. परंतु बहुमत मिळाले यासंबंधीचा विचार केला तर मी सांगतो की फक्त 33 टक्के जनतेनेच आपल्याला पाठिंबा दिलेला आहे आणि 67 टक्के लोक आपल्या विरोधात आहेत. तुमचे कार्यक्रम फक्त 33 टक्के लोकांनाच भावले आणि 67 टक्के लोकांना त्याचा फायदा मिळालाच नाही, त्यांना कुठलाही न्याय मिळाला नाही हेच या निवडणुकीतून सिध्द झालेले आहे. जाहिरनाम्यात आले असले तरी हे बहुमत म्हणजे जनतेचे बहुमत नाही म्हणून थोडेसे आत्मचिंतन करावे व त्याशिवाय पर्याय नाही. आम्ही वचनपुर्ती केली म्हणतात परंतु वचनपुर्ती म्हणजे काय तर तुम्हीच कबूल केल्याप्रमाणे मुबलक वीज, वीजमाफी याबाबत काय झाले याचाही विचार करावा. आज राज्यात 14-16 आणि 18 तास लोडशेडिंग होत आहे. अशा प्रकारे वीज नाही, वीजमाफी नाही तरी जय हो. 20 रुपये किलोची साखर 40 रुपयावर गेली त्याचा जय हो. 40 रुपये किलोने मिळणारी तुरीची डाळ 100 रुपये किलोवर गेली त्याचा जय हो. अशा प्रकारे आपणच आपली पाठ थोपटून घेत असाल तर ते किती तरी चुकीचे आहे. मी पुन्हा रिपिटेशन करणार नाही परंतु माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे व इतर सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने सांगणार आहे की, आपण जी कर्ज माफी केल्याचे सांगत आहात ती कर्जमाफी विदर्भातच आपण बसलो आहोत त्या विदर्भात फक्त 19 टक्के आहे, मराठवाड्यात 20 टक्के तर खानदेश व पश्चिम खानदेशचा भाग येथे 22 टक्के असा रिपोर्ट डॉ. नरेंद्र जाधव यांनी दिलेला आहे. सुरुवातीला माजी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी पॅकेज दिले की 80 हजार कर्ज असेल तर त्यातील 20 हजारापर्यंत कर्ज शासन भरेल आणि 60 हजार शेतकऱ्यांनी भरावेत. त्यानंतर आमचे मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण यांनाही वाटले की, आपणही काही दिले पाहिजे म्हणून त्यांनी पॅकेज दिले की 20 हजारापर्यंतचे कर्ज शासन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

भरणार. त्यानुसार शेतकऱ्यांनी वरचे सर्व कर्ज भराभर बँकांमध्ये जमा करुन टाकले. या आशेने की सरकार 20 हजारापर्यंतचे कर्ज भरणार आहे परंतु शासनाचे 20 हजार रुपये बँकांमध्ये जमा झालेच नाहीत तरीही जय हो. त्यामुळे शेतकऱ्यांना नव्याने कर्ज मिळू शकले नाही. अशा प्रकारे सरकारने आमिष दाखवून शेतकऱ्यांकडून कर्जाची वसुली करुन घेतली आणि आपला हिस्सा न टाकल्याने शेतकऱ्यांना कर्ज मिळाले नाही. कर्जमाफीची घोषणा करुन निवडणूक लढविली परंतु त्याचा फायदा मात्र 100 टक्के लोकांना मिळाला नाही. पश्चिम महाराष्ट्राची आकडेवारी पाहिली तर एका 3 एकर शेती असलेल्या शेतकऱ्याला 10 लाखापर्यंतचे कर्ज माफ करण्यात आले आणि आमच्या विदर्भ, मराठवाड्यात कोरडवाहू शेतीसाठी एकरी फक्त 3 हजार रुपये कर्ज मिळते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, आमच्या 5 एकरावाल्या शेतक-यांने 15-20 हजाराचे कर्ज माफी मिळाली आहे. यासंदर्भात मी कलेक्टरांकडून यादी मागवली तेव्हा दिसून आले की, पश्चिम महाराष्ट्रातील 3 एकर वाल्या शेतक-याला 10-10 लाख रुपयांपर्यंतची कर्ज माफी मिळालेली आहे. तरी जय हो. पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भामध्ये एवढा फरक आपण केलेला असतांना सुध्दा आम्ही जय हो म्हणायचे का ? या शासनाने जी कर्जमाफी दिलेली आहे ती थोतांड आहे. आम्ही मागणी केली होती की, 2 एकर जमीन असलेल्या शेतक-यावर असलेले कर्ज, 5 एकर जमीन असलेल्या शेतक-याचे कर्ज पूर्णपणे माफ करावे, त्यांचा 7/12 कोरा केला तर आम्ही माननीय राज्यपाल महोदयांचे अभिनंदन करु आणि या शासनाचे देखील अभिनंदन करु. आपण केवळ कर्ज माफीचा ढोल-ताशा बडवलेला आहे. चुकीचे रेकॉर्डवर राहू नये यासाठी मी आपल्याला सांगू इच्छितो की, माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 8 व 9 मध्ये जे लिहिले आहे ते येथे वाचून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही परंतु या शासनाने शेतक-यांच्या डोळयात धूळ-फेक करण्याचेच काम केलेले असले तरी आम्ही माननीय राज्यपाल महोदयांचे तसेच राज्य शासनाचे अभिनंदन करायचे आणि जय हो म्हणायचे काय ? तुम्ही करा जय हो. शेतक-यांना कर्जमाफी दिली नसली तरी आम्ही जय हो म्हणायचे का ?

सभापती महोदय, विदर्भातील सिंचनाच्या बॅकलॉगच्या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातील पॅरा क्रमांक 16 मध्ये उल्लेख आहे की, विदर्भात सिंचनाचा बॅकलॉग शिल्लकच राहिलेला नाही. हे सरकार मोठया प्रमाणात खोटे बोलत आहे. सरकारने विदर्भाच्या बॅकलॉगच्या संदर्भात जी खोटी माहिती दिलेली आहे त्यासंदर्भात माननीय बी.टी.देशमुख यांनी हायकोर्टात रिट याचिका दाखल केलेली आहे त्यामुळे हायकोर्टाने आता रिट याचिकेमुळे नोटीसेस इस्यू केलेला आहे. विदर्भाचा अजूनही 9 हजार कोटीचा बॅकलॉग शिल्लक आहे. विदर्भाच्या बॅकलॉसाठी माननीय राज्यपाल महोदयांनी जे निर्देश दिले होते त्या निर्देशावरुन राज्य सरकारने विदर्भाला पैसे दिले नाही. विदर्भाच्या बॅकलॉगच्या संदर्भात सरकारच्या मनात जो आकडा आला तो टाकला आणि विदर्भाचा सिंचनाचा अनुशेष शिल्लक नाही असे लिहून टाकले. विदर्भाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सिंचनाच्या बॅकलॉगच्या संदर्भात आपण जे काही लिहिले आहे त्यामुळे आपल्याला आता हाय कोर्टात त्याचे उत्तर द्यावे लागणार आहे. या शासनाने माननीय राज्यपाल महोदयांचे निर्देश पाळले नाहीत, भारतीय घटनेचे निर्णय पाळले नाहीत त्यामुळे विदर्भातील सिंचनाचा बॅकलॉग वाढत वाढत गेला असून अजून 9 हजार कोटी रुपयांचा बॅकलॉग शिल्लक आहे. तरी आम्ही आपले अभिनंदन करायचे, तरी आम्ही जय हो म्हणायचे ? तुम्ही खुशाल जय हो म्हणा परंतु आम्ही जय हो म्हणणार नाही.

सभापती महोदय, विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात आपल्याच पक्षाचे खासदार श्री. दत्ता मेघे यांनी परवा लोकसभेत जाणत्या राजाला प्रश्न विचारला की, या वर्षात देखील महाराष्ट्रातील 668 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. मागील 5 वर्षात आत्महत्या केलेल्या शेतक-यांची संख्या 5 हजारापेक्षा अधिक असली तरी आम्ही जय हो म्हणायचे का ?

सभापती महोदय, महाराष्ट्रातील निवडणुकांची धामधूम आटोपल्यानंतर 60 शेतक-यांनी आत्महत्या केली असल्याची माहिती या ठिकाणी माननीय श्री. दिवाकर रावते यांनी दिली आहे. या राज्याचे महसूल मंत्र्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना जे पत्र लिहिले त्या पत्राचा या सभागृहात उल्लेख झ ाला. महसूल मंत्र्यांनी लिहिले की, दारुच्या व्यसनामुळे शेतकरी आत्महत्या करतात. शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात ब्रेकअप माननीय महसूल मंत्री देऊ शकले नाहीत. दारुमुळे , कर्जबाजारीपणामुळे, मुलीचे लग्न करता येत नाही म्हणून किती शेतक-यांनी आत्महत्या केल्या, परंतु या आत्महत्येचा ब्रेकअप माननीय महसूल मंत्री देऊ शकले नाहीत. वर्धा जिल्हयातील एका गरीब शेतक-याची मुलगी दहावीत शिकत होती. तिने फी भरण्यासाठी आपल्या आईकडे 300 रुपये मागितले, वडिलांकडे पैसे मागितले परंतु तिला पैसे काही मिळाले नाही. त्यामुळे मुलीला वाटले की, परीक्षेची फी भरता येत नसल्यामुळे परीक्षा देता येणार नाही म्हणून त्या मुलीने चिठ्ठी लिहिली आणि विहिरीत जीव दिला, तरी आम्ही जय हो म्हणायच ? आपलीच पाठ थापटून घ्यावयाची का ? विदर्भातील सिंचनाचा बॅकलॉग तसाच शिल्लक आहे. सन 2012 पर्यंत महाराष्ट्र भारनियमनमुक्त होईल हे आम्ही माननीय विलासराव देशमुख मुख्यमंत्री होते तेव्हापासून ऐकत आहोत, माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

श्री. दिलीप वळसे-पाटील हे ऊर्जा मंत्री होते तेव्हा पासून तीच तीच भाषणे ऐकत आहोत. राज्य भारनियमन मुक्त करण्याच्या संदर्भात आपण काय प्रयत्न केलेले आहेत त्याची खरी माहिती एकदा आपण सभागृहाला देण्याची कृपा करावी एवढेच मला या निमित्ताने म्हणावयाचे आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

भारनियमन दूर करण्यासाठी देण्यात येणारी आकडेवारी आम्ही नेहमीच ऐकत आहोत. वीज टंचाई नाहीशी करण्यासाठी अमुक हजार कोटी रुपये दिले आहेत,अमुक हजार कोटी रुपयांचे प्रकल्प महाराष्ट्रात उभे राहणार आहेत असे वारंवार सांगण्यात येत असले तरी प्रत्यक्षात मात्र भारनियमन कमी होत नाही उलट विजेचे दरसुध्दा वाढविण्यात येत आहे. केवळ धान्याचे आणि भाजीपाल्याचेच भाव वाढलेले आहेत असे नाही तर विजेचे दरसुध्दा वाढविण्यात येत आहे.

सभापती महोदय,आज धान्याचे भाजीपाल्याचे आणि फळाचे दर वाढलेले आहेत. पाच रुपयाला एक लिंबू विकत घ्यावे लागत आहे. इतके महाग लिंबू आतापर्यंत कधीही विकत घेतलेले नाही. कोथिंबीरसुध्दा 100 रुपये या दराने विकली जात आहे.इतकी महागाई वाढलेली असतांनासुध्दा तिच्या बाबतीत कोणीही बोलत नाही वास्तविक पाहता महागाईच्या मुद्यावर सर्वानी एकत्र आले पाहिजे. महागाई कमी करण्याची जबाबदारी कोणाची आहे ? दहा वर्षा पासून देशात आणि राज्यात आपल्याच पक्षाचे सरकार आहे तेव्हा ही जबाबदारी आपलीच आहे. गोरगरीब माणसे महागाईने त्रासलेली आहे आणि महागाई कमी करावी असे आपल्याला वाटत नाही काय ? तरी सुध्दा "जय हो " म्हटले जाते ही गोष्ट बरोबर नाही. 45 रुपये किलो या दराने तूरडाळ विकत मिळत होती परंतु आता 100 रुपये दराने ती विकत मिळते. तरी सुध्दा "जय हो " चा नारा लावला जातो. इतकी महागाई वाढल्यानंतर महाराष्ट्रातील जनतेला 50 रुपये दराने डाळ उपलब्ध करुन दिली जाईल असा आव सरकारने आणला होता .महागाई संबंधीचा प्रस्ताव ज्या वेळी चर्चेसाठी येईल त्यावेळी मी या संबंधी सविस्तर बोलणार आहे. त्या डाळीमध्ये सोयाबीन आणि लाखोळी डाळीची भेसळ करण्यात आली असून ही डाळ लवकर शिजत नाही. 10 रुपयाची डाळ शिजविण्यासाठी 30 रुपयाचा गॅस लागतो अशी स्थिती या डाळीची असतांनासुध्दा "जय हो " म्हटले जाते .सभापती महोदय, समर्थन देण्याचा किंवा खेद व्यक्त करण्याचा किंवा अभिनंदन करण्याचा हा विषय नाही परंतु हे राज्य शासन माननीय राज्यपालांकडून स्वत:चे कौतुक करुन घेत आहे. राज्यपालाच्या तोंडून आपले कौतूक करुन घेत आहे. आता राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल येथे चर्चा सुरु आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा नाही. एखादी चांगली गोष्ट असेल तर त्याचे आम्ही जरुर अभिनंदन करु. परतु सत्य परिस्थिती काय आहे हे जनतेसमोर आली पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

सभापती महोदय, शेतक-यांना देण्यात आलेल्या पॅकेजचेसुध्दा तीन तेरा वाजले आहेत या बाबतीत सविस्तर बोलण्यासाठी आज पुरेसा वेळ नाही.म्हणून मी त्यासबंधी आता जास्त बोलत नाही. लोकलेखा सामितीने या संदर्भात ताशेरे ओढलेले आहेत. ज्यांनी शेतक-यांच्या टाळूवरील लोणी खाल्ले आहे अशा व्यक्तींना जेलमध्ये घालण्यात येणार आहे काय ? माननीय पंतप्रधानांनी जे पॅकेज दिले होते त्याचा लाभ माजी खासदार, माजी आमदार या लोकांनीच लाटले . गरीब माणसाच्या तोंडातील घास पळवितांना त्यांना शरम वाटावयास पाहिजे होती. परंतु असे घडत असतांनासुध्दा "जय हो" म्हटले जात असेल आणि तरीसुध्दा शासनाचे अभिनंदन करावे असे आपल्याला वाटत असले तर आम्ही मात्र त्याचे समर्थन करु शकत नाही.शेतक-यांसाठी देण्यात आलेल्या पॅकेजमध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याचे लोकलेखा समितीने उघडकीस आणलेले आहे तेव्हा त्या बाबतीत शासन काय कारवाई करणार आहे याबाबतीत खुलासा करण्यात यावा.

सभापती महोदय, या ठिकाणी दारिद्रय रेषेखालील व्यक्तींच्या संदर्भात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात जरुर उल्लेख करण्यात आला आहे.2002 साली दारिद्रय रेषेखालील व्यक्तींचा सर्व्हे करण्यात आला होता परंतु अजूनही दारिद्रय रेषेखालील माणसांना दारिद्रय रेषेखालची कार्डस मिळालेली नाहीत. त्या मुळे आता पुन्हा सर्व्हे करण्याची वेळ आलेली आहे जो सिमेन्टच्या घरात राहतो आणि 35 किलो धान्य घेतो त्याच्याकडे दारिद्रय रेषेखालचे कार्ड आहे परंतु जो झोपडीत राहतो त्याच्याकडे हे कार्ड नाही . सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री छगन भुजबळ यांना मी सांगू इच्छितो की, आपण बहुजन समाजाचे नेते आहात .खरा बहुजन समाज हा झोपडीत राहणारा आहे याची आपण दखल घेतली पाहिजे. दारिद्रय रेषेखालील बोगस कार्ड घेऊन या राज्याला आणि देशाला कोण फसवत आहे याची आपण दखल घेतली पाहिजे. त्याबरोबर दारिद्रय रेषेखालील व्यक्तींचा पुन्हा सर्व्हे करुन ख-या गरीब माणसला हे कार्ड देण्याची गरज आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर

सभापती महोदय, इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत दिली जाते. वैद्यकीय शिक्षण घेणारे पाच विद्यार्थी माझ्याकडे काल आले होते आणि त्यांनी मला असे सागितले की, आमची फी कॉलेजमध्ये जमा करण्यात आलेली नसल्यामुळे आम्हाला आता परीक्षेला बसता येणार नाही. इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी कॉलेजमध्ये जमा करण्याची हमी सरकारने घेतलेली आहे. परंतु इंजिनिअरींग आणि मेडिकलच्या विद्यार्थ्यांची फी अजूनही जमा करण्यात आली नाही . आठ दिवसात जर ही फी जमा झाली नाही तर त्या विद्यार्थ्यांना परीक्षेला बसता येणार नाही हे विद्यार्थी शेवटच्या वर्षाचे आहेत. परीक्षेला जर त्यांना बसता आले नाही तर त्यांचे नुकसान होणार आहे. शासनाकडून वारंवार फुले, आंबेडकराचे नाव घेतले जाते परंतु त्यांच्याप्रमाणे शासन खरोखर वागत आहे काय याचे आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे या ठिकाणी उपस्थित आहेत त्यांच्या एका मुद्याशी मी सहमत आहे. त्यांनी जो मुद्दा मांडला आहे त्या मुद्यासाठी गेल्या 25 वर्षापासून आम्ही सतत शासना बरोबर भांडत आहोत. देशातील आणि राज्यातील शेतकऱ्याला जर खरोखर न्याय द्यावयाचा असेल तर उत्पादन खर्चावर आधारित भाव दिला गेला पाहिजे. शेतीला प्रमुख्य उद्योगाचा दर्जा जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत शेतक-याला न्याय मिळू शकत नाही.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री. फुंडकर ...

परंतु त्याचा कोठेही यामध्ये उल्लेख केलेला नाही. कापसाचे पीक विदर्भात होते परंतु त्याची आता इतकी वाताहात झाली आहे की विचारू नका. गेली चार वर्षे कापूस एकाधिकार योजना बंद आहे. त्यामुळे संपूर्ण कापूस उत्पादक आज व्यापाऱ्यांच्या हातात सरकारने सोपविले आहेत. कापूस एकाधिकार योजनेचे विधेयक या वर्षी आणू, पुढील वर्षी आणू असे आम्हाला वारंवार सांगितले जाते. मध्यंतरी माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी मलाच प्रॉमिस केले होते की, पुढील वर्षी आपण निश्चितपणे कापूस एकाधिकार खरेदीचे विधेयक आणू परंतु ही योजना आजही सुरू झालेली नाही आणि आज ती पूर्णपणे बस्त्यात बांधून ठेवली गेली आहे. आज राज्यात पणन महासंघ कापसाची खरेदी करीत नाही तर नाफेड करते आणि नाफेडचा एजंट म्हणून पणन महासंघ राज्यात काम करीत आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे की, कापूस उत्पादक शेतकरी हा व्यापाऱ्यांकडून पूर्णपणे नागवला जातो आहे. राज्यामध्ये कापसाला 2200, 2400 रूपये भाव दिला जातो आणि बाहेर कापसाचे भाव 3500 रूपये आहे. 2200-2400 रूपयाला राज्यातील कापूस उत्पादकाकडून खरेदी केलेला कापूस गुजरात मध्ये 4 हजार रूपयांनी विकला जातो आहे आणि त्यातून शेतकरी पूर्णपणे नागवला जातो आहे. पण या कापूस उत्पादक शेतकऱ्याबद्दल या अभिभाषणात कोठेही उल्लेख नाही.

सभापती महोदय, राज्यातील नक्षलवाद्यांचा प्रश्न या ठिकाणी अनेक वक्त्यांनी उपस्थित केला. मी चार दिवस नक्षलाईट भागामध्ये दौरा केला आहे. 1 ते 4 तारखेपर्यंत गडचिरोली, भंडारा या भागामध्ये मी फिरत होतो. तेथे मी जे काही पाहिले, अनुभवले त्यावरून हे नक्षलवाद्यांचे राज्य आहे की, महाराष्ट्र सरकारचे राज्य आहे असा प्रश्न पडतो. तेथील एस.पी.ने मला सांगितले की, तुम्ही तेथे जाऊ नका, तो नक्षलाईट एरिया आहे. मी त्यांना सांगितले की, मी त्या भागात जाणारच, तुला पाहिजे तर मला संरक्षण दे अथवा देऊ नको आणि मी त्या भागात चार दिवस फिरत होतो. सभापती महोदय, त्या भागामध्ये सायंकाळी 6 वाजल्यानंतर कोणीही बाहेर पडू शकत नाही, फिरू शकत नाही. तेथे नक्षलवाद्यांची इतकी दहशत आहे की विचारू नका. तेथील सगळे व्यवहार, मार्केट बंद, एसटी बसेस देखील बंद, गाड्या बंद. कोणी एखादा शेतकरी शेतावर गेला तर त्याला देखील शेतावर जायला बंदी असते. राजकीय पक्ष देखील इतका कडकडीत बंद करू शकत नाहीत इतका 'कडकडीत बंद' या नक्षलवाद्यांचा तेथे असतो. अगदी अघोषित असा बंद तेथे

.... 4क्यू 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ...

त्यावेळी होता. रस्त्यावर साधे चिटपाखरू देखील दिसत नाही. सभापती महोदय, मी जेव्हा त्या भागात गेलो होतो त्याच्या आदल्याच दिवशी एका व्यापाऱ्याची मान चिरून नक्षलवाद्यांनी हत्या केली होती. त्याचे कुटुंबीय लोक पोलिसांकडे गेले आणि त्यांनी पोलिसांना सांगितले की, आमचा माणूस नक्षलवाद्यांनी मारून टाकला आहे, तरी तुम्ही त्याचा पंचनामा करून आमच्याकडे बॉडी द्या. त्यावर पोलिसांनी त्यांना दिलेले उत्तर मी आपल्याला सांगतो. पोलिसांनी त्यांना सांगितले की, आम्ही त्या भागामध्ये जात नाही. तुम्ही स्वत:च तेथे जा आणि त्या नक्षलाईट एरियातून त्याचा मृतदेह उचलून आणा म्हणजें मग आम्ही त्याचा पंचनामा करू आणि पोस्ट मार्टेम करू. पण आम्ही तेथे जाणार नाही. सभापती महोदय, ही आपल्या शासकीय यंत्रणेची तेथे स्थिती असेल तर मग तुमचे राज्य तेथे आहे का ? तेव्हा 1200-21300 कोटी रूपयांचे पॅकेज देऊन केवळ चालणार नाही. तुमचे कलेक्टर, एसपी, तहसिलदार तेथे काम करीत आहेत पण तेथे खरी सत्ता ही नक्षलवाद्यांचीच आहे. परवाला तेथे नक्षलवाद्यांचे अधिवेशन सुरू आहे. त्याच्या एक दिवसअगोदर एका वन अधिकाऱ्याला त्यांनी उचलून नेऊन ओलीस ठेवले आणि दिवसभर कोणाही वन अधिकाऱ्यांना- कर्मचाऱ्यांना बाहेर पडू दिले नाही. इतकेच नाही तर त्यांची हत्यारेही त्यांनी पळवून नेली. पण आपले पोलीस त्यांचे काहीही करू शकले नाहीत. सभापती महोदय, आपले कलेक्टर, एसपी जेथे राहतात तेथपर्यंत येऊन हे नक्षलाईट रिव्हाल्व्हर काढतात. सभापती महोदय, अशा प्रकारे एका बाजूला नक्षलाईटस् आणि दुसऱ्या बाजूला 26/11 ची घटना घडत असतानाही आम्ही तुमच्यासाठी 'जय हो' म्हणायचे का ? 67 टक्के माणसे तुमच्या विरोधात आहेत हे आपण लक्षात घ्या आणि तरीही तुम्ही स्वत:ला 'जय हो' म्हणवून घेता आणि आम्हालाही म्हणायला सांगता ? इतकेच नाही तर 'काँग्रेस का हाथ, आम आदमी के साथ', खाओ 40 रूपये किलो का गुढ़, खाओ 80 रूपये किलो का तेल' आणि तरीही 'जय हो' अशी स्थिती या राज्याची झालेली आहे. तरीही आम्ही अभिनंदन करायचे का ? सभापती महोदय, मी राज्यपालांचे या भाषणाबद्दल अभिनंदन करणार नाही. या पद्धतीने असेच पुढेही राज्य चालणार असेल, यात दुरूस्ती होणार नसेल तर कशासाठी आम्ही आपले अभिनंदन करायचे ? शेवटी सरकार तरी पैसे कोठून आणणार आहे ? मुंगेरीलाल के हसीन सपने केवळ दाखविली जातात. पण तुमच्यावर किती कर्ज आहे याचा तरी आपण कधी विचार केला आहे का ? 1 लाख 82 हजार कोटी रूपयापर्यंत आपल्यावरील कर्जाचा बोजा गेला आहे. ...

(यानंतर श्री. सरफरे ....4क्यू 1 ...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

त्याचा आपण विचार करणार आहात की नाही? हे राज्य दिवाळखोरीत गेले आहे.आज तहसिलदाराच्या गाडीमध्ये डिझेल टाकण्यासाठी आपल्याकडे पैसे नाहीत. त्याची आपल्याला लाज वाटत नाही. आज राज्यातील तहसिलदारांनी आपल्या गाडयांच्या चाव्या जिल्हाधिकाऱ्यांकडे पोहोचविल्या आहेत. माझ्या बुलढाणा, अकोला जिल्हयामधील तहसिलदारांनी एक दिवस बैठक घेतली. तेथील सर्व तहसिलदार एकत्र आले व त्यांनी संपाची नोटीस दिली. त्या सर्वांनी आपल्या जवळील वाहनांच्या चाव्या एकत्र करुन जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या. आणि त्यांना सांगितले की, वाहनामध्ये डिझेल टाकण्यासाठी पैसे मिळत नसल्यामुळे आम्ही या चाव्या आपल्या ताब्यात देत आहोत. यापुढे आम्ही एस.टी. बसने प्रवास करु. आमची वाहने तुमच्या कार्यालयासमोर उभी राहू द्या. एकदा मी एका उपविभागीय अधिकाऱ्याच्या कार्यालयामध्ये गेलो होतो. त्यावेळी त्याला तुझ्या कार्यालयातील पंखे कां चालू नाहीत? असे विचारले. त्यावेळी त्याने एम.एस.ई.बी. चे विजेचे बिल न भरल्यामुळे विजेचे कनेक्शन तोडून टाकण्यात आले आहे. अशाप्रकारची या राज्याची अवस्था असेल तर आपण कशासाठी 7 हजार कोटी, 1500 कोटी, आणि 1600 कोटींच्या घोषणा करता? आपण एवढे पैसे कोठून आणणार आहात? माननीय उपमुख्यमंत्री श्री. भुजबळ साहेबांना विनंती करतो की, आपण माननीय मुख्यमंत्र्यांना सांगावे की, 1 लाख 82 हजार कोटी रुपयांच्या झालेल्या कर्जाबाबत एक श्वेतपत्रिका प्रसिध्द केली पाहिजे. आणि यामधील सत्य बाहेर आले पाहिजे, महाराष्ट्रातील जनतेला ते समजले पाहिजे. महाराष्ट्रातील नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यासाठी आपण वाटेल ती उपाय योजना केल्यास आम्ही आपणास समर्थन देण्यास तयार आहोत. अतिरेक्यांचा बिमोड करण्यास आम्ही समर्थन देण्यास तयार आहोत. यानंतर 26/11 ची घटना या राज्यात पुन्हा होणार नाही याची आपण काळजी घ्या. त्यासाठी आवश्यक असलेले समर्थन देण्यास आम्ही तयार आहोत एवढे सांगून माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल अभिनंदनाचा प्रस्ताव माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी मांडला.त्या प्रस्तावाला माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे, सर्वश्री सुभाष चव्हाण, माणिकराव ठाकरे, उल्हास पवार, सय्यद जमा, सुरेश नवले, हेमंत टकले व सर्वश्रीमती अलका देसाई, मंदा म्हात्रे यांनी पाठिंबा दिला. त्याचबरोबर विरोधी पक्षाच्या काही सन्माननीय सदस्यांनी खेद व्यक्त केला. त्यामध्ये माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, अरविंद सावंत, दीपक सावंत, नितीन गडकरी, किरण पावस्कर, परशुराम उपरकर, विनोद तावडे, संजय केळकर, चंद्रकांत पाटील, जयंत प्र.पाटील, रामनाथ मोते, केशवराव मानकर, भगवानराव साळुंखे,भाऊसाहेब फुंडकर यांनी भाग घेतला.

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी मांडलेल्या सर्व मुद्यांची नोंद करुन घेण्यात आली आहे. प्रामुख्याने माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी गेल्या दहा वर्षात या राज्य सरकारकडून चांगले काम झाले नाही. मंत्रीपदावरुन शासनामध्ये खेचाखेची झाली. राज्याची सुरक्षितता धोक्यात आली आहे. माननीय मंत्री श्री. आर. आर. पाटील मराठी नाव लावीत नाहीत त्यामुळे आपण त्यांना रिचर्ड रॉबर्ट पाटील असे म्हणत असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे आयबीएन लोकमतबद्दल ते म्हणाले. अजित सहकारी बँक, नांदेड व इतर ठिकाणी असलेल्या विमानतळांच्या संदर्भात, झोपडयांच्या संदर्भात त्यांनी मुद्दे मांडले.माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी 67 टक्के जनता ही एनसीपीच्या विरोधात गेली आहे असे सांगितले. त्यांनी शिक्षण खात्याच्या संदर्भात बरेचसे मुद्दे मांडले. माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी मराठी भाषेच्या वापरासंदर्भात आपले म्हणणे मांडले. प्रत्येक माननीय सदस्यांनी मांडलेल्या मुद्यांना उत्तर देणे वेळेच्या अभावी मला शक्य होणार नाही. परंतु त्यांनी मांडलेल्या सर्व मुद्यांची शासनाने नोंद घेतली आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि यातील जे महत्वाचे मुद्दे आहेत, त्याकडे शासनाने खरोखर लक्ष देणे गरजेचे आहे, सुधारणा करणे गरजेचे आहे आणि काही निर्णय घेणे गरजेचे आहे. यासंदर्भात जरुर ती कारवाई केली जाईल एवढे मी याठिकाणी आपल्याला निश्चितपणे सांगू इच्छितो.

सभापती महोदय, खरेतर हे वर्ष या राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे आणि हेही खरे आहे की, या वर्षामध्ये जनतेने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला कौला दिला आणि पूर्ण बहुमताने निवडून दिले. खरे म्हणजे गेली दहा वर्षे या राज्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षाचे सरकार आहे.आपला युक्तीवाद आहे की, या सरकारच्या विरोधात 67 टक्के जनता विरोधात आहे आणि इतर सन्माननीय सदस्यांनी देखील अशा प्रकारचा युक्तीवाद केला. मला एवढेच सांगावयाचे आहे की, शेवटी लोकशाहीमध्ये जो काही सेटअप आहे, जी काही पध्दती आहे, त्या पध्दतीनुसार हे मान्यच केले पाहिजे की, या राज्यातील जनतेने परत एकदा राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षाच्या बाजून कौल दिला आणि मागच्या दहा वर्षाच्या कालावधीत सरकारमध्ये काम करीत असताना सुध्दा ज्याला इंकम्बन्सी म्हणतात, तशा प्रकारचा फटका सुध्दा बसला नाही. यापूर्वी कदाचित अपक्षांच्या आणि इतर सगळयांच्याच मदतीने सरकार बनवावे लागले. पण यावेळेला पूर्ण बहुमताने सरकार स्थापन झाले आणि अपक्षांनी सुध्दा या शासनाच्या बाजूने कौल दिला. मला फारसे मागे जावयाचे नाही. परंतु काही का असेना, पण आपण आपले सरकार साडेचार वर्षे टिकवू शकला नाहीत हे तर खरेच आहे आणि हे सरकार दहा वर्षे जनतेच्या पाठिंब्यावर टिकून आहे आणि राज्य कारभार करीत आहे. माझा असा अजिबात दावा नाही की, आम्ही 100 टक्के काम केले आहे. 100 टक्के गरीबी दूर झाली, 100 टक्के लोकांना पाणी मिळाले, 100 टक्के लोकांना मदत मिळाली, 100 टक्के लोकांचे शिक्षण झाले, आश्रमशाळांमधील प्रश्न 100 टक्के सुटले आहेत. पण या शासनाने गेल्या पाच वर्षामध्ये जे काही काम केले आहे, त्या कामाच्या विरोधात आपण सर्वांनी प्रचार केला की, शासनाने काही काम केले नाही, निर्णय घेतले नाहीत, अमुक नाही-तमुक नाही. परंतु जनतेला मात्र माहिती होते की, नाही, आपण जे सांगत आहात, त्यापेक्षा शासनाला जेवढे शक्य होते तेवढे काम निश्चितपणे केलेले आहे. म्हणूनच काँग्रेसच्या "जय हो" च्या नाऱ्याला जनतेने सुध्दा प्रतिसाद दिला आणि "जय हो" करीत परत महाराष्ट्रामध्ये एकदा राष्ट्रवादी काँग्रेस व राष्ट्रवादीचे सरकार सत्तेवर आले. मला असे वाटते की

. . . .4 एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भूजबळ . . . .

कदाचित तुमचे म्हणणे जनतेला पटले नाही म्हणून तुम्हाला वाईट वाटत आहे. पण आम्ही तरी काय करणार ? ते सांगा साहेब. तुम्ही सगळयांनी वेगवेगळया पध्दतीने, नवीन-नवीन पक्षांनी सर्व सांगण्याचा प्रयत्न केला. पण आपल्या येथे मान्यता आहे की, जनता आपल्यापेक्षा हुशार आहे. जनतेला माहिती आहे की, सत्तेवर कोणाला बसविले पाहिजे आणि कोणाला उतरविले पाहिजे आणि जनतेने तसा निर्णय दिला आहे. असे कुठे आहे, की या लोकशाहीच्या माध्यमातून जी सरकारे चालतात, त्या सर्वच सरकारला एकूण मतांमध्ये 51 टक्क्यापेक्षा जास्त मते मिळतात आणि मगच ती सत्तेमध्ये येतात. तुमची देखील अनेक ठिकाणी सरकारे कार्यरत आहेत आणि तेथील परिस्थिती देखील अशीच आहे, आपण तेथील आकडेवारी काढून पहावी. म्हणून एक गोष्ट आहे की, लोकशाहीची जी पध्दती आहे, त्यामध्ये लोकांनी हे राज्य चालविण्यासाठी, हा देश चालविण्यासाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्याच बाजूने उभे राहिले पाहिजे अशा प्रकारचा देशस्तरावर निर्णय घेतला, तसाच निर्णय महाराष्ट्रातील जनतेने सुध्दा सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये घेतला.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SMT/ MMP/ KTG/ KGS/ SBT/ प्रथम सौ. रणदिवे.... 19:55

श्री. छगन भुजबळ....

सभापती महोदय, म्हणूनच माननीय राज्यपालांनी हे सरकार साधारणपणे या पुढच्या काळात काय काय काम करु इच्छिते याचे एक दिशादर्शक स्वरुपातील थोडक्यात वर्णन आपल्या अभिभाषणात मांडलेले आहे. सगळेच्या सगळे प्रश्न अभिभाषणात मांडणे शक्यच नाही तसेच अभिभाषणात सगळया प्रश्नाचा उहापोह करणे हे केवळ अश्यक्य आहे. परंतु सर्वसाधारणपणे हे राज्य महत्वाच्या या या प्रश्नावर काम करीत आहे. विचार करीत आहे. निर्णय घेत आहे. कुठले काम प्रगतीपथावर सुरु आहे याचा थोडक्यात आढावा घेणारे असे माननीय राज्यपालांचे हे अभिभाषण आहे. नव्याने निवडून आलेले सरकार कुठल्या पध्दतीने वाटचाल करणार आहे, याचे दिशादर्शन माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये केलेले आहे. या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये निश्चितपणे या महाराष्ट्राला यशाच्या शिखराकडे आणखीन पुढे पाऊल टाकण्यासाठी हे सरकार काम करणार आहे हा दिलासा सुध्दा या अभिभाषणामध्ये निश्चितपणे दिलेला आहे. म्हणून पहिल्यांदा या महाराष्ट्राच्या जनतेने जी प्रगल्भता दाखविली आणि या शासनाला परत एकदा येथे पाठविले त्याबद्दल या महाराष्ट्राच्या जनतेचे सुध्दा मी मनापासून आभार मानतो. त्यांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी निश्चितपणे हे सरकार पुढील पाच वर्षात काम करील अशी ग्वाही मी या ठिकाणी देऊ इच्छितो.

सभापती महोदय, ज्यावेळी याठिकाणी टक्केवारीची भाषा केली जाते त्यावेळी मला दु:ख होते. जनतेच्या या कौलाचा, निर्णयाचा, जनतेने जी इच्छाशक्ती दाखविली, दूरदृष्टी दाखविली, जो जनादेश दिला त्याचा आपण अनादर का करता. ज्यावेळी आपण म्हणता की, 76 टक्के जनता या शासनाच्या विरुध्द आहे आणि म्हणून हे सरकार ज्यावेळी येथे बसेल त्यावेळी सरकारने जय हो चा नारा देऊ नये. परंतू हे आहे खरेच आहे की, जी पध्दती आहे त्या पध्दतीच्या माध्यमातून आज हे सरकार येथे बसले आहे. जनतेने, अधिकाधिक लोकांनी मतदान केले. तो जनतेने दिलेला जनादेश आपण का मान्य करीत नाही. त्यासाठी थोडे दिवस आणखीन लागतील याची मला कल्पना आहे. पराजय पचवायला सुध्दा थोडासा वेळ लागतो, तो एवढा ताबडतोब पचवावा असे काही माझे म्हणणे नाही पण हळूहळू, हळूहळू ते पचवावेच लागेल कारण ते सत्य आहे. म्हणून जनतेचा हा निर्णय खुल्या दिलाने मान्य केला पाहिजे आणि शासन यापुढे जेथे चुकेल त्यावर बोट ठेवण्याचा,सांगण्याचा तुम्हाला सगळयांना अधिकार आहे. परंतु जनतेने दिलेला कौल, विजय याच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ KTG/ KGS/ SBT/

श्री. छगन भुजबळ. . ..

संदर्भातच प्रश्न निर्माण करणे आणि जनतेने जर जय हो चा नारा दिला त्याबद्दल अशा प्रकारची नाराजीची भावना दाखविणे हे बरोबर नाही. माझी खात्री आहे की, जनता या पुढे सुध्दा चांगल्या कामाच्या पाठीमागे या शासनाच्या पाठीमागे जय हो चा नारा देत उभी राहील आणि त्या जनतेचे काम सुध्दा आम्ही या पुढेही करीत राहू. महाराष्ट्राचा हा सुवर्णमहोत्सव ही अतिशय महत्वाची घटना आहे आणि यामध्ये या महाराष्ट्राचा नावलौकिक केवळ या देशातच नाही तर या देशाच्या बाहेरसुध्दा वाढला पाहिजे यासाठी अनेक योजना शासनाने आखलेल्या आहेत. त्या योजनांना शासनाने सुरुवात केलेली आहे. जवळ जवळ 36 हजार कोटी रुपयाचे नियोजन येत्या काही वर्षासाठी शासनाने केलेले आहे. हे दीर्घकालीन नियोजन आहे आणि नजिकच्या भविष्यामध्ये या सगळया योजनांचे दृश्य स्वरुपात आपल्याला दर्शन झाल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये पाऊल टाकतांना किंवा तो साजरा करताना ज्या 105 हुतात्म्यांनी या मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा लढा देतांना जे बलिदान दिले त्यांचे विस्मरण या शासनाला झालेले नाही.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ ...

हे 105 हुतात्मे सगळ्या जनतेचे आहेत, सर्व भाषेचे आहेत हे सुध्दा आपण लक्षात घेतले पाहिजे. त्या सगळ्यांनी एकजुटीने संयुक्त महाराष्ट्राची लढाई लढली. त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपण सगळ्यांनी काम केले पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, सुवर्णमहोत्सवाचा कार्यक्रम सुध्दा आपण आपल्या भगिनी, ज्यांनी या विधिमंडळामध्ये काम केले आहे त्या या देशाच्या महामहिम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील याच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सुरु केला. स्व. यशवंतरावजी चव्हाण यांनी या महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर हा महाराष्ट्र कोणत्या दिशेने जाणार आहे, हा महाराष्ट्र कोणासाठी आहे, हा महाराष्ट्र काय काम करणार आहे, शेतीच्या बाबतीत काय करणार आहे, शेतकऱ्यांच्या बाबतीत काय करणार आहे, उद्योगधंद्याच्या बाबतीत काय करणार आहे, शिक्षणाच्या बाबतीत काय करणार आहे, कृषीच्या बाबतीत काय करणार आहे, सामाजिक न्यायाच्या बाबतीत काय कारणार आहे, आरोग्याच्या बाबतीत हा महाराष्ट्र कसा पुढे जाणार आहे, इन्फ्रॉस्ट्रक्चर उभे करण्यासाठी काय करणार आहे, याचे अचूक दिशादर्शन स्व. यशवंतरावजी चव्हाण यांनी केले. त्याच बरोबर या महाराष्ट्रात जे जे मुख्यमंत्री झाले मग काँग्रेस पक्षाचे स्व. वसंतदादा पाटील असतील, स्व. वसंतराव नाईक असतील त्यांच्यापासून श्री. शरद पवार साहेबांपर्यंत त्याचबरोबर शिवसेनेचे श्री. मनोहर जोशी असतील तसेच शिवसेनेचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. नारायण राणे असतील त्यांचा सुध्दा उल्लेख डॉक्युमेंटरीमध्ये कृतज्ञतापूर्वक केलेला आहे. ते शिवसेनेचे आहेत म्हणून त्यांचे नाव टाळले पाहिजे असे आम्ही केलेले नाही. कारण सर्वांनी आपापल्यापरीने, आपल्या पध्दतीने गेल्या 50 वर्षामध्ये महाराष्ट्राची सेवा केलेली आहे. सगळ्या मुख्यमंत्र्यांनी आपापल्या पध्दतीने, आपापल्या कुवतीनुसार काम केलेले आहे आणि त्यांचा सुध्दा उल्लेख आम्ही केलेला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एक गोष्ट जी सांगितली त्यांच्या म्हणण्याशी मी पूर्णपणे सहमत आहे. हे सगळे करीत असताना सीमा लढा अजूनही पूर्ण झालेला नाही, अजून त्याला यश मिळालेले नाही याचे सुध्दा दु:ख आहे. जे जे कोणी या महाराष्ट्रातील मराठी राज्यकर्ते असतील किंवा सामाजिक, राजकीय कार्यकर्ते असतील त्यांच्या मनामध्ये ही सल, ही खंत आज

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ .....

सुध्दा आहे. जगाच्या पाठीवर झाला नाही एवढा मोठा प्रदीर्घ लढा या ठिकाणी झाला. शेकडो हुतात्मे झाले. अनेक नेते धारातीर्थी पडले. अनेक नेत्यांनी शेवटचा श्वास घेताना आपल्या जवळच्या लोकांना सांगितले की, मी हे करु शकलो नाही, निदान तुम्हीतरी हे करा रे. परंतु ते झाले नाही. यासाठी कोणतेही आंदोलन शिल्लक राहिले नाही. सगळ्या प्रकारची आंदोलने झाली तरी सुध्दा मराठी भाषिक प्रदेश या महाराष्ट्रामध्ये येऊ शकला नाही याची खंत आजही आमच्या मनामध्ये आहे. यासंदर्भात आपण सर्वांनी जी समिती निर्माण केली त्या समितीने शेवटी असे ठरविले की, आपण सुप्रीम कोर्टात गेले पाहिजे. आजही सुप्रीम कोर्टात हा खटला प्रलंबित आहे. त्या ठिकाणी जे जे चांगले वकील असतील किंवा त्यांना जी अधिक माहिती पुरवावयाची आहे ती सगळी पुरविण्याचे काम आपण करीत आहोत. हा जो खटला सुप्रीम कोर्टामध्ये प्रलंबित आहे ते काम लवकरात लवकर व्हावे अशी जी आपली इच्छा आहे तशीच माझी सुध्दा इच्छा आहे.

सभापती महोदय, या महाराष्ट्रामध्ये जे जे निर्णय घेतले, ज्या अनेक योजना घेतल्या त्यातील अनेक योजना या देशाने सुध्दा स्वीकारलेल्या आहेत. अनेक दुसऱ्या राज्यांनी आपल्या योजना स्वीकारलेल्या आहेत. उदा. या महाराष्ट्रामध्ये प्रथम रोजगार हमी योजनेची सुरुवात झाली. त्याचा कायदा करण्यात आला. या ठिकाणी महिला विधेयक मांडण्यात आले. त्रिस्तरीय पंचायती राज पध्दतीची संकल्पना सर्वप्रथम या महाराष्ट्र राज्यामध्ये आली.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ...

माहितीच्या अधिकाराचा कायदा, माहिती तंत्रज्ञान धोरण, औद्योगिक धोरण, माहिती तंत्रज्ञान आधारित सेवा धोरण, वैशिष्टयपूर्ण गृहनिर्माण धोरण, टाऊनशिप पॉलिसी, सहकारी क्षेत्रास प्राधान्य, अनुसूचित जाती, जमातीतील लोकसंख्येच्या आधारावर अर्थसंकल्पात तरतूद, शून्याधारित अर्थसंकल्प, रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून फलोद्यान विकास, क्रीडा धोरण, बालमजूर प्रथेचे उच्चाटन, स्वतंत्र अल्पसंख्याक विकास विभाग स्थापन करणारे देशातील हे पहिले राज्य आहे, ग्रामीण स्वच्छता अभियान, तंटा मुक्त गाव अभियान, कोकण रेल्वे, मुंबई शहराला आंतरराष्ट्रीय महानगर बनिवणारा महत्वकांक्षी प्रकल्प इत्यादी राबविले जात आहेत. महाराष्ट्र सरकारने गेल्या 50 वर्षांमध्ये महत्वाच्या योजना वेळोवेळी राबविल्या आहेत. या योजना देशातील इतर राज्यांनी सुध्दा स्वीकारलेल्या आहेत.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले मत मांडताना मागील वर्षी 26 नोव्हेंबर रोजीच्या घटनेचा उल्लेख केला. हे खरे आहे की, माझे संपूर्ण आयुष्य मुंबईमध्ये गेले. मला नगरसेवक म्हणून व दोन वेळा महापौर म्हणून मुंबईतील लोकांची सेवा करण्याची संधी मिळाली आहे. त्या मुंबईवर असा काही प्रसंग आयुष्यात येईल असे स्वप्नात सुध्दा वाटले नव्हते. परंतु दुर्दैवाने तो प्रसंग घडला. मागील वर्षी 26 नोव्हेंबर रोजी दहशतवाद्यांकडून मुंबईवर हल्ला झाला. हा हल्ला केवळ मुंबईवर नव्हता तर संपूर्ण देशावर केलेला तो हल्ला होता. आमच्या पोलीस दलाचे चोऱ्या, मारामाऱ्या, खून, दरोडे, मोर्चे, बंदोबस्त ठेवणे इत्यादी संदर्भात कामे करणे हे खरे काम आहे. प्रत्यक्षात लढाईचे काम करावे लागेल असे स्वप्नात सुध्दा कोणाला वाटले नव्हते. परंतु ज्या पध्दतीने एकाच वेळी हल्ला झाला, त्याची सगळयांना कल्पना आहे. येथील काही लोक त्या रात्री ज्याठिकाणी हल्ला झाला त्याठिकाणी आले होते. एका ठिकाणी हल्ला झाल्यावर तेथे काही लोक मेले, नंतर दुसऱ्या ठिकाणी केलेल्या हल्ल्यात काही लोक मेले, तिसऱ्या ठिकाणी बॉम्ब हल्ल्यात काही लोक मेले. टॅक्सीमध्ये बॉम्ब फुटल्यामुळे आणि स्टेशनमध्ये हल्ला झाल्यामुळे काही लोक मृत्युमुखी पडले. हे हल्ले तरी कोठे होत आहेत, कोठे काय चालले आहे ते कोणालाही कळणे कठीण होते अशी परिस्थिती त्यावेळी निर्माण झाली होती. पण मुंबईचे, महाराष्ट्राचे मर्द पोलीस दल आहे. त्यांनी या परिस्थितीमध्ये सामना केला. आपल्या प्राणाची

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ...

कुर्बानी दिली. अनेकांची तेथे डयूटी नव्हती. तेथे नेमणूक नव्हती. ते त्यांचे काम नव्हते. परंतु हे सगळे सर्वजण विसरुन गेले होते. मी सबर्बनमध्ये आहे, चर्चगेट किंवा बोरीबंदर स्टेशनमध्ये झालेल्या हल्ल्याशी माझे काय कर्तव्य आहे असे कोणी म्हटले नाही. हे कर्मचारी त्या हल्ल्याच्या ठिकाणी धावत गेले. वॉकी टॉकीवर बोलणा-या पोलिसांनी हातामध्ये गन्स घेऊन चालविल्या. ते सुध्दा मृत्यूमुखी पडले. अनेक पोलीस अधिकारी असे होते की, त्यांना पासपोर्टचे काम दिले होते. श्री.राजवर्धन नावाचे पोलीस कर्मचारी होते. त्यांचे काम अगदीच वेगळे होते. ते सुध्दा व इतर कर्मचारी आपापले शस्त्र घेऊन त्या हॉटेलच्या आतमध्ये गेले आणि दहशतवादाचा मुकाबला करताना धारातीर्थी पडले. परंतु त्यांनी या मुंबईला वाचविण्यात यश मिळविले. एवढेच नाही तर श्री.ओंबळे यांनी ज्या पध्दतीने लढा दिला त्यामुळे कसाब नावाचा एकमेव जीवंत आतंकवादी पोलिसांच्या हातामध्ये आला. त्यामुळे या हल्लेखोराचे व शत्रू देशाचे खरे स्वरुप जगासमोर आले आहे. श्री.शशांक शिंदे याची छत्रपती शिवाजी टर्मिनसमध्ये डयूटी होती. कसाब व त्याचे साथीदार गोळीबार करीत असताना तो समोर आला आणि कसाबवर चाल करुन गेला. त्याच्यावर आपले पिस्तुल रिकामे करण्याचा त्याने प्रयत्न केला. दरम्यान त्याच्यावर अनेक गोळया झाडल्यामुळे त्याच्या अंगाची चाळण झाली. त्यामुळे श्री.शशांक शिंदे तेथेच धारातीर्थी पडला. त्याचे बलिदान हा देश कधीही विसरु शकत नाही.

यानंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. छगन भुजबळ...)

आपल्याला जेवढे करता येईल, जेवढे देता येईल तेवढे सहकार्य आपण दिलेले आहे. शेवटी त्यांचे प्राण परत आणता येत नाहीत. परंतु त्यांच्या कुटुंबाची सेवा करण्याच्या दृष्टीने आपल्याला जे जे काही देता येण्यासारखे आहे ते शासाने दिलेले आहे. काही ठिकणी एखाद्या गोष्टीची पूर्ती झाली नसेल तर शासन जरुर त्याबाबतीत लक्ष घालील. काही गोष्टी राहून गेल्या असतील परंतु त्याबाबतीत आमची मदत करण्याची भावना नाही असे नाही. आमची मदत करण्याची भावना आहे. ज्या गोष्टी त्रुटी म्हणून आमच्या निदर्शनास आणलेल्या आहेत त्या तपासून त्यात ताबडतोब दुरुस्ती करण्याचा प्रयत्न करु. आपणाला जेवढी कळकळ आणि तळमळ आहे तेवढी तळमळ आम्हाला सुध्दा आहे, ती नाही असे नाही. पण त्यापासून आपण निश्चितपणे धडा घेतलेला आहे. आपले पोलीस दल त्या अर्थाने तयार कण्याचा प्रयत्न आपण केलेला आहे. त्यासाठी नवनवीन प्रकाची आयुधे, स्पीडबोटी, फोर्स-वनची निर्मिती या गोष्टी केलेल्या आहेत. सायबर सेल देखील मजबूत करण्याचा प्रयत्न झालेला आहे. वेगवेगळया प्रकारची नवीन गॅझेटस् जी या देशामध्ये उपलब्ध नाहीत ती परदेशातून आणली गेली आहेत. इण्टेलिजन्स मजबूत करण्यासाठी पावले उचलली आहेत. आपणा सर्वांना कल्पना आहे की, एखाद्याची इण्टेलिजन्समध्ये बदली झाली की, त्याच दिवसापासून तो दुसरीकडे बदली करुन घेण्यासाठी प्रयत्न करीत असतो. परंतु आता 300 ते 350 लोक त्याच कामासाठी नेमलेले आहेत. त्यामध्ये संगणक क्षेत्रातील, केमिस्ट्री क्षेत्रातील आणि अन्य विविध विषयातील हुशार मंडळी घेतलेली आहेत. या लोकांनी संपूर्ण गोष्टींचा अभ्यास करुन इण्टेलिजन्स गोळा करुन ते पोलीस दलाला आणि शासनाला कळवायचे आहे. हे काम करण्यासाठी पुणे येथे त्यांचे प्रशिक्षण सुरु केलेले आहे. मिलिटरी, नेव्ही, तटरक्षक दल या महत्वाच्या दलात कोणकोणत्या गोष्टी पाहिजेत याची माहिती त्या दलांच्या प्रमुखांकडून घेतलेली आहे. तटरक्षक दलाचे प्रमुख श्री. बसरा यांची आणि माझी भेट झाली. त्यांनी अनेक गोष्टी सांगितल्या. किनारपट्टीच्या सुरक्षेबाबत काय काय करायला पाहिजे याबाबतची चर्चा आम्ही केली. हे अधिवेशन संपल्याबरोबर त्यांना परत बोलावून ते जे जे काही मागत आहेत ते तयार करण्यामध्ये शासन पावले उचलणार आहे. ह्या सर्व गोष्टी दिल्या आणि ते सोडून दिले अशातला भाग नाही. ज्या गोष्टी घडलेल्या आहेत त्या परत घडणार नाहीत याची काळजी घेतलेली आहे. पण उद्या त्या जर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.छगन भुजबळ...

झाल्याच तर दिल्लीची वाट न पाहता त्याला ताबडतोब उत्तर देऊ शकू अशा प्रकारचे दल उभे करण्याचे काम आपण केलेले आहे.

सभापती महोदय, नक्षलवाद्यांच्या संदर्भात अनेक घटना सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी सांगितल्या. त्या आम्ही नाकारत नाही. त्या घटना अतिशय दुर्दैवी आहेत. तेथे काम करणा-या ठेकेदारांचे खून होतात, काम करायला कोणी येत नाही, इंजिनिअर्स घाबरलेले आहेत. ही समस्या केवळ महाराष्ट्रापुरती नाही. मध्य भारतातील अनेक राज्यांमध्ये त्याचा प्रादुर्भाव झालेला आहे. त्याबाबतीत सुध्दा काम करण्याचे आपले प्रयत्न सुरु आहेत. केन्द्र शासन त्याकडे लक्ष देत आहे, राज्य शासनही त्याकडे लक्ष देत आहे. आपण या भागासाठी येत्या दोन वर्षामध्ये 1386 कोटी रुपये राखून ठेवून कामे सुरु केलेली आहेत. आर्थिक स्वरुपाच्या समस्येतून या समस्येचा जन्म झालेला असल्यामुळे तेथे पायाभूत सुविधा निर्माण करणे, वेगवेगळया सुखसोई निर्माण करुन त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी कृषी, पशुसंवर्धन, पाटबंधारे, शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, उद्योग, वन विकास, पाणी पुरवठा या विभागाच्या माध्यमातून विविध प्रकारच्या योजनांचा समावेश करुन काम केलेले आहे.

....नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ.....

हे करीत असताना नक्षलवाद्यांना सुध्दा वाटते की, हे जर झाले तर लोक मजबूत होतील आणि म्हणून हे काम होऊ नये यासाठी ते जाणीवपूर्वक प्रयत्न करतात आणि तेथील कंत्राटदारांची सुध्दा हत्या करण्यात येते हे खरे आहे. म्हणून तेथे सुध्दा आपले पोलीस दल मजबूत करण्याचे काम सुरु आहे. अहेरी येथे पोलीस अधीक्षक कार्यालय निर्माण करण्यात आले आहे. तेथील पोलीस यंत्रणेचे बळकटीकरण करण्याचे काम सुरु आहे. जर एखादा पोलीस दुर्दैवाने शहीद झाला तर तेथे सुध्दा ज्या पध्दतीने 26.11 च्या घटनेमध्ये मुंबईमध्ये ज्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली त्या शहीदांच्या कुटुंबियांना जशा प्रकारची मदत मिळाली त्याप्रमाणे या लोकांच्या कुटुंबियांना सुध्दा मदत मिळावी म्हणून प्रयत्न करीत आहोत. आता शिक्षण आणि तंत्रशिक्षणामध्ये महाराष्ट्र राज्याने फार मोठी आघाडी घेतली आहे. आज सुध्दा परदेशामध्ये, विशेषत: सिलिकॉन व्हॅलीमध्ये महाराष्ट्रातील, खेडयापाडयातील मुले मोठमोठे उद्योगपती म्हणून नावारुपाला आले आहेत. महाराष्ट्रातील सर्व तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी महाविद्यालये, आय.टी.आय. चांगल्या पध्दतीने शिक्षण देण्याचे काम करीत आहेत. स्व.वसंतदादा पाटील यांच्यासारख्या द्रष्ट्या मुख्यमंत्र्यांनी खाजगी क्षेत्रात इंजिनिअरिंग, मेडिकल कॉलेज सुरु करण्यास परवानगी दिली. आज शासनाच्या आणि खाजगी क्षेत्राच्या माध्यमातून मोठया प्रमाणावर शिक्षणाबाबत आपण आघाडी घेतली आहे. ही आघाडी घेत असताना रोजगाराभिमुख आणि उद्योगाशी निगडित असलेले तांत्रिक अभ्यासक्रम सुरु करण्यावर आपण अधिकाधिक भर देत आहोत आणि हाताला काम देणारे शिक्षण अधिकाधिक कसे उपलब्ध करुन देता येईल याकडे लक्ष देण्यात येत आहे. त्यामुळे देशी आणि परदेशी विद्यार्थी सुध्दा उच्च शिक्षणासाठी महाराष्ट्र राज्याला पहिली पसंती देत आहेत. उच्च शिक्षणाच्या बाबतीत देशातील आणि परदेशातील मुले महाराष्ट्रामध्ये शिक्षण घेण्यासाठी येत आहेत.

सभापती महोदय, राष्ट्रीय ज्ञान आयोगाच्या अहवालानुसार अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये केंद्र शासनाने देश स्तरावर ग्रॉस एम्प्लॉयमेंट रेशो 11 वरुन 15 टक्केपर्यंत नेण्याचे उद्दीष्ट ठरविले आहे. त्या अनुषंगाने तालुका तेथे कला, वाणिज्य, विज्ञान या विद्याशाखांचे किमान एक अनुदान तत्वावरील महाविद्यालय सुरु करण्याचे धोरण आपण आखले आहे. पंतप्रधानांच्या स्कील डेव्हलपमेंट मिशन या महत्वाकांक्षी कार्यक्रमानुसार 2022 पर्यंत 14 ते 45 वयोगटातील महाराष्ट्रातील 5 कोटी लोकांना तांत्रिकदृष्टया कुशल करण्याचा कार्यक्रम आपण आखला आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ.....

त्यानुसार शिक्षणामध्ये गुणात्मक दर्जावाढ करण्यासाठी शिक्षकांच्या नेमणुका करण्यास सुध्दा आपण प्राधान्य देणार आहोत. उच्च शिक्षण व तंत्र शिक्षणासाठी रिसर्च ट्रेनिंग इन्स्टिटयूट स्थापन करण्याचे ठरविले आहे. विद्यार्थ्यांना अद्यावत तंत्रज्ञान उपलब्ध व्हावे यासाठी सर्व विद्यापीठे, परीक्षा मंडळ, तंत्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण मंडळ यांच्या अभ्यासक्रमामध्ये आमुलाग्र बदल करुन समाजोपयोगी आणि जागतिक स्तरावरील बदलाच्या दृष्टीने सुधारित असे कार्यक्रम आपण त्यांना देत आहोत. नॅशनल मिशन ऑन एज्युकेशनल थ्रू आयएसटी या केंद्र शासनाच्या योजनेनुसार कन्टेन्ट डेव्हलपमेंट, ई-लर्निंग, ई-लॅबोरेटरी शिक्षकांचे प्रशिक्षण, विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण, डिजिटल लॅबोरेटरीच्या या संकल्पना 2012 पर्यंत शैक्षणिक संस्था आहेत त्या संगणकाद्वारे जोडण्याचा आपण संकल्प केला आहे. 18 ते 24 वयोगटातील लोकांमध्ये रोजगार आणि कौशल्य पुरेशा प्रमाणात वाढविण्यासाठी, उच्च शिक्षणाचा दर्जा आणि ऊंचावण्यासाठी जीव रसायन शास्त्र, डीएनए चाचणी, क्षेपणास्त्र शास्त्र, सामान्य विश्लेषण, भौतिकशास्त्र, मानसशास्त्र, ब्रेन मॅपिंग, नार्को ॲनालिसीस, सायबर फॉरेन्सिक असे वेगवेगळे अनेक विषय यापूर्वी कदाचित आपल्या अभ्यासक्रमात नव्हते ते विषय सुध्दा आपण घेत आहोत.

(नंतर श्री.खर्चे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ .....

या सर्व विद्यापीठांमध्ये अद्ययावत अभ्यासक्रम तयार करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. एवढेच नव्हे तर शासकीय महाविलयांमध्ये आणखी नवीन 4 आयएएस पूर्व प्रशिक्षण केंद्रे सुरु करण्याचा निर्णयही शासनाने घेतलेला आहे. हे खरे आहे की, भार नियमनाच्या बाबतीत आपण अडचणीत आलो. सन 1995 पर्यंत ही अडचण नव्हती याबद्दलची माहिती आपणही मंत्री होता त्यामुळे आपल्यालाही आहे आणि मलाही आहे. कारण त्यावेळेस प्रत्येक वेळी असा विचार केला जात होता की आपल्याला किती वीज हवी आहे आणि पुढील तीन चार वर्षात किती लागणार आहे त्यानुसार नियोजन होत होते त्याचा अभ्यास करुन विजेचे उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न होत होता. एनरॉनसंबंधीचा इतिहास आपण सर्वांनाच माहीत आहे. एनरॉन कंपनीला आणण्याचा प्रयत्न माननीय श्री. शरद पवार साहेबांनी केला, कंपनीचे काम सुरु झाले आणि पुढे काय झाले हे सर्वांनाच माहीत आहे, ते सांगणे बरे वाटणार नाही पण इतिहास आहे तो आहेच. त्यावेळेस राज्याला विजेची गरजच नाही असेही काही लोकांनी सांगितले होते. परदेशातील कंपनी 20 हजार कोटी रुपये खर्च करुन ज्यावेळेस ॲग्रीमेंट करते आणि ती समुद्रात बुडविण्याची भाषा केली तर कुठली कंपनी येईल आणि सांगेल की आम्ही महाराष्ट्रात आणखी वीज निर्मिती केंद्र उभारतो. त्या कंपन्यासाठी आपला पैसा बुडविण्यासाठी येथे येणार नाहीत. त्याचा फटका राज्याला सन 1999 ते 2004 पर्यंतच्या काळात बसला व भार नियमनाचे शुक्लकाष्ठ सुरु झाले तेव्हा या लोकांच्या लक्षात आले की, आपल्या राज्याला विजेची गरज आहे. पण ज्या गतीने विजेचे उत्पादन व्हायला हवे होते त्या गतीने, त्या पटीने ते वाढले नाही. ग्लोबलायझेशनचा जमाना आला आणि विजेच्या मागणीत वाढ होऊ लागली. अनेक परदेशी कंपन्या देशात व राज्यात आल्या, त्यांना विजेची गरज होती पण ती पूर्ण होण्यासाठी विजेचे उत्पादन आपण करु शकलो नाही म्हणून मागील आठवड्यात मंत्रिमंडळाच्या तीन बैठका माननीय मुख्यमंत्र्यांनी घेतल्या. त्यानुसार राज्यात ताबडतोब वीज निर्मिती केंद्रे कशी उभी करता येतील, अस्तित्वात असलेल्या केंद्रांचे प्रश्न लवकरात लवकर कसे सोडविता येतील यासंबंधीचा उहापोह त्या बैठकीत झाला व निर्णय घेण्यात आला. मी आज सांगू इच्छितो की, सन 2012 सालापर्यंत आपले राज्य विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाल्याशिवाय राहणार नाही. सन 2009 सालामध्ये एकूण 1819 मेगावॅट वीज ओपल्याला मिळणार

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ .....

आहे, सन 2010 मध्ये 1970 मेगावॅट विजेचे उत्पादन होणार आहे आणि डिसेंबर 2011 मध्ये 3570 व 2012-2013 मध्ये 2970 मेगावॅट वीज निर्मिती होईल अशी केंद्रे आपण उभी करीत आहोत. अशा प्रकारे भार नियमनाची तीव्रता कमी करण्यासाठी आजही राज्यात सिंगल फेजिंग सुरु केले आहे. गावठाणाच्या ठिकाणी स्वतंत्र फिडर्स योजना सुरु केली असून 30 हजार गावे आणि 4444 वाडयांमध्ये ही योजना राबवित आहोत. त्यापैकी सप्टेबर 2009 मध्ये 20 हजार गावे आणि 1035 वाडयांचे उद्दिष्ट साध्य झाले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ....

महावितरण कंपनीच्या माध्यमातून 15 हजार कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या कामाला सुरुवात देखील झालेली आहे. त्याच बरोबर पवन ऊर्जा, सौर ऊर्जा तसेच पारंपारीक ऊर्जेला प्राधान्य देण्याच्या कामाला सुरुवात देखील झालेली आहे.

सभापती महोदय, वाढत्या महागाईच्या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उल्लेख केलेला आहे. महागाई पूर्वीपेक्षा वाढलेली आहे ही बाब मी नाकारीत नाही. परंतु महागाई का वाढते आहे याचे कारण सुध्दा आपण शोधून काढले पाहिजे. केवळ आपल्याकडेच महागाई झाली असे नसून सर्वत्र महागाई झालेली आहे. महागाई झाली म्हणून आम्ही स्वस्त बसलेलो नाही. मार्केट भावापेक्षा जीवनावश्यक वस्तू स्वस्त दराने जनतेला उपलब्ध करुन दिल्या जात आहेत व त्यासाठी दर महिन्याला 100 ते 125 कोटी रुपये महाराष्ट्र शासन खर्च करीत आहे. सर्वसामान्य आणि गरीब जननेला महागाईचा त्रास होऊ नये म्हणून शासन दर महिन्याला 100-125 कोटी रुपये दर महिन्याला खर्च करीत आहे. त्यामुळे काही प्रमाणात का होईना मार्केट रेटपेक्षा जीवनावश्यक वस्तू सामान्य जनतेला उपलब्ध होत आहेत. अगोदर तूर डाळीचा भाव 95 रुपये होता तो 70 रुपये झालेला आहे. अगोदर साखर 40 रुपये प्रती किलो होती ती आता 33-34 रुपये प्रती किलो मिळू लागली आहे. रेशनवर आता तुरडाळ 55 रुपये या दराने उपलब्ध करुन देण्यात आली असून साखर 20 रुपये दराने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला दिलासा मिळाला आहे. बीपीएल कार्ड धारकांसाठी तर अजून स्वस्त दराने स्वस्त धान्य उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. या सर्व योजनांसाठी शासनाला दर महिन्याला 100 ते 125 कोटी रुपये खर्च सहन करावा लागत आहे. तसेच भाव वाढीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न होत आहे.

सभापती महोदय, फयान वादळाच्या संदर्भात या ठिकाणी बरीच चर्चा झालेली आहे. फयानमध्ये ज्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना नुकसान भरपाई देण्याच्या कामाला शासनाने आता सुरुवात केलेली आहे.

सभापती महोदय, कुपोषणाच्या संर्भात देखील शासनाने खूप चांगले काम केलेले आहे. अगोदर आदिवासी भागातील बालकांच्या कुपोषणाचे प्रमाण अधिक होते ते प्रमाण आता कमी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ....

करण्यात सरकारला यश मिळाले आहे. सन 2004-05 मध्ये श्रेणी एकचे प्रमाण 42.15 होते ते Iu 2008-09 मध्ये 41.11 झालेले आहे. श्रेणी दोनच्या बालकांचे प्रमाण सन 2004-05 मध्ये 22.26 होते सन 2008-09 मध्ये 22.21 वर आलेले आहे. सन 2004-05 मध्ये अतितीव्र कुपोषणांची संख्या 7452 होती परंतु तीच संख्या सन 2008-09 मध्ये 3858 इतकी झालेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ ...

सभापती महोदय,मागच्या वर्षाची आकडेवारी शासनाकडे येत असते. त्याप्रमाणे मी या ठिकाणी आकडेवारी सांगितलेली आहे. तेव्हा या संदर्भात आपण निश्चितपणे यावर ताबा मिळवत असून हळूहळू ही टक्केवारी कमी कमी होत आहे हे मान्य करण्यास काय हरकत आहे? सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सांवंत हे डॉक्टर असून यामध्ये आपल्याला यश मिळत आहे ही बाब काही कमी नाही म्हणून आपल्याला देखील आनंद झाला असेल असे मला वाटते.अर्थात विरोधी पक्षाकडून जी काही टीका टिप्पणी करण्यात आली होती म्हणून का होईना शासनाने उपाययोजना केल्या असे आपण समजू या... असे म्हणण्यामध्ये जर आपल्याला आनंद होत असेल तर मी तसे सुध्दा म्हणतो परंतु शासनाने केलेल्या कार्यवाहीमुळे 3 हजार 858 पर्यंत ही संख्या कमी झालेली आहे तेव्हा आता तरी आनंद झाला आहे असे सन्माननीय सदस्यांनी म्हणावे.

सभापती महोदय, कुपोषणावर मात करण्यासाठी सरकारने प्राधान्याने लक्ष दिले असून बाल मृत्यूची संख्या घटलेली आहे त्यासाठी राजमाता जिजाऊ माता बाल पोषण मिशन, मानव विकास मिशनची स्थापना केलेली आहे. मला आपल्याला सांगावयाचे आहे की , अशा प्रकारचे मिशन स्थापन करुन त्यांच्या मार्फत काम करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य आहे . या मिशनच्या मार्फत मानव विकास निर्देशाक कमी असलेल्या जिल्हयाकडे विशेष लक्ष देण्याचे काम करण्यात येत आहे.

सभापती महोदय, अल्पसंख्याक समाजाच्या बाबतीत सुध्दा शासनाने काही निर्णय घेतलेले आहेत. सच्चर समितीचा अहवाल आल्यानंतर आपल्याला कळले की,आदिवासी आणि दलित समाजा पेक्षासुध्दा नोकरी,शिक्षण आणि इतर गोष्टीमध्ये अल्पसंख्याकाचे प्रमाण कमी आहे त्यामुळे त्यांना नोक-या आणि शिक्षण देण्याची आवश्यकता आहे. म्हणून सरकारने त्यांच्यासाठी कोटयावधी रुपये मंजूर केलेले आहेत आणि ते पैसे खर्चही केलेले आहेत. त्यातून अल्पसंख्याकाच्या मुलांना फी माफी शिष्यवृत्ती, गणवेष व वसतिगृह देण्यासाठी तसेच त्यांच्या शाळा दुरुस्त करण्यासाठी शासनाने काम सुरु केले असून त्यांचे गावा गाववातील महानगरातील आणि नगरातील प्रश्न सोडविण्यासाठी कोटयावधी रुपये शासनाने दिलेले आहेत.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी प्रत्येकी सव्वा दोन ते अडीच हजार कोटी रुपये अर्थसंकल्पात ठेवलेले असून त्यातून या समाजातील लोकांना व त्यांच्या मुलांना रोजगार देण्याचे , शिक्षण देण्याचे त्यांच्याकरिता इनफ्रास्ट्रक्चर उभे करण्याचे नवीन वसतीगृहे बांधण्याचे तसेच नवीन उद्योग निर्माण करुन त्यांचा आर्थिक स्तर उंचाविण्याचे शासनाने काम केलेले आहे. सभापती महोदय, या ठिकाणी मी आपल्याला दाव्याने सांगतो की, आदिवासी आणि दलित समाजासाठी हे राज्य सरकार जेवढे पैसे खर्च करीत आहोत तेवढे पैसे देशातील इतर कोणतेही राज्य खर्च करीत नाही.

सभोपती महोदय, महिलांसाठीसुध्दा काही चांगले निर्णय घेण्यात आलेले आहेत. महिलांवर होणारे अत्याचार आणि हुंडाबळीचे प्रमाण कमी करण्यासाठी बाल विकास प्रकल्प अधिका-यांना संरक्षक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले असून 3 हजार 694 संरक्षण अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेमार्फत तसेच राज्य महिला आयोगा मार्फत 250 मोफत कायदा विषयक सल्ला केन्द्रे निर्माण केली आहेत तसेच गृह विभागाच्या माध्यमातून 45 पोलीस स्टेशनमध्ये महिला सहाय्यक कक्ष निर्माण करण्यात आलेले आहेत. महिलांना समुपदेशन आणि कायदेशीर सहाय्य उपलब्ध करुन देण्यासाठी 132 सेवा संस्थांनी नोंदणी केली असून त्यांना शासनाकडून मदत केली जात आहे. राज्यात आश्रय गृहे आणि त्री स्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या असून पीडित महिलांना त्वरित वैद्यकीय सेवा देण्यासाठी आरोग्य संचालनालयाला सूचना देण्यात आलेल्या आहेत त्याच प्रमाणे महिला विषयक कायद्याच्या बाबतीत सुध्दा विस्तृत प्रसिध्दी करुन त्यातून त्यांचे जनजागरण करण्याचे काम सुरु केलेले आहे. त्याच बरोबर राज्य आणि जिल्हा स्तरावर महिलांना कायदे विषयक सल्ला देण्याची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. वरळी सी लिंकच्या बाबतीत एक चांगले काम या वर्षी केले गेले आहे याची आपल्याला कल्पना आहेच.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शुध्दीपत्रीकेपूर्वी नाही

श्री. भुजबळ ....

मी समजू शकतो की, सी लिंक ब्रिजच्या नावावरून आपले मतभेद जरूर असू शकतील. पण तेथे एक चांगले काम झालेले आहे, राजीव गांधी सी लिंक निर्माण झालेला आहे आणि जगामध्ये जे 5-6 ब्रिजेस आहेत ज्यांचा समावेश संस्मरणीय कामामध्ये होतो अशा दर्जाचा नव्हे त्यामध्ये सामावणारा असा हा पूल आपल्या राज्याने बांधलेला आहे. आज तो साऱ्यांच्या आकर्षणाचे ठिकाण झालेला आहे. निश्चितपणे त्याचा उपयोग मुंबईतील जी वाहतूक कोंडी होत आहे ती कमी होण्यात होईल याबद्दल मला शंका नाही. अर्थात या सी लिंकचे काम पूर्ण झालेले नाही, पण ते पूर्ण करण्याचा, तो संपूर्ण सी-लिंक पूर्ण करण्याचा आपण प्रयत्न करू. इन्फ्रास्ट्रक्चर आपण पूर्ण करीत आहोत. मुंबई शहरामध्ये आज या क्षणाला 50 हजार कोटी रूपयांची कामे सुरू आहेत. त्यात मेट्रो रेल्वे, मोनो रेल आणि स्कायवॉक सारखी कामे आपण घेतलेली आहेत. यापूर्वी मुंबई शहरामध्ये राज्य सरकारने इतक्या मोठ्या प्रमाणात कधी पैसा खर्च केला होता का ? आपण देखील महापालिकेमध्ये काम केलेले आहे आणि मी देखील काम केलेले आहे. पण आजवर कधीही नव्हे इतके काम या मुंबई शहरात महापालिकेच्या माध्यमातून सरकार करीत आहे आणि ते आपणाला कोणालाही नाकारता येणार नाही. जवाहरलाल नेहरू पुनरूत्थान योजनेच्या माध्यमातून हजारो कोटी रूपये मुंबई महापालिकेला आणि नाशिकला मिळाले आहेत तेवढे यापूर्वी कधीही मिळाले नव्हते. मुंबईच्या पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी डॅम बांधण्यासाठी मुंबई महापालिकेने यापूर्वी जागतिक बँकेकडून पैसे घेऊन कामे केलेली आहेत पण आता सरकारदेखील त्यात आपला हातभार लावत आहे. तेव्हा 'जय हो, जय हो' का झाले त्याचे कारण हे आहे हे मी आमच्या समोरच्या मित्रांना, विशेषत: माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर यांना सांगू इच्छितो. सभापती महोदय, मुंबई शहरातअसेल वा अन्य शहरात असेल, कारण जसे ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारने प्रयत्न केले .. मग त्यात त्यांचे असलेले कर्ज माफ करण्याची बाब असो, मी हेही मान्य करतो की, त्यांचे 100 टक्के कर्ज सरकारने माफ केले नसेलही पण तुमचे देखील राज्य या राज्यात होते पण त्यावेळी तुम्ही असे काही केले नाही. तुम्ही जे काही तेंव्हा केले त्यापेक्षा किती तरी जास्त काम आम्ही केले आहे व करीत आहोत. त्यामुळे जनतेने आम्हाला सांगितले की, तुम्ही चांगले काम केले आहे, म्हणून तुम्हीच राज्य करा. त्यासाठीच आम्हाला जनतेने पुन्हा संधी दिली आहे. सभापती महोदय, मला हेही माहिती आहे की,

.....5बी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भुजबळ ...

1982 मध्ये हुडकोच्या माध्यमातून टनेल करून नरिमन पॉईंट खालून जायचे असा विचार सुरू झाला होता. तेव्हा पासून अगदी या शहरात मेट्रो रेल्वे झाली पाहिजे हे आम्हीही 1975 सालापासून बोलतो आहोत. पण त्यानंतर कलकत्तामध्ये आणि दिल्लीमध्ये देखील मेट्रो रेल्वे धावू लागली. आता आपल्या या मुंबई शहरात देखील आपण मेट्रो रेल्वे आणीत आहोत, मोनो रेल्वे करीत आहोत. अशा प्रकारे जवळपास 50 हजार कोटी रूपये खर्चाचे काम मुंबईमध्ये होत आहे. नाशिकमध्ये देखील अशीच कामे होत आहेत. आम्ही असे म्हणत नाही की, मुंबई महापालिका तुमच्या ताब्यात आहे. मुंबई महापालिका शिवसेनेच्या ताब्यात आहे, मुंबईचे महापौरपद शिवसेनेकडे आहे तर मग कशासाठी हा इतका खर्च करायचा. मुंबईमध्ये 150 कि.मी.वरून पाणी आणण्याचे काम करताना महापालिका जागतिक बँकेची मदत घेत असते याची आम्हाला कल्पना आहे पण त्यात आम्ही देखील काही वाटा उचलण्याचे ठरविले आहे. यापूर्वी तसे केव्हाही झाले नव्हते. तेव्हा जे काही चांगले आहे त्याला आमच्या विरोधी मित्रांनी चांगले म्हणायला काय हरकत आहे ? या मुंबईवर, या महाराष्ट्रावर जसे तुमचे प्रेम आहे तसेच आमचेही आहे. आपल्या या शहरामध्ये कॉंग्रेस-राष्ट्रवादीच्या माध्यमातून जी काही चांगली कामे होत आहेत त्याला चांगले म्हणायला काहीच हरकत नाही. तेव्हा आमच्या बाबतीत 'जय हो' चा नारा का लोक देत आहेत हा जो प्रश्न मघापासून माननीय विरोधी पक्षनेत्यांना पडला होता त्यांना मी त्यामागील कारणे सांगत आहे. ...

(यानंतर श्री. सरफरे ....5सी 1 ...

अशुधारित प्रत / अशुद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ....

त्यामुळे यावेळी ग्रामीण भागात आणि शहरी भागात कॉग्रेस-राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचा "जय हो" चा नारा जनतेने दिला. आणि आम्हाला इथे आणून बसविले. तसेच, जनतेने हेही लक्षात घेतले की, तुम्ही विरोधी पक्षाचे काम अतिशय चांगले करीत आहात. ती जबाबदारी तुमच्याकडे दिली आहे. हे काम तुम्ही करावयाचे व ते काम त्यांनी करावयाचे अशाप्रकारे जनतेने आपल्या कामाचे वाटप केले आहे. त्यामुळे यापुढे सुध्दा तुम्ही ज्या सूचना किंवा टिका-टिप्पणी कराल त्यामधील योग्य असलेल्या सूचनांचा अभ्यास करुन निश्चितपणे चांगले काम करण्यात येईल. शेवटी तुम्हाला जनतेची सेवा करावयाची आहे, आणि आम्हालाही जनतेची सेवा करावयाची आहे. तुम्हाला महाराष्ट्राची सेवा करावयाची आहे, आणि आम्हालाही महाराष्ट्राची सेवा करावयाची आहे. तुम्हाला त्या ठिक्राणाहून सेवा करावयाची आहे, आणि आम्हालाही या ठिकाणाहून सेवा करावयाची आहे. या चर्चेमध्ये भाग घेत असतांना काही लोकांनी खेद व्यक्त केला तर काही लोकांनी अभिनंदन केले. आपणास झालेल्या खेदाबद्दल आपण घरी जाऊन थोडा विचार केलातर आपल्या मनामध्ये राहिलेला खेद कदाचित निघून जाईल . आणि आपल्यालाही चांगले काम झाले आहे असे वाटेल. आणि आपणही "जय हो" म्हणाल. धन्यवाद, जयहिंद, जय महाराष्ट्र.

सभापती : आता मी प्रस्ताव मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मूल्यवर्धित कर (कर बसविणे, सुधारणा व विधीग्राह्यीकरण) विधेयक

L.A. BILL NO XX OF 2009

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002).

श्री. विजय वडेट्टीवार (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान सभेने संमत केल्याप्रमाणे सन 2009 चे वि.स.वि. क्रमांक 20 महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

सभापती :विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.स.वि. क्रमांक 20 महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 6 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1 संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने वि.स.वि. क्रमांक 20 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : सन 2009 चे वि.स.वि. क्रमांक 20 संमत झाले आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाच्या कामकाजासंबंधी

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आजच्या कामकाज पत्रिकेमधील अनुक्रमांक 8 "शासकीय विधेयके" यामधील 1) वि.प.वि.क्रमांक 7 व 2) वि.प.वि.क्रमांक 9 ही दोन विधेयके आज चर्चेसाठी घेण्यात येणार नाहीत.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 11-12-2009 रोजी सकाळी 10.30 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 08 वाजून 46 मिनिटांनी,शुक्रवार, दिनांक 11-12-2009 रोजीच्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही